

५४

ISSN 0976-2957

## भारतीय इतिहासलेखन विशेषांक

साहित्य, कला, संशोधन व परिवर्तनवादी
पुरोगामी विचाराशी बांधिलकी ठेवणारे त्रैमासिक

# अक्षरगाथा

वर्ष : चौदावे । अंक : तिसरा
ऑक्टोबर–नोव्हेंबर–डिसेंबर २०२३

www.kalikasteels.com

KALIKA STEEL


# REDEFINING STEEL DEFINING FUTURE

Every project and every infrastructure needs strength and long lasting durability. We take pride in contributing to the future of the nation with steel that has stood the test of time.

**Kalika 550 are the most preferred TMT BARS** that are used in infrastructure projects such as Airports, Railways, Dams, Ports, Roads, Bridges, Stadiums, Power sector, Civil construction..... wherever there's need, Kalika Steel delivers.

GREENPRO Certification defines our products are Environmental Friendly, and NABL Accreditation proves that our Lab is Trustworthy for Quality.

TC 11702




**TMT Bars 6mm to 40mm | Dowel Bars 32 mm & 36 mm**
**Cut & Bend | CRS Bars | Coupler Friendly TMT Rebar**

साहित्य, कला, संशोधन व परिवर्तनवादी पुरोगामी
विचाराशी बांधिलकी ठेवणारे त्रैमासिक

# अक्षरगाथा

**वर्ष : चौदावे । अंक : तिसरा । ऑक्टोबर–नोव्हेंबर–डिसेंबर २०२३**

## भारतीय इतिहासलेखन आणि समकालीन राजकारण

संपादक : **मा. मा. जाधव**

- **कार्यकारी संपादक** : कमलाकर चव्हाण, भगवान फाळके
- **संपादक मंडळ** : दिलीप चव्हाण, बजरंग बिहारी, अनिल जायभाये, विवेक घोटाळे, संतोष सुरडकर
- **प्रकाशक** : अर्चना माधवराव जाधव, बळीवंश प्रकाशन, 'बळीवंश', नृसिंह पॅलेसच्या मागे, नरहरनगर, नांदेड –५.
- **मुद्रिततपासणी** चंद्रकांत गायकवाड, भ्र. ९९२१६९४५५४
- **मुद्रक** मुद्रा ऑफसेट प्रिंटर्स अँड प्रोसेसर्स, शारदा टॉकीजजवळ, एम. जी. रोड, नांदेड–०३.
- **मुखपृष्ठ** सरदार जाधव
- **अक्षर सजावट** विजयकुमार चित्तरवाड

**अक्षरजुळणी**
गिरीश कहाळेकर
भ्र. ९८९०५९७७१४

**साहित्य व वर्गणी पाठविण्याचा पत्ता**

मा. मा. जाधव
'बळीवंश', नृसिंह पॅलेसच्या मागे, नरहरनगर, नांदेड – ४३१ ६०५. भ्र. ९४२२८७४३३६, ९८८११९१५४३.
e-mail : akshargatha@gmail.com website : www.akshargatha.com

**वार्षिक वर्गणी** : व्यक्ती : ₹ ३००/– संस्था : ₹ ४००/– **त्रैवार्षिक वर्गणी** : व्यक्ती : ₹ ८००/– संस्था : ₹ १०००/–
**१० वर्षासाठी** : व्यक्ती : ₹ २५००/– संस्था : ₹ ३०००/– **अंकाचे मूल्य** : ₹ १००/–

मनीऑर्डर/रोखीने/धनादेश/धनाकर्ष/Phone Pay/Google Pay 9422874336/बँक खाते : भारतीय स्टेट बँक (State Bank of India)
यशवंतनगर, नांदेड 'अक्षरगाथा' खाते नं. **32204333102** वर **IFSC Code : SBIN0001922**

वर्गणी रक्कम + ₹ ३० (शाखा विनिमय फीस) भरून पत्ता कळवावा.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी,
या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच, असे नाही.

* या अंकातील लेखांतून व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक, मुद्रक आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

**पृष्ठ क्र.३** **(मुखपृष्ठ व मलपृष्ठासह या अंकाची एकूण पृष्ठसंख्या १३२ आहे)**

**UGC CARE listed and Peer Reviewed Journal**

५४

अक्षरगाथा

**ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०२३**

# । अनुक्रम ।


## विभाग पहिला

| | | |
|---|---|---|
| ■ अभिजनवादी इतिहासलेखन | डॉ. अनिरुद्ध देशपांडे | ५ |
| ■ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण : पाठ्यपुस्तके आणि इतिहासलेखन | डॉ. विकास गुप्ता | २० |
| ■ फुले-आंबेडकरी दृष्टीकोनातून इतिहासलेखन | डॉ. उमेश बगाडे | ३६ |

## विभाग दुसरा

| | | |
|---|---|---|
| ■ ब्रिटिशांचा इतिहासलेखन उद्देश | डॉ. दिनकर मुरकुटे | ४४ |
| ■ इतिहासाच्या ब्राह्मणीकरणाचे राजकारण | प्रा. सचिन गरुड | ४९ |
| ■ शिक्षणाचा इतिहास आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण | डॉ. मिलिंद वाघ | ५६ |
| ■ क्रांती आणि प्रतिक्रांती | कॉम्रेड शरद पाटील | ६३ |

## विभाग तिसरा

| | | |
|---|---|---|
| ■ धर्म, मध्ययुगीन भारताविषयीचे मार्क्सवादी... | प्रा. मनोहर सुभाष निकम | ७२ |
| ■ शिवकालीन इतिहासलेखन, विकृती आणि... | डॉ. श्रीमंत कोकाटे | ८० |
| ■ मराठवाड्याच्या मध्ययुगीन इतिहासाचे पुनर्लेखन | सरफराज अहमद | ८३ |
| ■ समकालीन संक्रमणाला भिडलेले क्रांतिकारी धुरीणत्व | उमेश बगाडे | ९९ |

## विभाग चौथा

| | | |
|---|---|---|
| ■ इतिहासाच्या कक्षा रुंदावणारा अभ्यासक कार्यकर्ता | डॉ. संगीता ठोसर,<br>डॉ. राजू जाधव | ११८ |
| ■ सातवी विवेक जागर परिषद - इतिवृत्त | | १२६ |

**विभाग पहिला**



# अभिजनवादी इतिहासलेखन

■

**डॉ. अनिरुद्ध देशपांडे**
इतिहास विभाग, दिल्ली विद्यापीठ, दिल्ली,
भ्र. ९८१०२५४२५३

**अनुवाद– प्रा. प्रमोदकुमार जायभाये**
इंग्रजी विभागप्रमुख, संत रामदास कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, घनसावंगी,
जि. जालना–४३१२०९ भ्र. ९४२२१९६६

दि. ७ व ८ ऑक्टोबर २०२३ रोजी लोकायत विचारमंच आयोजित सातवी विवेकजागर परिषद जालना येथे संपन्न झाली. या परिषदेत 'भारतीय इतिहास लेखन व समकालीन राजकारण' या मध्यवर्ती विषयावरील '**अभिजनवादी इतिहासलेखन**' या विषयावर केलेल्या मांडणीचे शब्दांकन अक्षरगाथाच्या वाचकांसाठी प्रसिद्ध करीत आहोत.

मी सन २०१५ यावर्षी श्री. गोविंद पानसरे लिखित 'शिवाजी कोण होता?' या मराठी पुस्तकाच्या इंग्रजी भाषांतराच्या आवृत्तीचे संपादकीय संकलन केले. मी कल्पना केली नव्हती की, मी इथे आपणासमोर येऊन धार्मिक इतिहास लेखनाच्या संदर्भाने उपस्थित होणाऱ्या प्रश्नांच्या संदर्भाने आपणास संबोधित करेन. ज्याला मराठीत आपण 'अध्यात्मवादी इतिहासलेखन' असे संबोधता तेच हिंदी भाषेत 'अध्यात्मिक इतिहासलेखन' म्हणून ओळखले जाते. मला वाटलं की, ही माझी जबाबदारी आहे की, मी आपल्यासमोर येऊन व्यक्त झाले पाहिजे. 'इतिहासलेखन' या विषयावरच्या संभाषणासाठी मी त्याचा आकृतिबंध तयार केला पाहिजे, जो वर्तमानकालीन आणि भविष्यकालीन इतिहासलेखनाचे सौंदर्य खुलवणारा महत्त्वाचा पैलू ठरेल, ज्याची ऐतिहासिक व राजकीय महत्त्व ठरवण्यासाठी उपयुक्तता ठरेल.

विषय खूप मोठा आहे. तसा आजवरचा इतिहास हा अभिजन वर्गानेच लिहिला आहे. कारण, प्रत्येक समाजातील शिक्षण घेण्याचे कार्य हे केवळ अभिजन लोकच करत होते. ज्या लोकांना आपण वंचित समूह (subaltern masses) असे संबोधतो, ज्यांना आपण कष्टकरी वर्ग म्हणतो, शेतकरी म्हणतो, आदिवासी म्हणतो, बहुजन समाज म्हणतो वा समाजातील सामान्य लोक असेही संबोधतो. अगदी पूर्वीपासून जे आजच्या अगदी विसाव्या शतकापर्यंत ज्यांना शिक्षण घेण्याची मुभा नव्हती ते वाचू- लिहू शकत नव्हते, त्यांनी भक्ती संप्रदायातील संत निर्माण केले, जे थोडेबहुत वाचू – लिहू शकत होते. त्यांचे लिखाण त्यांनी निर्माण केले. परंतु सर्वसाधारणपणे कायद्याने प्राचीन काळातील मध्ययुगीन सरंजामशाही कालखंडातही त्यांना शिक्षण घेण्यास बंदी होती. कायद्याने त्यांना शिक्षणास प्रतिबंध होता आणि जे कोणी शिक्षण घेण्याचा, अक्षरओळख करून घेण्याचा

प्रयत्न करत त्यांना भयानक कठोर अशा शिक्षेस सामोरे जावे लागत असे. तर अशा परिस्थितीमध्ये भूतकाळात जे इतिहास लेखनाचे काम झाले आणि जेवढेही ग्रंथ लिहिल्या गेले, ऐतिहासिक ग्रंथ लिहिल्या गेले, ज्याला आपण मिथके म्हणा, कविता म्हणा, पोवाडे म्हणा, राजा-राणीच्या कथा म्हणा, राजकीय इतिहास लिहिलेला असू द्या किंवा पुराण घ्या हे सर्व काही लिखाण शिक्षित लोकांनीच लिहिले आहे. आणि ही सर्व शिकली- सवरलेली मंडळी सामान्यतः अभिजन वर्गातूनच आलेली असत. तर हे ठरलेलं गणित आहे, जाहीर आहे- त्यांच्या सर्व इतिहास लेखनात एकच 'अभिजनवादी तत्त्व' आढळून येते.

या सर्व पार्श्वभूमीवर मी आपल्यासमोर माझी काही निरीक्षणे नोंदवू इच्छितो. परंतु मी तुम्हाला 'अभिजनवादी इतिहासलेखन' (Elitist Historography) संदर्भात काही सांगण्यापूर्वी, सर्वप्रथम आपण हे जाणून घेतले पाहिजे की- इतिहास म्हणजे काय? इतिहासलेखन काय असते? इतिहास लेखनाच्या एक नव्हे, तर अनेक व्याख्या आपणास आढळून येतात. त्यास अनेक प्रकारे परिभाषित केले गेले आहे.

आपण एका गृहीतकापासून सुरुवात करू या. गृहीतक असे की - 'इतिहास हे संस्कृतीचे चरित्र / वर्णन असते'. जर इतिहास संस्कृतीचे वर्णन (चरित्र लिखाण) असेल तर त्याचा महत्त्वाच्या प्रश्नांशी संबंध येणार नाही का? ते इतिहासलेखन संपूर्णतः लिहिल्या गेलेला इतिहास असेल? मी या ठिकाणी मौखिक इतिहाससंदर्भात बोलत नाहीय. मौखिक इतिहास (oral history) बद्दल मी बोलत नाही. आपण मौखिक परंपरा (oral tradition)बद्दल बोलू शकतो, जो एका अंगाने एखाद्या प्रकारच्या इतिहासाला स्मृतीमध्ये ठेवण्याचा प्रयत्न असू शकेल आणि जो पुढे एका पिढींकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित केला जात असतो. जर आपण इतिहास लेखनासंदर्भात बोलत असू किंवा इतिहासाला लक्षात ठेवण्याचा विचार करत असू तर आपण इतिहासाला आठवणींच्या कप्प्यात दडवून ठेवतो.

इतिहास काय आहे? इतिहासाची सुरुवात केव्हापासून झाली? मनुष्य आणि जनावर यात फरक केल्या जाऊ शकेल की, प्राण्यांच्या डोक्यात भूतकाळ, वर्तमानकाळ किंवा भविष्यकाळ यांची कल्पना असत नाही. ती केवळ मानवामध्ये असते. आणि मनुष्य त्याच्याजवळ असणाऱ्या कल्पनाशक्तीच्या आधारे भूतकाळाला भविष्याशी सांधण्याचा प्रयत्न करताना दिसून येतो. हे भूतकाळ आणि भविष्यकाळ यांना जोडण्याच्या प्रयत्नात तो वर्तमानात जगत असतो. इतिहासालाही अशाच प्रकारे समजून घेण्याचा आपण सर्वजण प्रयत्न करत असतो. आणि 'संस्कृती' नावाची गोष्ट या सर्व प्रयत्नांतून उदयाला येत असते. भविष्याचा वेध घेण्याच्या कल्पनेतूनच 'संस्कृती' नावाच्या घटकाचा जन्म होत असतो. यातच कौशल्य, तंत्रज्ञान, स्वतःच्या मोठेपणाच्या गोष्टी सांगणे, त्यातच भाषा, आकलन, विचारशक्ती अशा प्रकारच्या बाबी दडलेल्या असतात.

त्यामुळे मग संस्कृती/ सभ्यता कोण निर्माण करतं? या मूलभूत प्रश्नांशी भिडायला होतं. संस्कृती जन्माला कोण घालतं? की संस्कृती केवळ तेच लोक निर्माण करतात जे इतिहास लिहितात? किंवा संस्कृती निर्माण करण्यात, घडवण्यात त्या लोकांचाही तेवढाच हातभार असतो, जे इतिहास तर लिहीत नाहीत; पण इतिहास मात्र घडवतात? कारण, उत्पादनाच्या शिवाय इतिहासाची आपण कल्पनाही करू शकत नाही. आता आपण इथे बसलो आहोत. वर्षानुवर्षे लोक अशीच बसायची, उठायची, भाषेद्वारे परस्परांशी संवाद साधायची, जेवायची, कौशल्य वापरायची, वस्तूंचा/ उत्पादनांचा वापर करायची. ही जी इतिहासाच्या व्याप्तीमधील भौतिकता आहे, ही भौतिकता घडविण्यात इतिहासातील मजूर आणि शेतकरी (कुणबी) यांचे फार महत्त्वपूर्ण योगदान आहे. आणि अभिजनवादी (अभिजात्य) इतिहासलेखन या योगदानाकडे

जाणीवपूर्वक दुर्लक्ष करताना दिसून येते. त्यामुळे अभिजनवादी इतिहास लेखनाच्या (Elitist Historography) 'संस्कृती' या घटकासंदर्भात जो दृष्टिकोन असतो तो गैरअभिजनवादी इतिहास लेखनापेक्षा वेगळा असतो.

दोन मुख्य प्रवाह इतिहास लेखनासंदर्भात आपोआप आपणास प्राचीन काळापासून आढळून येतात. आपण सर्वसाधारणपणे म्हणू शकतो की, हेच जर आपण भारत देशाच्या संदर्भात याची मांडणी करण्याचा प्रयत्न करत असू, तर साधारणतः मी असं म्हणतोय - असं नाहीये की, यात छोट्या-छोट्या इतर काही मांडणीचे पद्धती, प्रकार नाहीत. एक तुम्हाला खूप जुनी ब्राह्मणवादी पद्धत इतिहासाकडे बघायची, समजून घेण्याची आपल्यासमोर दिसून येते. ज्याने आपल्या संदर्भीय/असंदर्भीय हिंदू अभिजनवादी दृष्टिकोनाचा सर्वात मोठा भाग व्यापून टाकला आहे, तो आपणास दिसून येईल. आणि आपल्यासमोर दुसऱ्या बाजूला इतिहासात कोणत्या घटना घडल्या? इतिहासातील कोण कोण माणसे होती? ती काय करत होती? त्यांची विचारपद्धती कशी होती? ते इतिहास या गोष्टीकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहत होते? हे आपणाला इतिहासात ज्यांची ओळख विज्ञानवादी पंथ म्हणून ओळखले जाणारे बौद्ध दर्शन व जैन दर्शन यातून होते. या ज्या समाजात प्राचीन काळापासून चालत आलेल्या सकारात्मक परंपरा आहेत, ज्या मध्ययुगीन कालखंडात भक्ती संप्रदायांमध्ये परावर्तित होताना दिसून येतात, यामध्ये इतिहासाची जी कल्पना केलेली आहे ती आपल्याला 'डेट ऑफ फुड्स' सारख्या पुस्तकातून आढळून येते. याची मांडणी रविदासांनी केली आहे. हे पुस्तक सर थॉमस मन् रो यांच्या 'युटोपिया' या पुस्तकासारखे भासते. एका अशा समाजाची कल्पना - ज्यामध्ये सर्व लोक समान आहेत, हे सर्व लोक सोबत असूनसुद्धा एका समता असलेल्या इतिहासाला सोबत घेऊन जगत आहेत आणि समतेच्या इतिहासाची कल्पना करत आहेत.

तर हे दोन मुख्य प्रवाह आहेत. दोन सर्वसाधारणपणे मुख्य प्रवाह आहेत जे आपणास आपल्यासमोर इतिहास लेखनामध्ये आणि इतिहास दर्शन यात आढळून येतात. आणि खूप पूर्वीपासून भारताच्या इतिहासात दिसून येण्यास सुरुवात झाली आहे. आणि म्हणून एकदा का संस्कृतीची व्याख्या केली, तिच्याबद्दल वर्णन केल्या गेलं, की तुमचा दृष्टिकोन हा तुम्ही संस्कृतीची व्याख्या/ मांडणी कशी करता यावर अवलंबून असतो. तुमच्या मते, संस्कृती नेमकी काय आहे? आणि जर तुमच्याकडून संस्कृतीची व्याख्या करून झाली, संस्कृतीची म्हणजे मानवी संस्कृतीची, तर त्याच्यानंतर इतिहासकार असणाऱ्याचे एक खूप महत्त्वाचे कार्य आपल्यासमोर प्रकट होण्यास सुरुवात होते, आणि ते कार्य असं असतं की- इतिहास लिहिताना, त्याची मांडणी करताना, इतिहासकाराला हे दर्शवावे लागते की, संस्कृतीची घडण कशी होते? ती कशी बदलत जाते? संस्कृतीचे केवळ वर्णन करून चालत नाही की संस्कृती केवळ काळासोबत कशी आकाराला आली? त्या त्या भूप्रदेशावर कशी निर्माण झाली? हजारो वर्षांच्या काळाच्या पोटात संस्कृती निर्माण झाली आणि इतिहासकाराचे काम केवळ वर्णन करणे एवढेच नाही तर संस्कृती निर्माण होण्याची कारणे शोधणे हेही आहे.आणि जेव्हा तुम्ही संस्कृतीच्या निर्माणामागची कारणमीमांसा करता तेव्हाच तुम्हाला अभिजनवादी इतिहासलेखन आणि गैर- अभिजनवादी इतिहासलेखन यातील फरक ठळकपणे समजायला होते. या दोन्ही प्रकारच्या इतिहासलेखनाचा इतिहासाकडे पाहण्याच्या सैद्धांतिक दृष्टिकोनात फरक आढळून येतो.

दोन्ही इतिहास लेखनाचा इतिहासाकडे बघण्याचा जो दृष्टिकोन आहे, जो सिद्धांत आहे, तो वेगवेगळ्या प्रकारचा आहे. आणि हा खूप जुना आहे. हे असं नाही की, आज जी चर्चा होते ती इतिहासात खूप वर्षांपासून चालत आलेली आहे. मी माझ्या या संबोधनात या चर्चांचा उल्लेख पुढे करणार आहे.

प्रश्न हा निर्माण होतो की - इतिहास कोण

बदलतो? मला इथे आपण आयोजक मंडळींनी इतिहासाचा प्राध्यापक म्हणून बोलावलं, तर मी आपल्यासमोर एक इतिहासकार म्हणून प्रस्तुत झालो. मी काही तत्त्वज्ञ नाही, मी इतिहासकार आहे. आणि इतिहास या विषयात सर्वात महत्त्वपूर्ण आणि सर्वात अवघड प्रकरण हे इतिहासाच्या बदलाला सत्य करून दाखवणे आणि त्याचे स्पष्टीकरण देणे हे असते. एक जबाबदारी म्हणून विचार केला तर समाजशास्त्रज्ञ म्हणून, मानववंशशास्त्रज्ञ म्हणून व आपण त्याला काय म्हणू शकतो की- संरचनात्मक कार्यप्रणाली इतिहासाचे वर्णन करणे हे इतिहासकाराचे काम नाही. आमचं काम हे बघणं आहे की- का? आणि कसा समाज बदलत गेला? कोण आहेत त्याच्या बदलाचे घटक?

आणि दुसरं म्हणजे, अभिजनवादी लोकांनी समाज बदलवला. त्याचबरोबर असे लोक, ज्यांचा उल्लेख अभिजनवादी लोकांकडून इतिहासात केला गेला नाही, ते लोक खऱ्या अर्थाने समाज गतीने बदलवण्याच्या प्रक्रियेतील सर्वात महत्त्वपूर्ण घटक ठरतात. आणि म्हणून जी पुरोगामी चळवळ, प्राकृतिक आंदोलने भारतात दिसून येतात, तर जगभरात काही लोकांमध्ये इतिहासाला बदलवून टाकण्याचा जो आत्मविश्वास आहे, तो विश्वास निर्माण करणे हे या आंदोलनाचे काम आहे. जोपर्यंत सामान्य लोकांमध्ये हा विश्वास निर्माण होणार नाही की, तेच खऱ्या अर्थाने इतिहास निर्माण करणारे घटक आहेत, आणि फक्त इतिहासाचे बळी आहेत, तोपर्यंत ते इतिहासाचे दूत बनू शकणार नाहीत. त्याचबरोबर इतिहास असा-असा आपल्या समस्येच्या विकासाच्या अनुषंगाने बदलावा लागेल तसा इतिहास ते बदलवू शकणार नाहीत, ते केवळ अभिजात वर्गाची तुतारी फुंकत बसतील.

इतिहासात ज्या-ज्या मोठ्या क्रांत्या घडून आल्या, मग ती अमेरिकन राज्यक्रांती असो, फ्रान्सची क्रांती, रशियन राज्यक्रांती, चिनी राज्यक्रांती, भारतातील वेगवेगळ्या प्रकारचे विद्रोह असोत, मध्यकालीन युगातील असो किंवा आधुनिक युगातील असो, किंवा भांडवलशाही युगातील असोत, ही जी मोठी- मोठी आंदोलने झाली, बंड-उठाव झाले, शेतकऱ्यांचा उठाव झाला, कामगारवर्गाच्या मोठ्या मोठ्या चळवळी झाल्या, हजारो -लाखो लोकांनी आपल्या प्राणांचे बलिदान त्या चळवळीत दिले, कितीतरी रक्ताचे पाट वाहिले असतील इतिहासात. हे तेव्हाच घडून आलं, जेव्हा लोकांनी आपल्या स्वतःच्या हक्कांसाठी संघर्ष केला. आणि जगाला सांगण्याचा प्रयत्न केला की, ते गुलाम राहू इच्छित नाहीत, ते गुलामगिरीतून मुक्त होऊ इच्छितात. आणि म्हणून असा इतिहास जो गुलामांचा आणि गुलामांच्या बंडखोरीचा आहे. जर इतिहास हा गुलामांचा असेल तर तिथे गुलामांच्या उठावाचाही इतिहास असलाच पाहिजे. दोन्हीही इतिहासाचे वाचन अशावेळी अत्यंत गरजेचे ठरते. आणि म्हणून अभिजनवादी दृष्टिकोनातून लिहिला गेलेला इतिहास आणि गैर-अभिजनवादी दृष्टिकोनातून मांडलेला इतिहास या महत्त्वपूर्ण प्रश्नांचे उत्तर अगदी स्वच्छपणे आपल्याला दिसून येते.

इतिहासाबद्दलचा 'अभिजनवादी दृष्टिकोन' आणि इतिहासाबद्दलचा 'लोकप्रिय दृष्टिकोन' ज्याला आपण इतिहासकाराच्या भाषेत 'लोकप्रिय इतिहास' असेही म्हणतो. तर एक झाला अभिजात्य इतिहास (अभिजनवादी इतिहास) अभिजनवादी वर्गाने लिहिलेला इतिहास आणि एक आहे - लोकप्रिय इतिहास ( popular history ) जो लोकांच्या दृष्टिकोनातून येतो किंवा ज्यास आपण म्हणतो की, तळागाळातील लोकांच्या दृष्टिकोनातून (history from below) चा इतिहास. एक असतो शिखर दृष्टिकोन (Top term perspective), आणि एक असतो सामान्य दृष्टिकोन (history from below) या आणि या दोन्ही प्रकारचा इतिहास व दोन्ही प्रकारचे इतिहासलेखन यांनासुद्धा खूप मोठा इतिहास आणि या दोन्ही त्याच्या काळात त्यांचा प्रवास अव्याहत सुरू ठेवला आहे. आणि हे सर्व समजून घेत- हे आकलन करून घ्यावे लागेल की, हा जो 'अभिजनवादी इतिहासलेखन' आणि

'लोकप्रिय इतिहासलेखन' यांच्यातला संघर्ष हा केवळ एका वर्गखोलीमध्ये शिकवण्याचा विषय आहे, ही भूतकाळात घडून गेलेली घटना आहे ही वास्तविक घडलीच नसेल, हे सर्व मानून घेणे म्हणजे आपण आपलीच केलेली फसवणूक असेल. कारण, हा संघर्ष जोपर्यंत समाजात वर्ग संघर्ष असेल, जोपर्यंत समाजात जाती - संघर्ष असेल, जोपर्यंत समाजात लिंगभेद संघर्ष असेल, जोपर्यंत समाजात तृतीयपंथी वर्गसमूहाचा संघर्ष असेल,' जोपर्यंत हे संघर्ष समाजात चालत राहतील, तोपर्यंत हे दोन्ही दृष्टिकोनसुद्धा एकमेकांसमोर शड्डू ठोकून एकमेकांना लोळवण्याचा प्रयत्न करतील. संघर्ष करत राहतील. आणि म्हणून हा संघर्ष म्हणजे वर्चस्ववादी आणि शोषित, वंचितांचा संघर्ष होय. यावर मी नंतर प्रकाश टाकणारच आहे.

पण खेदाची गोष्ट म्हणजे, दुर्दैवाने अभिजनवादी इतिहास हा लोकप्रिय इतिहासापेक्षा अधिक लोकप्रिय आहे. तो लोकप्रिय इतिहास जो तळागाळातील लोकांनी लिहिलेला आहे. सत्यता शोधली तर आपणास निश्चितपणे आढळून येईल की, अभिजनवादी इतिहासवर्णन हे जास्त लोकप्रिय आहे. अभिजनवादी इतिहास वर्णन समाजात जास्तीत जास्त लोकप्रिय असण्याचे कारण या सत्तारूढ वर्गाची समाजावरील वर्चस्ववादी पोलादी पकड. म्हणून खऱ्या अर्थाने इतिहास राज्यशास्त्राची बालवाडी आहे.

आतापर्यंत जेवढे तत्त्वज्ञान, सिद्धांत असतील, मग ते साम्यवादाचे असू देत, फॅसीझमचे असू देत, नाझीझमचे असू देत, ही सर्व तत्त्वज्ञाने अगदी मुळापासून तळागाळातील आहेत. आणि जर समाजात आपण एका ठिकाणी उभे राहून मूलभूत निरीक्षण करू, तर आपणास असे दिसून येते की, ज्या लोकांच्या विरुद्ध हे शासन सरकार काम करते, ज्या लोकांचे अभिजनवर्गाबरोबर खूप खोलवर जाणारे अंतर्विरोध आहेत तेच लोक जर अभिजनवादी दृष्टिकोनास वर्चस्व मिळवण्याचा दृष्टिकोन मानून चालत असतील तर, त्याचा अर्थ आपल्या शैक्षणिक व्यवस्थेमध्ये ज्या पद्धतीचा इतिहास शिकवला गेला आहे, मागील शंभर ते दीडशे वर्षांपासून, कमीत कमी मी असे म्हणू शकेन की, इसवी सन १८५७ साली भारतात महत्त्वाच्या ठिकाणी विद्यापीठांची स्थापना केली गेली. जसे की मुंबई, मद्रास आणि कलकत्ता यांची स्थापना एकाच वर्षात झाली.

आपल्या महाराष्ट्रातील दोन महत्त्वाचे विद्वान, प्राच्यविद्वान रा. गो. भांडारकर आणि थोर मराठा राष्ट्रवादी इतिहासकार आणि समाजसुधारक न्या. म. गो. रानडे. ही दोघेही मुंबई विद्यापीठाची फलिते म्हणू या. आमच्या काळातील तेव्हा लोकप्रिय, प्रसिद्ध असलेले रानडे यांचे 'मराठा सत्ता संघर्षाचा उदय' (The Rise of Maratha Power) तुम्ही वाचून पाहा! तुम्हाला आठवेल किंवा नाही आठवणार; पण माझ्या मते, आपणाला त्यात खूप स्पष्टपणे अभिजनवादी इतिहासाचा दृष्टिकोन दिसून येतो. मी त्याला इतिहासाचा ब्राह्मणवादी अभिजात दृष्टिकोन असेच म्हणेन. जो ब्राह्मणवादी समग्र औपचारिक दृष्टिकोनापेक्षा काकणभरही कमी भरणार नाही. त्या पुस्तकात आपल्याला दिसून येईल की, मध्ययुगीन कालखंडात मराठी भाषा बोलणाऱ्या मराठ्यांचे राष्ट्र शोधण्याचा, सोळाव्या व सतराव्या शतकातील युरोपियन इतिहासलेखनाच्या धर्तीवर 'मराठ्यांचा इतिहास' निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचे लिखाण म्हणजे दुसरे तिसरे काहीही नसून संपूर्णपणे युरोपियन इतिहास लेखनाची केलेली नक्कल होय.

थोडं क्षणभर थांबून अभिजनवादी इतिहास एवढा लोकप्रिय का आहे? त्याची कारणे काय आहेत? ती आपल्याला समजली पाहिजेत. जर अभिजात्य इतिहास एवढा लोकप्रिय नसता, तर मला तुमच्यासमोर भाषण देण्याची काहीही गरज नव्हती. आपला विजय झालाच होता म्हणायचे मग! परंतु लोकप्रिय इतिहासाचा दृष्टिकोन लोकप्रिय नाही म्हणून एकप्रकारे तो आपला पराभवच आहे. यासाठी हे समजून घेणे खूप महत्त्वाचे ठरेल ते म्हणजे अभिजात दृष्टिकोन काय आहे? हे समजून

घेण्याचा प्रयत्न करावा. हे जणू असं आहे की -ज्या शत्रूला तुम्हाला पराभूत करायचे आहे, त्याला समजून घेण्याचा तो प्रयत्न असेल.

अभिजनवादी इतिहास हा नेहमी शासक वर्गाचा राहिला आहे, तो त्या अपरिहार्य कारणांमुळे. त्याला नेहमी राज्यामार्फत उत्तेजन दिल्या गेले आहे, जो की शासकवर्गाच्या नियंत्रणात आणि अधिपत्याखाली आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, आजच्या काळातही मागील ४०-५० वर्षांपासून तेच चालू आहे. आपणास आढळून येईल की, अभिजनवादी इतिहास हा खऱ्या अर्थाने वर्चस्ववादी कथांचा इतिहास आहे. जो माध्यमाद्वारे तुमच्या- आमच्यात फार शिताफीने पेरला जातो. आणि तुम्ही ते समजून घ्या की, जवळपास हा संपूर्णपणे शासकवर्गाच्या विचारधारेचा हमरस्ताच असतो. ज्याला ग्रामसी (Antonio Gramsci- Italian Neo Marxist writer) शासकवर्गाच्या सिद्धांताचा मार्ग म्हणून संबोधतो.

म्हणून मी आता जरा अभिजनवादी इतिहास लेखनाच्या मुख्य वैशिष्ट्यांचा शोध घेण्यासाठी वळतो. ज्याचा मी थोडा उल्लेख नंतर माझ्या बोलण्यात करेन.

एक महत्त्वाचा मुद्दा, तसे काही आणखी महत्त्वाचे मुद्दे आहेत, ज्यांची मला नोंद घेणे गरजेचे वाटते. ज्यावर मला माझे भाषण झाल्यानंतर आपणाला बोलता येईल. त्यावर आपण काळजीपूर्वक लक्ष द्यावे असे मला वाटते.

अभिजनवादी इतिहासलेखन ज्याला आपण एका वेगळया संज्ञात गुंफूया. हिस्टरीआॅलॉजी (Historology) हिस्टरीओलॉजी म्हणजे इतिहासशास्त्र. ज्यात तुम्हाला इतिहास आणि मिथक यांचे मिश्रण दिसेल. म्हणून मी फॅन्सीना यांनी उद्धृत केलेल्या 'हिस्टरीओलॉजी' मराठीत ज्याला 'इतिहासशास्त्र' म्हणतात, त्या संज्ञेचा वापर करेन. एका अर्थाने मूलतः तो पौराणिक इतिहास (mythological history) आहे. जो विद्यार्थ्यांना सांगितला जातो, लोकांना सांगितले जातो आणि पुढे पुढे अनेक घटकांपर्यंत त्याला पोहोचवले जाते.

जेव्हा तुम्ही त्याला इतिहासशास्त्र (Historology)असं म्हणता, पोवाडा, धर्मशास्त्र, महाकाव्य, वीरकथा यात तुम्हाला ते आढळून येईल. आणि भारतीय इतिहास तुम्हाला राजकीय इतिवृत्तांतात /बखरीमध्ये सापडेल. जे राजकीय इतिवृत्त लिहिल्या जात असत.

जे राजकीय इतिवृत्त किंवा बखर लिहिले जात असते ते दरबारी इतिहासकार असत. त्यांनी इतिहासाचे मोठे-मोठे ग्रंथ लिहिले. मध्ययुगीन कालखंडात आणि प्राचीन कालखंडात लिहिलेला राजे - महाराजे यांचा इतिहास आहे आणि तो इतिहास केवळ त्यांचेच गुणगान करताना दिसतो. मग तो पोवाडा असो, शायर असो, कवी असो किंवा स्वच्छंद इतिहासकार असो. या पद्धतीने लिहिलेला इतिहास हा खूप जुना इतिहास आहे. तो होमरच्या 'इलियड' आणि 'ओडिसी' पर्यंत जातो. आणि आपल्या देशात 'रामायण' व 'महाभारत' यासारख्या महाकाव्यातून इतिहासाचे दर्शन आपल्याला घडून येते. किंवा तुमच्या पौराणिक कथा ज्या पुराणात तुम्हाला सापडतात, तो पण एक इतिहासच आहे. एका प्रकारे ज्याला आपण 'आख्यान' असे संबोधतो. प्राचीन काळात किंवा प्राचीन काळातील भाषेच्या संदर्भात त्याला आख्यान म्हटले गेले आहे. आणि अशाच प्रकारचा इतिहास तुम्हाला महाराष्ट्रात सर्व प्रकारच्या इतिहासात नाही. परंतु काही बखरींच्या इतिहासात त्याच प्रकारचे वर्णन तुम्हाला पाहायला मिळते, शायरीमध्ये दिसून येते. छत्रपती शिवाजी महाराजांविषयी भूषण यांच्या कवितेत, कवी भूषण यांच्या आख्यानमध्ये तुम्हाला दिसून येईल. तर आपण जेव्हा बघू की, आपल्याजवळ प्राचीन काळापासून आजपर्यंत लिहिला गेलेला जो सर्व इतिहास आहे, त्यात साधारणपणे आपल्यासमोर असं मानून घेऊ या की, ९०% इतिहास आपल्याकडे अभिजातीय वर्गाचाच इतिहास आपल्याला आढळून येतो. सर्वसाधारणतः आपल्या इथे असणारे कष्टकरी, शेतकरी हे युरोपातील

कामगार व शेतकऱ्यांच्या तुलनेत अशिक्षित दिसून येतात. इथे शिक्षणाची परंपरा दिसत नाही. अक्षरओळख नसे, लोकांना शिक्षण दिल्या जात नसे, त्यामुळे साक्षरता नव्हती. त्यामुळे त्या लोकांची कुठलीही लिखित साधने दिसत नाहीत. युरोपमध्ये पंधराव्या व सोळाव्या शतकानंतर जी लाट आली आणि साक्षरतेकडे ख्रिश्चन सुधारकांनी जाणीवपूर्वक लक्ष देण्यास सुरुवात केली. तिथे १७,१८ व १९ व्या शतकापर्यंत साक्षरतेच्या पातळीत कमालीची लाट दिसून आली, त्याचा परिणाम असा झाला की, युरोपियन इतिहासात आपल्याला खूप सारे कामगारवर्गाचे, शेतकरीवर्गाचे व कारागीर / बलुते यांचे दस्तावेज पाहायला मिळतात.

आणि एक प्रकार असतो तो इतिहास अंदाजे अनुमानाने लिहिणे आणि दस्तावेजाआधारे इतिहास लिहिणे, जे लोक आपल्या अनुभवाधारे लिहून लोकांमध्ये प्रसृत करून जात असत. तर या दोन्ही इतिहासात आपल्याला खूप मोठे अंतर दिसून येते. त्यात दृढता आहे. युरोपियन इतिहास लेखनाच्या पार्श्वभूमीवर लोकप्रिय इतिहासात त्यांचे संकेत पाहावयास मिळतात. ते सर्व युरोपमधून येताना दिसतात. त्यांचे सरळसरळ कारण असे आहे की, जो वर्ग तिथे निर्माण झाला, ही परिस्थिती तिथे निर्माण झाली. विशेषतः सोळाव्या व सतराव्या शतकातील घडून आलेल्या युद्धाने अशी परिस्थिती निर्माण केली. मुद्रणकला व्यवसायावर दिलेला भर आणि त्याचा विस्तार यामुळे तो तिथे खूपच लोकप्रिय झाल्याचे आपल्याला दिसून येते.

आपल्याकडे ती मुद्रण/ प्रकाशन संस्कृती १९ व्या शतकापासून विकसित होण्यास सुरू झालेली दिसून येते. त्याअगोदर आपल्याकडे सर्व संस्कृती ही मौखिक परंपरेची होती आणि सामान्य व्यक्तीकडे तेवढा वेळ नव्हता. अधिकचा वेळ नसायचा. तशा सुविधा नसत. तेवढं तेल जाळण्यासाठी, दिव्यासाठी तेल नसायचं, तेवढ्या मेणबत्ती नसायच्या की, ते एका ठिकाणी बसून स्वतःचा इतिहास लिहितील. तर एक म्हणजे, जी साधने आपल्याकडे भारतात, आशियामध्ये लोकप्रिय इतिहासाची संदर्भीय साधने यांच्या तुलनेत कमी होती. आणि ९०% इतिहास आपल्याकडे जो लिहिला गेला तो सुखवस्तू वर्गाने लिहिला आहे आणि हा सुखवस्तू वर्ग हाच बव्हंशी शासकवर्ग असायचा.

याचा अर्थ असा की, जो लिहिला गेलेला खालच्या स्तरातून/ वर्गातून किंवा स्थानिक लोकांच्या इतिहासाचा उदय होण्यापूर्वी, ज्याला नंतर अँटोनियो ग्रामसीच्या शब्दात वंचितांचा इतिहास (Subaltern History) हे नाव दिले, तो अपरिहार्यपणे अभिजनवादी इतिहास आहे? हा दुसरा प्रश्न आहे. इतिहासाचे लेखन जर अभिजात्य करत असेल तर अभिजनवादी इतिहासलेखनच आहे असे म्हणणे गरजेचे आहे का? हा दृष्टिकोनातील फरक आहे. जसा वसाहतीक इतिहास आणि वसाहतवादी इतिहास लेखनातला फरक आहे. म्हणून दुसऱ्या बाजूला काही इतिहास हे ‘लोकप्रिय इतिहास’ असल्याचा दावा केला जातो. तो प्रत्यक्षात एक प्रकारचा अभिजनवादी इतिहास असू शकतो. जसं की, विसाव्या शतकात पोहोचेपर्यंत आपल्याला अशा इतिहासाची ओळख करून दिल्या जात असे की, तो इतिहास ‘लोकप्रिय इतिहास’ आहे. परंतु प्रत्यक्षात जर अत्यंत काळजीपूर्वक निरीक्षण केलं तर लोकप्रिय इतिहासाच्या नावाखाली अभिजनवादी इतिहास आपल्या माथ्यावर मारण्याचा प्रकार आहे, ही अक्कल येण्यास सुरुवात होते. जसे की, अधिकृत मार्क्सवादी इतिहासलेखन, अधिकृत समुदाय इतिहासलेखन, पक्षातून बाहेर पडलेले यांचा इतिहास आणि हे सर्वच्या सर्व इतिहास आहेत ते एका संस्थांचा इतिहास बनून राहतात. पक्षाच्या प्रतिनिधींचे इतिहास बनतात. नोकरशाहींचे इतिहास बनतात आणि नेहमीच या इतिहासातील जे खरेखुरे लोक असतात ते तुम्हाला परके वाटायला लागतात. राष्ट्रवादी इतिहास लेखन जो नेहमी दाखवतो की, तो राष्ट्राच्या इतिहासाबद्दल आहे, राष्ट्रवादाबद्दल आहे. परंतु प्रत्यक्षात जेव्हा तो भारतमाताविषयी बोलतो किंवा भारत देशाबद्दल बोलतात, राष्ट्राबद्दल बोलतात, राष्ट्रवादाबद्दल बोलतात

तर त्यांच्यामध्ये त्या देशातल्या लोकांचा समावेश असतो की नसतो? म्हणून जी. अलॉयसिअस (G.Aloysius) याचे एक सुंदर पुस्तक आहे 'नॅशनॅलिझम विदाऊट अ नेशन' (Nationalism without a Nation). राष्ट्रवादाशिवाय राष्ट्र असू शकते का? राष्ट्र म्हणजे खरेखुरे राष्ट्र, ते काय आहे? जसे की – जवाहरलाल नेहरू त्यांच्या 'डिस्कवरी ऑफ इंडिया' (अनुवाद भारताचा शोध – साने गुरुजी) या ग्रंथात म्हणतात की, ते शेतकऱ्यांना भेटायला गेले, आणि त्या काळात शेतकरी नेहमी घोषणा देत असत तेव्हा – भारतमाता की जय! तर शेतकऱ्यांना त्यांनी विचारलं की, भारतमाता कोण आहे? तुम्ही या ज्या घोषणा देता– भारतमाता की जय! आजकाल तर सर्वच घोषणा देतात –भारतमाता की जय! भारतमाता की जय! आजतर जो घोषणा देत नाही, त्यालाही जबरदस्तीने भारतमाता की जय! म्हणायला भाग पाडले जातं. बोला – भारतमाता की जय! तर सगळेजण भारतमाता की जय! भारतमाता की जय! म्हणतात; पण भारतमाता आहे कोण? हा प्रश्न उपस्थित होतो. तर उत्तरादाखल या निष्कर्षावर येतो की, भारतमाता म्हणजे दुसरं तिसरं कुणी नसून भारत देशातील लोक आहेत. परंतु तुम्ही 'भारतमाता' नावाच्या एका अमूर्त कल्पनेविषयी बोलू शकता. भारतमाता एक अखंड भूभाग आहे. भारतमाता एक अखंड भारत आहे, भारतमाता एक नकाशा आहे, भारतमाता एक ऐतिहासिक अस्तित्व आहे, ज्याचा इतिहास धुंडाळणं खूपच अवघड काम आहे. भारतमाता सर्वकाही आहे; पण भारतमातामध्ये लोक नाहीत, मूर्ती आहेत, नकाशे आहेत, सर्वकाही आहे. जसे की, १९ व्या शतकात गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी 'भारतमाता' ही संकल्पना सर्वात अगोदर मांडली होती. ते म्हणाले– हे भारतमातेचे मंदिर पाहा, भारतमाता अश्रू ढाळतेय आणि याच संकल्पनेला मध्यवर्ती सूत्र करून बंकिमचंद्र चटर्जी यांची खूप सुप्रसिद्ध कादंबरी आहे. मला असं वाटतं, त्या कादंबरीने आपल्या देशातील जातीयवाद, जातीयवादी विचारधारेला खूप उत्तेजन मिळाले. त्या कादंबरीचे नाव आहे – 'आनंदमठ!' त्यावर एक चित्रपटही बनवला गेला होता. त्यात प्रदीप कुमार आणि अजित या नटांनी भूमिका केल्या आहेत. त्या चित्रपटात भारतमातेच्या मंदिरावर प्रश्न उपस्थित केला जातो, तर भारतमाता ही काय एखादी मूर्ती आहे? भारतमाता म्हणजे देशातील लोक आहेत का? तर राष्ट्रवादी इतिहासलेखन तुम्हाला ते एक गैरअभिजनवादी इतिहास म्हणून प्रयत्न करताना धडपडताना दिसून येतं. परंतु जेव्हा तुम्ही कोणत्याही प्रकारच्या एखाद्या राष्ट्रवादी इतिहास लेखनाचे वाचन कराल तर ते अतिशय काळजीपूर्वक करा. आपलं डोकं व्यवस्थित जागेवर ठेवून वाचन करा की, खरंच राष्ट्रवादी हे तुमच्याशी राष्ट्रासंबंधी व स्वतःच्या इतिहासाबद्दल काय काय सांगू इच्छितात? आणि आदर्श राष्ट्र व वास्तववादी राष्ट्र यात खूप मोठा फरक असतो. जसे इतिहासात आदर्शामध्ये आणि व्यवहारात/ वास्तवतेत खूप मोठा फरक असतो. वास्तववादी इतिहास हा आदर्शवादी /आदर्श केलेल्या इतिहास, ऐतिहासिक दृश्ये, ऐतिहासिक दृष्टिकोन इत्यादीपेक्षा खूपच वेगळा असतो.

हे चिंतन मला अभिजनवादी इतिहासासंबंधीच्या दुसऱ्या महत्त्वाच्या निरीक्षणावर घेऊन जातं. तर, इतिहासासंबंधी अभिजातवादी दृष्टिकोन हा अभिजात्य किंवा अभिजात्यांचं प्रतिनिधित्व करणाऱ्यांच्या डोक्यातून बाहेर पडलेली कल्पना आहे. लिहितं कोण? तर बुद्धिजीवी लिहितात. प्रत्येक युगात, प्रत्येक समाजात, बुद्धिजीवी वर्ग असतोच असतो, तो लिहितो. त्यांच्याकडे सिद्धांत असतात, त्यांच्याकडे मुबलक वेळ असतो, ज्यांच्याकडे लिहिण्याची साधने असतात, शारीरिकदृष्ट्या ज्यांना सकाळी आठ वाजल्यापासून सायंकाळी आठ वाजेपर्यंत काम करण्याची गरज नसते, सहसा तेच लोक लिहीत असतात. जे दुसऱ्यांच्या अवकाशावर आपले पोट भरत जीवन जगत असतात. जो अभिजनवर्ग असतो तो एक विशिष्ट वर्ग असतो. तर परावलंबी हा कधीही त्या प्रकारचा इतिहास लिहिणार

नाही. ज्याचा खऱ्या अर्थाने समाजातील इतर लोकांना लाभ मिळेल. तो नेहमी स्वतःचे अस्तित्व जिवंत ठेवण्यासाठी व स्वतःच्या अस्तित्वाच्या औचित्यासाठीच इतिहास लिहील आणि आपल्या वर्गाचे गुणगानच तो इतिहासामध्ये करत राहील. आम्हीच सर्वात श्रेष्ठ आहोत, आमची जात सर्वात श्रेष्ठ आहे. आम्ही माननीय /मोठे आहोत, आम्ही फार ज्ञानी आहोत, आमच्यातच ज्ञानाचे गुण सापडतील, आम्ही फलाने फलाने आहोत, आम्हीच पवित्र कुळातले आहोत, आमचा संबंध प्रेषितांच्या घराण्यातील आहे, आम्ही त्याचे खरे वारसदार आहोत, आम्ही उच्च आहोत आणि हे जे इतर जातीतले आहेत ते नीच कुळातील आहेत, अजलाफ आहेत ( व्यवसायानुसार जाती असणारे -जसे धोबी, गुजर, फकीर, बुनकर, रंगारी इत्यादी.) हे तेली मुसलमान आहेत, हे फलाना आहेत, यांना धर्म काय माहीत? यांना धर्माचा इतिहास कुठे ठाऊक आहे? हे आम्हीच लिहितो आणि आम्हीच तुम्हाला त्यासंबंधी माहिती देऊ शकतो. कारण, आम्हीच धर्माचे ठेकेदार आहोत. काही अशाच प्रकारे इतर धर्मांतही त्या सर्व धर्माचे ठेकेदार त्यांचा इतिहास हा त्यांच्या ठेकेदारीच्या फायद्याच्या अनुषंगाने लिहीत असतात. त्यानंतर त्याचे तुम्हाला पुष्कळ उदाहरणे सापडतील. हे उदाहरण नाही, खूप सारे जी तवारीख परंपरा आहे, जी इस्लामिक इतिहासलेखनाची एक परंपरा आहे, जी तारीख व तवारीख परंपरा आहे, त्यात काही चांगले इतिहास लिहिले गेले आहेत. परंतु, जेव्हा साधारणपणे आपण जेव्हा अशा प्रकारचे इतिहासलेखन पाहतो तर असे दिसते की, ते एखाद्या सुलतानाची स्तुती करताना दिसतील, एखाद्या बादशहाचे गुणगान करताना दिसतील, याचे कारण सुलतान आणि बादशहा हेच लोक इतिहास लिहायला सांगत आणि हे गरजेचं नाही की, इतिहास लिहिताना जसे अभिजनांचा इतिहास लिहिणारे अभिजन वर्गातीलच असावेत, लोकप्रिय इतिहास घटकातून जरी आले तरीसुद्धा ते अभिजात्य इतिहास लिहिताना दिसतात. जसे की, राजस्थानातील चारण आणि भाट लोक. आणि हा चारण आणि भाट समुदाय आहे, तो उच्चभ्रू व अभिजात्य गटात मोडत नाही. परंतु चारण आणि भाट यांनी लिहिलेलं जेव्हा आपण अभ्यासू, मौखिक परंपरा ज्या त्यांनी सांभाळून ठेवल्या आहेत, त्यामध्ये कुणाचे गुणगान सापडते? कुणाचा गौरव केलेला दिसतो? तर उत्तर येतं- राजपूत राजांचे. अरे! तेच राजपूत, जे तुम्हाला तुमच्या बाजूला बसून घ्यायलासुद्धा संकोच करतात. तर ते लिहून ठेवले आणि फार विलक्षण इतिहास लिहायचे हे चारण आणि भाट. पृथ्वीराज चव्हाण ज्याच्या जीवनावर 'पृथ्वीराज रासो' लिहिल्या गेले, त्यात पृथ्वीराज चव्हाण यांना काबूलला पण पाठवलं आणि त्याच्या हातून तिथे मोहम्मद घौरीला मारलेले दाखवले. अस्सल इतिहास कुठे चाललाय? यांच्या तोंडून आलेला इतिहास कुठे जातोय? लिहिणारे जे कुर्ग लोक आहेत ते सर्वसामान्यपणे सर्वसामान्य स्तरातील लोक आहेत आणि गौरव त्यांचा करत आहेत ते लोक जे त्यांच्या वर्गाचे खरेखुरे शत्रू आहेत. ही एका अर्थाने फसवी समजूत आहे, याला इंग्रजीतून फाल्स कोंशिअस्नेस (falls consiousness) असे म्हणतात.

अभिजनवादी इतिहासलेखनाची कधी कधी अशी सौंदर्यपूर्वक मांडणी असते की, त्यात गैरअभिजनवादी, अभिजात्यांच्या विरोधातील मंडळीसुद्धा ते इतिहासलेखन करण्यासाठी बरोबर फिट्ट बसतात. याला वर्चस्वाद (hegemony) म्हणतात. आज शहीद भगतसिंग यांना ते सर्व लोक योग्य ठरवण्यास तयार आहेत, ज्यांच्यासोबत भगतसिंग एक पाऊलसुद्धा सोबत चालायला तयार नव्हते. आता डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. संपूर्ण भारतात मी पाहतोय की, त्यांच्या पुतळ्याच्या आजूबाजूला मोठमोठ्या पोलादी जाळ्या बसवल्या गेल्या आहेत. आता येताना वाटेत मी काही मूर्ती पाहिल्या. जसे बाबासाहेबांना जणू काही कैदेत ठेवलय. जणू एका अर्थाने तुम्ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना तुमच्या सोयीनुसार वापरायच्या प्रयत्नात भिडलेले दिसून येतात आणि दुसऱ्या बाजूला असे

काही लोक आहेत ते बाबासाहेबांना त्यांच्यासाठी योग्य ठरवत -ठरवत अंधारात जाऊन डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्याची विटंबना करण्याचा प्रयत्न करतात वा भंजन करतात. खूप ठिकाणी त्यांच्या पुतळ्याची तोडफोड होताना दिसून येते. परंतु अशा प्रकारचा जो आशय आहे ना, जो तुम्हाला इतिहासात दिसून येतो, तो सातत्याने चालत राहतो. तर आपण हे म्हणू की, इतिहासात प्राचीन काळात भारतात खूप साऱ्या ठिकाणी ब्राह्मणवादी इतिहासलेखन होत असे. मग तुम्ही खूप मोठा प्रकल्प हाती घेतला अब्राह्मणवादी इतिहासलेखन करण्याचा, गैरब्राह्मणवादी/ सर्वसमावेशक इतिहास घडवण्याचा. खालच्या वर्गातून आलेला इतिहास हा कामगार, शेतकरी, दलित आणि समाजातील शोषित वर्गाबद्दल कणव असणाऱ्यांच्या इतिहासातून उदय पावलेला दिसून येतो. ते तेच लोक आहेत, ज्यांनी तळागाळातील लोकांना समोर ठेवून इतिहासाची मांडणी केली आहे. गॅस्टन बॅचलॉर्ड (१८८४-१९६२), मिशेल फॉकॉल्ट (१९२६-१९८४) सारख्या लोकांनी फ्रेंच राज्यक्रांतीसंदर्भात, गरजेचे नाही की, ते स्वतः गरीब असतील. परंतु त्यांनी गरिबांचा कैवार घेत, शेतकरीवर्गाचे कौतुक करत 'क्रांतीच्या संदेशासाठी' इतिहास लिहिला. त्यांच्या दृष्टिकोनातून कार्ल मार्क्सनेसुद्धा १९ व्या शतकात जी काही म्हणून ऐतिहासिक मांडणी इतिहासाच्या माध्यमातून केली. अथवा फ्रेडरिक एंगल्स यांनी १८४४ मध्ये जे पुस्तक लिहिले 'द कंडीशन ऑफ वर्किंग क्लास इन इंग्लंड' त्या पुस्तकामुळे अतिशय महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या 'आधुनिक कष्टकरी वर्गाच्या' इतिहास लेखनाची सुरुवात होताना दिसून येते. हे सर्व उल्लेख केलेले इतिहास हे खालच्या वर्गातून आलेले इतिहास आहेत; पण तसं पाहिलं तर वास्तवात मार्क्स आणि एंगल्स हे दोघे मजूर नव्हते. तर हे महत्त्वाचं नाही की, तो कुठून आलाय? महत्त्वाचं हे आहे की, त्याची सहानुभूती कुठे आहे? कोणाप्रति आहे? बौद्धिक वर्गाची तशी भूमिका समाजामध्ये खूप गरजेची आहे. बुद्धिजीवी कोणती भूमिका घेतो? खरोखरच वस्तुनिष्ठ भूमिका घेऊन बुद्धिजीवी वर्ग प्रगतिशील स्त्रोतांसोबत उभा राहतो का? की बुद्धिजीवी वर्ग तो वर्ग आहे, जो म्हणजे अं!ऽऽऽ आपण त्याला काय म्हणू की- पारंपरिक बुद्धिजीवी बनतो! जो केवळ आपल्या वर्गाच्या फायद्याच्या हिशोबाने लेखणी चालवतो. जसे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांच्या पुस्तकात लिहितात- 'दि अनटचेबल्स'मध्ये आणि ते अगदी सुरुवातीलाच मांडलेय. ते लिहितात की -असं नाही की ब्राह्मण ज्ञानी नाही, ब्राह्मणात खूप सारे ज्ञान आहे, ब्राह्मण खूप ज्ञानी असतात, त्यांना सर्व ग्रंथांचे ज्ञान होतं, सर्व ग्रंथ ते मुखपाठ लक्षात ठेवतात; पण असा ब्राह्मण हा काही बुद्धिजीवी वर्गात मोडत नाही आणि डॉ. आंबेडकर प्रश्न विचारतात - का भारत एखाद्या व्हॉल्टेअरला जन्माला घालू शकला नाही? व्हॉल्टेअर हा ख्रिश्चन धर्माचा खूप मोठा चिकित्सक होता, मुक्ती ज्ञानाचा जनक होता. आपण त्याला असे म्हणूया की, व्हॉल्टेअर हा आधुनिक प्रबोधनाचा जनक होता. ज्याच्यापासून अठराव्या शतकात एका नवीन विचारधारेचा प्रारंभ होताना दिसून येतो. या विचारधारेत व्हॉल्टेअर, रुसो, मॉन्टेस्क्यू, डिडेरो ही सर्व मंडळी त्या सर्वांचा समावेश होतो.

तर मुळात विविध स्वरूपातील व्यावसायिक, शैक्षणिक, अभिजनवादी इतिहासामध्ये, १९ व्या शतकाजवळ येईपर्यंत अभिजनवादी इतिहासलेखन आपले स्थान पक्के करताना हळूच शैक्षणिक इतिहास लेखनाचे रूप घेऊन आपली जागा निश्चित करते. हीसुद्धा एक प्रक्रिया आहे. इतिहास विषयावर एक वेगळे व्याख्यान होऊ शकते. परंतु सारांशरूपाने मी आपणास सांगेन की, एकोणिसावे शतक महत्त्वपूर्ण आहे. कारण, आपण इतिहासलेखन विषयावर चर्चा करत आहोत आणि इतिहास लेखनाला एका व्यवसायाप्रमाणे, जे व्यावसायिक इतिहासकार आहेत- जी माझी जातकुळी आहे, व्यावसायिक इतिहासकार. ही जात आहे ती १९ व्या शतकात जन्माला आली आहे आणि शैक्षणिक इतिहास, विद्यापीठातील लिहिल्या जाणारा इतिहास,

वर्गात शिकवल्या जाणारा इतिहास आणि शिक्षणव्यवस्थेत रुजू पाहणारा इतिहास यामुळे शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाच्या प्रक्रियेवर याचा प्रभाव पडला. हे सर्व जगभरात घडून आलं. १९ व्या शतकात जेव्हा समस्त जगभरातल्या विद्यापीठांतील वर्गातून या गोष्टीचा बोध झाला की – शिक्षण विशेषतः आधुनिक शिक्षण, शिक्षण संस्था, शिक्षणशास्त्र आणि शिक्षणाच्या ज्या पद्धती आहेत, त्या कामगारवर्ग, शेतकरीवर्ग आणि निम्न मध्यमवर्गास नियंत्रित करण्याचा सर्वात प्रभावी मार्ग आहे. याला कधी-कधी मनावर नियंत्रण मिळविण्याचा, मनावर वर्चस्व गाजविण्याचा प्रकारही म्हणता येईल. एखाद्याच्या शारीरिक नियंत्रणापेक्षाही त्याचे वैचारिक नियंत्रण करणे अतिशय महत्त्वाचे ठरते; पण जर तुम्ही एखाद्या गुलामाला समजावू शकलात की, गुलामगिरी न्याय्य आहे, तर तुम्हाला गुलामांच्या उठावाची भीतीच राहणार नाही. जर तुम्ही एखाद्याला समजावू शकलात की, अमुक अमुक जातीत जन्माला येणे हे त्याचे नशीबच आहे, तर तो कधीही त्याची जात बदलणार नाही आणि जातव्यवस्था ही अत्यंत कठोर आहे. त्यात बदल होणे तर शक्यच नाही. ज्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रेणीबद्ध विषमता म्हणायचे. या जातव्यवस्थेची वैशिष्ट्यता अशी होती की, प्रत्येक जात आपल्यापेक्षा खालच्या जातीचा शोध घेत असे. हे खरे आहे की, आम्ही शूद्र आहोत, ते आहेत ते, आमच्यापेक्षा खालचे आहेत. त्यातच त्यांना मानाचे समाधान मिळत असे. आम्ही कुणाबरोबरही जेवत नाही किंवा आम्ही कुणाबरोबरही सोयरपण जोडत नाही, यातून ते स्वतःवरच खूश होत.

भारतातल्या लोकांना कोण-कोणत्या गोष्टींमधून आनंद मिळू शकतो? जर पाहिलं तर- आमच्याकडे कांदा खाल्ला जात नाही, कुणी म्हणतं- आमच्याकडे लसूण वर्ज्य आहे, काही माहीत नाही; पण न खाण्यात असं काय विशेष आहे? हे मला समजतच नाही. यात खास असं काय आहे? आमच्याकडे गुरुवारी मांसाहार नाही करत, कुणी म्हणतं आमच्याकडे मंगळवारी नाही खात. अरे! ही काय पद्धत आहे विचार करण्याची? (हंशा!) ही असली कसली पद्धत आधुनिक भारतात? अच्छा! आम्ही यांच्यातही लग्न करतो, यांच्यात नाही करत. कमाल आहे बुवा! आणि ते यालाही इतके अभिमानाने सांगतील, जणू काही त्यांनी त्यांच्या आयुष्यात फार मोठी अभूतपूर्व कमाईच केली! यापेक्षा कुठलीही मोठी उपलब्धी नाहीच की, मी अमुक अमुक जातीमध्ये नातेसंबंध जोडत नाही. अरे! हे जग कुठे जाऊन पोहोचलेय. बाकी देश किती प्रगती करताहेत. स्वातंत्र्याच्या कशा वेगवेगळ्या कल्पना विकसित पावल्या आहेत. किती लोकांनी संघर्ष केलाय आणि तुम्ही याच्यावर खूश होणार की मी मंगळवारी कांदा खात नाही. अरे! (हशा!) एकमेकात बसल्यावर काय चर्चा चालतील आपल्याकडे माहिती आहे ?आमच्याकडे गुरुवारी नाही, आमच्याकडे शनिवारी नाही. मला कळत नाही या अंधविश्वासातून या जगाला कधी मुक्ती मिळेल? मला तर असं दिसतंय -हा अंधविश्वास कमी होण्याऐवजी, समाजात दिवसेंदिवस वाढतच चाललाय. आणि तो, जो वंचित घटकातील वर्ग, समाज होता, त्यांच्यात पूर्वी बंडखोरीची भावना प्रबळ असायची. मला स्पष्टपणे दिसतेय की, त्या लोकांमध्ये संस्कृतीकरण भावनेच्या आहारी जाण्याचे प्रमाण दिसू लागले आहे. मी जेव्हा माझ्या परिवाराकडे पाहतो, माझा मिश्रित परिवार आहे. माझ्या घरी-परिवारात अनोळखी लोक असायचे, जो ख्रिश्चनबरोबर लग्न करायचा, मुसलमानाबरोबर लग्न करे, कुणी दलिताबरोबर केले. तरी एका पिढीत तीस चाळीस वर्षांत मला काही बदल दिसून येत नाही. आणि जी पिढी समोर येतेय त्यांच्यामध्ये पुराणमतवादी श्रद्धा आणखी जोराने वाढू लागल्या आहेत; पण मी आमच्या उत्तर भारताकडील लोकांमध्ये असं पाहतोय की, खूप सारे लोक हे सामाजिक उतरंडीतील खालच्या जातीतील लोक आहेत. गैरब्राह्मण लोक आहेत, ते लोकही आजकाल नवरात्रीसारख्या दिवसात मांस-भक्षण वर्ज्य समजताहेत. त्यांना हे करण्यात काहीतरी खूप मोठी

अभिमानास्पद कामगिरी केल्यासारखे वाटते. अमुक - अमुक दिवशी जसे काही मांसाहार न केल्याने त्यांनी जगावर खूप काही उपकारच केलेत जणू! (हशा!)

तर मुळात प्रश्न तोच आहे - जेव्हा आपण एकत्र बसल्यानंतर म्हणतो की, ब्राह्मणवर्गाने त्यांच्यात बुद्धिमान व्यक्ती तयार केलेला नाही, तर त्यांच्या म्हणण्याचा अर्थ असाच असतो की, त्यांनी एखादा व्हॉल्टेअर जन्मास घातला नाही. म्हणजे स्व-चिकित्सा करणारा विद्वान किंवा आत्मचिंतन करणारा माणूस, आत्मचिंतन- आत्ममंथन करणारी विद्वानमंडळी तुम्हाला ब्राह्मणवादी वर्गात सापडणार नाहीत. कारण, ब्राह्मणवादी वर्गाची जी विचारधारा आहे, ती ब्राह्मणवादी व्यवस्थेनुरूप विकसित झालेली आहे. आणि इतिहासात त्यांना त्यांची विचार पद्धती बदलण्याची काही गरज नाही. इतिहासात विचारधारा तेव्हा बदलली जाते जेव्हा समाज बदलायला सुरुवात होते. नाहीतर शासकवर्गाला आपली विचारधारा बदलण्याची काहीही गरज नाही.

म्हणून, माझ्या भाषणाचा समारोप करण्यापूर्वी अभिजनवादी इतिहासाच्या सर्वात महत्त्वाच्या घटकाकडे दुर्लक्ष करता येणार नाही, आणि हे जे जे म्हणून अभिजनवादी इतिहास लेखनाची वैशिष्ट्ये म्हणून ओळखले जातील, ते सर्व १७ व्या शतकात विशेषरूपाने आकारास आले होते ते पर्शियन स्कूल ऑफ हिस्ट्रीच्या नेतृत्वाखाली. मला वाटते, ते सर्व आधुनिक इतिहास लेखनाच्या जनकाने विकसित केले होते. ज्याचे नाव आहे पर्शियाचा लियोफ्रँड फ्रँकी.

याला आपण कधी कधी आशावादी इतिहासलेखन म्हणूनही संबोधतो. इतिहासाचे दोन-तीन पिता, जनक आहेत. दुर्दैवाने, माता नाहीत. (हशा!) मला माफ करा! या सभागृहात बसलेल्या अनेक माता-भगिनींची माफी मागतो. मला खात्री आहे की, हे भाषण ऐकल्यानंतर त्या त्यांच्या स्वतःचा इतिहास लिहिण्याच्या कार्याचा आरंभ करतील. मला आशा आहे की, त्या आता इतिहासाचा बळी ठरण्यास ठामपणे नकार देतील आणि पुढील काळातील निर्माण होणाऱ्या इतिहासाच्या त्या अग्रदूत असतील, आणि इतिहासाच्या दूत बनून त्या त्यांच्या स्वतःच्या कामगिरी लिहितील.

तुम्ही लोक अभिजनवादी इतिहास लेखनाची ओळख करून घेत नाहीत. तुम्ही लोक व्हॉट्सअॅप विद्यापीठात शिक्षित होताय. तरुण पिढीही व्हॉट्सअॅप युनिव्हर्सिटीमधूनच शिक्षण घेताहेत. त्यांच्यासाठी व्हॉट्सअॅप विद्यापीठ ठीक आहे. अमुक -अमुक राजपूत राजा साडेसात फूट उंचीचा होता, त्याची तलवार ऐंशी किलोग्रॅमची होती, त्याचे वजन ४०० किलो होते, अरे! त्या घोड्यावर काहीतरी दया करा! कमीत कमी प्राणी हक्काचा तरी विचार करा! इतकं वजन घेऊन तो घोडा कुठे जात असेल? काय करत असेल? आणि वरून आणखी ८० किलोची तलवार असेल तर भावा! मला सांग अखिल जगात कोणताही मनुष्य ८० किलोंची तलवार हाती घेऊन तलवारबाजी नाही करू शकत. कुठे वाचलं मग हे? व्हॉट्सअॅपवर आलयं! आणि त्यावर अधिकृतपणा आणि अधिकार असतो. काय-काय सांगतं अजून व्हॉट्सअॅप? - नेहरुंचे वडील मुसलमान होते. कुठे वाचलं? व्हॉट्सअॅपवर फोटो आला होता- गांधींना पाहिलं पोरींबरोबर नाच- गाणं करताना! एका शाळेत ती चित्रफित चालवली गेली, तिथून व्हॉट्सअॅपवर. ती कुठल्यातरी एका मेजवानीमधील चित्रफित (व्हिडिओ) होती. ज्यामध्ये गांधींसारखी वेशभूषा करून कोणीतरी तरुणीसोबत नृत्य करताना दिसून येत होतं, सिगारेट ओढताना दिसून येत होता, तो गांधी किती अय्याशी करत होता. काहीही बोलायचं आपलं! आणि खूप सारे वैशिष्ट्ये आहेत या व्हॉट्सअॅप विद्यापीठाचे!

म्हणून आपण काय करूया! मला अभिजनवादी इतिहास लेखनाची सात-आठ खास वैशिष्ट्ये आढळून येतात. जेव्हा- केव्हा तुमच्या हाती एखादे इतिहासाचे पुस्तक लागेल आणि तुम्हाला जर असे आढळून आले की, वर उल्लेख केल्याप्रमाणे अतिशयोक्ती करून या ठिकाणी इतिहासलेखन झालंय, तुम्ही समजून चालायचं की तुमच्या हातात जे पुस्तक इतिहासाचे म्हणून पडले

ना! ते अगदी खात्रीशीर अभिजनवादी दृष्टिकोनातूनच लिहिल्या गेलंय.

**वैशिष्ट्य – एक**

घटनांना खूप अतिरंजित करून सांगितलेलं असेल, त्याला खूप महत्त्व दिलेलं असेल. जसं की युद्ध- वर्णन. युद्ध- वर्णनांवर आधारित इतिहास हा राजकीय इतिहासाचा एक भाग असतो, जो अभिजनवादी इतिहास लेखनासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण घटक असतो.

**वैशिष्ट्य –दोन**

केवळ एकाच्या वैयक्तिक राजकीय महत्त्वकांक्षेतून हा इतिहास निर्माण झाल्याचे भासवण्यासाठी त्या इतिहासावर जास्त भर देणे याला आम्ही इतिहासकार लोक असे म्हणतो – महान व्यक्तींच्या इतिहासाचा सिद्धांत इतिहास कसा रचला जातो? इतिहास हा थोर, महान व्यक्ती, महान राजे, महान सुलतान, महान बादशहा यांच्या वैयक्तिक संकल्पनामुळे घडून येतो. हे सर्व समजून घेणे फार महत्त्वाचं आहे.

**वैशिष्ट्य– तीन**

इतिहासाने मुळात प्रामुख्याने राजकीय, लष्करी आणि मुत्सद्दीगिरी या इतिहासाच्या दृष्टिकोनातून बघितले आहे. तुम्हाला जी काही जुनी वर्णनं सापडतील, आजही तुम्हाला जास्तीत जास्त वर्णने लष्करी इतिहास, राजकीय इतिहास आणि मुत्सद्दी इतिहास यांचं त्यातील वजन हे सर्वसाधारणपणे खूप जास्त असेल, त्या पद्धतीचे इतिहासलेखन तुम्हाला अभिजनवादी इतिहास लेखनात पाहायला मिळेल.

**वैशिष्ट्य – चार**

महान व्यक्तींच्या इतिहासाचा सिद्धांत हा खूप जुना अभिजनवादी सिद्धांत आहे. राजे– महाराजे यांचा गौरव आणि इतिहासाला त्यांच्या व्यक्ती वैयक्तिक इच्छेनुरूप बघण्याची इतिहासाची पद्धत. हा इतिहास कसा घडून येतो? अमुक राजा जेव्हा चांगलं करतो, तेव्हा चांगलंच होतं. जेव्हा तमुक राजाला वाईट वाटतं, तेव्हा वाईट होतं. इतिहास ही मानवी इच्छेची अभिव्यक्ती आहे, आणि कोण सर्वोत्तम होते? लोकांच्या समजुतीनुसार तो राजा असायचा. ज्याला राज्य करण्याचा दैवी अधिकार प्राप्त झालेला होता, आणि हा दैवी अधिकार किंवा हक्क त्याला ईश्वराकडून प्राप्त झालेला होता. इतिहास म्हणजे भविष्य सुचक ते महत्त्वाचे होते.

**वैशिष्ट्य – पाच**

आणखी महत्त्वाचे पुढील पाचवे वैशिष्ट्य म्हणजे –तुम्हाला नेहमी असे आढळून येईल की, अभिजनवादी इतिहास लेखनात सर्वसाधारणपणे सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक इतिहासाकडे केलेले दुर्लक्ष. हे जे प्रश्न आहेत ना! अगदी सहजपणे अभिजनवादी इतिहासकार त्याकडे कानडोळा करतात. सामाजिक इतिहास, सांस्कृतिक इतिहास आणि आर्थिक इतिहासातील प्रश्न. आणि सामाजिक संघर्ष, विरोधाभास, जात आणि लिंगभेद यांचा इतिहास या सर्वांना दुय्यम लेखणे असं करतात. अभिजनवादी इतिहासकार हे सामाजिक संघर्ष आणि सांस्कृतिक संघर्ष या विषयाकडे पुरेसे लक्ष देताना दिसून येत नाहीत. हा सुद्धा अभिजनवादी इतिहास लेखनाचा अतिशय महत्त्वपूर्ण पैलू लक्षात घेणे गरजेचे आहे.

**वैशिष्ट्य –सहा**

भारतीय इतिहास लेखनाच्या संदर्भात, अभिजनवादी इतिहास हा राजकीय कारणास्तव धर्म आणि धार्मिक संघर्ष यांचे अतिशयोक्तीपूर्ण वर्णन करताना दिसून येतो.भूतकाळाकडे अचूक पद्धतीने पाहण्याचा मार्ग म्हणजे या दोन्ही संघर्ष आणि सहकार्य याविषयी तर्कशुद्ध रीतीने चर्चा करून सत्यशोधनाचा मार्ग. परंतु हे अभिजनवादी नेहमी भूतकाळातील धार्मिक संघर्षालाच ठळकपणे अधोरेखित करताना दिसतील. कारण, वर्तमानकाळातील त्यांचे राजकीय स्वार्थ. याचे मूळ याच्यात आहे की, त्यांचे काम हे वास्तववादी इतिहास लेखनाऐवजी भावनात्मक इतिहासलेखन आहे. धार्मिक इतिहासाचे महत्त्वाचे काम म्हणजे, तुमचे रक्त खवळवणे असते. ना की वास्तववादी विचार करणे,

चिकित्सा करणे वा चिंतनशील मार्गाने जाणे. याचे मूळ कारण ते राजकीय लोकांचा अनुनय करतात, सत्ताधारी बुद्धिवाद्यांची सेवा करतात.

**वैशिष्ट्य – सात**

आणि शेवटी अभिजनवादी इतिहासाचा सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे विशेषतः १९ व्या शतकात देशाची कल्पना म्हणून उदयास आलेली संकल्पना. कल्पना ही की– देश कल्पना ही इतिहासाचे वाहन आहे आणि असे असणे हे भूतकाळातील सुवर्णयुगाचा मार्ग आणि शोध हा प्रशस्त करत जाते. हे अभिजनवादी इतिहास लेखनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणून आपणास पाहावयास मिळेल. ते असं ठसवतील की, भूतकाळात तेव्हा सुवर्णयुग होते. म्हणून तुम्हाला– अकबराचा कालखंड हा सुवर्णयुगाचा कालखंड म्हणून निर्माण झाला असे दिसेल. आणखी, अशोका नाही, आजच्या काळात अशोकाचा नाही म्हणता येणार. चंद्रगुप्त मौर्य नाही तर समुद्रगुप्त कालखंड हा वर्चस्ववादी, वसाहतवादी आणि खूप चांगला सुवर्णयुग कालखंड दाखवला आहे हे तुम्ही जाणता. आणि यासोबत ते कालिदासाला जोडून देतील, आणि वेगवेगळ्या प्रकारचे ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वे यांना त्यात कुठलेही तथ्ये, पुरावा यांची शहानिशा न करता घुसडून देतील किंवा १९ व्या शतकाला वेदांच्या पुनरुज्जीवनाचा सुवर्णयुग कालखंड म्हणून दाखवण्याचा प्रयत्न करतील.

या कालखंडात सर्वकाही सुबत्ता नांदत होती. सर्व काही होतं; पण आपण साधी सायकल बनवू शकत नव्हतो. याची कुठलीही ऐतिहासिक क्रमवारीतेची बुद्धीला पटेल अशी मांडणी नसणार. कुठलेही उत्पादन करण्याची पद्धती नाही. याला कुठलाही आधार नाही की समाजात तंत्रज्ञान हे उत्पादनाच्या विशिष्ट पद्धतीने टप्प्याटप्प्याने विकासाबरोबर विकसित होऊ शकेल. सर्व काही होतं; पण एवढेही माहीत नव्हतं की, पाणी उकळण्याने ते निर्जंतुक होते. आपल्याकडे शल्य-चिकित्सा तर होती; पण भूल देण्याची पद्धत नव्हती. आणि त्यालाच परत परत परिष्कृत करायचे, शुद्ध करायचं आणि त्यालाही अमूर्त संकल्पनेत परावर्तित करायचं. आयुर्वेदातील सर्वच्या सर्व मांस – भक्षण, सर्वच्या सर्व प्राण्यांची शिकार व त्यांचे मांस – भक्षण आणि सर्वच्या सर्व आदिवासी घटकांना पराभूत करणं, त्यांचं पुरतं ब्राह्मणीकीकरण करणं. जर तुम्ही चरक संहिता किंवा सुश्रुत संहिता वाचाल तर तुम्ही आश्चर्यचकित व्हाल, ते आपण काय – काय खावे, कोणकोणत्या आजारांवर कुठल्या– कुठल्या प्राण्यांचे मांस भक्षण करावे याचा सल्ला देत असत. तर इतिहासाची संपूर्णपणे हा अभिजनवादी इतिहास तोडफोड करताना दिसून येतो. आपल्या स्वतःच्या विचारसरणीच्या फायद्यासाठी. आणि हेच ते लोक आहेत, जे सर्वात अगोदर तुम्हाला सांगतील की, तुम्ही इतिहास लिहा; पण त्यात वैचारिक मुद्दे, विशिष्ट विचारधारा असता कामा नये. कारण, विचारधारा तयार करण्याचे काम आमच्यावर सोपवा ना! तुम्हाला ते काम करायची काय गरज! आणि त्यांचा दृष्टिकोन हा सर्वात जास्त वैचारिक असेल; पण ते असे ढोंग करतील की त्यांची वस्तुनिष्ठ मांडणी ही वैचारिक नाही, विशिष्ट विचारधारेची नाही.

१९ व्या शतकापासून आपणास अभिजनवादी इतिहास लेखनाच्या तीन पद्धती आढळून येतात–

१.वसाहतवादी आणि वर्चस्ववादी इतिहासलेखन

२.राष्ट्रवादी इतिहासलेखन

३.जातीयवादी (संप्रदायवादी) इतिहासलेखन

तिसरा लेखनप्रकार हा राष्ट्रवादी इतिहास लेखनाचा एक भाग आहे. तुम्हाला असे दिसेल की, जातीयवादी इतिहासलेखन हे धार्मिक, राष्ट्रवादी इतिहास लेखनाचा भाग आहे. या दोन्ही म्हणजे राष्ट्रवादी इतिहासलेखन आणि जातीयवादी इतिहासलेखन यांनी त्यांच्या संज्ञा, नियम आणि कल्पना या मोठ्या प्रमाणात वसाहतवादी इतिहास लेखनातूनच उचललेल्या दिसून येतात.

आणि शेवटचा मुद्दा– जो मला माझ्या भाषणाच्या समारोपाकडे घेऊन जाईल. जो वर्चस्वादी मांडणी,

वर्चस्वादी इतिहास लेखनातील वर्चस्वादी मांडणी, जातीयवादी इतिहासलेखन यांच्याविरुद्ध दोन हात करण्यास मदत करेल. भूतकाळातील ब्राह्मणवादी विचारपद्धतीचा विध्वंस/ नाश आणि त्याविरुद्ध विद्रोहाचा दृष्टिकोन हा १९ व्या शतकात विकसित पावला होता. १९ वे शतक हे खऱ्या अर्थाने या दृष्टिकोनाच्या संदर्भाने पाहणी करण्यासाठी ठळक सीमारेषा आहे. तर असं समजून घेऊन चालू नका की, आज १९ व्या शतकात फक्त ब्राह्मणी विचारधाराच आहे. जर आपण आता सर्वजण इथे जमलो आहोत, तर एका अर्थाने आपण १९ व्या शतकाच्या विद्रोहाचा वारसा एकप्रकारे आपल्या खांद्यावर पुढे घेऊन जाण्यास कटिबद्ध होत आहोत आणि वेगळ्या प्रकारच्या इतिहासाकडे बघण्याचा जो दृष्टिकोन १९ व्या शतकानंतर विकसित झाला आहे, जो इतिहास लेखनाच्या आधुनिक पद्धतीचा वापर करत त्याच्या सर्व गुणदोषांसहित युरोप आणि इंग्लंडमधून भारतात पोहोचला. महात्मा फुले, नारायण गुरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मूलभूत विचारवंत, चिकित्सक, नास्तिक आर. पेरियार या सर्व मंडळींनी याविरुद्ध आवाज बुलंद केला आणि पूरक अशी मांडणीसुद्धा केली. मार्क्सवादी इतिहासलेखन आणि नंतर वंचितांसाठीच्या वैचारिक संस्था आणि स्त्रीवादी इतिहास यांना अभिजनवाद्यांची पात्रता धारण करण्यासंदर्भात रुची दिसते. अशा प्रकारे अभिजनवादी इतिहासलेखन आणि लोकप्रिय इतिहास यांच्यातील वैचारिक स्पर्धा याला आपण तिचे गांभीर्याने भारतीयकरण करून १९ व्या शतकात सुरू झालेली प्रक्रिया आपल्या आजच्या कालखंडातही उलगडून दाखवत अखंडपणे पुढे चालू शकू!

धन्यवाद!

**संदर्भ टीपा**

१. बखर - बखर शब्दाची उत्पत्ती अरबी शब्द ‘खबर’ (बातमी, वृत्तान्त) पासून झालेली आहे. मराठ्यांच्या काळात ‘बखर’ हा शब्द माहिती देणाऱ्या अर्थाने रूढ झाला आहे. अशी माहिती अर्थातच ऐतिहासिक व्यक्ती व घटनांच्याविषयी असते. अनेकवेळा चरित्रकारांना हुकमावरून बखरकाराकडून लिहून घेण्यात येत असे. बखर हा ऐतिहासिक दस्तऐवजांचा एक महत्त्वाचा प्रकार आहे. कारण, त्यात राजे, वीरांची स्तुती, ऐतिहासिक घटना, लढाया, महापुरुषांच्या जीवनाच्या कथा आहेत.

२. होमर - युरोपियन खंडामध्ये याला महाकवी म्हणून मान्यता आहे. ज्याने इलियड आणि ओडिसी हे महाकाव्य रचले.

३. चारण व भाट - यामध्ये चारण म्हणजे योद्धा किंवा वीर. आणि भाट म्हणजे राजदरबारातील स्तुती पाठक.

४. कुर्ग - दक्षिण - पश्चिम भागातील डोंगररांगातील पहाडी लोक.


■

**‘अक्षरगाथा’चे प्रसिद्ध झालेले विशेषांक उपलब्ध आहेत.**

■ डॉ. आ.ह. साळुंखे विशेषांक ■ मराठी कादंबरी विशेषांक ■ मराठी भाषा विशेषांक ■ मराठी साहित्यविचार विशेषांक ■ मराठी भाषाअभ्यासक्रम विशेषांक ■ परिवर्तनाच्या चळवळी विशेषांक ■ सांस्कृतिक दहशतवादविरोधी विवेकीविचार विशेषांक ■ जात व पितृसत्ता विशेषांक ■ कुळवाडीभूषण छत्रपती शिवराय विशेषांक ■ वर्तमान समाज आणि माध्यमे ■ लोकशाहीपुढील आव्हाने व भारतीय संविधान ■ समकालीन भारत : विकास आणि विषमता ■ भारतीय इतिहासलेखन आणि समकालीन राजकारण

**प्रति अंक १०० रु.** (मनिऑर्डरने पैसे पाठवून अंक मागवता येतील)

ISSN : 0976-2957



# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण : पाठ्यपुस्तके आणि इतिहासलेखन



■

**डॉ. विकास गुप्ता**
इतिहास विभाग, दिल्ली विद्यापीठ, दिल्ली,
भ्र. ९८१८१९३८७५

**शब्दांकन – राजक्रांती वलसे**
इंग्रजी विभाग, बद्रीनारायण बारवाले
महाविद्यालय, जालना, भ्र. ७०२०५९६३१८

दि. ७ व ८ ऑक्टोबर २०२३ रोजी लोकायत विचारमंच आयोजित सातवी विवेकजागर परिषद जालना येथे संपन्न झाली. या परिषदेत 'भारतीय इतिहास लेखन व समकालीन राजकारण' या मध्यवर्ती विषयावरील '**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण : पाठ्यपुस्तके आणि इतिहासलेखन**' या विषयावर केलेल्या मांडणीचे शब्दांकन अक्षरगाथाच्या वाचकांसाठी प्रसिद्ध करीत आहोत.

मी आपणास आठवण करून देऊ इच्छितो की, आपण ज्या शिक्षणाबद्दल बोलतोय त्या आधुनिक शिक्षणाची सुरुवात लॉर्ड मेकॉले नावाच्या व्यक्तीपासून झालेली नाहीये. लॉर्ड मेकॉले यांच्यापासून आधुनिक शिक्षणाची सुरुवात झाली असं सगळे लोक म्हणतात. यामध्ये प्रगतिशील विचारांचे लोक आणि दक्षिण पंथी लोकांचादेखील समावेश होतो. आधुनिक शिक्षणाची सुरुवात लॉर्ड मेकॉले यांच्या फार अगोदर झालेली आहे. खरं तर आमच्या देशाचा आधुनिक इतिहास हा बऱ्याच प्रमाणात बंगालच्या मॉडेलने प्रभावित झालेला आहे. त्यामुळेच सर्वसाधारणपणे शिक्षणाचा इतिहास देखील त्याच चौकटीत लिहिला जातो. खरं तर त्याबद्दल बोलणं याप्रसंगी औचित्यपूर्ण ठरणार नाही. आणि मी त्याच्या खोलात कशाला जाऊ? खरं तर लॉर्ड मेकॉलेच्या शंभर वर्षे अगोदर भारताच्या दक्षिण आणि दक्षिण-पश्चिम अशा अनेक भागांमध्ये आधुनिक अशा प्रकारची शिक्षणाची व्यवस्था होती आणि ते लोकांना दिलं जात असे. हे शिक्षण केवळ ईस्ट इंडिया कंपनीद्वारेच दिलं जात नव्हतं तर त्यावेळी बऱ्याच परकीय सत्ता भारतात आलेल्या होत्या. त्या सत्तांच्या संपर्कामधून हे आधुनिक शिक्षण सुरू झालेलं होतं. त्यामध्ये मेकॉले याचं टिपण किती महत्त्वपूर्ण होतं किंवा ते इतकं महत्त्वाचं नव्हतं यावर खूप काही लिहून झालेलं आहे.

मी फक्त एवढंच सांगू इच्छितो की, इंग्रज सरकारने भारतात पहिल्यांदाच एक मोठं धोरण आखलं. ईस्ट इंडिया कंपनीमार्फत भारताचा कारभार चालविण्यात येत होता. इ.स. १८५४ मध्ये एक शैक्षणिक धोरण आखण्यात आलं. त्याला वुड्स डिसपॅच (वुड्सचा खलिता) असं म्हणतात. इथूनच एक धोरण म्हणून याची सुरुवात झाली. वुड्सच्या खलित्यामध्ये दोन-तीन अशा गोष्टी आहेत की, ज्यांचा उल्लेख व्यवस्थितपणे केला जात नाही किंवा केलाच तर तो एवढ्या व्यवस्थितपणे केला जात नाही. एक-त्यामध्ये हे निश्चित करण्यात आलं होतं की, जे थोडे लोक इंग्रजी भाषेमध्ये पाश्चात्त्य ज्ञानाला सामाजिकदृष्ट्या समजून घेऊ शकतात अशा लोकांना त्यांच्या स्थानिक भाषांमध्ये ज्ञान द्यावे. परंतु या दोन्ही प्रसंगांमध्ये कोणतं

ज्ञान हे आधुनिक युरोपियन व युरोपियन ज्ञान. यामध्ये भाषेवर आधारित विभाजन या शिक्षण धोरणाने केलं. सामाजिक विभाजन झालं किंवा त्यामध्ये तशी दरी तयार झाली. अशी ही दरी पुनर्निर्मित करण्यात आली. परंतु याच्याबरोबरच या देशातील जो शक्तिशाली घटक होता. ज्यामध्ये राज्यकर्ता वर्ग होता; समाजातील अभिजनवादी वर्ग होता. त्यांना ज्ञानप्राप्तीसाठी ज्या अभिजात भाषांची आवश्यकता होती ती प्रक्रियादेखील चालू होती. अशा प्रभुत्वशाली वा अभिजनवर्गाला अभिजात भाषांमधून ज्ञानप्राप्ती करण्याची व्यवस्था उपलब्ध होती. यावर प्रा. दिलीप चव्हाण यांनी सविस्तरपणे लिहिलं आहे. परंतु यानंतर जी दुसरी गोष्ट आहे ती खूपच महत्त्वपूर्ण आहे. त्या वुड्सच्या खलित्यामध्ये हे सुध्दा अगदी स्पष्टपणे लिहिलं होतं की, आम्ही अशा परिस्थितीमध्ये कधीही जाणार नाही ज्यामध्ये राज्य त्या सगळ्या शैक्षणिक संस्था चालवेल. राज्य सरकार शैक्षणिक संस्थांना स्वबळावर चालवणार नाही, हे वुड्स खलित्यामध्ये स्पष्टपणे नमूद केलं होतं. हा उघडउघड नकार होता. The State will never be running all these educational institutes. कोणत्याही वा कसल्याही परिस्थितीत राज्य सरकार शैक्षणिक संस्थांची जबाबदारी घेणार नाही. अशा प्रकारचा उघड नकार (explicit denial) इ.स. १८५४ च्या शैक्षणिक धोरणामध्ये आहे. राज्य सरकार सगळया लोकांच्या शिक्षणाची जबाबदारी घेणार नाही. त्यांनी अनुदान व्यवस्था सुरू केली. त्या अनुदान व्यवस्थेमध्ये अशी तरतूद होती की, एखाद्याने शैक्षणिक संस्था सुरू केल्यास व त्यांनी ती शिक्षण संस्था स्वकष्टाने वर्गणी गोळा करून पाच वर्षे यशस्वीरित्या चालविल्यास सरकारकडे अर्ज करून अनुदान मागण्याचा त्यांना हक्क राहील. तुम्ही शाळा किंवा महाविद्यालयाची सुरुवात करून ते पाच वर्षे यशस्वीरित्या चालवावे. याचा अर्थ तुम्ही ते कॉलेज किंवा शाळा पुढेही यशस्वीपणे चालवावे. यामध्ये हे महत्त्वपूर्ण आहे की, तुम्हाला स्वत:च्या कष्टाने शैक्षणिक संस्था चालवावी लागेल. यामध्ये एक विरोधाभास आहे. प्रत्येक जात आपापली शाळा, कॉलेज, वसतिगृह सुरू करत होते. याला पाठिंबा देण्याचे काम आधुनिक राज्य करत होते. सरकारी शाळेत मागास जातींना शिक्षण घेण्यास मुभा होती. अस्पृश्यदेखील सरकारी शाळेत येऊ शकत होते. परंतु जर एखाद्या सवर्ण व्यक्तीने मागास जातीच्या अथवा अस्पृश्य जातीच्या विद्यार्थ्यांच्या उपस्थितीला विरोध केला व म्हटले की, जर या वर्गात अस्पृश्य विद्यार्थी बसला तर आम्ही शाळेवर बहिष्कार टाकू तेव्हा सरकार म्हणत असे की, तुम्ही बसा. आम्ही अस्पृश्य विद्यार्थ्यांना वर्गाबाहेर व्हराड्यांत बसवू. सरकार सवर्णांना सांगत असे की, तुम्ही स्वत:ची शाळा उघडा. तुम्हाला मागास जातीबरोबर बसावयाचे नसेल तर स्वत:ची शाळा उघडा. आम्ही तुम्हाला अनुदान देवू. अशा प्रकारे हिंदूंचं वेगळं कॉलेज, मुस्लीम, शीख, पारसी यांची वेगवेगळी महाविद्यालये उदयास आली.

या प्रवासात एक महत्त्वाचा टप्पा आला आणि तो म्हणजे हंटर कमिशन होय. मी हंटर कमिशनबद्दल फार विस्तारपूर्वक बोलणार नाही. हंटर कमिशनबद्दल वेगवेगळ्या पाठ्यपुस्तकांमध्ये बरंच काही लिहिलं गेलं आहे. मी लंडनमधील ब्रिटिश लायब्ररीमधील हंटरची खासगी पत्रे वाचली आहेत. त्याने मद्रास व पंजाब प्रांतांच्या गव्हर्नरसना अनेक पत्रे लिहिली होती. मद्रास प्रेसिडेन्सीमधील वेगवेगळ्या धर्माच्या-हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन मिशनरीज-धर्मगुरुंना आपापल्या पद्धतीच्या शिक्षण संस्था सुरू करायच्या होत्या. हंटरने असा आदेश दिला की, त्या सगळ्या धर्मगुरुंच्या मागण्या मान्य कराव्यात. मी असं काहीही करणार नाही ज्यामुळे शिक्षण प्रणालीच्या मुख्य गाभ्याला धक्का पोहोचेल, असं हंटरने स्वत:च्या खासगी पत्रांमध्ये म्हटलं आहे. महात्मा फुलेंनी ज्या हंटर कमिशनला अर्ज केला होता तो हंटर स्वत:च्या खासगी पत्रव्यवहारात असं म्हणत होता की, मी असं काहीही करणार नाही, ज्यामुळे अगोदरपासूनच अस्तित्वात असलेल्या प्रस्थापित शिक्षण यंत्रणेच्या गाभ्याला क्षती पोहोचेल. हंटर कमिशनने हे

अगोदरच ठरवलं होतं. तो त्यामध्ये कसलाही बदल करणार नव्हता. हंटर कमिशनच्या निवेदनामध्ये अनेक लोकांच्या मतांना स्थान देण्यात आले होते. कमिशनने त्या मतांना मानले किंवा मानले नाही, हा भाग वेगळा. अनेक लोकांच्या विधानांना तसेच साक्षींना हंटर कमिशनच्या अहवालामध्ये स्थान मिळालेले आहे. त्या विधानांना अहवालात उद्धृत करण्यात आलेले आहे. त्या विधानांशी हे कमिशन गुंतवून घेऊ इच्छित नाही. फुल्यांनी दिलेल्या निवेदनाबद्दल हंटर कमिशन उदासीन राहिले.

त्यावेळच्या शिक्षणव्यवस्थेचा हा इतका शक्तिशाली, जहाल व अभिजनवादी वर्ग होता जी व्यवस्था केवळ अभिजनांची निर्मिती करत होती. सगळी पाठ्यपुस्तके, अभ्यासक्रम, शिक्षण शुल्क व व्यवस्थाच अशा प्रकारची होती जी केवळ अभिजनवादींचीच पुनर्निर्मिती करत होती. समाजामधील अत्यंत धनदांडगा वर्ग याचा लाभ घेतो. समाजामधील मागास वर्गामधील काही व्यक्तींना याचा लाभ होतो. मागास जातीमधील काही विद्यार्थ्यांवर याचा थोडासा प्रकाश पडतो. काही थेंब त्यांच्यावर पडतात. असे विद्यार्थी झळाळून उठतात. उदा. डॉ. बी. आर. आंबेडकर व महात्मा जोतिबा फुले असे जे काही अत्यंत बुध्दिमान विद्यार्थी होते ते याच अभिजनवादींची पैदास करणाऱ्या व्यवस्थेमधून स्वकष्टाने प्रकाशमान होतात आणि त्यामुळे असं वाटतं की, इंग्रज सरकारने उभारलेल्या शिक्षणव्यवस्थेमुळे हे झालं आहे. इंग्रजांनी उभारलेली शिक्षणव्यवस्था स्वातंत्र्य देणारी व्यवस्था होती किंवा तीच मुक्ती देणारी व्यवस्था होती असं वाटायला लागतं. शिक्षण देण्यासाठी इंग्रज सरकार आलेलं होतं व तीच शिक्षणव्यवस्था स्वातंत्र्य देणारी होती, असं वाटायला लागतं. शिक्षणाचे हे एक मॉडेल होते. This was a liberative model of education. शिक्षणाचे दुसरे एक मॉडेल होते. त्या मॉडेलचेदेखील काही प्रॉब्लेमस होते. हे मॉडेल हे सिद्ध करतं की, education in colonial India was a mask of conquest भारताला जिंकण्यासाठी हे शिक्षण एक प्यादा होतं. It was a mechanism to win the consent of the rule ज्या लोकांवर विजय मिळवायचा होता त्या लोकांची इंग्रजी राज्यकारभाराला अधिस्वीकृती मिळवून देणे हा त्यांचा उद्देश होता आणि शिक्षण हे त्याचं माध्यम होतं. इंग्रज शासनास लोकांनी अधिस्वीकृत करावे. विचार करण्याची पध्दतीच अशा प्रकारची बनवायची की, आम्ही मागच्या कालावधीबद्दल एका वेगळया पध्दतीने विचार करू आणि इंग्रजी शिक्षणाबद्दल दुसऱ्या पध्दतीने विचार करू. ती शिक्षणव्यवस्था चांगली होती का? हा आपला आजचा विषय नाही. हे मानलं जात की ही जी शिक्षणव्यवस्था होती ती मध्यस्थाला (intermediary) अधिक चांगलं मजबूत करण्याची व्यवस्था होती. It was a mechanism of cultural imperialism. सांस्कृतिक साम्राज्यवाद कसा? वसाहतीमध्ये शहरी संस्कृतीला उभं करण्याचं असं यंत्र जिच्याद्वारे असे व्यापारी तयार करणे जे येथील कृषी अर्थव्यवस्था व औद्योगिक अर्थव्यवस्था यांच्यामध्ये एक दुवा / मध्यस्थ म्हणून किंवा साखळीची एक कडी म्हणून काम करतील. आणि आम्ही त्यांचे कायमचे गुलाम म्हणून राहू, अशी ती व्यवस्था होती. आताच पार पडलेली जी - २० परिषद आपण पाहिलीच आहे. जी-२० मधील भांडवलवादी अर्थव्यवस्थांचं युरोपियन युनियनसोबत असं साटंलोटं आहे, ज्यांच्याकडे जगातील ८५ टक्के अर्थव्यवस्थेचा ताबा आहे. दु:खदायक वास्तव हे आहे की, जी-६ ते जी-२० पर्यंत पोहोचण्यासाठीच्या या पन्नास वर्षांच्या कालावधीत या गटाने जगातील संसाधनांच्या केंद्रीकरणाला एवढी गती दिलीय; त्याला एवढं पसरवलंय की, मागच्या पन्नास वर्षांमध्ये जग मागील कालावधीपेक्षा अधिक मोठ्या प्रमाणात असमान झालं आहे. आणि आज जे शैक्षणिक धोरण आलं आहे आणि ज्याच्याकडे आपण चाललो आहोत ते हाच उद्देश प्राप्त करण्यासाठी आणलं गेलं आहे.

कॉर्पोरेट विश्व हे सांस्कृतिक शब्दांचा आधार

घेऊन असे एक धोरण बनवून त्यावर कसा कब्जा मिळवते ते समजून घेणं गरजेचं आहे. हंटर कमिशन अस्तित्वात आल्यानंतर ते वेगवेगळ्या प्रातांत गेलं. त्याच्या प्रांतीय उपसमित्या बनल्या. त्या प्रांतीय उपसमित्यांसमोर जेवढ्या लोकांनी साक्ष दिली ते सगळं सरकारने स्वत: Superintendent of Govt Printing Culcutta मधून इ.स. १८८४ मध्ये छापून लोकांसाठी खुलं केलं. लोकांनी दिलेल्या साक्षीमध्ये कितीही जहाल चिकित्सा वा टीका असली तरी ती टीका आमच्या देशातील Observation सरकारने प्रकाशित केली. आज आम्हाला हे देखील माहीत होत नाही की कोणी काय भरलं? तीनशे शब्दांमध्ये पाचशे शब्दांमध्ये पत्रक भरून घेतलं जातं आणि ते पत्रक इंटरनेटवर भरून घेतलं जातं. कोणी कोणती साक्ष दिली वा विधान केलं हे देखील आम्हाला माहीत होत नाही. इंटरनेटवरून ते भरून दिलेलं पत्रक कुठे जाते याची कसलीच खबरबात नसते. इ.स. २०१६ पासून किती ड्राफ्ट आले याचादेखील पत्ता नाही. प्रत्येक नव्या वर्षात नवीन काहीतरी येतं. इ.स. २०१६ मध्ये स्मृती इराणीने एक ३२ पानांचा ड्राफ्ट टाकला होता. त्यावर मी २५ पानांचे (११५०० शब्दांचे) टीकात्मक विवेचन लिहिले होते. नंतर ते विवेचन EPW च्या अंकात प्रसिध्द झाले. त्यानंतर सात ड्राफ्टस् आले. त्यानंतर डिसेंबर २०१९ मध्ये आणखी एक ड्राफ्ट आला. त्याच्या मुखपृष्ठावर लिहिलेलं होतं NEP- 2020 त्यानंतर पंतप्रधानांनी digital education चे समर्थन केले. त्यामध्ये ऑनलाईन एज्युकेशनचा चॅप्टर जोडला आणि त्यास NEP- 2020 च्या नावाने कॅबिनेटच्या मंजुरीने प्रकाशित केले. खरं तर NEP- 2020 संसदेसमोर कधीही गेलं नाही. बजेट सेशनमध्ये राष्ट्रपतीच्या भाषणात त्याचा थोडासा उल्लेख केला गेला. त्यानंतर ते राज्यपालांच्या द्वारे गृहमंत्रालयाने सर्व विद्यापीठांमध्ये व शाळांमध्ये लादणं सुरू केलं. आम्ही या शैक्षणिक धोरणाची चर्चा करणार आहोत.

हंटर कमिशनने हे सांगितलं की, समाजाला शिक्षणासाठी उत्तेजन देणं अत्यंत गरजेचं आहे. हंटर कमिशनने त्यांच्या अहवालात अत्यंत जोरकसपणे सर सय्यद अहमद खान यांनी अलिगढमध्ये जे कॉलेज सुरू केलं होतं त्याची वकालत केली. त्याच्या अगोदरच्या अहवालामध्ये उदा. १८५४ चा अहवाल असेल की १८५९ चा अहवाल असेल. Stanley Dispatch 1859 हा स्टॅन्ले डिसपॅच वुड्स खलित्यावर टीका करतो. परंतु या दोन्ही आयोगांनी बॉम्बे आणि उत्तर पश्चिम (आग्रा) या भागात स्थानिक शिक्षणाचे जे काम झाले होते त्याची खूप प्रशंसा केली. अशा प्रकारचे काम संपूर्ण देशभर पसरविण्यात यावे असे त्यांनी त्यात नमूद केले. अशा प्रकारच्या प्रक्रिया चालू होत्या. परंतु हंटर कमिशनने कम्युनिटी एज्युकेशनवर मोठा भर दिला. स्थानिक सरकारे होती पण ती अजूनही व्यवस्थितपणे बनली नव्हती. दुसरीकडे धार्मिक, वांशिक आधारावर चालवलं जाणाऱ्या शिक्षण संस्था होत्या. हंटर कमिशनच्या अगोदर आणि वुड्स कमिशननंतर दोन मोठ्या घटना घडल्या होत्या. वुड्स डिसपॅचनंतर तीन मोठी विद्यापीठे अस्तित्वात आली. त्यानंतर प्रत्येक प्रांतात शिक्षण विभाग बनले आणि त्यानंतर सरकारी शाळांची संख्या वेगाने वाढू लागली. मद्रासमध्ये ख्रिश्चन मिशनरीज आणि शिक्षण विभागाचा संचालक यांच्यामध्ये तणाव निर्माण झाला. संचालकाने काही ख्रिश्चन मिशनरीजच्या शाळांमध्ये स्कूल इन्स्पेक्टर्स पाठविले आणि त्यांचे अनुदान कमी केले. अनेक शाळा उघडल्या जात होत्या. इ.स. १८६८-६९ मध्ये हा संघर्ष झाला होता. वुड्स डिसपॅचने खासगी शाळा उघडण्यासाठी प्रोत्साहन दिले; पण सरकार शाळा उघडणार नाही असे जाहीर केले. इ.स. १८६८-६९ मध्ये खूप मोठ्या संख्येने शाळा, महाविद्यालये व प्रशिक्षण संस्था उघडल्या जात होत्या. हा वाद लंडनपर्यंत गेला. संचालकाने लंडनमध्ये जाऊन तिथे सभा घेतल्या. त्याने लॉर्ड रिपनची भेट घेतली. लॉर्ड रिपन भारतात येणार होते. संचालकाने हे सर्व त्यांच्या कानावर घातलं की, भारतात हे सर्व होत आहे. लॉर्ड रिपन भारतात

आले व त्यांनी एक शिक्षण आयोग बनवला. त्यामध्ये एक गंमतीशीर प्रश्न आहे. महात्मा जोतिबा फुले यांचं निवेदन वाचल्यानंतर हे लक्षात येईल. त्यामध्ये त्याचं उत्तर लिहिलेलं आहे. राज्य सरकारने स्वत: ला शिक्षण क्षेत्रातून बाजूला करावं का? हा तो प्रश्न आहे. म्हणून फुले म्हणाले की, राज्य शिक्षण क्षेत्रातून बाहेर पडलं तर ही सगळी शिक्षण क्षेत्राची व्यवस्था ब्राह्मण आणि मिशनरीच्या ताब्यात जाईल व त्यामुळे धर्मनिरपेक्ष प्रवृत्तीच्या वृध्दीस नुकसान पोहोचेल. ही मोठी घटना होती.

आपल्या देशातील सार्वजनिक शिक्षणव्यवस्था या साच्यातून कधीच बाहेर आली नाही. मी हे अत्यंत प्रामाणिकपणे सांगतोय की, अगदी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरदेखील सार्वजनिक शिक्षणव्यवस्था या साच्यातून बाहेर पडली नाही. सरकारने शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी कधीच घेतली नाही. त्याने शिक्षणाची किती जबाबदारी घेतली त्याकडे मी येणार आहे. राज्य एक मॉडेल इन्स्टिट्यूट बनवू शकलं असतं परंतु ते त्यांनी कधीही बनवलं नाही. राज्य एक शांततेचं केंद्र आहे. स्वातंत्र्याच्या नंतरचा डाटा आपण पाहू शकता. विशेष करून मागास जाती, आदिवासी, स्त्रिया, मुली, दिव्यांग यांच्या शिक्षणाची जबाबदारी ही जास्तीत जास्तपणे खासगी म्हणजेच सामाजिक संस्थांनी सुरुवात केलेल्या कार्यामधूनच झालेली आहे. त्यांच्यासाठी नेमलेल्या शिक्षकांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था पाहिल्यानंतर खासगी क्षेत्राची टक्केवारी जास्त दिसते. राज्याचा हिस्सा फारच कमी होता. जी प्रक्रिया व प्रगती पाश्चात्त्य देशात झाली ती भारतात कधीच झाली नाही.

अठराव्या शतकात शेवटी शेवटी रशियामध्ये- जो नंतर जर्मनीचा भाग बनला - फ्रेडरिक (दुसरा) याच्या कारकिर्दीत सार्वजनिक अनुदानित राज्य शिक्षण व्यवस्था (Public funded state education system) सुरू झाली होती. त्याचे वेगवेगळे मॉडेल्स आहेत. युरोपने शिक्षणाला धार्मिक संस्थांच्या / चर्चच्या हातामधून स्वत:च्या हातात घेतलं. प्रशियाचे मॉडेल इतर युरोपियन देशांच्या मॉडेलपेक्षा वेगळे होते.

अठराव्या शतकाच्या शेवटच्या वर्षांपासून अमेरिकेत सार्वजनिक शाळांची वाढ झाली. शिक्षण चर्चच्या हातामधून राज्याच्या हातात गेलं. शाळा राज्य सरकारकडून चालविल्या जाऊ लागल्या. हे अभियान काही राज्यांमध्ये फारच जोरदार होते. १८३० च्या शेवटी शेवटी तर हे अभियान फारच लोकप्रिय झाले. इ.स. १८७० च्या आसपास तिथेही महत्त्वपूर्ण बदल होत होते. इ.स. १८५० मध्ये सरकारी आयोग आला. माध्यमिक शिक्षण आयोग इ.स. १९०० मध्ये आला. इ.स. १८३० पासून कॉर्न लॉजची चळवळ सुरू झालेली होती. समग्र शाळा चळवळ सुरू झाली तेव्हापासूनच शिक्षण हा राष्ट्रीय मुद्दा बनत चाललेला होता. १९२५ च्या वेळेला समग्र शैक्षणिक चळवळ सुरू झाली. तिथे सगळ्या प्रकारची मुले - मुली सर्व प्रकारचं ज्ञान मिळविण्यासाठी एकाच शाळेत जायला लागले. अशा प्रकारच्या काही शाळा काही काऊंटीजमध्ये सुरू केल्या. इ.स. १८९० पासूनच त्यांनी जर्मन मॉडेलचं अनुकरण करण्यास सुरुवात केली होती. जर्मनीने स्वत:चे आर्थिक विकासाचे मॉडेल इ.स. १८३० पासून सुरू केले होते. तेव्हा इंग्लंडला याची चिंता वाटत होती. इंग्लंडला जर्मनीच्या अभ्यासक्रमाबद्दल आणि वेगवान विकासाबद्दल चिंता वाटत होती. इंग्लंडची शैक्षणिक व्यवस्था फारच विस्कळीत होती. वेगवेगळ्या लोकांसाठी सार्वजनिक शाळा उघडल्या जात होत्या. याचा भारतावरदेखील परिणाम झाला.

भारतामध्ये जात हा सर्वात प्रबळ असा विभाजनवादी घटक राहिलेला आहे. तसाच भारतीय शैक्षणिक व्यवस्थेमध्येही जात हा अत्यंत विभाजनवादी घटक राहिला. सर्व विद्यार्थ्यांना एकत्र बसविणे खूपच कठीण काम होते. मुला-मुलींना एकत्र बसवणंदेखील कठीण होतं. इ.स. १८८० मध्ये हा फार मोठा मुद्दा होता. बंगालमधून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. इतर ठिकाणावरून फारच नकारात्मक अहवाल आले.

आपणाला एक विभाजनवादी व्यवस्थेचा वारसा लाभला. वुड्सचा खलिता आणि हंटर कमिशन यांच्यादरम्यान एक घटना घडली. त्यानंतर मी स्वतंत्र भारताकडे येणार आहे. इ.स. १८६० मध्ये अनेक लोकांनी त्यावेळी लिहिल्या जाणाऱ्या पाठ्यपुस्तकांमध्ये देवी-देवतांबद्दल खूप वर्णन आहे, त्यांची चित्रे व त्यांच्या गोष्टींनी ती भरून गेली आहेत, ही सर्व पाठ्यपुस्तके ब्राह्मणी साहित्याने भरून गेली आहेत, अशी त्यावर टीका झाली. युरोपमधून आयात केलेली पुस्तकं ठीक आहेत. काही पुस्तके इथे लिहिली गेली आहेत, यावर ख्रिश्चन मिशनरीजनी जोरदार आक्षेप घेतला. जॉन वुडॉल्फने सरकारवर खूप दबाव आला आहे हे सांगितलं. इ.स. १८७३ मध्ये एक अत्यंत गुप्त आदेश संमत करण्यात आला. सगळ्या पाठ्यपुस्तकांची तपासणी करण्यात यावी असा आदेश देण्यात आला. त्यानंतर प्रादेशिक पाठ्यपुस्तक समितीने ती पुस्तके तपासली. पुस्तकांमधील नकारात्मक वा समस्याग्रस्त भागाचा आढावा घेण्यात आला. हा अहवाल इ.स. १८७७ मध्ये आला. तोपर्यंत तर भारतात कोणत्याच प्रकारचं पाठ्यपुस्तक धोरण तयार झालेलं नव्हतं. मी हे आपणास यासाठी सांगतोय की, कारण बऱ्याच वेळेला धर्मनिरपेक्षतावादाबद्दलचा जो वादविवाद आहे; म्हणजे ही संकल्पना परकीय आहे; ती भारताच्या घटनेत घुसडलेली आहे; किंवा ती भारतातच वाढलेली आहे इत्यादी. परंतु ती भारतातच वाढलेली आहे असं जर ते म्हणाले असते तर आधुनिकपूर्व काळात त्यास घुसडलं गेलं असतं. मी हे देखील सांगू इच्छितो की, धर्मनिरपेक्षता ज्या पद्धतीने भारतात उत्क्रांत झालेली आहे, त्यामध्ये शैक्षणिक क्षेत्रातंर्गत ज्या लढाया झालेल्या आहेत त्याकडे देखील पाहणं गरजेचं आहे. धर्मनिरपेक्षतावादाचा ऐतिहासिक वादविवाद शिक्षणाला संपूर्णपणे परिघावर ढकलून देतो. राज्य सरकारचे धोरण, शिक्षणाची प्रक्रिया तर एक दैनंदिन प्रक्रिया आहे. धर्मनिरपेक्ष किंवा धार्मिक दृष्टिकोन तयार करण्यामध्ये हे धोरण खूप मोठ्या प्रमाणात भूमिका पार पाडत असते. परंतु त्याचा उल्लेख करणं आपण विसरून जातो. त्यावेळीदेखील असे काही मुद्दे होते : या पुस्तकात केवळ मुस्लीम राज्यकर्त्यांचं चित्रण वाईट पध्दतीने केलं गेलं आहे. त्यांच्यामध्ये केवळ दोषच दाखविले गेले आहेत. त्यांच्यामधील गुण दाखविले गेले नाहीत. त्यामध्ये दक्षिण भारताचा इतिहास कमी दाखविला गेला आहे. उत्तर भारताचा इतिहास जास्त प्रमाणात दाखविला गेला आहे. पाठयपुस्तकात हा इतिहास उत्तर भारत केंद्री आहे. त्याच्यामध्ये हिंदू इतिहास काळाचे कमी चित्रण आहे. मुस्लीम व ब्रिटिश कालावधीचे चित्रण फारच जास्त आहे. असो! असे मुद्दे त्याकाळी होते.

मी इथे दुसरा मुद्दा उपस्थित करू इच्छितोय की, भारतात पहिल्यांदाच १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात पाठयपुस्तकावर वादविवाद सुरू झाला. त्याची दोन कारणे होती. एक-त्याअगोदर पाठ्यपुस्तके एखाद्या विद्यार्थ्याची वैयक्तिक मालमत्ता म्हणून कधीही अस्तित्वात आली नव्हती. इ.स. १८२०-३० मध्ये पाठ्यपुस्तकावर आधारलेली व्यवस्था लोकप्रिय झाली. या अगोदर नाही. जेव्हा पाठ्यपुस्तक बनतं तेव्हा त्याचा अर्थ असा होतो की, काय शिकवलं गेलं नाही पाहिजे किंवा कोणती गोष्ट शिकवणं योग्य राहील. तसेच कोणता भाग शिकवण्यालायक असेल. याच्यावर चर्चा झाली पाहिजे की कोणती गोष्ट शिकवली गेली नाही पाहिजे किंवा कोणती गोष्ट शिकवण्यालायक आहे. याच्यावर प्रत्येक समुदाय चर्चा करत होता. जोपर्यंत प्रत्येक समुदाय वेगवेगळं शिकवत होता. तोपर्यंत काहीच समस्या नव्हती.

आता विरोधाभासात्मक परिस्थिती अशी आहे की, सर्वांच्या आपापल्या स्वत: च्या शाळा, महाविद्यालये आहेत. श्रीमंत, गरीब, मागास वर्गातील विद्यार्थी त्यांच्या स्वत:च्या शाळेत जाताहेत. सामाजिक, आर्थिक स्तरानुसार शाळांची रचना अस्तित्वात आलेली आहे. दिव्यांग एका वेगळ्याच शाळेत जातोय. गरीब अशाच एका वेगळ्या शाळेत जातोय. संरचनात्मक

पातळीवर खूप मोठी असमानता आहे आणि समतेची / समानतेची लढाई कशावर? तर एका अशा निवडक संकलित ज्ञानावर जे सामाजिकदृष्टया पूर्वग्रहदूषितपणावर आधारलेले आहे. भौतिक गोष्टी किंवा ज्या वास्तविक गोष्टी आहेत त्यासंदर्भात प्रचंड असमानता आहे. असं का? पाठ्यपुस्तक म्हणजे काही ज्ञान नव्हे. ज्ञानाच्या अथांग सागरामधून काही निवडक गोष्टी आपल्याला दिल्या जातात आणि असा भ्रम निर्माण केला जातो की हेच ज्ञान आहे. विद्यार्थ्यांना असं वाटतं की, इथं जे लिहिलं आहे तेच सर्वांगीण सत्य आहे. तेच ब्रह्मवाक्य आहे. पाठ्यपुस्तक हे आधुनिक शिक्षणाचा अत्यावश्यक भागदेखील नाहीये. कारण, जगामध्ये असे अनेक देश आहेत, जिथे एक चांगली शिक्षणव्यवस्था आहे. तिथे पाठ्यपुस्तकं बंधनकारक नाहीत. जास्तीत जास्त काय आहे तर संदर्भग्रंथ वर्गखोल्यांमधील शेल्फवर ठेवलेली असतात. विद्यार्थ्यांना वाटलं तर ते त्यापैकी कोणते तरी संदर्भग्रंथ पाहतील व त्यामधून आवश्यक ती माहिती घेतील. किंवा घरी जाऊन त्यांनी कल्पनेच्या दुनियेत मुशाफिरी करावी. असं म्हटलं गेलं की स्वप्न पाहणं / कल्पनेच्या दुनियेत रममाण होणं भारतामध्ये एक प्रकारचा सुखवस्तूपणा आहे. भारतात अशी चर्चा सुरू झाली की, असं स्वप्न पाहणं फारच सुखवस्तूपणाचं आहे. स्वतंत्र भारतात आजदेखील १३ टक्के शाळा या एकशिक्षकी आहेत. एक शिक्षक सर्व वर्गांना शिकवतो. या ज्या १३ टक्के शाळा आहेत त्याच्यापैकी एक मोठा हिस्सा एकल विद्यालयांचा आहे. या अशा शाळांमध्ये आरएसएसचे शिक्षक जातात व विद्यार्थ्यांना सांगतात की, आपला इतिहास फारच गौरवपूर्ण आहे. याच्यामध्ये जात, पितृसत्ताक नावाची काहीच समस्या नाहीये. हा आपला देश लढाऊ लोकांचा देश आहे आणि या लढाऊ लोकांनी जगाला नेहमीच टक्कर दिलेली आहे आणि आता हा देश हजारो वर्षांच्या गुलामगिरीमधून मुक्त होणार आहे.

तर ही जी पाठ्यपुस्तकाची संस्कृती आहे त्याची आणखी एक गमतीशीर बाब आहे. वासाहतिक सरकारने दीर्घकाळपर्यंत म्हणजेच त्याच्या सुरुवातीच्या कालावधीमधील बराच काळपर्यंत एकच एक क्रमिक पाठ्यपुस्तक लागू केले नाही. अगदी एका राज्यातदेखील एकाच पाठ्यपुस्तकाची सक्ती केली नाही. पाठ्यपुस्तक समितीकडे जेवढी पुस्तके यायची तेव्हा ती समिति यापैकी कोणतंही पुस्तक अभ्यासू शकता असं सांगत असे. समिती एखाद्या पुस्तकास नकार देत असे; पण मंजुरी दिलेल्या पुस्तकांपैकी कोणतंही पुस्तक आपण अभ्यासू शकता असे ती सांगत असे. एखाद्या शिक्षकाला वाटलं की आपण हे पुस्तक शिकवावं तर त्यास पाठ्यपुस्तक समितीची हरकत नव्हती.

यापेक्षाही आणखी एक गमतीशीर बाब अशी होती की, ही तरतूद केवळ सरकारी शाळांनाच लागू होती. ज्या अनुदानित व विनाअनुदानित शाळा होत्या त्यांना हा नियम लागू नव्हता. ही गुंतागुंत आपण विसरून जातो जेव्हा आपण इंग्रज सरकारबद्दल बोलतो आणि तरीदेखील ते आपल्याला 'मेकॉलेपुत्र' म्हणतात. स्वातंत्र्यानंतर – ज्याला मी भावनात्मक एकात्मतेचा काळ म्हणतो–नेहरुंची जी ब्रिगेड आहे त्याचा सर्व भर भावनात्मक एकात्मतेवर आहे. इ.स. १९६१ मध्ये नेहरुंनी भावनात्मक एकात्मता यावर अहवाल प्रकाशित केला होता. भारतातील समुदायांच्या अस्मितांना राष्ट्रीय ओळखीमध्ये एकात्मिक करायचं यावर त्यामध्ये भर दिलेला आहे. आणि सगळ्या प्रकारच्या समुदायांच्या अस्मिता / ओळखींना धोका समजण्यात येऊ लागला. हे भारताच्या फाळणीनंतरचं युध्द आहे. स्वतंत्र झालेल्या या नवीन प्रदेशाला समुदायांच्या उपओळखीची भीती वाटते. त्याला समुदायांची पूर्ण निष्ठा हवी आहे. पार्लमेंटमध्ये असे प्रश्न उपस्थित केले गेले की, अनेक राज्यांमधील पाठ्यपुस्तके सांप्रदायिक आहेत. ती जातीयवादी आहेत. ती पितृसत्ताक आहेत. इ.स. १९६० च्या दशकामध्ये ही चर्चा होती की, पाच एजन्सींना एकत्र करून National Council for Teacher Education तयार केलं जावं. NCFTE चं काम प्रशिक्षण आणि संशोधन आहे. त्याने बोर्ड आणि

पाठ्यपुस्तकं तयार करावीत याचा त्यात अंतर्भाव आहे. जेव्हा NCERT ची स्थापना झाली तेव्हा त्याने एखाद्या राज्याच्या जिल्ह्यातील किंवा शाळेमध्ये शिकविण्यासाठी पाठ्यपुस्तके तयार करावीत, असा त्याचा हेतू कदापिही नव्हता. दिल्लीमध्ये बसून एखाद्या राज्यासाठी पाठ्यपुस्तके बनविणे हा त्याचा उद्‌देश नव्हता. त्याचा उद्‌देश केवळ एक मॉडेल पाठ्यपुस्तक बनविणे एवढाच होता. परंतु अनेक राज्यांत त्यालाच स्वीकारण्यात आलं. आणि विशेष करून जसं जसं CBSE चा विस्तार झाला तसंतसं NCERT ची पाठ्यपुस्तके वाढत गेली. प्रशासकीय सेवांसाठी, वैद्यकीय, अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी असलेल्या प्रश्नपत्रिका या CBSE च्या अभ्यासक्रमावर आधारलेल्या असतात असा विचार करून त्यांनी NCERT च्या पुस्तकांना स्वीकारले आणि आम्ही त्या दिशेनं निघालो. केंद्रीय ठिकाणी निर्मिती झालेली पुस्तके स्वीकारण्यात आली. राज्य सरकारांनी केलेली ही एक स्वयंस्फूर्त अशी कृती होती. आजपर्यंत ते असंच राहिलेलं आहे. असं करण्यास कोणीही त्यांच्यावर बंधन घातलं नव्हतं. जबरदस्ती केली नव्हती. अलीकडील काळात CBSE ने जे काही निर्णय घेतले त्याचा प्रभाव १६ ते १७ टक्के शाळांच्या अभ्यासक्रमावर पडला. भारत-चीन युध्द झाले तेव्हा भारताने चीनकडून शिकण्याची गरज आहे यावर चर्चा झाली. चीन स्वत: चा व्यवस्थित विकास करत होता. इतर गोष्टींशिवाय भारतास शिक्षणामध्ये बदल व विकास घडवून आणण्याची शक्यता दिसत होती. तेव्हा स्वतंत्र भारताचा पहिला शिक्षण आयोग बनला. प्राध्यापक डी.एस. कोठारी आयोगाचे अध्यक्ष होते. कोठारी कमिशनने अनेक शिफारशी केल्या. त्याने नेबरहूड स्कूल (शेजार शाळा) ची शिफारस केली. शेजार शाळा या संकल्पनेवर आधारित सार्वजनिक शालेय व्यवस्था लागू करावी ही सर्वात महत्त्वाची शिफारस या आयोगाने केली. ही काही नवीन गोष्ट नव्हती. जगातील अनेक देशांमध्ये हे झालेलं होतं. हे केवळ समाजवादी किंवा साम्यवादी देशातच नव्हे, तर अगदी भांडवलवादी देशांमध्ये देखील ही सार्वजनिक शालेय व्यवस्था राबविण्यात आलेली होती. ज्या देशांनी विकास केला होता तिथे हे झालेलं होतं. घराशेजारी असलेल्या शाळेत समाजातील कोणत्याही स्तरांतील व्यक्तीच्या मुला-मुलींना शिकायला जाता येईल अशी ती कल्पना होती. जर असं झालं तर त्या शाळेमध्ये सरकारी अधिकाऱ्याच्या मुला-मुलींना जे शिक्षण मिळत आहे ते शिक्षण समाजातील मागासवर्ग व मागास विद्यार्थ्यांनादेखील मिळेल. या कल्पनेला राष्ट्रीय शिक्षण धोरण १९६८ मध्ये स्वीकारण्यात आले. परंतु ते मूर्त स्वरूपात आलं नाही. इ.स. १९७७ च्या आणीबाणीनंतर जेव्हा नवीन सरकार बनले तेव्हा पाठ्यपुस्तकासंदर्भात वादविवाद उत्पन्न झाला. त्यावेळी भारताचे पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी त्यांच्या सचिवाद्वारे एक अत्यंत महत्त्वाची गुपित नोट लिहिली आणि ती नोट शिक्षणमंत्र्यास पाठविली. नंतर ती नोट सार्वजनिक झाली. त्यावर बराच गोंधळ झाला. रोमिला थापर, आर.एस. शर्मा, अर्जुन देव, बिपिनचंद्र यांची इतिहासाची पुस्तके अभ्यासक्रमातून बाजूला करण्याचा मुद्दा त्या नोटमध्ये होता. तिथून वादविवाद सुरू झाला. मी त्या खोलात जाणार नाही. परंतु यावेळी जो वादाचा जो मुख्य मुद्दा उपस्थित झाला तो म्हणजे भारताचा खरा इतिहास मुला-मुलींना शिकविला गेला पाहिजे. त्याचा उद्‌देश असा होता की, भारताच्या NCERT मार्फत जी पुस्तके तयार करण्यात आली त्या आधारावर पुस्तके तयार करण्यात यावी व ती पुस्तके अभ्यासक्रमात समाविष्ट करावी. परंतु हे झालं नाही. नुरुल हसन यांच्याविरोधात प्रतिक्रिया आल्या. वामपंथी आणि दक्षिणपंथी यांच्यात संघर्ष झाला. प्रगतिशील विचारवंतांना वामपंथी विचारवंतांशी जोडण्यात आले. त्या इतिहासातून मुक्त करण्यासाठी एका राष्ट्रवादी इतिहास लेखनास सुरुवात झाली.

इ.स. १९८६ मध्ये आणखी एक राष्ट्रीय शैक्षणिक आयोग आला व त्यानेदेखील सार्वजनिक

शाळांचा उल्लेख केला. परंतु त्या आयोगामध्ये अगदी विरुध्द शिफारस करण्यात आली. अनौपचारिक शिक्षणाला पाठिंबा देण्यात आला. कॉमन स्कूलच्या विरुध्द असणाऱ्या अनेक गोष्टी त्यामध्ये टाकण्यात आल्या. एका बाजूला सातत्याने अभ्यासक्रमाच्या ज्ञानास एकजिनसी करण्याची प्रक्रिया चालू होती. परंतु शैक्षणिक संरचनेच्या पातळीवर असमानतेला टिकवून ठेवणे चालूच होते. आणि शैक्षणिक इतिहासाचा हाच विरोधाभास आहे की, ज्याच्यामधून सामाजिक असमानता ही सातत्याने टिकवून ठेवली जात आहे आणि हीच असमानता आजदेखील निरंतरपणे त्यात दिसून येते. ज्ञानाला समरूपी बनविणे व त्यास तसे बनविण्यावर भर देणे व शिक्षणाच्या मूलभूत स्वरूपामध्ये भेदभाव कायम ठेवणे हे धोरण सातत्याने पुढे रेटण्यात येत आहे. या गोष्टींच्या युतीमुळे खरं तर या देशात सरकारांच्या द्वारे सामाजिक असमानतेला कायम ठेवण्यात आले आहे. हे धोरण विरोधाभासी आहे. आपल्या प्रक्रियांमधून म्हणजेच ज्या कार्याच्या प्रक्रियेनुसार ज्या ज्ञानाची निर्मिती केली आहे ते तुमच्या कामाचा अविभाज्य भाग झाले आहे. जंगलांमध्ये, खेड्यांमध्ये, वस्ती, मोहल्ला, कारखाने अगदी कुठेही हे ज्ञान इंग्रजीमध्ये आहे. ज्या इंग्रजी भाषेमधून किरकोळ प्रमाणात ज्ञाननिर्मिती केली जाते ते संपूर्ण शिक्षणव्यवस्थेला दिले जात आहे. आणि हे सर्व अशा संस्थांना पुनर्निमित करतं आणि आपल्या शिक्षणव्यवस्थेतील संस्थांच्या बहिष्कृतीला देखील ते पुनर्निमित करतं. ज्या भाषेमध्ये ज्ञानाचं सृजन होते व त्या श्रम संस्कृतीमध्ये ज्ञानाचं सृजन होतं ते औपचारिक शिक्षणाच्या दृष्टीने बाहेरची घटना आहे. ज्या लोकाचं ज्ञान त्या मुख्य प्रवाहामध्ये बहिष्कृत समजतात. पारंपरिकदृष्ट्या व ऐतिहासिकदृष्ट्या जे लोक ताकदवान आहेत ते सातत्याने पुढे जातात आणि हे अनाहतपणे चालू आहे. मागील तीस वर्षांमध्ये विशेषत: ही प्रवृत्ती सातत्याने प्रबळ झालेली आहे. जर आपण NEP-2020 ची चर्चा केली तर या ऐतिहासिक संदर्भाला माहीत करून घेतल्याशिवाय त्या चर्चेवर अन्याय होईल. इतिहासाला आपण माफ केल्यासारखे होईल. NEP-2020 हे आणखी किती भयंकर स्वरूपात आपल्यासमोर आलं आहे हे देखील आपणाला ऐतिहासिक संदर्भाशिवाय स्पष्ट होणार नाही. हे सर्व चालत राहिलं. मध्ये मध्ये शैक्षणिक धोरणं आली. WTO आणि GATT मध्ये शिक्षणाबद्दल बोललं आहे. आपल्या देशातील दोन मोठ्या उद्योगपतींनी शिक्षणाच्या बाबतीत एक अहवाल बनविला होता. हा अहवाल इ.स. २००० मध्ये आला. त्या अहवालाच्या प्रस्तावनेत असं म्हटलं आहे की, आता आपण शिक्षणाला सामाजिक जबाबदारीची वस्तू या स्वरुपात पाहणं बंद करावं. Now the time has arrived when we should stop seeing education aids, education in terms of its social significance. शिक्षण, शैक्षणिक अनुदान याचे सामाजिक महत्त्व असते. यासंदर्भात आपण वेगळा विचार करावा असं या दोन उद्योगपतींनी सरकारला सांगितलं होतं. याचा अर्थ काय? ज्याला शिक्षण मिळेल ते त्या व्यक्तीची व्यक्तिगत मिळकत असेल. म्हणजे, समजा मी एम.ए. पदवी मिळविली तर त्याचा फायदा कुणाला मिळेल? तर मला मिळेल. मी इथं तुमच्यासमोर भाषण देतोय. हे तर तोट्याचं काम आहे. जर मी इथं तास दीड तास बोललो तर लोक म्हणतील की, यांना या भाषणाचे किती पैसे द्यायचे. मी हे ज्ञान आपणासोबत का सामाईक करतोय हे मला माहीत नाही. कदाचित माझा बिर्ला–अंबानीशी संबंध नाहीये. त्यांनी दुसरी एक गोष्ट अत्यंत सुस्पष्टपणे सांगितली व ती गोष्ट आज तर फारच सुस्पष्ट आहे. जर शिक्षण सामाजिक कालसुसंगतेचा विषय असेल तर त्यास खरेदी किंवा विक्री कसं करता येईल. बिर्ला – अंबानीच्या अहवालामध्ये असं म्हटलं आहे की, जर शिक्षणाला खरेदी – विक्रीची वस्तू बनवायची असेल तर सर्वप्रथम काय आवश्यकता आहे तर शिक्षणाला सामाजिक जबाबदारीची वस्तू म्हणून पाहणं बंद करावं. त्यामध्ये आणखी फारच भयंकर

गोष्टी आहेत. त्या गोष्टी NEP-2020 मध्ये आल्या आहेत. NDA-1च्या सरकारला आपल्या देशातील दोन मोठ्या भांडवलदारांनी हे सांगितलं होतं की, तुम्हाला या गोष्टी करायच्या आहेत. आता त्यानंतर वीस वर्षांनी हे धोरण आलेलं आहे. ते इथपर्यंत गेले की त्यांनी शिक्षणाला WTO आणि GATS मध्ये देखील समाविष्ट केलं. ते म्हणाले की, आमच्या देशातील उच्च शिक्षण ही एक विकाऊ वस्तू आहे. तुम्ही इथे या आणि खरेदी करा. आम्ही त्यावर बोली लावतोय. त्यावेळी यावर एकमत / सहमती झाली नाही. परंतु ते लागू करण्याची प्रक्रिया सुरू झाली होती. UPA-1 सरकार बनलं आणि कपिल सिब्बल व उच्च शिक्षण विभागाने सहा बिलं आणली तेव्हा त्यावर कडाडून टीका झाली. देशभर आंदोलनं झाली व ती बिलं संसदेत कधीच मंजूर झाली नाहीत. बिलं पार्लमेंटमध्ये मंजूर न होणं ही समस्या नाहीये. मला वाटतं, बिलं पार्लमेंटमध्ये पास होणं हीच आजची समस्या आहे. (हशा) उदा. शेतकरी बिलं. परंतु परकीय विद्यापीठांना भारतात येण्यासाठीची उद्घोषणा झाली. हे आपल्याला कधी सांगितलं नाहीये. जर तुम्ही उच्च शिक्षणाला विकणार असाल तर त्यासोबत शालेय शिक्षणदेखील निघूनच जाणार आहे. कारण, शाळेत शिकविण्यासाठी जो शिक्षक येणार आहे, तो जेव्हा हे विक्री केलेलं शिक्षण खरेदी करून येईल तेव्हा तो मोफत शिक्षण शिकविण्यासाठी कसा काय उपलब्ध होऊ शकेल? जेव्हा शिक्षकांचं प्रशिक्षण एक विक्री झालेली वस्तू असेल तेव्हा मोफत शिक्षणासाठी शिक्षक कोठून उपलब्ध होईल?

शिक्षणाचा अधिकार कायदा मंजूर करण्यात आला. शिक्षण अधिकार कायद्याने खासगी शाळांना कायद्याच्या पातळीवर कायदेशीर केले. त्यास मान्यता दिली. त्यामध्ये चार प्रकारच्या शाळांचा समावेश केला गेला. सर्व विद्यार्थ्यांना सक्तीचे मोफत शिक्षण देण्याचा कायदा झाला. सर्व शाळा राज्य सरकारच्या असल्याशिवाय मोफत व सक्तीचे शिक्षण देता येणार नाही. पैसे तर राज्यांना खर्च करावे लागणार आहेत. हे कसं होणार? त्यांची तर मजबुरी होती. त्यावेळच्या राज्यकर्त्यांना शिक्षण विकायचंच होतं. त्याच्यामध्ये अनेक दोष असले तरीही त्यामध्ये एक चांगला विभाग होता. विभाग क्रमांक २५ हा चांगला होता. गरीब कमी होतील आणि अशाच प्रकारच्या अनेक चांगल्या गोष्टी लिहिल्या होत्या. तो परिवर्तनवादी व प्रगतिशील विचार आहे. संविधानाची जी मूलभूत तत्त्वे आहेत त्याबद्दल विचार केला आहे.

खाजगी शाळेत गरीब वर्गाला २५ टक्के आरक्षण देण्यात आलेले होते. ही वेगळी गोष्ट आहे. आम्ही त्याबद्दल समाधानी नाहीयेत. मी तर बिलकूल समाधानी नाहीये. आम्ही तर म्हणतोय शिक्षण सगळ्यांनाच द्यायचं आहे तर २५ टक्के आरक्षणाची गोष्टच कशाला करताय? बरं हे मोफत नाहीच. त्यासोबत अनेक गोष्टी द्याव्या लागतात. परंतु त्यानंतरचा NEP-2020 या कार्यकाळ सुरू झाला. NEP 2020 च्या अगोदर स्मृती इराणीचा ड्राफ्ट आला. त्यानंतर सुब्रह्मण्यम समिती व इतर डॉक्युमेंटस आले. कस्तुरीरंगन समिती आली. हे छोटे छोटे अहवाल आले. त्यानंतर दोन लहान आवृत्त्या आल्या. त्या आवृत्त्यांपैकी पहिल्या आवृत्तीच्या मुखपृष्ठावर २०१९ असं लिहिलं होतं. त्यानंतर दुसरी आवृत्ती डिसेंबर २०१९ मध्ये आली. त्यावर अगोदरच लिहिलं होतं NEP 2020. आणि त्यानंतर २०२० मध्ये अंतिम आवृत्ती आली. जेव्हा हे धोरण आलं त्यावेळी लोक शिक्षणच घेऊ शकत नव्हते. तो कोरोना काळ होता. त्यावेळी जे शिक्षण धोरण होतं त्यानुसारदेखील लोक शिक्षण घेऊ शकत नव्हते. जगामध्ये त्यावेळी अशा कोरोनाकाळात सहा देशांनी राष्ट्रीय शिक्षण धोरण लागू केले. हे राष्ट्रीय शिक्षण धोरण आलं तेव्हाच UGC ने संमिश्र शिक्षणामधून 'संकल्पनात्मक भूमिका' यास काढून टाकले. त्याचवेळी इतर काही नोटिफिकेशन्स आले. सरकार म्हणाले की, ४० टक्के शिक्षण हे ऑनलाईन पध्दतीने देण्यात येईल. त्यांचा विशेष भर उच्च शिक्षणावर होता. NEP-2020

या धोरणावर कोणत्याही विद्वत्तेचा, योजनेचा प्रभाव राहिलेला नाहीये.

१९ व्या शतकाच्या प्रारंभी इंग्लंडमध्ये भारताबद्दल विशेष अभ्यास झालेला होता. त्याला इंडॉलॉजी (Idology) म्हणतात. त्यास Orientalism असं म्हणतात. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात खूप समीक्षा झाली. त्यांच्या अनेक मुख्य विचारांना रद्द केले गेले. उदा. जगातील सर्व भाषा एक भाषा परिवार आहे. तीन भाषा परिवार आहेत. जसं आर्य नावाचा एक वंश आहे. ते सहा फूट उंचीचे असतात. इंडो-आर्यन भाषा परिवार इत्यादी गोष्टींना अवैध मानलं गेलं होतं. हे देखील सिद्ध झालेलं होतं की, यांची जी इतिहासाची संकल्पना आहे ती खूपच उथळ होती. कारण, माणुसकीचा उदय पाच हजार वर्षांपूर्वी झालेला नव्हता. तो उदय हजारो वर्षांपूर्वी झालेला होता. The history of human beings goes back to millions and millions of years. It is not only five thousand years old history. This was proved as early as in the middle of the nineteenth century. गमतीशीर बाब म्हणजे, या गोष्टी सिद्ध करण्यासाठी ज्या व्यक्तीने एक महत्त्वाची भूमिका निभावली त्या व्यक्तीचे नाव आहे चार्ल्स डार्विन. त्याला आताच्या भाजप सरकारने अभ्यासक्रमातून हटविले आहे. डार्विनने या पृथ्वीवरील सजीवांच्या दीर्घकालीन इतिहासाला सिध्द केले. आणि या सरकारने डार्विनलाच अभ्यासक्रमातून बाद केले. Darwin proved the long history of life on this earth. या दक्षिणपंथी विचारधारेमध्ये लेखनाची एक पध्दत आहे. त्यामध्ये देशाच्या प्राचीन काळाचा खूप गौरव केला जातो. ते त्यास 'सुवर्णयुग' म्हणतात आणि जो मध्ययुगीन काळ आहे त्याला ते 'अंधारयुग' म्हणतात. यास ते बाद करतात. धर्मग्रंथांमध्ये जे लिहिलं गेलं आहे त्याला वास्तविक सत्य म्हणून इतिहासात वापरलं जातं. धर्मग्रंथांमध्ये जे लिहिलं आहे आणि जे व्यावहारिक जीवनामध्ये होतं त्याच्यामध्ये कोणताच फरक असत नाही असं मानून धर्मग्रंथांच्या अनुवादाच्या आधारे जो इतिहास लिहिला गेला आहे त्याला आपण इंडालॉजी असं म्हणतो. NEP-2020 हे संपूर्णपणे या विचारधारेवर आधारित आहे. म्हणूनच त्यामध्ये मध्ययुगीन काळाचा कोणताच उल्लेख नाही. प्राचीन भारत, तक्षशीला, नालंदा यांना खूप मोठ्या विद्यापीठाच्या स्वरूपामध्ये सादर केलं आहे आणि त्यानंतर ते थेट आधुनिक काळाकडे येतात. म्हणजेच मधल्या हजार दीड हजार वर्षांच्या काळात काहीच झाले नाही.

इंग्रज सरकार, महात्मा जोतिबा फुलेंसारख्या असंख्य सामाजिक कार्यकर्त्यांनी, ख्रिश्चन मिशनरीजनी, स्वतंत्र भारताच्या सरकारांनी काहीच केलंल नाहीये असा त्यांचा प्रचार असतो. फक्त सुरुवातीलाच जे झालं ते झालं. इतरांनी काहीच केलं नाहीये. जैन, बौध्द, चार्वाक, शीख इत्यादी अब्राह्मणी परंपरांचा उल्लेख नाहीये. त्यांना बहिष्कृत केलं आहे. अर्थात त्याच्यामध्ये एक प्रकरण आहे. सामाजिक, आर्थिकदृष्ट्या वंचित असं प्रकरण आहे. परंतु त्यामध्ये जातीच्या आधारावर इतिहासात भेदभाव होत आलेला आहे. दलित आणि दलित वर्ग यांच्या आर्थिक समस्यांबद्दल कसलाच उल्लेख नाहीये. मी हे विधान अत्यंत काळजीपूर्वक करत आहे. थोडा उल्लेख आदिवासीबद्दल आहे. परंतु त्यांच्यासाठी आदिवासी आश्रम आहेत. आदिवासींसाठी आदिवासी आश्रम उभारले जातील असा उल्लेख आहे. मुस्लीम अल्पसंख्याकाबद्दल कसलाच उल्लेख नाही. खरं तर उर्दू ही मुस्लिमांची मातृभाषा नाहीये. परंतु या धोरणात उर्दूचा कसलाच उल्लेख नाहीये. आरक्षण शब्दाचा कुठेच उल्लेख नाहीये. उलट त्यामध्ये अनेक ठिकाणी प्रवेश, निवड आणि नेमणुका, पदोन्नतीसाठी काही ठिकाणी आणि कडकपणे काही ठिकाणी केवळ 'गुणवत्ता' हेच तत्त्व असेल असं म्हटलेलं आहे. गुणवत्ता एवढा उल्लेख पुरेसा होता. परंतु 'काटेकोरपणे' आणि 'केवळ' हे शब्द वापरण्याची काय गरज होती? कुठेच आरक्षणाचा उल्लेख नाही. अनुशेष भरण्याची चर्चा वा उल्लेख नाही. त्यामध्ये कुठेच शिक्षकांच्या सेवा

आयोगाबद्दल उल्लेख नाहीये. शिक्षण हक्क कायद्याने जे थोडंफार मिळालं होतं किंवा १९६८ व १९८६ च्या धोरणाने जे मिळालं होतं त्या धोरणालादेखील संपूर्णपणे या NEP-2020 ने रद्दबातल करण्याची तरतूद केली आहे. खरं तर मी NEP-2020 ला राष्ट्रीय हकालपट्टी धोरण (National Expulsion Policy) म्हणेन. देशातील नागरिकांना त्यांच्या मूलभूत हक्कांपासून वंचित ठेवण्यासाठीच हे धोरण आणलं आहे. कोठारी कमिशनने School Clusters चा उल्लेख केला आहे. सहकार तत्त्वाच्या अनुषंगाने त्याचा उल्लेख केला आहे. NEP-2020 मध्ये असं म्हटलं आहे की, पाच ते अकरा कि.मी. च्या परिघात येणाऱ्या सर्व शाळा एका समूहाचा भाग होतील. कुठे पाच किमीचा परीघ बनेल तर कुठे अकरा किमीचा परीघ बनेल. ज्या प्रदेशात दूर दूर लोकसंख्या वसलेली आहे. तो भाग डोंगराळ आहे. हे कोणते भूभाग आहेत? ते मागास जातींचे भाग आहेत. आदिवासींचे प्रदेश आहेत. जंगलात राहणाऱ्या निवासींचे हे प्रदेश आहेत. तिथे अकरा किमीच्या परिघाचे क्लस्टर असेल. क्लस्टर म्हणजे काय? जर एखाद्या शाळेत एखाद्या विषयाचा शिक्षक नाहीये तर काही अडचण नाही. कारण, ती शाळा कायदेशीर मानली जाईल. कारण, तिथे दुसऱ्या शाळेतून शिक्षक येईल. एका शाळेत क्रीडांगण नसेल तर दुसऱ्या शाळेतून येईल. शिक्षण हक्क अधिकार कायदा आठव्या वर्गापर्यंत शिक्षण द्या असं म्हणतो आणि NEP-2020 म्हणते की, पाचव्या वर्गापर्यंत शिक्षण द्या आणि हे परत म्हणताहेत की आम्ही मातृभाषेला प्रोत्साहन देऊ. उच्च शिक्षणामध्ये देखील मातृभाषेला प्रोत्साहन देण्याचा उल्लेख आहे. हे आणखी मजेशीर आहे. आता त्यांनी देशातील सर्व विद्यापीठांतील प्रवेशासाठी Common University Admission Entrance Test लागू करण्याचं ठरवलं आहे. त्यांनी केंद्रीय विद्यापीठांना लागू केलं आहे. आता किती राज्य विद्यापीठे आणि खासगी विद्यापीठे स्कोअर निश्चित करतील? तो स्कोअर तर वाढणारच आहे; पण तो वाढला नाही तरीही देशातील १७ टक्के सीबीएसई शाळांच्या अभ्यासक्रमावर आधारित जेव्हा आपण संपूर्ण देशातील विद्यार्थ्यांची एक सामायिक प्रवेश परीक्षा घेणार आणि अशाच प्रकारे सरकारने अगोदरच वैद्यकीय व अभियांत्रिकीसाठी नीट व जेईई प्रवेश परीक्षा लावलेल्या आहेतच. व्यवस्थापन कोर्ससाठीदेखील प्रवेश परीक्षा आहे. आणि आता विद्यापीठ प्रवेशासाठी सर्वसाधारण प्रवेश परीक्षा लावली आहे. या सर्व परीक्षा कोचिंगवर आधारलेल्या असतील. या परीक्षा इंग्रजी पुस्तकांवर आधारलेल्या असतील किंवा त्या त्या भाषेत इंग्रजी पुस्तकांचा अनुवाद केलेल्या पुस्तकांवर आधारित असतील तेव्हा मग प्रश्न असा आहे की, मातृभाषेला प्रोत्साहन कसं मिळेल? आणि जर ती पुस्तके त्या-त्या मातृभाषांमध्ये उपलब्ध झाली तर ती प्रवेश परीक्षा कोणत्या भाषेमध्ये होणार? इंग्रजीमध्ये आणि त्याचं मूल्यांकन कोणत्या भाषेमध्ये होणार? ठीकाय... परीक्षा वस्तुनिष्ठ स्वरूपाची होणार पण त्याचं जे भाषांतर आहे ते कसं असणार?

हे तर शक्यच नाही. जेव्हा एखादी शिक्षणव्यवस्था केंद्रीय मुद्द्यांना उत्तेजन देईल ती व्यवस्था मातृभाषा व स्थानिक ज्ञानाला दूर करेल. स्थानिक ज्ञान म्हणजे समाजाचे ज्ञान. समाज ज्ञान म्हणजे दलित - आदिवासी याचे ज्ञान; जे ज्ञान त्यांनी जगण्यामधून प्राप्त केलेलं आहे. त्यांच्या अनुभवाचं ते संचित आहे. They have lived their experience.हे ज्ञान त्यांच्यापासून दूर होत जाईल This is a logical rational. हे तर शक्यच नाही. PARAKH म्हणजे Performance Assessment, Review and Analysis of knowledge for Holistic Development. शालेयस्तरावर केंद्रीय मूल्यांकन चाचणी लागू केली आहे. ही चाचणी तिसरी ते बारावी वर्गापर्यंत लागू केली आहे. त्याला परख म्हणतात. ही National Commission for Higher Education वर आधारलेली असेल.

राष्ट्रीय उच्च शिक्षण आयोगाच्या चार शाखा असतील. सरकारने CBSE सुरू करून NEP-2020 ला अगोदरच सुरू केले होते. UGC ने नमुना अभ्यासक्रम बनविले आणि ते विद्यापीठांवर लादले.

त्यामध्ये हिंदू स्टडीज, स्वातंत्र्य आणि फाळणी अभ्यासक्रम, भारताची कल्पना हे सर्व आहे आणि ते विद्यापीठांना शिकवावे लागणार आहे. विद्यापीठांच्या स्वायत्ततेवर आक्रमण होत आहे. हे धोरण संस्थांच्या अकॅडमिक स्वायत्ततेवर आक्रमण आहे. संघराज्य व्यवस्थेमध्ये राज्य सरकारांची जी एक स्वायत्तता आहे. त्यास क्षती पोहोचवली जात आहे. सरकार एवढ्या मोठ्या प्रमाणात केंद्रीकरण करत आहे व वरून म्हणत आहे की, आम्ही तुम्हाला मातृभाषेतून शिकविणार. शिक्षण हा राज्यघटनेमधील समवर्ती सूचीमधील विषय आहे. म्हणजेच, यावर कायदा करण्याचा प्राथमिक अधिकार हा राज्यांना आहे. परंतु राज्य व केंद्र सरकार यांच्यामध्ये किंवा त्यांच्या कायद्यामध्ये संघर्षाची परिस्थिती निर्माण होते तेव्हा त्यासंदर्भात केंद्र सरकारला कायदा बनवावा लागतो. समवर्ती सूचीचे प्रगतिशील धोरण वा तत्त्व हे असे असते. परंतु हळूहळू हे सरकार शिक्षणाला संपूर्णपणे केंद्र सरकारच्या ताब्यात घेऊ इच्छित आहे. त्यामुळे NEP-2020 ला बळ देण्यासाठी गृहमंत्री अमित शहा यांनी शिक्षणमंत्र्यांची परिषद न बोलावता राज्यपालांची परिषद बोलावली. बिहारमध्ये मुख्यमंत्री नितीशकुमार चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या विरुद्ध होते. परंतु राज्य विद्यापीठांचा कुलपती राज्यपाल असल्यामुळे अमित शहांनी तिथेही चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम लागू केला. अगोदर काँग्रेसने चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम लागू केला होता. नंतर भाजपचे सरकार बनले तेव्हा हा अभ्यासक्रम भाजपने रद्द केला आणि तेच सरकार आता हा अभ्यासक्रम दुसऱ्यांदा घेऊन आले आहे. प्रश्न असा उपस्थित होतो की, पहिल्या वेळेसचा निर्णय वेगळा होता की आताचा निर्णय वेगळा आहे. इथे मागील नऊ वर्षांमध्ये असं नवीन काय झालं आहे की, आता भाजपचा अंतरात्मा जागा झाला आहे व त्यांना याची जाणीव झाली आहे की, तीन वर्षांपेक्षा चार वर्षांचा अभ्यासक्रम जास्त चांगला आहे. सरकारला हे देखील माहीत नाही की चौथ्या वर्षी काय शिकवायचं? (हशा). मी दिल्ली विद्यापीठाच्या Academic Council वर शिक्षक प्रतिनिधी म्हणून शिक्षकांकडून निवडला गेलो आहे. तिथे बैठकीत बसून मी विचार केला की, चौथ्या वर्षी काय शिकवायचं? तेव्हा ते म्हणाले की, चौथ्या वर्षी आपण विद्यार्थ्यांकडून संशोधन करून घेऊ. ते म्हणाले की, एम.ए. एक वर्षाचं करुया. आम्ही म्हणालो, आम्ही तर एम.ए.ला दोन वर्ष शिकवितो. एक वर्ष जगाचा इतिहास शिकवितो. पूर्ण आठ पेपर्स आणि दुसऱ्या वर्षी त्यांचं जे काही स्पेशलायझेशन असेल ते आम्ही शिकवितो. ते पुन्हा म्हणाले की, चार वर्षांचा अभ्यासक्रम आहे तो एका वर्षातच शिकवू आणि जे तीन वर्षांमध्ये शिकवलं जातं ते दोन वर्षांमध्ये शिकवायचं. ते पूर्ण अव्यवहार्य बोलतात.

एक एम.ए. चा कोर्स चालविण्यासाठी वर्गखोली अपुरी पडते. वर्गात एवढे मुले - मुली असतात की सांगायला लाज वाटते. माझ्या French Revolution च्या कोर्समध्ये एवढे विद्यार्थी असतात की, त्यांना जागेअभावी खाली जमिनीवर बसावं लागतं आणि दोन प्रकारचं एम.ए. चालवायचं म्हटल्यास किती विद्यार्थी असतील? या धोरणाला लागू करण्यासाठी सरकारने विद्यापीठांच्या स्वायत्ततेबाबत एवढ्या पातळीपर्यंत तडजोड केली आहे की, त्यांनी Value Added courses. Skill enhancement courses लागू केले. हे सगळे कोर्सेस अत्यंत अर्थहीन स्वरूपाचे आहेत. सरकारने योगा कोर्स सुरू केला आहे. दिल्ली सरकारने देखील अनेक योग शिक्षकांची नेमणूक केली आहे. दिल्ली विद्यापीठामध्ये वेळापत्रकाची अडचण आहे. त्यांनी आता महाविद्यालयांचे क्लस्टर बनविले आहेत. जर तुमच्या महाविद्यालयात Skill Enhancement चा कोर्स नसेल तर तीन किमी दूर असलेल्या कॉलेजमध्ये जाऊन शिका आणि मग परत येऊन कॉलेजमध्ये वर्गात उपस्थित राहा. हा किती अव्यवहार्यपणा आहे. परंतु हा अव्यावहारिकपणा ते पुन्हा पुन्हा करताहेत. NEP-2020 इ.स. २०३० पर्यंत अधिस्वीकृतीच्या आधारावर महाविद्यालयांना स्वायत्तता देणार. आजच्या तारखेला दिल्ली विद्यापीठाच्या कक्षेत ९१ महाविद्यालये आहेत. NAAC मध्ये चांगले मार्क्स

मिळविणाऱ्या महाविद्यालयांना इ.स. २०३० पर्यंत सुटया सुटया स्वरूपात स्वायत्त महाविद्यालये करण्यात येतील. म्हणजेच, शिक्षकांच्या संघटनादेखील वेगळ्या होतील. शिक्षकांच्या सेवा, अटी, वेतन आयोग यापासून देखील शासन मुक्त होईल. त्यानंतर प्राचार्य त्याच्या मनाप्रमाणे एखाद्या शिक्षकाला वेतन देवून नेमणूक करेल. अमेरिकेत Community Colleges असतात व ते शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवतात. तशाप्रमाणे ही आपली महाविद्यालये चालतील. नाहीतर वेगळी होतील. ही महाविद्यालये विद्यार्थ्यांकडून हवी तेवढी फीस घेतील. सुब्रह्मण्यम् समितीने विद्यार्थी संघटनेच्या विरुध्द लिहिलं आहे. ABVP ला देखील आवडलं नाही. NEP-2020 म्हणतं की, इ.स. २०३५ पर्यंत जेवढी एकशाखीय महाविद्यालये आहेत. उदा. अध्यापक प्रशिक्षण महाविद्यालये त्यांना बहुविद्याशाखीय संस्थांमध्ये रूपांतरित केले जाईल. याचा अर्थ काय? Power of Article ने दिल्ली शिक्षण संस्था बनविली. अशा अनेक छोट्या मोठ्या संस्था बनल्या; पण आता या सगळ्या संस्था धोक्यात आल्या आहेत.

बाबासाहेब आंबेडकरांनी सिध्दार्थ महाविद्यालय उघडलं. ते आता धोक्यात आलंय. अशा दूरदृष्टी असणाऱ्या असंख्य लोकांनी ज्या शिक्षण संस्था उघडल्या त्यांचं काय होणार? काशी विद्यापीठाचे काय होणार? अंबानी आणि अदानी यांनी मोठ्या शिक्षण संस्थांमध्ये गुंतवणूक केली आहे.

आता UGC बंद होणार आहे. आता तिचे नाव National Commission for Higher Education होणार आहे. आता संस्थांना अनुदान मिळणार नाही. त्यांना कर्ज देणार आहेत. याचं समर्थन NEP-2020 करत आहे. शिक्षण संस्थांमध्ये परोपकारी (Philanthropic) संस्थांना उत्तेजन देण्याची गरज आहे. आता सरकारने कार्पोरेटला नवीन शब्द शोधला आहे. यामध्ये शुल्क वाढीबद्दल चिंता व्यक्त केली आहे. NEP - 2020 मध्ये असं नवीन काहीच नाहीये जे अगोदर नव्हतं. शुल्कवाढीला रोखण्यासाठी अगोदरच अस्तित्वात असलेल्या उपाययोजना तकलादू सिध्द झालेल्या आहेत. शुल्क सातत्याने वाढत आहे. त्यामध्ये आणखी एक चिंता व्यक्त केलीय. त्यामध्ये परकीय विद्यापीठांबद्दल बोललं गेलंय. परकीय विद्यापीठे कोणताही नफा मिळवणार नाहीत. परंतु ते जे काही नफा मिळवतील तो नफा शिक्षण क्षेत्रामध्येच गुंतवतील. ठीक आहे. आम्हाला अडचण नाहीये. ही विद्यापीठे नफा तर मिळवू शकतात. परंतु तो नफा ते साबण बनविणाऱ्या उद्योगात गुंतवणार नाहीत.

तुमच्या मुलांकडून घेतलेल्या शुल्कामधून जो नफा शिल्लक राहील त्यामधून ही विद्यापीठे इतर महाविद्यालये उघडू शकतात आणि ही महाविद्यालये ते केवळ या देशातच नाही तर इतर कोणत्याही देशांत उघडू शकतात. कारण त्याच्यामध्ये हे लिहिलं नाही की, education sector within this country NEP-2020 म्हणतं की, जे शुल्क घेतलं जाईल त्यामध्ये पारदर्शीपणा असेल. यापूर्वी शुल्क वाढविण्यासाठी राज्य मंडळांची मंजुरी घ्यावी लागत असे. त्यासदेखील NEP-2020 नं रद्द केलं आहे. दिल्लीमध्ये शैक्षणिक संस्थांना शुल्क वाढविण्याअगोदर राज्य सरकारची परवानगी घ्यावी लागते आणि एका वर्षात ते जास्तीत जास्त दहा टक्के वाढवू शकतात. NEP-2020 नं या सगळ्या तरतुदींना बाजूला केलं आहे. खासगीकरणास नष्ट करण्याची राज्य सरकारकडे जी ताकद होती त्यास संपविण्यात आलं आहे. खरं तर आज जी शाळा, महाविद्यालये आहेत ती मोठ्या प्रमाणात राजकीय पुढाऱ्यांची आहेत. त्यामुळे ते असं धोरण आणणारचं नाहीत की, जे धोरण अशा गोष्टींना लगाम घालू शकेल. NEP 2020 हे एक असं धोरण आहे ज्यामध्ये अकादमिक मंडळ असणार नाहीत. तिथे Board of Governors असेल. आणि या BOG ची नेमणूक सरकार करेल. उद्योग आणि राज्यकर्त्या वर्गाच्या विचार गटामधून हे ँBOG अस्तित्वात येईल. म्हणजेच, आरएसएसच्या लोकांची नेमणूक होईल आणि त्या कॉर्पोरेट घराण्यांना नेमण्यात येईल, जे त्यांच्या उद्योगामध्ये लागणारे मनुष्यबळ आणि संशोधन यासाठी या विद्यापीठाचा व महाविद्यालयांचा

वापर करतील. कोणत्याही निवडणुका होणार नाहीत. शिक्षक असणार नाहीत. दिल्ली विद्यापीठात इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमातून महाश्वेता देवी यांच्या 'पार्वती' या कलाकृतीला काढून टाकलं. इतिहास विभागाच्या विषमता आणि असमानता या कोर्सला बंद केले. हा बी.ए. पातळीवरचा कोर्स होता. तत्त्वज्ञान विभागाचा आंबेडकरांवर असणारा एक कोर्स बंद करण्याचा प्रयत्न केला; पण आम्ही त्यात हस्तक्षेप केला आणि आम्ही जिंकलो. महंमद इक्बाल यांना अभ्यासक्रमातून हटवलं. NCERT च्या समाजशास्त्राच्या पाठ्यपुस्तकांमधून त्यांनी संपूर्ण जात चळवळीचे प्रकरणच गायब केले. गांधीजींच्या खुनाचे प्रकरण वगळले. अनेक धड्यांमधून त्यांनी जातविरोधी चळवळीशी असणारी संबंधित असणारी वाक्ये वगळली. मुघल कालखंड वगळला. सरकार देशावर एकच गोष्ट लागू करत आहे. २०१५ मध्ये एक बैठक झाली होती. त्यात त्यांनी संपूर्ण देशासाठी एकच अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके असतील व ते सर्व NCERT तयार करेल याचा आराखडा तयार केला. आता राज्यांना तीच पाठ्यपुस्तके शिकवावी लागणार आहेत. सामाजिकशास्त्रात जास्तीत जास्त २० टक्के भाग राज्य जोडू शकतील. संपूर्ण देशात एकाच प्रकारचे ज्ञान थोपवलं जाईल. राज्यांच्या इतिहासाची मुळं कमी केली आहेत. नैसर्गिक विज्ञानामध्ये स्थानिक परिस्थतीचं ज्ञान असण्याची गरज नाही. महाराष्ट्र आणि दिल्लीतील शाळेत असणारे विद्यार्थी एकच पाठ्यपुस्तक अभ्यासतील. पर्यावरणाचं एकच पाठ्यपुस्तक असेल. महाराष्ट्राच्या एखाद्या भागात असणाऱ्या वृक्ष, वेली, प्राणी यांचा त्यात उल्लेख असणार नाही. दिल्लीतील अशोक रस्त्यावर असणाऱ्या वृक्षांचा त्यात समावेश असणार नाही. मागील काही वर्षांमध्ये वेगवेगळे राजकीय पक्ष NEP- 2020 च्या विरोधात दिल्लीत आंदोलन करत होते. देशाच्या वेगवेगळ्या भागामधून आलेले लोक आंदोलन करत होते. विरोधी पक्ष जसं राहुल गांधी यांनी कर्नाटक व तामिळनाडू येथे याचा उल्लेख केला. परंतु अजूनही याबाबत एक सशक्त राजकीय चिकित्सा व चर्चा झालेली नाहीये. तामिळनाडूने NEP-2020 ला नकार देवून स्वत:चे शैक्षणिक धोरण लागू केले आहे. कर्नाटकातदेखील असेच होत आहे. हे एका अशा परिस्थितीत होतंय जेव्हा ब्राह्मण्यवादी आणि भांडवलवादी शक्ती आरक्षण, सामाजिक न्याय व संविधानाला नष्ट करण्यासाठी इरेला पेटली आहेत. NEP-2020 ला नकार देवून काहीच साध्य होणार नाही. त्याचं चिकित्सक विश्लेषण करणं गरजेचं आहे. कारण, यावेळी सरकारने NEP-2020 च्या समर्थनात पूर्ण शक्ती लावली आहे. आणि संपूर्ण परिवर्तनवादी बुद्धिजीवी वर्गाला भ्रमित केलं आहे. त्यांना स्वत:च्या तंबूत ओढलं आहे. त्यामुळे NEP-2020 चं समालोचनात्मक व चिकित्सक विश्लेषण होणं गरजेचं आहे. एका जनकेंद्री धोरणाबद्दल आपल्याला बोलावं लागेल. त्याची प्रचंड गरज आहे. कारण, NEP-2020 ला नकार देवून रद्द करून घेतलं तरी त्यानंतर कोणतं धोरण येणार आहे हे जर आपण ठरवलं नाही तर हीच चौकट चालू राहील आणि अशाच प्रकारे इतर धोरणं येतील.

मी इथं दुसरी गोष्ट बोलणार आहे. खरं तर कोणतंही शिक्षण धोरण असू देत ते आपल्या राज्यघटनेमधील तीन गोष्टींशी ताळमेळ असणारं हवं. ते गरजेचं आहे. एक-संविधानाची प्रास्ताविका महत्त्वाची आहे. दुसरं म्हणजे मूलभूत अधिकार आणि त्यामध्ये स्वातंत्र्याचा अधिकार व समानतेचा अधिकार या दोन्ही गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. कोणतंही शिक्षण धोरण तयार झालं किंवा कोणतीही शैक्षणिक नीती तयार झाली तरी ती जोपर्यंत या दोन हक्कांशी ताळमेळ राखत नाहीत तोपर्यंत असं शिक्षण धोरण संविधानविरोधी असणार आहे. तिसरं म्हणजे संविधानामध्ये दिलेली नीतीनिर्देशक तत्त्वे. राज्यांना मार्गदर्शक तत्त्वे सांगितली आहेत. सर्व सरकारांनी या मार्गदर्शक तत्त्वांना बकवास म्हणून किनाऱ्यावरच ठेवलं आहे. मान्य आहे की, ही तत्त्वे कोणत्या एका व्यक्तीसाठी न्यायपूर्ण नाहीत. परंतु ही तत्त्वे सर्व सरकारांसाठी बंधनकारक आहेत.

कोणतंही सरकार असलं कसलं धोरण बनवू

शकतं जे मार्गदर्शक तत्त्वांच्या विरोधी आहे. लक्षात ठेवा, मी इथं केवळ कलम १४ व कलम १५ बद्दल बोलत नाहीये. हे कलम मोफत व सक्तीच्या शिक्षणाबद्दल बोलतं. वय वर्षे १४ पर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण राज्याने द्यावे असं हे कलम म्हणतं. कलम ३९ व ४३ बद्दल देखील मी बोलत नाही. प्रत्येक व्यक्तीला सन्मानपूर्वक जीवन जगण्याचा अधिकार आहे. राज्याची ही जबाबदारी आहे की, समाजामध्ये संसाधनांचे समान वितरण समानतेच्या आधारावर करावे. समाजामध्ये जी असमानता आहे, त्यास कमी करावं. जे धोरण बनेल किंवा बनलेलं आहे त्या धोरणाला संविधानाच्या या तीन भागांना जोडून पाहणं ही कोणत्याही बहुजन आंदोलनाची प्रथम अट असायला हवी.

ज्या देशात जातिव्यवस्था आजपर्यंत जिवंत आहे आणि जिथे जमीन सुधारणा आजपर्यंत झालेली नाहीये; तसेच जिथे गरिबातील गरीब व्यक्ती आपल्या पाल्यांना सर्वोत्तम शिक्षण देण्यासाठी स्वत:ची जनावरे, स्थायी व अस्थायी संपत्ती विकतो त्या देशामध्ये शिक्षणाच्या लढाईला प्रागतिक चळवळीच्या गाभ्यामध्ये असणं महत्त्वाचं आहे. हे यासाठीदेखील महत्त्वाचं आहे की, बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या प्रसिध्द असलेल्या घोषवाक्यामध्ये 'educate, organise and agitate ' शिक्षण या शब्दाला अग्रभागी ठेवलं. परंतु त्यांनी जे संविधान तयार केलं ते देखील धोक्यात आहे. अनेक हिंदी वृत्तपत्रांमध्ये बातम्या प्रकाशित झाल्या. इ.स. २०२४ मध्ये होणाऱ्या कुंभमेळ्यात संत-महंतांच्या एका सभेद्वारे तयार केलेल्या संविधानाचा एक तृतीयांश भाग प्रकाशित होणार आहे. मला वाटतं की, परिवर्तनवादी आंदोलनांसाठी शैक्षणिक धोरणाच्या इतिहासाची समज आणि वर्तमानकाळात आमच्यासमोर जी आव्हाने उभी आहेत त्यांना स्वीकारून पुढे जाण्यासाठी मार्गदर्शक म्हणून काम करणार आहेत. याच गोष्टी आपल्या देशातील लोकशाहीला वाचवू शकतात.

■


**अक्षरगाथा नियतकालिकाच्या विशेषांकासाठी हार्दिक शुभेच्छा... !**

शुभेच्छुक



प्रो. डॉ. एस. एम. मांटे
संस्थापक



सौ. आर. एस. मांटे
अध्यक्षा

JALNA

भिलदरी बहुउद्देशीय संस्थेचे

- राजर्षी शाहू कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, पारध.
- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्र, पारध
- राजर्षी शाहू विद्यालय, पारध.
- महर्षी पाराशर ऋषी इंग्लिश स्कुल, पारध.
- राजर्षी शाहू इंग्लिश स्कूल, दत्तनगर, जालना.
- राजर्षी शाहू इंग्लिश स्कूल ॲण्ड ज्युनीअर कॉलेज, मंठा रोड, जालना.
- कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाटूर, ता. परतूर, जि. जालना.
- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्र, वाटूर

- : वैशिष्ट्ये : -

* इयत्ता ११ वी, १२ वी कला, वाणिज्य विज्ञान * बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.सी.ए.सायन्स, बी.एस्सी. संगणकशास्त्र,
* एम.एस्सी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, * एम.ए. मराठी, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, एम. कॉम.
* यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, अभ्यासकेंद्र. बी.ए., बी.कॉम., बी. एस्सी., एम. ए. मराठी., इंग्रजी, हिंदी, एम.कॉम, एम.बी.ए.



# फुले-आंबेडकरी दृष्टीकोनातून इतिहासलेखन

■

**डॉ. उमेश बगाडे**
सिटी हाईट अपार्टमेंट, फ्लॅट नं.बी-२०४, यशोमंगल हाऊसिंग सोसायटीच्या समोर, सम्राटनगर, खडकेश्वर, छत्रपती संभाजीनगर भ्र. ९८९०९१२७३४

शब्दांकन - **उमेश खडसे,**
बाभूळगाव, जि यवतमाळ,
भ्र. ८३९०२८२०९१

> दि. ७ व ८ ऑक्टोबर २०२३ रोजी लोकायत विचारमंच आयोजित सातवी विवेकजागर परिषद जालना येथे संपन्न झाली. या परिषदेत 'भारतीय इतिहास लेखन व समकालीन राजकारण' या मध्यवर्ती विषयावरील '**फुले-आंबेडकरीवादी दृष्टीकोनातून इतिहासलेखन**' या विषयावर केलेल्या मांडणीचे शब्दांकन अक्षरगाथाच्या वाचकांसाठी प्रसिद्ध करीत आहोत.

प्रा. अनिरुद्ध देशपांडे यांनी आपल्या मांडणीमध्ये पर्यायी इतिहासलेखनाचा एक पट उभा केला आहे. त्यातून पर्यायी इतिहासलेखनाच्या शक्यता कोणकोणत्या इतिहासलेखनातून येतात, याचा निर्देश केला आहे. त्यामध्ये त्यांनी मार्क्सवादी, नवमार्क्सवादी, स्त्रीवादी, सबाल्टर्न, फुले-आंबेडकरी अशा इतिहासलेखनाचा उल्लेख केला. त्याला प्रा. देशपांडे यांनी प्रतिप्रभुत्वाचे इतिहासलेखन म्हटले. प्रभुत्वाला प्रश्न विचारून शोषित-वंचितांच्या बाजूने इतिहास लिहिणारे प्रवाह म्हणून त्यांचा उल्लेख होतो. त्यापैकी मी फुले-आंबेडकरांचे इतिहास लेखन हा विषय माझ्या मांडणीसाठी बुध्याच निवडला आहे. त्याचे कारण अगदी स्पष्ट आहे. समकालीन भारताचे राजकारण हेच मुळात मार्क्सवादी चौकटीत उलगडता येते का, तर ते उलगडता येत नाही. इतिहासकार इतिहासाच्या बदलामागचे तत्त्व जाणतो, ते तत्त्व सांगण्याचा प्रयत्न करतो. मार्क्सवादाचा जो सिद्धांत आहे, तो प्रामुख्याने उत्पादन साधनांमध्ये जो बदल होतो, यावर भर देतो. हा सिद्धांत जेव्हा आपण घटनाक्रमाला आणि वर्तमानाला लावतो तेव्हा आपणास असे दिसते की, भांडवलशाहीचे चरित्र बदलले आहे. भांडवलशाही बदलली आहे. भांडवलशाही बदलल्यामुळे ती मुख्यत: आता अस्मितावादी, प्रतीकवादी राजकारणाचे धोरण पुढे नेत आहे. अनेक मार्क्सवादी सांगतात, त्यानुसार इटली, जर्मनीमध्ये असे अस्मितावादी, प्रतीकवादी राजकारण उभे राहिले. असे राजकारण उभे राहण्यामागे भांडवली शक्ती काम करत होत्या. यातील पेच समजून घेणे गरजेचे आहे. तो पेच काय आहे. तर जणू काही घटना अनिवार्य आहेत, त्या बदलणारच नाहीत, अशा चौकटीत मार्क्सवादाचा सिद्धांत लागू करण्यात येतो. विशेषत: ज्याला 'ऑफ़िशिअल मार्क्सइझम' म्हटले जाते. त्यामध्ये घटना या जणू काही अनिवार्यपणे विशिष्ट वळणानेच घडणार आहेत, असे मानले जाते. त्यामुळे समकालीन राजकारणाला भेदण्याचे सूत्र त्यातून मिळत नाही. समकालीन राजकारणाला नेमकेपणाने भेदायचे असेल तर आपल्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इतिहासाचे जे प्रारूप दिले, ते प्रारूप समकालीन राजकारणाला लावून पाहता आले पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'क्रांती-प्रतिक्रांती' नावाचा ग्रंथ लिहिला आहे. त्यामध्ये दोन प्रतिमा आहेत. एक 'क्रांती'ची प्रतिमा आहे, तर दुसरी 'प्रतिक्रांती'ची आहे. डॉ. आंबेडकरांनी त्यांच्या ग्रंथामध्ये भारतात येऊ

घातलेल्या प्रतिक्रांतीचे भाकीत केले आहे. हे भाकीत समुचित असल्यामुळे त्याची चर्चा आपण करीत आहोत.

'प्रतिक्रांती'विषयी डॉ. आंबेडकरांचे जे आकलन आहे, त्यामध्ये त्यांनी प्रतिक्रांतीचे तीन-चार महत्त्वाचे घटक सांगितले आहेत. त्यातील एक घटक 'आत्मकल्पनेचा भ्रम' हा आहे. सगळे स्त्रीशूद्रातिशूद्र हे दबल्या गेलेले असताना सुद्धा आपले स्वत: चे दबलेपण का टिकवतात, ते का निभावतात आणि ते निभावण्यामागे मूळ कारण काय आहे, हे समजून घेणे आवश्यक ठरते. आपल्या दास्यत्वाची भूमिका स्त्रीशूद्रातिशूद्र, कामगार, शेतकरी का पाळतात ? तर याचे एक मुख्य कारण फुल्यांनी सांगितले ते म्हणजे 'अविद्या' होय. म्हणजे स्वत:विषयीची आणि जगाविषयीची चुकीची कल्पना होय. अशा चुकीच्या कल्पनेतून आपल्याला कर्तेपण आलेले दिसून येते. आपले कर्तेपण या चुकीच्या आत्मकल्पनेतून उभे राहिलेले आहे. या सभागृहात मी बोलत असताना तुमची जी आताची स्थिती आहे, ती विद्यार्थ्याची आहे. म्हणून तुम्ही ऐकत आहात तर माझी जी भूमिका आहे, ती शिक्षकाची आहे, म्हणून मी बोलतोय. आपल्या आत्मकल्पना आपल्याला कर्तेपण देऊ करते. कर्तेपणाच्या सर्व कल्पना मुख्यत: ब्राह्मणी भ्रामक ज्ञानातून निष्पन्न होतात. उदा. जातीच्या ओळखी आपण स्वत: घेतलेल्या नाहीत. कोण स्वत:हून स्वत:ला चांभार, महार, गोंड, सुतार म्हणवून घेईल. कोण स्वत:ला आम्ही नीच आहोत म्हणून आम्ही हे जातीय स्थान स्वीकारले असे म्हणेल. त्यामुळे जर या जातीय आत्मकल्पना आपण स्वत:हून स्वीकारलेल्या नाहीत, तर त्या आपल्याला दिल्या कुणी आणि त्या आत्मकल्पना निभावण्यासाठी आपण रोजच्यारोज स्वत:ला त्या आत्मकल्पनांच्या अनुषंगाने परफॉर्म (perform) करीत आहोत. स्वत:ला त्यादृष्टीने रोज घडवतो. स्वत:ची आत्मकल्पना रोज राबवित आहोत आणि त्यानुसार वागतो. जातीय ओळखीची आत्मकल्पना आपल्याला विवेक देते. आपला विवेक अशा आत्मकल्पनांमधून येतो. उदा. मी 'पती' आहे. मी 'पत्नी' आहे. मी 'पिता' आहे. अशा आत्मकल्पना आपण करतो. या आत्मकल्पनांमधून आपला स्वत:चा कर्तेपणाचा विवेक घडतो.

आत्मकल्पनेचे हे सूत्र आताच्या लोकशाहीच्या दृष्टीने फार महत्त्वाचे सूत्र आहे. लोकशाही असतानासुद्धा 'ब्राह्मणसत्व' हे बहुसंख्यांक होते तर 'शेतकरी' आत्मसत्व हे बहुसंख्यांक असतानासुद्धा ते मात्र अल्पसंख्याक होते. शेतकऱ्यांच्यासंदर्भात अलीकडे तीन कायदे करण्यात आलेत. हे तीन कायदे भारतामध्ये बहुसंख्याकांचे (बहुमतात) जे सरकार प्रस्थापित झाले, त्या सरकारने बहुसंख्यांक असणाऱ्या शेतकऱ्यांच्या विरोधातील तीन कायदे केले. या ठिकाणी विवेक कसा घडला तर तो ब्राह्मणी धार्मिक जातीय ओळखीतून घडला. अमेरिकेतून एक मराठे नावाचा ब्राह्मण हा शेतकरी कायदेविषयक धोरण ठरवण्यात मोदी सरकारमध्ये मध्यवर्ती होता. त्याचे अहवाल आता आले. शेतकऱ्यांच्यासंदर्भात काय करायचे, याविषयी शेतकऱ्यांना न विचारता अमेरिकेमधून एक ब्राह्मण येतो आणि भारतात भांडवलदारांशी चर्चा करून शेतकऱ्यांविषयी भारताचे धोरण ठरवतो. 'ब्राह्मणसत्व' बहुसंख्यांक होणे आणि शेतकरी बहुसंख्यांक असून ते अल्पसंख्यांक होणे हे या उदाहरणावरून वर्तमानकाळात समजून घेता येते. हे इतिहासाच्या प्रांगणामधील महत्त्वाचे राजकारण आहे. कारण, आपल्याला ज्या आत्मकल्पनांची देण मिळाली ती सगळी इतिहासाची देण आहे. आपण वर्तमानात ज्या जातीय / लैंगिक ओळखी घेत आहोत, त्या काही आजच्या बाबी नाहीत. तर त्या इतिहास प्रदत्त आहेत. इतिहास काळापासून चालत आलेल्या ओळखी आपण निभावत आहोत. इतिहास काळापासून 'पिता' कसा असावा, हे चालत आले आहे. आपण ती भूमिका निभावत असतो. इतिहासाची जी कल्पना तुमचे कर्तेपण काय असले पाहिजे हे सुचवते, निर्देशित करते, ती कल्पना इतिहास ज्ञानातून निष्पन्न झालेले आहे. त्यामुळे तुम्ही म्हटले की, आम्ही 'मराठे' आहोत, तर 'मराठा' या ओळखीचा इतिहास रचावा लागतो. मराठा ओळखीचा इतिहास मूलत: ब्राह्मण्यवादाच्या कुशीतच रचला गेल्या

कारणामुळे 'मराठा' ही आत्मकल्पना स्वीकारल्याबरोबर तुम्ही अधीनतेच्या चौकटीत उभे राहता. ब्राह्मण तुमच्या वरती येतात. वर्णाश्रमधर्माचा आकृतिबंध स्वीकारल्याशिवाय मराठा/ क्षत्रिय धर्म स्वीकारताच येत नाही. ही जी कोंडी आहे, ती ब्राह्मण्यवादी इतिहास ज्ञानाने आपल्यासमोर उभी केली आहे. या कोंडीत अडकल्या कारणांमुळे आपण प्रतिक्रांतीचे एजंट बनले आहोत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी फॅसिझमची इटली आणि जर्मनीत झाली, त्यांच्याविषयी अत्यंत मौलिक लिहिले आहे. या प्रतिक्रांतींवर ज्या चिंतकाचा प्रभाव आहे, तो चिंतक म्हणजे नित्शे होय. नित्शेने 'मनुस्मृती' ग्रंथाचे कौतुक केले आहे. मनुस्मृती या ग्रंथाचे कौतुक करून 'सुपरमॅनची' थिअरी नित्शेने मांडली. नित्शेची ही सुपरमॅनची थिअरी नाझीझमध्ये हिटलरने प्रत्यक्षात आणली. आम्ही जर्मन सुपरमॅन आहोत आणि बाकी सगळे सामान्य आहेत. त्याआधारे हिटलरने ज्यूंची मोठी कत्तल घडवली. हे जे सुपरमॅनचे प्रतिमान आहे, मनुस्मृतीमधून प्रेरित झालेले आहे आणि हे स्वत: नित्शेने कबूल केले आहे. या नित्शेचे खंडन डॉ. आंबेडकरांनी केले आहे. डॉ. आंबेडकरांनी लिहिलेल्या प्रतिक्रांतीमध्ये जी आत्मकल्पना सुपरमॅनच्या चौकटीत कशी उभी राहते, त्याचे दिग्दर्शन केले आहे.

डॉ. आंबेडकरांनी 'ब्राह्मणवाद' या शब्दाची व्याख्या ही मुख्यत: 'बळकावण्याचे राजकारण' (Politics of accusation) असे केले आहे. दुसरी गोष्ट 'अहंकार' ही होय. नित्शे मांडत असलेल्या सुपरमॅनचा अहंकार हा वाढत जातो, हे डॉ. आंबेडकर स्पष्ट करतात. अहंकाराची वृद्धी हे सुपरमॅनचे सूत्र असते. प्रतिक्रांतीच्या काळात ब्राह्मण हे 'भूदेव' बनले आणि त्यांनी त्यांना परंपरागत नसणारे सर्व अधिकार मिळविले. त्यांनी राजपद भोगण्याचा अधिकार मिळविला. त्यांच्या हितसंबंधांना विरोध करणाऱ्याला विरोध करणे, प्रसंगी त्याला ठार करणे हे नैतिक तत्त्व बनवले. जे ब्राह्मण हितसंबंधांच्या विरोधात आहे, ते सर्व राक्षस आणि असे सर्वजण निर्दालन करण्यासाठी पात्र अशी कल्पना ही या सुपरमॅनच्या आत्मकल्पनेच्या गर्तेत उभी राहिली.

आत्मकल्पनेची वाढ करणे, त्याचा विस्तार करणे याचे तर्कशास्त्र आताच्या आपल्यासमोर जी प्रतिक्रांती आहे, त्यामध्ये 'हिंदू' आत्मतत्त्व म्हणून उभे आहे. हिंदू आत्मतत्त्वसुद्धा असेच कोटिंग आहे. जगविख्यात होणे, विश्वगुरू बनणे अशा कल्पनांमध्ये तुमच्या आत्मतत्त्वाचा विस्तार करण्यात येतो. या विस्ताराच्या ज्या योजना आहेत, त्यांमध्ये एक महत्त्वाचे सूत्र असते ते म्हणजे कोणत्याही प्रकारचा नैतिक विवेक सोडण्यात येतो. महाभारत असो वा रामायण असो त्यांमध्ये धर्म-अधर्माचा विवेक सोडण्यात येतो. धर्माची व्याख्या पवित्राच्या चौकटीत करायची आणि पवित्र्याच्या कल्पनेत आत्मकल्पनेची वृद्धी करायची. ब्राह्मण श्रेष्ठ का, तर ते पवित्र आहेत. आज जे 'हिंदू' आत्मकल्पनेत जे पावित्र्य आहेत, त्यात प्रत्येकजण स्वत:ला साकारण्याचा प्रयत्न करत आहे. उदा. आम्ही लसूण खात नाही, आम्ही मटन, मांस खात नाही. आम्ही तमुक करीत नाही, आम्ही तमुक करीत नाही. शुद्धीच्या आत्मतत्त्वामध्ये आज प्रत्येक जण स्वत:ला साकारण्याचा प्रयत्न करीत आहे, ही बाब आपण समजून घेतली पाहिजे.

डॉ. आंबेडकरांनी क्रांती आणि प्रतिक्रांतीविषयक मांडणी करताना प्राचीन भारतातील प्रतिक्रांती समजून घेताना 'मनुस्मृती' हा ग्रंथ महत्त्वाचा मानला आहे. त्यात तुम्हाला सगळ्यात महत्त्वाची एक बाब दिसून येते ती म्हणजे स्त्रिया आणि शूद्रांची अधीनता (Subjection) दिसून येते. Subjection ही बाब प्रत्येक आत्मकल्पनेसाठी अनिवार्य ठरते. उदा. 'आई' असणे यासाठी कुणीही आईला कोणत्याही प्रकारे सूचित केले नाही. आई कशी वागली पाहिजे यासाठी कुणीही आईच्या पाठीमागे दंडुका घेऊन उभे राहत नाही. आई स्वत: 'आईचे' आत्मतत्त्व हे स्वत:च्या अस्तित्वात भिनवून आपल्या लेकरासाठी समर्पण आणि त्याग करीत असते. त्यामुळे 'स्त्री', 'पत्नी', 'माता' ही Subjection संस्कृतीच्या, विचारसरणीच्या पसाऱ्यात घडलेले दिसून येते. धर्म आणि धर्मग्रंथांच्या आधारे स्त्रियांचे

अवनतीकरण (degradation) करण्यात आले. वर्तमानकाळात स्त्रियांचे अवनतीकरण (degradation) आणि अधीनता (Subjection) वाढवण्याचे काम सुरू आहे. हीच बाब शूद्रांबाबतही सुरू आहे. भारतामधील सर्व समूहांचे जर Subjection करायचे असेल तर त्याला यंत्रणा लागते. ती यंत्रणा प्रतिक्रांतीच्या काळात जात-पितृसत्तेच्या रूपात जन्माला आली, हे डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले आहे. इतिहासातील प्रतिक्रांतीच्या या यंत्रणेचा आजच्या प्रतिक्रांतीत जोरदार वापर सुरू आहे. वर्तमानात जे भय दिसून येते, ते या यंत्रणेच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या अन्याय-अत्याचाराचे आहे. उदा. 'लवजिहाद'. लवजिहादची कल्पना आपल्यासमोर उभी करण्यात येते. लवजिहाद कल्पनेच्या अनुषंगाने आपले Subjection जात-पितृसत्तेच्या यंत्रणेमाध्यमातून आपल्या जातीच्या, आपल्या कुटुंबातील स्त्रियांचे रक्षण करणे हे परक्यांपासून करणे गरजेचे आहे, हे बिंबवण्यात येते. यातून 'परके' पणाची कल्पना आणि त्या संदर्भातील तत्त्वज्ञान हे आपल्यात भिनवण्याचा प्रयत्न जसा प्रतिक्रांतीच्या काळात करण्यात आला, तसाच तो प्रयत्न आज होताना दिसत आहे. डॉ. आंबेडकरांनी जेव्हा गीतेचे विश्लेषण केले की, बौद्ध क्रांतीने जे देणे दिले ते गीतेने पूर्णत: मान्य केलेच नाही किंबहुना देणे नव्हतेच अशी भूमिका घेतली.

आताच्या काळात स्त्रिया या प्रतिक्रांतीच्या पायदळ (foot soldier) आहेत. अर्थवशीर्ष म्हणण्यासाठी हजारो स्त्रिया गोळा होतात. अर्थवशीर्ष त्या तोंडपाठ म्हणून दाखवतात. असा हा उद्योग, त्याचा भडीमार स्वत: स्त्रियाच करतात, त्या अशा स्त्रिया आहेत, ज्यांना फुले-आंबेडकरांमुळे शिक्षणाची दारे खुली झाली. हे शिक्षण स्त्रियांना धर्माचे एजंट (वाहक) बनवण्यासाठी वापरण्यात येत आहे. या स्त्रियांना धर्माचे कर्तेपण देऊन, आपल्या धर्मासाठी आपण केले पाहिजे, ही भावना त्यांच्यात रुजवून त्या अथर्वशीर्षाचे पठन करीत बसतात. या बाबी लक्षात घेतल्यास डॉ. आंबेडकरांचे इतिहास लेखनाच्या सूत्राचे महत्त्व आपल्या लक्षात येण्यास मदत होते.

बदलत्या उत्पादन पद्धतीनुसार बदल होणार आहेत आणि उत्पादन तंत्र आणि भांडवलशाहीच्या अरिष्टामधून मक्तेदार भांडवलशाहीचा विकास होणार आहे. अशा प्रकारच्या यांत्रिक आकलनातून आपण समकालीन राजकारणाचा पेच समजू शकत नाही. तो जर समजून घ्यायचा असेल तर डॉ. आंबेडकर जो आत्मकल्पनेचा पेच मांडतात तो समजून घेतला पाहिजे. आत्मकल्पनेचा जो पेच आहे तो आपल्या सर्वांना घडवणारा आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पाचव्या खंडात 'वार्निंग टू अनटचेब्लस' मध्ये एक टिपण लिहिले आहे. त्यामध्ये त्यांनी प्रामुख्याने विचार करण्याच्या यांत्रिकपणावर आक्षेप घेतला आहे. त्यातील एक मुद्दा मार्क्सवादाला मानणाऱ्यांसाठी पुढे आणला. भारतामध्ये जर भांडवलशाहीचा विकास झाला. तर जातिव्यवस्था आपोआप कोलमडून पडेल, असा विचार त्या काळात मांडला जात होता. डॉ. आंबेडकरांनी आपल्या मांडणीत हा तर्क चुकीचा असल्याचे दर्शविले. भांडवलशाही आल्यामुळे जातिव्यवस्था मोडत नाही, हे त्यांनी स्पष्ट केले. दुसरा आणखी एक 'विवेका'चा तर्क त्यांनी खोडला. कांटने प्रबोधनाची कल्पना मांडली. त्या प्रबोधनाच्या कल्पनेतून एक विचार पुढे आला. तो म्हणजे विवेक हा माणसांमध्ये शिक्षणामधून जागृत होतो. शिक्षणाचा जसा जसा विस्तार होईल तसातसा लोकांमध्ये विवेकदेखील जागृत होत जाईल आणि जसा जसा विवेक जागृत होईल तसातसा जातिव्यवस्था भ्रांत आहे, ती अयोग्य आहे हे समजून येईल आणि मग लोकं जातिव्यवस्था मोडतील. म्हणजे विवेकवादातून जातिव्यवस्थेचा बीमोड होईल. डॉ. आंबेडकर म्हणतात, विवेकाने जातिव्यवस्था मोडल्या जाईल, हे शक्य नाही. आपले मत पटवून देण्यासाठी ते एक उदाहरण देतात. ते असे की, ब्राह्मण वर्ग शिक्षित होऊनही तो जातिव्यवस्था मोडण्यासाठी तयार नाही. ब्राह्मण शिक्षित होऊनसुद्धा जातिव्यवस्था का मोडत नाही, त्याचे एक साधे उत्तर आहे, ते म्हणजे की, ब्राह्मण ही त्याची

आत्मकल्पना जातिव्यवस्थेच्या उतरंडीमध्ये त्याला श्रेष्ठत्व देते. जातिव्यवस्थेच्या श्रेष्ठत्वाच्या चौकटीत आत्मकल्पना ओलांडून त्याचा विवेक काम करीत नाही. जातिव्यवस्थेने दिलेल्या ब्राह्मण या आत्मकल्पनेच्या कुशीतच त्याचा विवेक काम करतो. अशा प्रकारे आपले विवेक जर त्या त्या जातीने, पितृसत्तेने दिलेल्या चौकटीत आपला विवेक संचालित झाला की, आपोआपच आपण ब्राह्मण्यवादाचे घटक बनतो, वाहक बनतो. त्यामुळे ब्राह्मणी पितृसत्तेच्या भूमिकेत जर आपली पित्याची भूमिका उभी राहत असेल तर आपण तोंडाने कितीही म्हणत असलो की आम्ही फुले-आंबेडकरवादी आहोत आणि आमची भूमिका ही जातिव्यवस्था विरोधी क्रांतिकारक आहे, तरीही उपयोग नाही. त्यामुळे कुठल्याही परिवर्तनाला आपण सिद्ध होऊ शकत नाही. म्हणून आपल्या आत्मकल्पनांचे हे जे जंजाळ आहे, ते निपटून काढणे गरजेचे आहे. ते जंजाळ निपटून काढण्यासाठीचे सूत्र फुले-आंबेडकर देतात. 'बुद्ध आणि त्याचा धम्म' या ग्रंथात डॉ. आंबेडकर 'फ्रीडम'ची व्याख्या देतात. त्या व्याख्येचे सूत्र 'बौद्धिक स्वातंत्र्य आणि मानसिक स्वातंत्र्य' हे आहे. त्यात हे स्पष्ट करतात की, तुमच्या आत्मकल्पनेचा जो भ्रम आहे, तो नष्ट करणे म्हणजे फ्रीडम आहे.

फुले-आंबेडकरांच्या इतिहास लेखनावर मी लिहिलेले आहे. मात्र प्रस्तुत ठिकाणी मी त्यांच्या वर्तमानकाळातील दार्शनिक महत्त्वावर भर देत आहे. जातिव्यवस्थेने दिलेल्या आत्मकल्पनांचे जे भूत तुमच्या माझ्या मनात आहे, त्याच्या चौकटीत जोपर्यंत आपण अडकून आहोत तोपर्यंत आपल्याला बौद्धिक व मानसिक स्वातंत्र्य प्राप्त होणार नाही. तोपर्यंत आपण खऱ्या अर्थाने मुक्तीच्या दिशेने जाऊ शकत नाही. इतिहासाच्या कोणत्याच टप्प्यावर असे घडलेले नाही, की लोकांनी निमूटपणाने जातिव्यवस्थेचा अन्याय सहन केला. इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर जातिश्रेष्ठत्वाच्या, जातिशोषणाच्या विरोधात संघर्ष झालेले आहेत. कुणी अपमान केला की साधे एखादे लहान लेकरूसुद्धा विरोध करते. सर्वसामान्य माणूस हा समतेचा हक्क मागतोच मागतो. हे सर्वसाधारणरित्या आपणास दिसून येते. मग समतेचे हक्क ही जर माणसाची महत्त्वाची भूमिका असेल तर ती भारतामध्ये स्थिर वृत्ती म्हणून का उभी राहत नाही? याचे कारण हे आहे की, आपण आपला विवेक ब्राह्मणी व्यवस्थेने दिलेल्या आत्मकल्पनेच्या चौकटीतच उभा करतो. एकदा आपण अशा चौकटीत आपला विवेक उभा करायला लागलो की आपले समतेचे बंड फार पुढे जाऊ शकत नाही.

ब्राह्मणवाद तुम्हाला कल्पनेचे अफाट विश्व देतो. उदा. आपण स्वत:च्या जातीच्या श्रेष्ठत्वाची कोणतीही कल्पना केली तर ती ब्राह्मणवादाच्या मुशीतूनच घडते. आपल्या श्रेष्ठत्वाचा गौरव तुम्हाला सांगायचा झाल्यास तो ब्राह्मणवादाच्या चौकटीतच उभा राहतो. उदा. आम्ही क्षत्रिय आहोत. आमची लढवय्यी परंपरा आहे, ही कल्पना आहे. सर्वच जातींत लढवय्ये आणि भित्रे लोक असतात. सर्वच जातीत बुद्धिमान आणि कमी बुद्धीची लोकं असतात. त्यामुळे एका विशिष्ट जातीचा विचार करताना मात्र विशिष्ट कल्पना मानली जाते. उदा. ब्राह्मण बुद्धिमान, शूद्र बुद्धिहीन. या कल्पनांच्या चौकटींमध्ये जेव्हा आपण आत्मकल्पनेच्या प्रतिमा रचायला लागता तेव्हा अपरिहार्यपणे आपण ब्राह्मणवादाच्या कह्यात अडकतो.

ब्राह्मणवाद म्हणजे, 'बळकावण्याचे राजकारण.' हे जे डॉ. आंबेडकर आपल्याला सांगतात. ते आपल्याला ठायीठायी दिसते. शिक्षण क्षेत्र बघा. सरकारी शिक्षणसंस्था मोडीत काढून आता सर्व शिक्षणाचे खाजगीकरण करण्यात येत आहे. सार्वजनिक आरोग्य सुविधा या सर्वदूर पातळीवर अत्यंत अस्थिर करून त्यांचे खाजगीकरण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. एअरपोर्ट, रेल्वे या खात्यांचेदेखील खाजगीकरण करण्याची प्रक्रिया सुरू आहे. एकूणच सगळ्या सार्वजनिक खात्यांचे हळूहळू खाजगीकरण करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. डॉ. आंबेडकरांनी प्रतिक्रांतीच्या प्रारूपाविषयी सांगितले की, ब्राह्मणवादाने सगळ्या जमिनी भूदानाच्या स्वरूपात घेतल्या आणि सगळी

प्रशासकीय पदे स्वत:च्या हातात एकवटवली. इतिहासाच्या याकाळातही बहुसंख्यांक लोकांचे सत्व अल्पसंख्यांक बनणे आणि अल्पसंख्यांक ब्राह्मणांचे सत्व बहुसंख्यांक होणे ही प्रक्रिया अशाप्रकारे घडत होती. त्याचप्रमाणे आज हे ब्राह्मणी आणि भांडवली जे अल्पसंख्यांक आहेत, ते बहुसंख्यांक बनले आहेत. आपल्या चरिताचा, भवितव्याचा प्रश्न या बळकावण्याच्या राजकारणाशी निगडित आहे. सार्वजनिक विद्यापीठे, सरकारी शाळा कोसळत आहेत. बहुजन विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे गुणवत्तापूर्ण शिक्षण, आवश्यक असणारी ज्ञानाची पातळी दिलीच जात नाही. त्यांच्या भवितव्याच्या, त्यांच्या लढ्याच्या, परिवर्तनाच्या शक्यता निर्माण होतील अशी स्थितीच ठेवण्यात आलेली नाही. बळकावण्याचे राजकारण असे गतिमान झाले असताना फुलेंचा दृष्टिकोन आपल्याला समजून घेणे आवश्यक ठरतो. फुले म्हणतात त्यानुसार, आपल्याला अविद्येचा बीमोड करावा लागेल. अविद्येचा बीमोड करावयाचा म्हणजे काय करायचे तर त्यातील पहिली गोष्ट म्हणजे तुम्हाला आणि मला जे फुले आणि आंबेडकरांनी सांगितले, ते मुक्तिदायी ज्ञान आहे. फुले-आंबेडकर कोणत्याही प्रकारच्या भ्रामक ज्ञानाला, कोणत्याही कल्पिताला नाकारतात. फुलेंनी मायथॉलोजीला नाकारले. सगळे बाबाबुवा आजही वेगवेगळ्या मायथॉलोजी उभ्या करीत आहेत. मायथॉलोजी असंभवनीय आहे. अतार्किक आहे. हे शक्य नाही. त्यामुळे कार्यकारणभावच तुमच्या आयुष्यात महत्त्वपूर्ण ठरतात. फुले-आंबेडकरांनी त्याला महत्त्व दिले. तुम्ही श्रम केले तरच धान्य पिकणार आहे, श्रम केले नाही तर धान्य पिकणार नाही. कोणताही देव तुमच्या ताटामध्ये अन्न देणार नाही. कार्यकारणभावाचे जे मूलगामी तत्त्व आहे ते तत्त्वच सर्वात महत्त्वाचे आहे. उदा. डॉ. आंबेडकर यांनी गीतेच्या बाराव्या अध्यायावर टीका केली आहे. त्यांच्या मते, ब्राह्मणवाद कल्पनेचा लहरी तर्क देतो. कल्पनेच्या लहरी म्हणजे पाप-पुण्याच्या कल्पना, स्वर्ग नरकाच्या कल्पना. तुम्ही पाप करता म्हणून नरकात जाता, तुम्ही पुण्य करता म्हणून स्वर्गात जाता. तुम्ही धार्मिक का असले पाहिजे तर तुम्ही पुण्य केले पाहिजे. ऐहिक चौकटीत बसणाऱ्या नाही. त्यामुळे इहवादाच्या चौकटीमध्ये विश्वाचा विचार केला पाहिजे. इहवाद सोडून विश्वाचा विचार करणे चूक आहे. उदा. आत्मा. आत्मा ही कल्पना कल्पनेचा एक तर्क आहे. बौद्ध तत्त्वज्ञानामध्येसुद्धा हा युक्तिवाद येतो. देह आणि आत्मा या दोन गोष्टी आहेत का? फुले आणि बौद्ध तत्त्वज्ञान विचारते. तुम्ही देह सोडून आत्मा दाखवा. एकदा का आत्मा स्वीकारला की, आत्म्याने केलेल्या कर्माचे जे फळ आहे, ते पुनर्जन्म आहे. आत्म्याने केलेल्या पापाचा, पुण्याचा जो परिणाम आहे तो चौऱ्यांशी लक्ष योनी आहे. हे कल्पनाचे तर्क सामान्य माणसाच्या कर्तेपणाला अडकून ठेवतात. त्यामुळे हा सगळा कल्पित विचार आहे, कल्पनांच्या तरंगांचा विचार आपण फेकला पाहिजे. कल्पिताचा इतिहास लिहिणे हा ब्राह्मणवादी इतिहास लेखनाचे प्रयोजन असते. दुसरी बाब म्हणजे, इतिहासाची कल्पना. ब्राह्मणवादी इतिहासाची कल्पना तुम्हाला कर्तेपणच देत नाही. इतिहास कुणाचा आहे, तर सांगितले जाते, की ज्यांनी राज्य केले , ज्यांनी ग्रंथ लिहिले त्यांचा आहे. मग ग्रंथ कुणी लिहिले, संस्कृती कुणी घडवली तर सांगितल्या जाते ब्राह्मणांनी. अशा प्रक्रियेतून कर्तेपणाचा जो इतिहास पुढे येतो तो उच्चजातीयांचाच असतो, त्यातही तो पुरुषांचाच असतो. म्हणून फुले सांगतात, मी इतिहासाची कल्पनाच बदलतो, subject matter बदलतो. आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, फुले-आंबेडकरांनी इतिहासलेखनात subject matter च बदलले. इतिहासलेखनाचा विषयच त्यांनी बदलला. महात्मा फुल्यांनी शूद्रातिशूद्रांचा इतिहास लिहून इतिहास-लेखनाचा विषयच बदलला. त्यांच्या लेखनामुळे इतिहास लेखनाचे Paradigm shift झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीदेखील 'शूद्र पूर्वी कोण होते ?' हे शोधले. त्यांनीदेखील इतिहास लेखनाचा विषयच बदला. 'अस्पृश्य मूळचे कोण होते ?', याचा शोध त्यांनी घेतला. प्राचीन कालखंडात प्रतिक्रांती कशी झाली, हे शोधण्यावर डॉ. आंबेडकरांनी भर दिला.


एकूणच काय तर फुले-आंबेडकरांनी ब्राह्मणी इतिहास ज्ञान व लेखनाच्या चौकटी भेदून इतिहासलेखन केले. ब्राह्मणी इतिहास लेखनाच्या चौकटीत आपण इतिहास लेखनाला बसवले की, ब्राह्मणवादाच्या Paradigm मध्ये अडकतो, हे निश्चित. त्यामुळे फुले-आंबेडकरांनी इतिहास लेखनाची दिलेली नवी दृष्टी आपण समजून घेणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने आपण आपले इतिहास लेखनाचे विषय बदलले पाहिजेत. आपल्याला इतिहास लिहायचा असेल तर आपल्याला इतिहासाची तत्त्वे किंवा सिद्धांत यांचा मूलगामी विचार करायला हवा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मार्क्सवादाचा जो तणाव किंवा जे मतभेद आहेत, ते महत्त्वाचे मानले पाहिजे. त्यांवर सारवासारव करून चालणार नाही. भारताचे सामाजिक वास्तव हे मुख्यत: धर्मप्रभुत्वातून साकार होते. डॉ. आंबेडकर यांच्या मतानुसार, भारतामध्ये एका माणसाचा दुसऱ्या माणसाशी असणारा संबंध धर्म निर्धारित करतो. एका कामगाराचा दुसऱ्या कामगाराशी असणारा संबंध धर्म ठरवतो. श्रम करणारा दलित हा अस्पृश्य आहे आणि श्रम करणारा शेतकरी हा शूद्र आहे. काम करणाऱ्या हातांचे अवनितीकरण करण्यात आले आहे. डॉ. आबेडकर प्रतिक्रांतीच्या प्रक्रियेत श्रमाचे अवनितीकरण करण्यात येते, याकडे लक्ष वेधतात. नुसते अवनितीकरण होत नाही, तर आणखी चार प्रक्रिया घडतात. त्या त्यांनी सांगितल्या आहेत. त्यातील एक कलंकीकरणाची आहे. एखाद्याला कलंक लावला म्हणजे काय होते, तर त्याला वगळता येते. अस्पृश्य हा कलंक, शूद्र हा कलंक आहे. यामध्ये नीचतेचा दर्जा आहे. त्यामुळे नीचतेच्या दर्जामुळे नागरिकत्वाचा दर्जा मिळत नाही. नागरिकत्व नाही, म्हणजे स्वातंत्र्य नाही. त्यामुळे जेव्हा स्त्रीशूद्रातिशूद्र या सर्वांना कलंकित करणे हे राजकारण करण्यात येते. दुसरी प्रक्रिया ही सिमांतीकरणाची आहे. स्त्रीशूद्रातिशूद्रांना 'नाहीरे' बनवणे होय. मनूने तत्कालीन कालखंडात शूद्रांना कोणत्याही प्रकारच्या संपत्तीचा अधिकार नाकारला. संपत्तीचा अधिकार नाकारणे हे आजदेखील घडत आहे. विकासाच्या नावाखाली आपल्या संपत्तींना गिळंकृत केल्या जात आहे. हे एकप्रकारे बळकावण्याचे राजकारण करण्यात येत आहे. त्याने एक महत्त्वपूर्ण अभ्यास केला. मराठा आरक्षणाच्या प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर त्यांचे म्हणणे महत्त्वाचे आहे. शेतकरी जातींमध्ये (मराठा, जाट, गुर्जर इ.) या शेतकरी जातींमध्ये दारिद्र्याचे प्रमाण या काळात वाढले आहे. म्हणजे, या बळकावण्याच्या राजकारणाचा परिणाम जसा प्राचीन कालखंडातील प्रतिक्रांतीच्या काळात संपत्तीविहीनता होती, ती संपत्तीविहीनता आपल्या दारांसमोर उभी आहे. आपापल्यातील मध्यम वर्गांना सध्यातरी काही सुरक्षितता आहे. मात्र, आपल्या पुढील पिढीकडे बघा. प्राध्यापक होण्याची स्थितीच नाही. आपल्यातील नवीन पिढी प्राध्यापक होऊ शकेल, अशी स्थितीच नाही. ही प्रक्रिया संपत्तीविहीन करण्याच्या चौकटीत आपण समजून घेतली पाहिजे. एकप्रकारे अवलंबित्व आले आहे. कोणत्याही संस्थाचालकांच्या पायाशी शरणागती पत्करल्याशिवाय तुम्ही नोकरीवर लागू शकत नाही. तुम्ही बुद्धिजीवी असूनसुद्धा या नोकरीच्या प्रक्रियेत शरणागत, स्वातंत्र्यविहीन म्हणूनच जगणार आहात. त्यामुळे तुमचे स्वातंत्र्य काढून घेणे ही प्रक्रिया अशा प्रकारांमधून सुरू आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या प्राचीन काळातील प्रतिक्रांतीचे स्वरूप समजून घेतल्यास वर्तमानातील प्रक्रियांचा / घडामोडींचा अन्वयार्थ लावता येतो. त्यांनी ब्राह्मणी इतिहास लेखनाचा दृष्टिकोन नाकारून स्वतंत्र चिकित्सक दृष्टिकोन घडवला. तुमचे भौतिक शोषण करण्यासाठी धर्म आणि विचार काम करीत असतात, हे आंबेडकर यांनी इतिहासलेखनातून स्पष्ट केले. ग्रामशीपूर्वी फुले आपल्याला जे सांगतात ते व्हीजनरी आहे. फुले 'वरक्रांतीचा आश्रय' असा शब्दप्रयोग करतात. 'वरक्रांतीचा आश्रय' म्हणजे, 'आम्हीच तुमचे तारणहार आहोत./आम्हीच तुमच्या भल्यासाठी काम करू'. त्यामुळे हे वर्तमान भारतातील भांडवलदार आणि राज्यकर्ते आपल्याला सांगतात की, आम्ही गोरगरिबांचे कैवारी आहोत. मात्र ते जातिआधारित गणना टाळतात. जातिधारित जनगणना टाळणे हे आपल्या अधिकारांवरील अतिक्रमण आहे.

आज जी सामाजिक न्यायाची मागणी उभी राहत आहे, ती मागणी ही एका अर्थाने आपल्या सर्वांचा 'बहुसंख्यांक' होण्याचा प्रयत्न आहे. त्यातील पेच आपण सोडविले पाहिजेत. त्यात सर्वात महत्त्वाचे म्हणजे, जातिअंताच्या निकषावरच हे राजकारण आपण लढले पाहिजे. सामाजिक न्यायाचे राजकारण हे कोणत्याही पातळीवर जातीगटांच्या आधारे लढून चालणार नाही, ते जातिअंताच्या कसोटीवरच लढावे लागणार आहे. यासाठी आजघडीला 'हिंदुत्वाची' आत्मकल्पना उभी करून जे बळकावण्याचे राजकारण उभे केले जात आहे, त्याचे आकलन करणे गरजेचे आहे. काय घडत आहे की ज्यातून अदानी-अंबानी नवे सम्राट होत आहेत, पूर्वी कधी नव्हे, इतक्या मोठ्या प्रमाणात मीडिया भांडवलदारांच्या ताब्यात कसा काय जातो, हे समजून घ्यावे लागते. डॉ. आंबेडकरांनी प्राचीन कालखंडातील प्रतिक्रांतीच्या काळात जे बळकावण्याचे राजकारण झाले, त्याविषयी जी मांडणी केली. त्याचीच वर्तमानातील ही प्रतिकृती आहे. माझ्या म्हणण्याचा उद्देश तेच ते घडते असा नाही. मात्र त्यातून वर्तमानाला समजून घेण्यासाठी दिग्दर्शन/दृष्टी मिळते, हे नक्की. सबालटर्न दृष्टिकोनानुसार शेतकऱ्यांची जाणीव स्वायत्त असते. शेतकऱ्यांचा अभ्यास मी केला आहे. १८७५ ला जेव्हा दखखनचा दंगा झाला तेव्हा शेतकऱ्यांनी फक्त मारवाडी सावकारांना लक्ष्य केले. ब्राह्मण सावकारांना लक्ष्य केले नाही. कारण, ब्राह्मणांविषयीचा आदर शेतकऱ्यांच्या मनात भरलेला होता. मग शेतकऱ्यांची जाणीव स्वायत्त असल्याचे सबालटर्न दृष्टिकोनातील म्हणणे, त्याचे गौरवीकरण आपल्याला पुढे घेऊन जाता येत नाही. त्यामुळे भारतातील स्त्रीशूद्रातिशूद्रांनी ब्राह्मण्यत्व टिकवून आपले हक्क मागण्याच्या लढ्याने परिवर्तन येणार नाही. त्यामुळे फुले-आंबेडकरांनी मूलगामी पातळीवर जो जात्यांत सांगितला आहे, त्याच्या आधारेच भारतातील सर्व लोकांचे विवेकीकरण करावे लागेल. अशा व्यापक पातळीवर विवेकीकरण करणे हे इतिहासाचे महत्त्वाचे काम आहे. फुले-आंबेडकरांनी केलेले इतिहासलेखन आणि त्यांनी मांडलेला इतिहासविषयक दृष्टिकोन हा आपल्या विवेकीकरणाची सामग्री आहे. आपण स्वत: व विश्वाला समजून घेणे आणि आताच्या कालखंडात आपली भूमिका ठरवणे या सर्वांसाठी फुले-आंबेडकरांचे इतिहासलेखन आपल्याला मार्गदर्शक आहे. फुले यांनी आपल्या इतिहासलेखनात मायथालॉजीचा जो वापर केला होता तो स्वातंत्र्याच्या दिशेने केला.

फुले-आंबेडकर हे सर्व सामाजिक मुक्तीला महत्त्व देतात. मुक्तीकडे नेणारे इतिहासलेखन करायचे असेल तर दुसरी आणखी बाब आवश्यक ठरते, ती म्हणजे पद्धतीशास्त्र होय. इतिहास लेखनाचे विषय बदलले पाहिजे. इतिहासाच्या कार्यकारणभावाची तत्त्वे बदलली पाहिजेत. इतिहासाची पद्धती बदलली पाहिजे. त्यांनी उत्पत्तीशास्त्राचा, मानववंशशास्त्राचा उपयोग केला. इतिहास लेखनाच्या पद्धतीत बदल केल्याशिवाय आपल्याला इतिहास लिहिता येत नाही. फुले-आंबेडकरांच्या पुढे कॉ. शरद पाटील आपल्याला एका वेगळ्या स्वरूपात इतिहासाचे दर्शन देतात. या इतिहास दर्शनाला काही मर्यादा असल्या तरी चिकित्सक पद्धतीने त्याकडे बघावे, हे त्यांचेदेखील म्हणणे आहे. आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधी या फॅसिस्ट प्रतिक्रांती करणाऱ्या आहेत, असे कॉ. कम्युनिस्ट पार्टीचे (सीपीएम) मत होते. त्या विरोधातील पत्रव्यवहार कॉ. शरद पाटील यांनी केलेला आहे. त्यांनी सीपीएम पक्ष सोडताना जे पत्र लिहिले त्यात त्यांनी काही कारणे दिली आहेत, त्यामध्ये त्यांनी एक कारण हे मांडलेले आहे की, भारतामध्ये प्रतिक्रांती काँग्रेस आणणार नाही तर ती भाजप आणि त्यांचा जनसंघ आणेल, हे त्यांनी त्या कालखंडात भाकीत केले होते. ही चिकित्सा नेमकेपणाने विश्लेषण देणारी आहे. म्हणूनच फुले-आंबेडकर-कॉ. शरद पाटील-गेल ऑम्व्हेट अशी जी इतिहासलेखनाची परिवर्तनवादी परंपरा आहे, तिच्यातून शिकत शिकत आपण व्यापक जनसमुदायाचे विवेकीकरण करणारा इतिहास पुन:पुन्हा लिहिला पाहिजे. ■

 ISSN : 0976-2957

**विभाग दुसरा**



# ब्रिटिशांचा इतिहासलेखन उद्देश

■

**डॉ. दिनकर मुरकुटे**
इतिहास विभागप्रमुख,
रयत शिक्षण संस्थेचे, एस.एम. जोशी कॉलेज, हडपसर, पुणे-२८
भ्र. ९३२५२८९१३१

इतिहासाच्या संशोधनातून नवसंहिता आकारास येत असते. अशा इतिहासाच्या मांडणीसाठी स्वतंत्र असा दृष्टिकोन असतो आणि हा दृष्टिकोन आपआपले हितसंबंध निर्धारित करतो. भारतातील इतिहासलेखनात विविध इतिहासलेखन प्रवाहाचे महत्त्वपूर्ण असे योगदान राहिले आहे. कारण, इतिहासलेखनातून भारतातील विविध संकल्पनांचा आपआपले हितसंबंध जोपासण्यासाठी वापर करण्यात आला आणि याच्याच आधारावर आपले प्रभुत्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न झाला.[१]

इतिहास व इतिहासलेखनात वास्तवाला प्रभावित करण्याची क्षमता आणि त्याची अनुभवजन्य ज्ञानमीमांसा असते. त्यामुळे इतिहासाच्या चिकित्सक अवलोकनाची आवश्यकता सतत निर्माण होत असते. प्रचलित इतिहासलेखन प्रवाहांच्या मीमांसेमधूनच इतिहासलेखनाच्या नवनव्या शक्यता निर्माण होत असतात.[२] इतिहासलेखन प्रवाहांच्या माध्यमातूनच आपआपले हितसंबंध अधिकाधिक सुरक्षित होण्याची शक्यता असते. कारण, इतिहासातील ज्ञानाच्या आधारेच व्यक्ती, समूह राष्ट्राची अस्मिता आकार घेत असते. राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक अस्मिता घडविण्यासाठी इतिहास अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडतो.

भारतात वासाहतिक काळापासून इतिहासलेखनाची शास्त्रीय पद्धत वाढीस लागली. वसाहतवादी इतिहास लेखनाने भारतातील ब्रिटिश सत्तेस मजबूत करण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रवादी इतिहासलेखन प्रणालीने तिला राष्ट्रीय स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. मार्क्सवाद्यांनी इतिहासलेखन वर्गीय स्वरूपात रुपांतरित केले. सबाल्टर्न इतिहासलेखनाने शोषित, अंकित जनांच्या इतिहासातील योगदानाचे विवेचन केले. आपल्या सत्ताकारणाला, हितसंबंधांना, भविष्यातील योजनांना पूरक असे इतिहासलेखन करणारे इतिहासलेखन संप्रदाय भारताच्या इतिहास लेखनामध्ये निर्माण झाले.

वसाहतवादी इतिहासलेखन प्रवाहाने साम्राज्यवादी, आर्थिक व सांस्कृतिक प्रभुत्वाच्या प्रयोजनासाठी इतिहासलेखन केले. तर त्या विरोधात राष्ट्रीय मुक्तीची व गौरवाची संगती मांडणारे इतिहासाचे लेखन राष्ट्रवादी प्रवाहाने केले. फुले आणि आंबेडकरांनी जातलक्षी इतिहासलेखन केले.

**साम्राज्यवादी (वसाहतवादी) इतिहासलेखनाचा उद्देश:-**

ब्रिटिशांच्या वसाहतवादी हितसंबंधांना अनुकूल अशी इतिहासाची संहिता घडविण्यास वसाहतवादी इतिहासलेखनाने सुरुवात केली. भारतातील ब्रिटिश साम्राज्याचे समर्थन करण्यासाठी जेम्स मिल, जॉन माल्कम, जॉन कॉपर, जॉन सिले, लॉर्ड कर्झन, लॉर्ड

मिंटो व लॉर्ड डफरीन या सारख्यांनी साम्राज्यवादी इतिहासलेखन केले.

ब्रिटिशांनी वसाहतवादाच्या नजरेतून भारताच्या इतिहास व संस्कृतीची ज्ञानसामग्री पुढे आणून तिची मीमांसा केली. या इतिहासकारांमध्ये प्राच्यविद्याविशारद (Orientalists), ब्रिटिश उपयुक्ततावादी आणि ख्रिश्चन मिशनरी हे भारतासंबंधी ज्ञानसामग्री पुढे आणणारे तीन प्रवाह होते.[३]

वरील प्रवाहाने भारताच्या इतिहासासंदर्भातील विवेचन करून भारत नावाची ओळख उभी केली. वसाहतवादी मीमांसाकारांनी पूर्वेशी पश्चिमेची तुलना करून विवेचन केले.

*** प्राच्यविद्याविशारदांचा उद्देश (Orientalists)**

Orientalists' अर्थात 'पौर्वात्यवाद' ही संकल्पना एडवर्ड सैद यांनी मांडली आहे.
पौर्वात्यवाद अथवा ओरिएंटॅलिझम् ही 'पूर्व' या संकल्पनेमध्ये अंतर्भूत असणाऱ्या सर्व गोष्टींचा विचार करण्याची एक पद्धत आहे.[४]

प्राच्यप्रणालीकार (Orientalists) कोणाला म्हणावे? हासुद्धा यक्ष प्रश्न आहे. काही वेळा १८ व्या, १९ व्या शतकातील विल्यम जोन्स्, चार्ल्स विल्किन्स्, हेन्री थॉमस कोलब्रुक, एफ. मॅक्समुल्लर इ. प्राच्यविद्याभ्यासक/ प्राच्य विद्याभ्यासकांना उद्देशून हा शब्दप्रयोग केला जातो. त्यांनी पूर्वेविषयीच्या जिज्ञासेने आणि त्यापैकी बहुतेकांनी ब्रिटिशांच्या प्रशासकीय गरजेपोटीसुद्धा पूर्वेचा संशोधनपर अभ्यास आरंभला. किंबहुना प्राच्यविद्येची, विशेषतः भारतविद्येची (Indology) स्वतंत्र ज्ञान-शाखाच विकसित केली.[५]

ज्ञानाच्या विविध क्षेत्रात जे कार्य मोठ्या जोमाने सुरू झाले होते. त्याची मुहूर्तमेढ सर विल्यम जोन्स् यांनी १७८४ साली 'एशियाटीक सोसायटी ऑफ बेंगॉल' ची स्थापना करून रोवली. या संस्थेच्या स्थापनेच्या कामी वॉरेन हेस्टिंग्ज फार मोठे साहाय्य विल्यम जोन्स यांना मिळाले. ज्ञानोपासनेला वाहिलेल्या या संस्थेचे अध्यक्षपद वॉरेन हेस्टिंग यांनी स्वीकारावे अशी विल्यम जोन्सची इच्छा होती. पण विल्यम जोन्स्ची कर्तबगारी लक्षात घेऊन वॉरेन हेस्टिंगने हा मान उदारपणे नाकारला आणि विल्यम जोन्स हे संस्थेचे अध्यक्ष झाले. भारताचा इतिहास, प्राचीन अवशेष, कला, शास्त्रे आणि वाङ्मय इत्यादींचा अभ्यास करणे हे या संस्थेचे सर्वांत प्रमुख उद्दिष्ट होते.[६]

एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉलच्या माध्यमातून भारताच्या इतिहास व संस्कृतीच्या अभ्यासास सुरुवात झाली आणि भारतातील नवीन कायद्याचे राज्य आणण्यासाठी प्राचीन भारतातील कायद्यांचा, प्राचीन धर्मग्रंथांचा अभ्यास जोमाने करण्यात येऊ लागला. एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉलच्या माध्यमातून संस्कृत साहित्याचे भाषांतर करण्यात येऊ लागले.

१७८४ मध्ये विल्किंन्सने संस्कृतमधून इंग्रजीमध्ये भगवतगीतेचा अनुवाद केला. १७८७ मध्ये त्यानेच 'हितोपदेश'चा अनुवाद केला. विल्यम जोन्सने 'शाकुंतल' या कालिदासाच्या साहित्यकृतीचे १७८९ मध्ये भाषांतर केले. युरोपातील बुद्धिवादी समाजाचे नवीन ज्ञानाप्रति असलेल्या उत्कटतेने पुढील वीस वर्षात 'शाकुंतल'च्या पाच वेळा आवृत्त्या प्रकाशित झाल्या. विल्यम जोन्सने 'गीतगोविंद' चा अनुवाद केला. विल्यम जोन्सने मनुस्मृतीचा केलेला अनुवाद 'दि इन्स्टिट्युट ऑफ हिंदू लॉ' जोन्सच्या मृत्यूनंतर प्रकाशित झाला.[७]

एशियाटिक सोसायटीच्या माध्यमातून कोलब्रुक आणि मॅक्समुल्लर यांनी धर्मग्रंथांचे भाषांतर करण्यास सुरुवात केली.

दुसरा संप्रदाय 'आंग्लवादी' (Anglicist) म्हणून ओळखला जातो. जेम्स मिल, लॉर्ड विल्यम बेंटिंक, लॉर्ड टॉमस बॅबिंग्टन मेकॉले यांच्यासारख्यांचा समावेश आंग्लवाद्यांमध्ये करता येईल. हे आंग्लवादी भारताला, भारतीय संस्कृतीला, एकंदरीत पौर्वात्य परंपरेला हीन लेखणारे होते. 'हिंदू संस्कृती ही मुळात समृद्ध आहे; पण आता ती क्षीण व मलिन झालेली आहे', असे आरंभकालीन प्राच्य-विद्याभ्यासक मानत असत, तर

 ISSN : 0976-2957

ती मुळातच क्षीण व मलिन असल्याचा आंग्लवाद्यांचा दावा होता. इंग्रजी शिक्षणाद्वारे पाश्चात्य ज्ञान-विज्ञानाचा प्रसार भारतात करून या देशाला वेगाने सुसंस्कृत व आधुनिक बनविले पाहिजे; येथे पाश्चात्त्य मूल्ये, परंपरा व संस्था रुजवल्या पाहिजेत; भारतीयांचे आंग्लीकरण केले पाहिजे अशी त्यांची ठाम धारणा होती. विशेषतः जेम्स मिलचा 'भारताचा इतिहास' (१८१८) आणि लॉर्ड मेकॉलेचे 'शिक्षणविषयक टिपण' (१८३५) यांतून त्यांच्या भूमिकेचा प्रत्यय येतो. मेकॉलेने २ फेब्रुवारी १९३५ रोजी म्हटल्याप्रमाणे, ब्रिटिश राज्यकर्ते आणि भारतीय जनता यांच्यातील मध्यस्थ्यांचा असा वर्ग निर्माण करणे ब्रिटिशांना अभिप्रेत होते की, 'जो वर्ग रक्ताने व रंगाने भारतीय असेल; पण त्याच्या आवडीनिवडी, मते, नीतिनियम व बुद्धिमत्ता या गोष्टी इंग्रजी वळणाच्या असतील. आंग्लवादी भूमिका मांडणारे विचारवंत, प्रशासक हे मुलत: 'उदारमतवाद' (Liberalism) आणि उपयुक्ततवाद (Utilitarianism) या तात्त्विक विचारप्रणालीचे उपासक होते.[८]

*** उपयुक्ततावादी उद्देश :-**

वसाहतवादी इतिहास लेखनातील उपयुक्ततावादी हा अत्यंत महत्त्वाचा प्रवाह होय. उपयुक्ततावादी म्हणजे १९ व्या शतकातील बौद्धिक क्षेत्रात वर्चस्व गाजविणाऱ्या ब्रिटिश तत्त्वज्ञांचा एक गट होता. भारतामधील ब्रिटिश राज्य ही एक ईश्वरी योजना आहे. याबद्दल त्यांना खात्री होती. कारण, ब्रिटिश राज्ययंत्र आणि विधिमंडळ यांच्या योगे भारतामधील तोपर्यंत शतकानुशतके चालत असलेला मागासलेपणाचा अनियंत्रित राजसत्तेचा काळ संपेल आणि भारतीय जनतेला राजकीय जागृती प्राप्त होईल असा त्यांचा विश्वास होता.

*** जेम्स मिल -**

भारतीय इतिहास चिंतनावर प्रभाव पाडणाऱ्यामध्ये जेम्स स्टुअर्ड मिल यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. "History of British India' हा ग्रंथ १८१८ मध्ये प्रकाशित झाला. या ग्रंथाचा एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे भारताचा इतिहास धार्मिक पायावर समजून घेण्याचा पायंडा त्याने पाडला आणि नंतरच्या द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांताला एक आयतेच ऐतिहासिक अधिष्ठान प्राप्त करून ठेवले. भारताच्या इतिहासाची हिंदू संस्कृती, मुस्लीम संस्कृती आणि ब्रिटिश संस्कृती अशा तीन कालखंडांत विभागणी करणारा तो पहिला इतिहासकार आहे.[९] जेम्स मिलच्या इतिहासाने भारताच्या इतिहासाची मांडणी ही धर्माच्या आधारावर करण्यास सुरुवात झाली. आश्चर्य म्हणजे, जेम्स मिलच्या इतिहासाच्या विभागणीस भारतीयांद्वारे स्वीकारले गेले.

उपयुक्ततावाद्यांच्या राजकीय आणि वैचारिक पार्श्वभूमीशी मिलची भारतीय इतिहासाची मांडणी सुसंगतच म्हणावी लागेल. परंतु त्यांच्या नंतरच्या इतिहासकारांनी त्यांचा हा कालविभागणीचा साचा कोणत्याही चिकित्सेशिवाय जशाच्या तसा उचलला गेला. जेम्स मिलचा ग्रंथ हा भारतीय इतिहासावरील सर्वमान्यता पावलेला पहिलाच ग्रंथ होय आणि त्याचा एवढा प्रभाव पडला की, अजूनदेखिल काही विद्वान मिलचे गृहीत दावे मान्य करतात. काही इतिहासतज्ज्ञ भारतीय इतिहासाची विभागणी करताना प्राचीन, मध्ययुगीन आणि अर्वाचीन असे शब्द वापरतात. परंतु ही कालविभागणी परत मिलबरोबर म्हणजे, प्रमुख राजघराण्याचे धर्म या पायावर केलेल्या कालविभागणी बरोबर जुळणारी असते. मिलचा ग्रंथ भारतीय नोकरांमध्ये एक पायाभूत ग्रंथ मानला गेला. मिलच्या या ग्रंथाचे आणखी एक वैशिष्ट्ये म्हणजे हिंदू संस्कृतीवर त्यामध्ये मागास, प्रगतिविरोधी व बुद्धिविरोधी म्हणून कठोर टीका केलेली होती. तो ज्याला 'मुस्लीम संस्कृती' म्हणतो. त्याबद्दल त्याला थोडी जास्त आस्था असावी. परंतु कित्येक वेळा ही मुस्लीम संस्कृतीसुद्धा त्याच्या विखारी हल्ल्यामधून सुटलेली नाही. याची प्रतिक्रिया म्हणून प्राच्यविद्वान आणि नंतर भारतीय इतिहासतज्ज्ञ यापैकी बरेचजण दुसऱ्या टोकाला गेले आणि हिंदू संस्कृतीचे समर्थन करण्याच्या नादात त्यांनी दुसरे टोक गाठले.[१०]

*** ख्रिस्ती मिशनऱ्यांचा उद्देश :-**

साम्राज्यवादी ख्रिस्ती मिशनऱ्यांचा एक महत्त्वाचा संप्रदाय म्हणजे 'शुभवर्तमानवादी' (Evangelical) संप्रदाय होय. हा मुख्यत: ख्रिस्ती मिशनऱ्यांचा संप्रदाय होता. खुद्द इंग्लंडमध्ये शुभवर्तमानवाद्यांचे उदारमतवादी- उपयुक्ततावादी संप्रदायाशी बरेच मतभेद होते. परंतु भारतात मात्र ब्रिटिश साम्राज्यवादाच्या छत्राखाली या दोन गटांच्या अनुक्रमे धार्मिक व आर्थिक हितसंबंधाची युती घडवून आली. भारतीय धर्म व संस्कृती (विशेषतः हिंदू व मुस्लीम धर्म) हे चार्ल्स ग्रँट, विल्यम विल्बरफोर्स, अलेक्झांडर डफ इ. शुभवर्तमानवाद्यांच्या टीकेचे प्रमुख लक्ष्य होते. याबाबतीत आंग्लवाद्यांशी त्यांचा मेळ होता. किंबहुना शुभवर्तमानवाद्यांचा भारतविषयक दृष्टिकोन आंग्लिकरणवादीच होता.[११] असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या प्रवाहातील इतिहासकारांनी हिंदूच्या दुर्बलता पाहण्याकडे लक्ष दिले. कारण, ब्रिटिश साम्राज्य मजबूत करण्यासाठी धर्म परिवर्तन करून बहुसंख्य हिंदूंना ख्रिश्चन धर्मात धर्मांतरित केल्यानंतर आपोआपच ब्रिटिश साम्राज्य मजबूत होईल.

*** लिखाणाचे वैशिष्ट्ये -**

हिंदू धर्माची मांडणी करताना जैन आणि बौद्ध धर्माच्या विद्रोही तत्त्वज्ञानाकडे दुर्लक्ष केले. आणि याला पुरावा देण्यात आला तो म्हणजे, रॉयल एशियाटिक सोसायटीमधल्या एच. व्ही. कोलब्रुकचा. कारण, या व्याख्यानात कोलब्रुकने बौद्ध, जैन धर्मास हिंदूच म्हटले होते. कारण, ते जातिव्यवस्था मानतात असा भ्रम कोलब्रुकचा होता. मात्र कोलब्रुकने या धर्माच्या जाती विरोधाच्या तत्त्वज्ञानाकडे पूर्णतः दुर्लक्ष केले होते. याच कोलब्रुकच्या लिखाणाने ख्रिश्चन मिशनऱ्यांचा दृष्टिकोन विकसित करण्यात मदत केली होती. असे असले तरी ज्ञानसामग्री पुढे येत होती. या ज्ञान सामग्रीसोबतच प्राचीन भारतीय इतिहासाची हिंदू परंपरा उभी होत होती. हिंदू व बौद्ध धर्मांतील अंतर्विरोधाकडे या प्रवाहाने दुर्लक्ष केले.

*** आधुनिक भारतातील वसाहतवादी उद्देश -**

ब्रिटिशांच्या वसाहतवादी राजसत्तेचे प्रभुत्व प्रस्थापित करणाऱ्या योजनेतून वसाहतवादी इतिहासकारांनी आधुनिक भारताच्या इतिहासाची संहिता घडविण्यास प्रारंभ केला. वसाहतवादी राज्यसंस्थेची, संस्कृतीची, वंशाची श्रेष्ठता व त्याविरोधात भारतीय राज्यसंस्थेची, संस्कृतीची हीनता व वंशाची हीनता गृहीत धरूनच आधुनिक भारताच्या इतिहासाची संगती त्यांनी मांडली. मध्ययुगीन सरंजामी जुलूमशाहीतून भारतीयांची सोडवणूक करणारी उदारतावादी, घटनाधिष्ठित राजवट असे ब्रिटिश राजवटीचे चित्रण या इतिहासकारांनी केले. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक शोषणातून व वर्चस्वातून मुक्ती मिळविण्यासाठी भारतीय स्वातंत्र्यलढा उभा राहिला हा अन्वयार्थही त्यांनी झुगारुन दिला. स्वातंत्र्याची चळवळ जनतेचे प्रतिनिधित्व करत नव्हती असा दावा करून भारतीय स्वातंत्र्य संग्रामाची नैतिकता व वैधता नाकारण्याचा पवित्रा वसाहतवादी इतिहासकारांनी घेतला.[१२]

ब्रिटिश संस्था, संकल्पना व संपत्ती यांना भारतीय अभिजन वर्गाने दिलेला प्रतिसाद या विवरण चौकटीत भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे वर्णन वसाहतवादी इतिहासकारांनी केले. भारतीय अभिजनांनी त्यांच्या हितसंबंधाची बूज राखण्यासाठी केलेली उठाठेव म्हणजे भारताचा स्वातंत्र्य लढा होता असे मत त्यांनी प्रतिपादले. भारतीय जनतेला ब्रिटिशविरोधी उठावासाठी उद्युक्त करून अभिजनांनी आपले हितसंबंध साध्य करण्याचे राजकारण केले. टिळक, नेहरू, गांधी सारखे नेते सत्तेच दलाल म्हणून कार्य करत होते. अशी आधुनिक भारताच्या इतिहासाची मीमांसा वसाहतवादी इतिहासकारांनी केली.[१३]

*** केंब्रिज संप्रदाय :-**

आधुनिक भारतातील केंब्रिज संप्रदायातील अनिल सिल, जे. ए. गैलाधर आणि त्यांच्या विद्यार्थ्यांनी आधुनिक भारतीय इतिहासाचे काही निष्कर्ष काढले.

१) भारतीय संरचनेत कुठल्याही क्षेत्रात वसाहतवादी अस्तित्व नव्हते. भारतीयांनी साम्राज्यवादाच्या विरोधात कसल्याही प्रकारची लढाई केली नाही आणि साम्राज्यवादाच्या विरोधात कुठलेही हितसंबंध निर्माण होतील अशी भारतीयांची भूमिकादेखील नव्हती.

२) साम्राज्यवादाच्या विरोधात जो भारतीयांचा संघर्ष आहे तो खरा नसून खोटा संघर्ष आहे.

३) भारत राष्ट्र नाही व नव्हतेदेखील. तर भारत हा एक समुच्चय आहे. कारण येथील राजकीय संघटनांचा मुख्य आधार हा येथील धर्म आणि जात आहे. आणि येथील राष्ट्रवादासंदर्भात अनिल सिलचे उद्गार आश्चर्यकारक आहेत. तो म्हणतो,

४) येथील संघर्ष दूरवरून पाहता राष्ट्रवादाच्या नावाखाली राजकीय स्वातंत्र्यासाठी संघर्ष करताना दिसतो तर जवळून निरीक्षण केले तर असे दिसून येते की, ते आपल्या जुन्या समुदायाचे हितसंबंधाचीच सुरक्षा करू पाहत आहेत आणि हे जर शक्य नसेल तर स्वतःची स्थिती सुधारू पाहत आहेत.१४

५) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ही भारतीय जनतेचे प्रतिनिधित्व करीत नव्हती तर काँग्रेसअंतर्गत राहून स्वहित पाहिले जात होते.

६) भारतीय राष्ट्रीय आंदोलन हे जनआंदोलन नव्हते. भारतीय अभिजनांनी स्वार्थासाठी उभे केलेले ते आंदोलन होते. कारण, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठे मोठे दलाल होते आणि तेच त्यांचे नेतृत्व करीत होते. आणि येथील आंदोलन म्हणजे सत्तेसाठीचा संघर्ष होय.

७) वसाहतवादाच्या विरोधात कसल्याही प्रकारचे लढे निर्माण झाले नाहीत आणि लढे उभेदेखील राहू शकले नाहीत.

८) भारतीय राष्ट्रीय आंदोलन म्हणजे सत्ताप्राप्तीसाठी केलेले आंदोलन आहे.

इतिहास लेखनातील हा प्रवाह केवळ वासाहतिक शोषणच नाकारत नाही तर अल्पविकास आणि केंद्रीय अंतर्विरोध आणि अशा आदर्श व्यक्तिमत्त्वांनादेखिल नाकारते ज्यांनी वसाहतवादाच्या विरोधातील संघर्षात आपल्या प्राणाची आहुती दिली.[१५]

थोडक्यात असे म्हणता येईल की, भारतातील ब्रिटिश बुद्धिजीवींनी तत्कालीन इतिहासलेखन करताना कायमच ब्रिटिश हित लक्षात ठेवले व ब्रिटिश हितसंबंधाना प्राधान्य दिले.

**तळटिपा ❋**


१. बगाडे उमेश (संपा.) विचारकिरण, ('दीनमित्र'मधील अग्रलेख १९१०-१५) 'दीनमित्र'कार मुकुंदराव पाटील स्मारक समिती, तरवडी जि. अहमदनगर प्रस्तावना.
२. इतिहास मीमांसा- निवडक समाज प्रबोधनपत्रिका - खंड -१, लोकवाङ्मय प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती मार्च, २०१०, प्रस्तावना नऊ.
३. प्रा. नारायण भोसले, २००४, डॉ. आंबेडकर आणि अब्राह्मणी इतिहाससमीमांसा, रियाग प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती - पृ. १२ .
४. प्रा. जास्वंदी वांबुरकर(संपा.), ऑगस्ट - २०१४ , - 'इतिहासातील नवे प्रवाह' डायमंड पब्लिकेशनस्, प्रथम आवृत्ती, पृ. ५६ .
५. प्रा. जास्वंदी वांबुरकर (संपा.), कित्ता -पृ. ४५.
६. डॉ. रा.श. वाळींबे, नोव्हेंबर-१९०२, - एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना , प्रकाशक - डॉ. रा. श. वाळींबे कॉमन वेल्थ कॉलनी, पुणे - २, प्रथम आवृत्ती , पृ. १
७. ई. श्रीधरन-२०११, इतिहास लेख - एक पाठ्यपुस्तक, ओरियंट ब्लॅकस्वॉन- प्रथम आवृत्ती पृ. ३५४.
८. प्रा. जास्वंदी वांबुरकर(संपा.), कित्ता पृ. ४६.
९. रोमिला थापर व इतर. १९९१, इतिहास की पुनर्व्याख्या - राजकमल प्रकाशन - नवीन दिल्ली - प्रथम आवृत्ती - पृ. ८९.
१०. रोमिला थापर व इतर कित्ता- पृ. ८९, ९०.
११. प्रा. जास्वंदी वांबुरकर(संपा.), कित्ता- पृ. ४६.
१२. उमेश बगाडे, फेब्रुवारी २०१४- बीजभाषण - सोलापूर इतिहास परिषद अधिवेशन - ३,४.
१३. बिपिनचंद्र व इतर, १९९६- 'भारत का स्वतंत्रता संघर्ष', हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, पृ. भूमिका XIX.
१४. बिपीनचंद व इतर - कित्ता - पृ. भुमिका XVII.
१५. बिपीनचंद्र व इतर कित्ता - पृ. भूमिका XIX.


■

# इतिहासाच्या ब्राह्मणीकरणाचे राजकारण

■

**प्रा. सचिन गरुड**
ए-११, प्राध्यापक कॉलनी, महादेवनगर, इस्लामपूर, ता. वाळवा,
जि. सांगली-४१५४०९
भ्र. ९८९०९१२७३४

इतिहास या विद्याशाखेचे किंवा इतिहासाचे ब्राह्मणीकरण साधारणतः औपचारिक तसेच अनौपचारिक पातळीवर घडणारी अत्यंत व्यापक प्रक्रिया आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने स्वीकारलेल्या धर्मनिरपेक्ष, जाती स्त्री-पुरुष भेद अव्हेरणारी समता आणि आधुनिक लोकशाहीच्या उदार मानवी मूल्यांच्या राष्ट्रीय तत्त्वचौकटीत शिक्षणव्यवस्था विकसित करण्याचे धोरण स्वीकारले. त्याच चौकटीत केंद्र व राज्यस्तरीय शिक्षणव्यवस्थेचा सगळा राजकीय-प्रशासकीय कारभार आणि शिक्षण आशय, अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, अध्यापन,परीक्षापद्धती, संशोधन आदी संस्थात्मक प्रक्रिया कार्यान्वित करण्याचा मानस घडवण्याचा प्रयत्न केला गेला. या प्रक्रियेत इतिहास या विद्याशाखेच्या शिक्षणक्रमाची जी घडण झाली, तिला औपचारिक प्रक्रिया म्हणता येईल. तर अनौपचारिक पातळीवर एकूण समाजातील इतिहासासंबंधी धारणा, संस्कार घडण्याचा सापेक्ष 'व्यवस्थाबद्ध' विचार करणे अपेक्षित आहे. औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षण सुटे सुटे नसून परस्परसंबंधित आहे. पारंपरिक जाती-पितृसत्तेच्या सामाजिक पर्यावरणात इतिहासासंबंधी घडणाऱ्या धारणा, संस्कार या बहुविध अर्थाने गुंतागुंतीच्या शरणतेच्या -अंकिततेच्या-शोषिततेच्या तसेच निषेधाच्या, प्रतिकाराच्या, संघर्षाच्या गतीकीतून आकाराला येत असतात. परंतु ब्राह्मणी उच्चजातवर्गीय शोषक-शासक बहुसंख्य हे शेतकरी, बलुतेदार, दलित, आदिवासी जातीवर्ग व सर्व जातीय स्त्रिया यांना व्यवस्था शरण-अंकित ठेवण्याचे त्यांचे एकूण मानस म्हणजेच मानसिक -बौद्धिक अवकाश घडविण्याचे व्यवहार करत असतात. अनौपचारिक जनशिक्षण प्रक्रियेत भारतीय पर्यावरणात ब्राह्मणी व जातीसंस्कृती परंपरागत भाकडकथाचे उत्पादन केले जात असते. तसेच सार्वजनिक अवकाशात याच तऱ्हेच्या राजकीय प्रचारमोहिमा वेगवेगळ्या रीतीने गतिमान असतात. महाराष्ट्रात गेल्या दोन-तीन वर्षांत पाठ्यपुस्तकांच्या औपचारिक शिक्षणाच्या तुलनेत चित्रपट, टी. व्ही. मालिका या माध्यमांद्वारे छत्रपती शिवाजी-संभाजी पितापुत्रांचा इतिहास मोठ्या प्रमाणात ब्राह्मणी पद्धतीने प्रक्षेपित केला गेला.

औपचारिक शिक्षणप्रक्रियेच्या संदर्भात शिक्षण आशय, अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके यांच्या अंगाने विचार करत असताना नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशन रिसर्च अॅन्ड ट्रेनिंग (एनसीईआरटी) ही सरकारी संस्था १९६१ मध्ये स्थापन झाली. आणि तिने पुढील काही वर्षांतच देशभर शिक्षण आशय, अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके यांच्या आधुनिकीकरणाची प्रक्रिया सुरू केली. यामध्ये राष्ट्रीय इतिहासलेखनाचा बहुतांशी व्यवहार राष्ट्रवादी, डाव्या विचाराच्या इतिहासकारांच्या फळीच्या माध्यमातून साकार होत गेला. परंतु या आधुनिक राष्ट्रीय इतिहासलेखनाचा प्रकल्प नेमकी कोणती आधुनिकता घडवत होते? याचीही चिकित्सा करणे क्रमप्राप्त आहे. या प्रकल्पात धर्मनिरपेक्षता, जाती स्त्री-पुरुष भेद अव्हेरणारी समता आदी आधुनिक मूल्यांच्या गाभ्यातही

उच्चजातवर्गीय तसेच जातीसंलग्न पितृसत्ता यांच्या हिताचे केंद्रीय सातत्य स्पष्ट दिसून येईल. त्यात हिंदुत्वाची मूल्ये, आशय, प्रतीके , चिन्हे यांच्यासह हिंदू-मुस्लीम संमिश्र संस्कृती मूल्यांचे ब्राह्मणी प्रभुत्त्व अध्याहृत राहिले आहे. याच पद्धतीचा व्यवहार १९६७ मध्ये स्थापन झालेल्या महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाने तयार केलेल्या शिक्षण आशय, अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके याबाबतीत झाला. १९९८ पर्यंत केंद्रात आणि राज्यात काँग्रेसची राजवट होती. अभिजन जातीवर्गाला मध्यवर्ती राखणारा इतिहास शिक्षणाचा आशय या राजवटीच्या काळात अधिकाधिक दृढमूल केला गेला. एनसीईआरटी व सीबीएसई यांच्या स्थापनेपूर्वीच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची समांतर यंत्रणा या पातळीवर कार्यरत राहिली आहे. सरस्वती शिशु मंदिर, विद्याभारती यासारख्या संस्था संघाने स्थापन करून हे काम सुरू ठेवले आहे. अनेक राज्यांत तेथील सत्ताधाऱ्यांच्या साहाय्याने तर कधी संघ-भाजपचे सत्ताबळ वाढल्यावर शेकडो संस्था तेथील जनजीवनात घुसखोरी करत जातजमातवाद वर्चस्वाच्या विचारसरणीचा प्रचार करत आल्या आहेत. 'हिंदू शिक्षा समिती', 'शिक्षाविकास समिती', 'सर्वहितकर समिती', 'वनांचल शिक्षा समिती'यासारख्या अनेक संस्थांमार्फत अनेक राज्यांमध्ये तसेच आदिवासी भागात, ईशान्येकडील राज्यांत वनवासी कल्याण आश्रम, विद्याभारती व सेवाभारती तसेच एकल विद्यालय फाऊंडेशन ऑफ इंडियामार्फत विविध वयोगटांतील मुला-मुलींना हिंदू धर्म, सांस्कृतिक राष्ट्रवाद यांचे शिक्षण देणाऱ्या बालवाडी, बालसंस्कार केंद्रे, वसतिगृह, निवासीशाळा, रात्रशाळा, प्राथमिक ते माध्यमिक शाळा असे अनौपचारिक शाळांचे जाळे दूरदूर भागात तयार केले आहे. या संस्थांमार्फत विषमता-पोषक आणि परधर्मद्वेष पसरवणाऱ्या कू-शिक्षणाचे प्रचारीकरण अव्याहतपणे सुरु आहे.

संघाचा हा सगळा कारभार प्राथमिक ते उच्चशिक्षणापर्यंत एकूण शिक्षण आशयाचे हिंदुत्ववादी आवरणातील ब्राह्मणीकरण करण्याचा राहिला आहे. काँग्रेसच्या सत्ताकाळातील शिक्षण आशय, अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके बदलून त्यांचे ब्राह्मणीकरण करण्याचा पहिला प्रयत्न संघाने १९७७-७८ च्या जनता सरकारच्या राजवटीत केला होता.परंतु हे सरकार अल्पमुदतीत कोसळल्याने सरकारच्या माध्यमातून हा बदल करण्याचा प्रयत्नही स्थगित झाला. १९९८ मध्ये भाजप सत्तेवर येताच संघाने असा प्रयत्न पुन्हा गतिमान केला. याच काळात त्यांनी शिक्षण क्षेत्रात अनेक बदल घडवून आणले, जे बदलत्या परिस्थितीत ब्राह्मणीकरणाचा उघड अजेंडा घेऊन आले होते आणि या ब्राह्मणीकरणाचे जागतिकीकरणाच्या नव्या भांडवली हितसंबंधांशी समायोजन करण्याचा घाट घातला गेला. याकाळात सरकारच्या माध्यमातून संघाने इतिहासाचे ब्राह्मणीकरण करण्याचा बृहद प्रकल्पच पुढे रेटला. संघ-भाजपने एनसीईआरटी व सीबीएसईचा अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तक यांचे आशय बदलणे तसेच वैदिक फलज्योतिष, ब्राह्मणी पौरोहित्य-कर्मकांड आदी नवे कोर्सेस सुरू करणे, संस्कृत भाषेची व सरस्वती वंदना, ब्राह्मणी मूल्यशिक्षणाची सक्ती करणे इ. शैक्षणिक धोरणातील बदल त्यांच्या विषमतावादी विचारसरणीला अनुरूप होते. वैदिक फलज्योतिष, ब्राह्मणी पौरोहित्य-कर्मकांड आदी नवे कोर्सेस मुख्यत्वे ब्राह्मणी संस्कृत साहित्याच्या इतिहासावर आधारलेले होते.संस्कृत भाषेची व सरस्वती वंदना, ब्राह्मणी मूल्यशिक्षणाची सक्ती करताना ब्राह्मणी इतिहासाचाच आधार घेतला गेला. १९९८ मध्ये केंद्र सत्तेत आलेल्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीत असलेला प्रमुख सत्ताधारी पक्ष भाजप असला तरी भाजपचे संसदीय संख्याबळ हे २०१४ आणि २०१९ या दोन्ही सत्ताकाळाच्या तुलनेत अधिक नव्हते. विरोधी पक्षाचे संसदीय संख्याबळही तुल्यबळाचे होते. त्यामुळे संघ-भाजपच्या शिक्षणाच्या ब्राह्मणीकरणाच्या अजेंड्याविरोधात त्यावेळी डावे, समाजवादी, पुरोगामी अभ्यासक, बुद्धिजीवी वर्ग मोठ्या प्रमाणात लढत होता. २०१४ नंतर स्थिती

अधिक प्रतिकूल बनली. संघ-भाजपचे सत्ताधारी अधिकाधिक मुजोर बनत गेले आहेत. याकाळातील सरकारविरोधी बुद्धिजीवी वर्गाचे दमन फॅसिस्ट पद्धतीने केले जात आहे. आणि सार्वजनिक अवकाशात झुंडशाहीचा दहशतवाद भयावह स्वरूपात उभा करण्यात या प्रतिगामी शक्ती यशस्वी होत गेल्या आहेत.

१९९८ च्या संघ-भाजप सत्ताकाळात त्यांचे नेते, बुद्धिजीवी वर्ग काँग्रेसच्या राजवटीत साकारलेल्या शिक्षणव्यवस्थेला आणि एकूण शैक्षणिक आशय, पाठ्यक्रम यांची संभावना मार्क्स, मेकॉले व मदरसा अशा तीन 'म' कारांनी करत होते. त्यांचा दावा होता की, त्यांना शिक्षणाचे 'भारतीयीकरण, राष्ट्रीयीकरण व अध्यात्मीकरण' करायचे आहे. सावरकर, गोळवलकर आदी हिंदुत्ववादी ब्राह्मणी सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या प्रवर्तकांबरोबरच काँग्रेसने बढती दिलेल्या डॉ. राधाकृष्णनसारख्या तसेच संघाशी थेट संबंध नसलेल्या तथाकथित उदारमतवादी म्हणून प्रतिमा निर्माण करण्यात आलेल्या अनेक विचारवंत-व्यक्तीही संघाच्या बृहद प्रकल्पाचा वैचारिक आधार बनलेले दिसतील. या शिक्षणाचे तथाकथित 'भारतीयीकरण, राष्ट्रीयीकरण व अध्यात्मीकरण' म्हणजे ब्राह्मणीकरणाचा उघडउघड अजेंडाच होता. गुजरात, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश या तीन राज्यांत भाजपला सत्ता मिळताच या शिक्षणाच्या ब्राह्मणीकरणाच्या जबरदस्त प्रयोगशाळा बनवल्या गेल्या. गुजरातमध्ये गेल्या वीस वर्षात पहिली ते बारावीपर्यंत अनेक हिंदुत्ववादी ब्राह्मणी आशयाची पाठ्यपुस्तके आणि पूरक वाचनसाहित्य अशा शैक्षणिक साहित्याची निर्मिती हिंदू राष्ट्रवादी संघटना, शिक्षा बचाव आंदोलन समितीचे संस्थापक व संघाचे अनुयायी दीनानाथ बात्रा यांनी केलेली आहे. त्या शैक्षणिक साहित्याची गुजरात, हरियाणा, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आदी राज्यांतील शैक्षणिक संस्थांमध्ये पाठ्यपुस्तके म्हणून वितरीत केली जात आहेत.

शिक्षणाच्या ब्राह्मणीकरणाच्या या अजेंड्यात इतिहासाची अभ्यासशाखा अधिक रडारवर राहिली आहे. सुरुवातीच्या प्रयत्नात इतिहासाच्या पूर्वीच्या पाठ्यपुस्तकांचे संघी विचारधारेला गैरसोयीचे वाटणारे मजकूर हटवणे, त्याजागी नवीन ब्राह्मणी हिंदुत्ववादी मजकूर आणणे यावर जोर दिला गेला. १९९८ च्या आणि आता २०१४ ते २०२३ पर्यंत सत्ताकाळात एनसीईआरटीच्या इतिहासविषयाच्या सर्व इयत्तेतील पाठ्यपुस्तकांमधील वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था, आश्रमव्यवस्थेतील वर्ण व लिंगाधारित मुद्दे, वेदाभ्यास करण्यासाठी स्त्री-शूद्रांना असलेली बंदी, ब्राह्मणांना मिळणारे विशेषाधिकार, सम्राट अशोकाच्या कल्याणकारी राज्याचे-बौद्ध धम्मनीतीचे बहुतेक संदर्भ तसेच मजूर, दास-दासी, भूमिहीन शेतकरी व गुलामांच्या श्रम व शोषणावर साधण्यात आलेला शेती विकास या प्राचीन व मध्ययुगीन कालखंडातील विषयाचे विश्लेषण वगळले आहेत. दिल्ली विद्यापीठाने अलीकडेच इतिहासातील पाठ्यक्रमातील 'ब्राह्मणीकरण' हा शब्द व त्याचे संदर्भच हटवले आहेत. पितृसत्ता आणि लिंगभाव या संकल्पनेची मोडतोड 'स्त्रीशक्ती' या ब्राह्मणी कल्पनेचा नवा मजकूर त्यात मिसळला आहे. जातिभेद, अस्पृश्यता ही मुळातच वैदिक ब्राह्मणी हिंदू समाजरचनेत नसून मुस्लीम आक्रमकांच्या निर्माण करून या प्रथा टिकवल्या आहेत, असे विश्लेषण आता संघाकडून दिले जात आहे. संघाच्या बुद्धिजीवी लेखक कार्यकर्त्यांनी या विषयावर विपुल साहित्यनिर्मिती केली असून त्याचे संदर्भ शैक्षणिक आशयात घुसवले जात आहेत. याप्रकारच्या शैक्षणिक आशयाच्या अध्यापन-अध्ययन प्रक्रियेतून विद्यार्थ्यांची आकलनशक्ती चिकित्सक बनण्याऐवजी व्यवस्था-अंकित राहू शकते. सामाजिक उतरंडीची विषमता आणि विविधता याविषयक आकलनावर विपरीत परिणाम होईल. सामाजिक परिवर्तनासाठी अनुकूल होणारी बौद्धिक-मानसिक घडण यातून होत नसल्याने मोठी गंभीर स्थिती उद्भवू शकेल.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० आणण्याची तयारी केवळ अलीकडच्या काळात सत्ता प्राप्त झाली,

याच कालावधीत करण्यात आली असे मुळीच म्हणता येत नाही. या शैक्षणिक धोरणाच्या पाठीमागे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडातील सनातनी ब्राह्मणी प्रवाहाच्या नेत्यांनी, बुद्धिजीवी वर्गाने स्वहिताचे संरक्षण व संवर्धनाची घेतलेली भूमिका वेळोवेळी जपत केलेल्या ब्राह्मणी व्यवस्थेच्या पुनर्जीवनाचा सातत्यशील कृतीकार्यक्रम आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० मध्ये ब्राह्मणीकरण आणि खाजगीकरण यांची सांगड घालून ब्राह्मणी इतिहास,संस्कृतीच्या उदात्तीकरणाचा स्पष्ट अजेंडा प्रतीत होतो. ओघाने त्यातील विषमता आणि शोषणाचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष समर्थनही केले जाते. या धोरणात भारतीय ज्ञानप्रणालीची (इंडियन नॉलेज सिस्टम) एक अत्यंत वैचारिक चौकट निर्माण करून ब्राह्मणी विचार, कल्पना, मूल्ये रुजवण्याचा आग्रह धरला आहे. या धोरण-चौकटीचा आधारच ब्राह्मणी इतिहास आणि साहित्य आहे. पाठ्यपुस्तक पुनर्लेखनाची हिंदू राष्ट्रवादी दिशा समकालीन आधुनिक विज्ञान-सरणीला अव्हेरून या भारतीय ज्ञानप्रणालीचा दुराग्रह धरत आहे. सर्व विज्ञान-तंत्रज्ञानाचे शोध सर्वप्रथम भारतात वैदिक ब्राह्मणी हिंदू पूर्वजांनी लावले. असे भाकड व तथ्यहीन आशय बालवयापासून मुला-मुलींच्या मेंदूत रुजवण्याचा हा अजेंडा बौद्धिक-मानसिक गुलामगिरीकडे नेणारा आहे. स्किल एन्हान्समेंटचे प्रोगाम्स जातिव्यवस्थेतील उत्पादन-संबंध आणि ब्राह्मणी-जाती संस्कृती परंपरेशी जोडलेले आहेत. त्यामुळे संघ-प्रणीत इतिहासाच्या ब्राह्मणीकरणाचे उद्दिष्ट जातीवर्ग व पुरुषसत्ता यावर आधारलेले अर्थोत्पादन संबंधाचे संरक्षण व संवर्धनाचेही आहे, असेही ठळकपणे यातून दिसते.

ब्राह्मणीकरण ही संज्ञा समग्र भारतीय समाजाचे गतिशास्त्र समजून घेण्याची एक वस्तुनिष्ठ सिद्धांत-चौकट आहे. तिचे उपयोजन आणि सिद्धान्तन बहुतेक दिग्गज विद्वान अभ्यासकांनी केले आहे. जातीरचनेतून लादली गेलेली सामाजिक विषमता आणि जातीशी अविभाज्य असलेली पुरुषसत्तेतून टिकवून धरलेली स्त्री-पुरुष विषमता या दोन्ही विषमता व शोषणसंबंधाचा अंतर्भाव ब्राह्मणी व्यवस्था व या व्यवस्थेच्या संरक्षण व संवर्धनासाठी गतिशील राहणारी ब्राह्मणीकरणाची प्रक्रिया यामध्ये होतोच. परंतु याच व्यवस्थेच्या चौथऱ्यावर विकसित होत गेलेल्या नव्या भांडवलशाहीने जातीसमाजात जे वर्गसंबंध साकारले ते जातीच्या परिवेशातील वर्ग आहेत. त्यामुळे नव्या वर्गसंबंधांच्या गतिविधींनाही ब्राह्मणी व्यवस्था व ब्राह्मणीकरणाची प्रक्रिया या बदलत्या वैचारिक सूत्रात पाहणे अभिप्रेत आहे. केवळ ब्राह्मण जातीला उद्देशून ब्राह्मणीकरण ही संज्ञा वापरत नाही, हेही याअनुषंगाने स्पष्ट होते. संघ-भाजपने प्रचलित शिक्षणातील आधुनिक मूल्ये आणि समतावादी आशय नाकारून त्याजागी जातिव्यवस्था, पितृसत्ता आणि बदलत्या भांडवली शोषणाला पूरक विचार-मूल्यरचना आणण्याचा प्रयत्न गतिमान केल्याने ही शिक्षणाच्या ब्राह्मणीकरणाची प्रक्रिया आहे, असा या एकूण प्रतिपादनाचा अर्थ आहे. या शिक्षणाच्या ब्राह्मणीकरणाच्या प्रक्रियेतला एक भाग म्हणून इतिहासाचे ब्राह्मणीकरणही पाहायला पाहिजे. १९९८ च्या काळात संघ-भाजपप्रणीत शिक्षणाच्या ब्राह्मणीकरणाला डाव्या, समाजवादी, पुरोगामी प्रवाहाने 'भगवेकरण' आणि 'हिंदुत्वीकरण' अशी संज्ञा वापरली. या दोन्ही संज्ञा हिंदू-जमातीकरण या अर्थाला अधिक लक्ष्य करत होत्या. परंतु या संज्ञा अधिक यथार्थ नव्हत्या. हिंदुत्ववादाचा जमातवाद हा उच्चजातीय आणि पुरुषवर्चस्व यांच्या हितसमर्थनाचा असल्याने हिंदुत्ववाद हे जमातवादी बाह्यांग होते आणि त्यांचे खरे अंतरंग ब्राह्मणीव्यवस्थेचे अर्थात जातिव्यवस्था आणि स्त्री-पुरुष विषमतेचे राहिले आहे. त्यामुळेच 'भगवेकरण' आणि 'हिंदुत्वीकरण' अशा एकांगी संज्ञेच्या मानाने 'ब्राह्मणीकरण' ही संज्ञा अधिक सापेक्ष वस्तुनिष्ठ आहे. 'भगवेकरण' आणि 'हिंदुत्वीकरण' या संज्ञा धर्मवाचक असून पेच निर्माण करतात. या संज्ञेद्वारे उच्चजातवर्गीयांचे हित व शोषकत्त्व अदृष्यमान करण्याची क्षमता असल्याने त्यांनाही हवीशी वाटते.

वैचारिकदृष्ट्या हा झगडा हिंदुत्ववादाच्या चौकटीत रंगवल्या गेल्याने त्याचा लाभ तथाकथित हिंदुत्ववादी ब्राह्मणी शक्तींना होतो. 'भगवेकरण' आणि 'हिंदुत्वीकरण' या संज्ञेचा अर्थ एका धार्मिक ओळखीच्या संवर्गात व्यापक बनल्याने त्या अंतर्गत असलेल्या वर्ग जाती शक्तीचे संघर्ष उघड करण्याची थेट शक्यताच नष्ट होऊन जाते. याउलट उच्चजातवर्गीयांना कनिष्ठ बहुजन-दलित-आदिवासी जाती जमातींना जोडून घेता येते, त्यांचे जातजमाती-संघर्षविरहित एकात्म मानसिक भान, जे मुळातच भ्रांत असते; पण त्याची बांधणी करता येते; आणि कनिष्ठ जाती-जमातींही या हिंदुत्वीकरणाच्या प्रक्रियेत सामील झाल्याने उच्चजातवर्गीयांविरोधातील मुक्तिदायी परिवर्तनाच्या शक्यताही स्थगित होतात. याच जोरावर हिंदुत्ववादी प्रतिगामी ब्राह्मणी शक्ती 'भगवेकरण' आणि 'हिंदुत्वीकरण' या लेबलखालील विरोधकांच्या प्रतिवादाला हिंदू धर्माच्या श्रद्धा व हिंदू जनता यावर विरोधीहल्ला म्हणून पेश करून राजकारण करण्याचा अवकाश बळकावत राहतात. डाव्या, समाजवादी, पुरोगामी प्रवाहाकडून अशा मोघम संकल्पना वापरून ब्राह्मणीकरणाच्या प्रक्रियेला कळत नकळतपणे खतपाणी घातले गेले आहे. तुलनेत फुले-आंबेडकरवादी प्रवाहाने ब्राह्मणीकरण या शब्द- संज्ञेचा सातत्याने लेखन व जनप्रबोधनाच्या मोहिमेत वापर केलेला दिसतो. सनातनी प्रवाहाच्या बरोबरीने बहुतेक पुरोगाम्यांनी हा शब्द-संज्ञेचा विरोध करून ती जातीवादी संकल्पना म्हणून मोडीत काढण्याचा प्रयत्न केला आहे. वास्तविकदृष्ट्या ब्राह्मणीकरणाची संकल्पना जातीवादी प्रवृत्तीचे द्योतक नसून जातीवादाच्या निराकरणासाठी वापरलेले वैचारिक हत्यार आहे. हेच गांभीर्याने समजून घेतले गेले नाही. हा विश्लेषणपद्धतीचा पेचही आहे. मार्क्सवादी विश्लेषणपद्धती ही वर्गलक्षी राहिल्यानेच त्याधारे केलेले जातिव्यवस्थेचे आकलन 'ब्राह्मण्यग्रस्त' राहिले आहे. फुले-आंबेडकरवादी प्रवाहाची विश्लेषणपद्धती जातलक्षी असल्याने त्यांनी केलेले जातिव्यवस्थेचे विश्लेषण ब्राह्मण्याचे मोठ्या प्रमाणात निदान करत आहे. फुले-आंबेडकरवादी दृष्टीमुळे संघ-भाजपकृत ब्राह्मणीकरणाचा वेध घेता येतो. या ब्राह्मणीकरणाचे अर्थात विषमतेचे बळी दलित असल्याने फुले-आंबेडकरवादी प्रतिपादनाला विद्रोही धार आली असली तरी त्यांच्या राजकीय अल्पसंख्य स्वरूपाच्या प्रभावाने आणि डाव्या, समाजवादी, पुरोगामी शक्तीच्या 'ब्राह्मण्यग्रस्तते'कडील दुर्लक्षित भूमिकेने संघ-भाजपच्या राजकारणाची ताकद वाढली आहे. याचा दुष्परिणाम डाव्या आणि फुले-आंबेडकरवादी प्रवाहाला भोगावा लागत आहे. काँग्रेसच्या राजवटीतही सरकारी व बिगर सरकारी बौद्धिक संसाधनांवर ब्राह्मणादी उच्चजातीयांची मक्तेदारी राहिल्याने संघाचा फॅसिस्ट हल्ल्याचा जोर एकीकडे त्यांच्या विरोधात असणाऱ्या डाव्या, पुरोगामी उच्चजातीय शक्तीवर वाढत राहिला, जो सरकारी बौद्धिक संसाधनांवर क्षेत्रावर प्रभाव टाकून होता आणि दुसरीकडे या क्षेत्रात फुले-आंबेडकरी प्रवाहातील दलित, बहुजन जातीयांच्या प्रवेशाची नसबंदी पुरोगामी व सनातनी प्रवाहातील उच्चजातीयांनी करून ठेवल्याने त्यांच्याविरुद्धचा हमला समरसताकरण आणि हिंस्त्र दमन या दोन्हीही मार्गाने सुरू राहिला आहे.

'इंडियन कौन्सिल ऑफ हिस्टोरिकल रिसर्च' या संस्थेवर डाव्या पुरोगाम्यांचे वर्चस्व असल्याचा आरोप करत संघाने ती संस्थाच १९९८ च्या दरम्यान ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. संस्थेच्या घटनेतील आधुनिक व विवेकवादी ध्येयधोरणे बदलून ती 'राष्ट्रवादी इतिहासलेखन' करण्याच्या धोरणात परिवर्तीत करण्यात आली. १९९० च्या आगे-मागे 'इंडियन हिस्ट्री काँग्रेस' या संस्थेचे अपहरण करण्याचा संघाने प्रयत्न केला. या संस्थेत अनेक बनावट व खोट्या सभासदांचा शिरकाव करून तिचा कब्जा घेण्याचे प्रयत्न केले. २०१४ नंतर एनसीईआरटी, आयसीएचआर, आयसीएसएसआर, युजीसी आदी सर्वच केंद्रीय संस्थांची संघाने वेगाने पुनर्रचना करून

त्यांची ध्येयधोरणे आणि कामकाजाची लोकशाही विकेंद्रित पद्धतही बदलवली आहे. या संस्थांवर भारतातील बहुसंख्य विद्यापीठांत व तत्सम प्रशासनव्यवस्थेत संघाच्या एकनिष्ठ अनुयायांना अधिकाराची पदे दिली आहेत. यामुळे या शैक्षणिक संस्थांचा लोकशाहीचा जो काही व्यवहार थोडाफार विकसित झाला होता, त्याला खीळ घातली गेली आहे. आणि या संस्थांचे एकप्रकारचे 'लष्करीकरण' झाले आहे. लोकशाही संस्थांचे अपहरण करून त्यांच्या लष्करीकरणाच्या प्रक्रियेच्या मुळाशी ब्राह्मणी फॅसिस्ट प्रवृत्ती असून तिला स्वजातवर्गहिताचे बळकटीकरण करून परिवर्तनवादी, मुक्तिदायी शक्ती नेस्तनाबूत करायच्या आहेत. त्यानुसार संघाच्या विचारप्रणालीनुसार अनेक अजेंडे राबविण्याची मोहीमच देशात जलदगतीने सुरू झाली आहे. संघ अनेक हिंदुत्ववादी झुंडींना प्रोत्साहन देऊन प्रागतिक बुद्धिजीवी, कार्यकर्ते आणि त्यांच्या संस्थांवर हिंसक हल्ले करण्यास प्रवृत्त करत असतो. इतिहासाच्या ब्राह्मणीकरणाचा पर्दाफाश करणाऱ्या पुस्तक-पुस्तिका विकणाऱ्या अनेक प्रागतिक कार्यकर्त्यांवर २०१४ नंतर भारतभर झुंडीच्या हल्ल्यांचे प्रमाण वाढतच गेले आहे. वैचारिक स्तरावर ब्राह्मणी गौरवाचे इतिहास-लेखनाचा प्रचार, विस्तार करणे आणि त्याला विरोध करणाऱ्या प्रवाहाला हिंसक पद्धतीने दडपणे या फसिस्ट व्यूहनीतीचा वापर संघ करत आला आहे. त्यांचे सांस्कृतिक राष्ट्रवादी इतिहास-लेखन हे इतिहासाचे भ्रांत चित्रण करते. इतिहासातील विषमतेच्या अंगाने येणारे सर्वच संघर्ष नाकारून त्याचे रूपांतर भ्रामक जमातवादी धर्म-संस्कृती संघर्षात केले जाते. प्राचीन मध्ययुगीन हिंदू ब्राह्मणी इतिहासाचे गौरवीकरण आणि बौद्ध-जैन, शीख, मुस्लीम, ख्रिश्चन धर्म संस्कृतीप्रवाहांचे विकृतीकरण करणाऱ्या त्यांच्या तथाकथित राष्ट्रीय इतिहासलेखनात ब्राह्मणी पुराणकथा व भाकडकथा यांचा वापर केल्याचे दिसते. ब्राह्मणी इतिहासकथनाचा आधार या पुराणकथा, भाकडकथा असून ते आधुनिक इतिहासपद्धतीना सोयीनुसार सोयीनुसार वापरते आणि जिथे गैरसोयीची वाटते तिथे ती पाश्चात्त्य / वसाहतवादी म्हणून त्याज्य ठरवते. हे एकप्रकारचे कृतक इतिहासलेखन ( स्युडो-हिस्ट्री रायटिंग ) आहे. प्राचीन भारतातील इतिहासातील वेद-पुराणातील, रामायण-महाभारतातील अनेक बाबींना 'कृतक विज्ञान-तंत्रज्ञाना'च्या स्वरूपात पेश करते. प्राचीन, मध्ययुगीन इतिहासातील द्विज जातीसमर्थक पुराणकथा, प्रतीके, मूल्ये यांचा सांस्कृतिक राष्ट्रवाद केंद्रवर्ती राखताना त्यातील स्त्रीदास्य, दलित-बहुजन शोषण-दमन यांचा आशय संदर्भ पुसून टाकून व्यवस्थाशरण-व्यवस्था-अंकिततेला उचलून धरणारे अर्थ मोठ्या हातचलाखीने प्रसृत केले जात आहेत. संघाने स्वीकारलेली हिंदू जमातवादी इतिहास-लेखनाची दृष्टी ब्रिटिश वसाहतवादी इतिहासकारांकडून आत्मसात केली आहे. वसाहतवादी इतिहासकारांनी भारतीय इतिहासाचे १) प्राचीन कालखंड -हिंदू, २) मध्ययुगीन कालखंड - मुस्लीम, आणि ३) आधुनिक कालखंड -ब्रिटिश अशी जी तीन कालखंडांत विभागणी केली, ती विभागणी स्वीकारली. हिंदू नामाभिधान दिलेल्या प्राचीन कालखंडातील जातिभेद, अस्पृश्यता, सती, विधवा, बालविवाह या ब्राह्मणी रूढींना असंस्कृत व अमानवी ठरवून वसाहतवादी इतिहासकारांनी कठोर टीका केली आहे. मध्ययुगीन कालखंडाला मुस्लीम संबोधून सल्तनत व मुघल तसेच इतर मुस्लीम राजांचे चित्रण धर्मांध असे करून हिंदू-मुस्लीम धर्म-संघर्ष असा अन्वयार्थ वसाहतवादी व राष्ट्रवादी इतिहासकारांनी लावला. त्याला प्रतिक्रिया म्हणून ब्राह्मणी इतिहासकारांनी या हिंदू-ब्राह्मणी कालखंडाचे गौरवीकरण केले. याच गौरवीकरणात्मक इतिहासाची पुनर्निर्मिती संघ वेगवेगळ्या पद्धतीने करत आहे. मुस्लीम इतिहासकार मध्ययुगीन मुस्लीम राजवटीचा गौरव करत असतात, तर हिंदू-ब्राह्मणी इतिहासकार मुस्लिमांना धर्मांध आणि हिंदुंवर अन्याय-अत्याचार करणारे खलपात्र म्हणून रंगवितात. मध्ययुगीन कालखंड हा मुस्लीम सल्तनत व मुघल बादशहा, इतर मुस्लीम राजांचा मानला तरी, हे वास्तव नव्हते. ही मध्ययुगीन सामंती राजसत्ता हिंदू-मुस्लीम

धर्मातील जातीय उतरंडीवरच आधारलेली होती. मुख्य शासकवर्ग उच्चजातीय अश्रफ मुस्लीम तर दुय्यम-तिय्यम शासक ब्राह्मण-सामंती वरिष्ठ जातीय होते. मुस्लीम राजे आणि हिंदू वरच्या जातीचे सरंजामदार यांच्या संयुक्त सत्तेत हिंदू-मुस्लीम कनिष्ठ जातीय शोषित-शासित होते. याचा अर्थ, मध्ययुगातील संघर्ष हा धार्मिक स्वरूपाचा नसून राजकीय होता. या राजकीय संघर्षाला जातीसंघर्षाचे अंतरंग होते. संघाने मध्ययुगीन कालखंडातील सल्तनत व मुघल यांच्या इतिहासाचा भागच वगळून त्याजागी राजपूत राजवट, चोल व अन्य साम्राज्याच्या काळातील इतिहासावर भर दिला आहे. इतिहासाच्या पाठ्यपुस्तकातून, अभ्यासक्रमातून मुस्लीम शासकांची स्मृती हटवत असताना वर्तमानातील अनेक शहरे-नगर व तत्सम भागातील स्थापत्य व इतर प्रतीके चिन्हेही कशी परिवर्तीत करता येतील असे कूप्रयत्नही केले जात आहेत. अनेक शहर, स्थळ, रस्त्यांची जुनी मुसलमानी नावे बदलून त्याजागी ब्राह्मणी इतिहासबोध दर्शवणारी नामांतरे केली गेली आहेत. मुस्लिमद्वेष पोसणाऱ्या ब्राह्मणी इतिहास-आशय प्रचारीकरणातून हिंदू-मुस्लीम जमातवादी तणावाचे वातावरण तयार केले जाते.आणि जातजमातीय हिंसाचाराचा स्फोटक अवकाश निर्माण केला जातो. ज्यातून संघ-भाजपचे राजकीय सामर्थ्य वाढत जाते. जातजमातीय हिंसाचाराला अशा ब्राह्मणी-भांडवली सत्तेसाठीचे साधन म्हणून उच्चजातवर्ग वापरत असतो. फुले-आंबेडकरी इतिहास-लेखनाने ब्राह्मणी इतिहासलेखनाला जे जोरकस आव्हान दिले आहे, त्याची प्रतिक्रिया म्हणून ब्राह्मणी इतिहासलेखनाची मोहीम स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात संघाने कार्यरत ठेवली आहे. आणि शोषित-मागास जातीवर्गांचे शोषितपणाचे भान जागे न होऊ देणाऱ्या अल्पसंख्याकांच्या विरोधाकडे लक्ष वळवणे यासाठी मुस्लीमद्वेषाच्या ब्राह्मणी इतिहासाचा वापर केला जात आहे. डाव्या, उदारमतवादी इतिहासप्रवाहाने फुले-आंबेडकरी चळवळीच्या तसेच दलित, आदिवासी, ओबीसी व स्त्रियांच्या कर्तेपणाच्या इतिहास-आशयाला डावलले आहे, परिघावरच ठेवले आहे. तर संघ-प्रणीत त्यांच्या या इतिहासाला विकृत करून किंवा समरसता पॅटर्नने सामावून ब्राह्मणीकरण करत आहे. जो सामाजिक स्थितीवाद जोपासू शकेल. वास्तविक इतिहास ज्ञानाने निर्माण होणारी ब्राह्मणी व्यवस्थाविरोधी संघर्षशीलता मोडून काढण्यासाठी इतिहासाचे ब्राह्मणीकरण करणे, हेच ब्राह्मणी प्रतिगामी-प्रवाहाचे बलस्थान आहे, हे गांभीर्याने समजून घेणे आज आवश्यक बनले आहे.

■


OUR VISION YOUR SUCCESS

Our Vision Your Success

| VSS College, Jalna | VSS Institute of Pharmacy, Badnapur |
|---|---|
| ➢ BCA, & BCS<br>➢ B.Sc (Forensic Science & Cyber Security)<br>➢ B.Sc (Networking & Multimedia)<br>➢ MCA & M.Lib<br>➢ M.Sc (Computer Science) | ➢ D. Pharmacy<br>➢ B. Pharmacy<br>➢ ADMLT |

ISSN : 0976-2957



# शिक्षणाचा इतिहास आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण

■

**डॉ. मिलिंद वाघ**
नाशिक, भ्र. ९४२३९६४९६६



माझ्या आधीच्या वक्त्यांच्या, प्रा. विकास गुप्तांच्या व्याख्यानामध्ये वेगळ्या पद्धतीने विचार करायला प्रवृत्त करणारे बरेच मुद्दे होते. 'ऑल इंडिया फोरम फॉर राईट टू एज्युकेशन' या संघटनेत ते कार्यरत आहेत. या संघटनेबरोबर काम करत असताना मला स्वतःला व्यक्तिशः डॉ. अनिल सदगोपालसारख्या व्यक्तीकडून खूप शिकायला मिळाले. त्यांच्या सहवासामुळे शिक्षणाविषयीचे खूप कंगोरे समजले. त्यामुळे शिक्षक म्हणून कार्यरत असताना माझ्या कामावर त्यांचा खूप प्रभाव पडला.

जालन्यातली ही सातवी विचार जागर परिषद 'भारतीय इतिहासलेखन व समकालीन राजकारण' या विषयावर आयोजित करण्यात आली आहे. मी औषधनिर्माणशास्त्र या विज्ञान शाखेतून येतो. त्यामुळे माझी मांडणी थोड्या वेगळ्या पद्धतीची राहील. शिक्षणावरील या कार्यशाळेतील अकॅडेमिक मांडणीचा व सध्या देशात व महाराष्ट्रात जे चालू आहे त्याचा संबंध लागतो का? लावला जाऊ शकतो का? तसे करणे गरजेचे आहे का?

**आरक्षणाचे समकालीन राजकारण व शैक्षणिक प्रश्न**

डॉ. अनिल सदगोपाल किंवा प्रा. विकास गुप्तांची ओळख आपण श्रीयुत मनोज जरांगे पाटलांशी करून दिली तर त्यांच्यातील चर्चा कशी असेल? मनोज जरांगे पाटील आज बहुजनांमधील एका जातसमूहाचे अतिशय जोरदार पद्धतीने प्रतिनिधित्व/नेतृत्व करीत आहेत. त्यांच्या प्रामाणिकपणाविषयी मला शंका नाही. अण्णा हजारेंच्या प्रामाणिकपणाविषयीदेखील मला तशी शंका नव्हती. अण्णा हजारेंनी उठवलेला भ्रष्टाचाराचा मुद्दा रास्त होता. कारण भ्रष्टाचारामुळे समाजव्यवस्था पोखरून गेली आहे हे एक भीषण वास्तव आहे. मात्र अण्णांच्या आंदोलनाचा काय परिणाम झाला? त्या आंदोलनामुळे भ्रष्टाचार कमी झाला का? लोकपाल विधेयक हे त्यावरील उत्तर होते का? त्या आंदोलनामुळे देशाचे राजकारण प्रतिगामी शक्तींच्या ताब्यात गेले का? हे प्रश्न आपण समाज म्हणून विचारले पाहिजे. असेच प्रश्न आरक्षणाच्या आंदोलनांविषयी पण विचारले पाहिजेत. कुठल्याही राजकीय अथवा सामाजिक आंदोलनाची चिकित्सा ही समाजाच्या व्यापक हितासाठी केली गेलीच पाहिजे.

महाराष्ट्रात मराठा समाजाच्या आंदोलनाचे नेतृत्व सध्या तुमच्या या जालन्यामधील श्री मनोज जरांगे पाटील करत आहेत. या मराठा आरक्षण आंदोलनाप्रमाणेच देशातील अनेक राज्यांत मध्यम जातींच्या आरक्षणाच्या मागण्यांवर आंदोलन होत आहेत. जाटांचे, पटेलांचे, गुज्जरांचे आरक्षणाकरिताचे आंदोलने ही त्यातील काही ठळक उदाहरणे आहेत.

शिक्षण चळवळीतील एक कार्यकर्ता व अभ्यासक म्हणून मला वाटते, की या आंदोलनांमधून व्यक्त होणाऱ्या खदखदीकडे आपण दुर्लक्ष करायला नको. त्यामागील कारणांचा अभ्यास करणे खूप आवश्यक आहे. मराठा आरक्षण आंदोलनापाठीमागे दोन महत्त्वाच्या गोष्टी आहेत. पहिली म्हणजे, बेरोजगारीची समस्या व दुसरी म्हणजे शिक्षणातील महागाई. शिक्षण व रोजगाराचा अभ्यास असणाऱ्या

तज्ज्ञ व्यक्तींनी मराठा समाजातील आंदोलकांशी संवाद साधायला पाहिजे. मात्र हा संवाद साधत असताना, आपल्याकडे सर्व प्रश्नांची उत्तरे आहेत या आविर्भावात व अहंकाराच्या छायेत तज्ज्ञांनी असायला नको.

**इतिहासाविषयीचे भ्रम**

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीत असलेल्या शैक्षणिक क्षेत्रातील असंतोषाचा अभ्यास करत असताना भारतीय शिक्षणाच्या इतिहासाकडे वळावेच लागेल. आत्ताच प्रा. विकास गुप्तांनी हंटर कमिशन, वुड्स डिस्पॅच, मॅक्युले मिनिट्स याबद्दल माहिती दिली. इंग्रजांनी बहुजनांच्या शिक्षणासाठी केलेले प्रयत्न, उभारलेल्या पद्धती या लेखबद्ध दस्तावेजीत केलेल्या आहेत. असे प्रयत्न भारतीय उपखंडातील तत्कालीन राजा, महाराजा, संस्थानिक यांनी केले असल्याचे आपणास दिसत नाही, तसे पुरावेही सापडत नाहीत. याचा अर्थ ब्रिटिश सत्ताधाऱ्यांचे आगमन होईपर्यंत आणि झाल्यानंतरही येथील राज्यकर्त्यांनी आणि अभिजनवर्गाने बहुजनांच्या शिक्षणाकरिता कुठलीही ठोस पावले उचलली नाहीत किंवा कुठलाही विचारही केला नाही.

समस्येचा अभ्यास करून त्यावरील उत्तरांचे दस्ताऐवजीकरण केल्याने समस्या समजून घ्यायला व सोडवायला मदत होते. स्वतंत्र भारतात नेहरुंनी स्थापन केलेल्या नियोजन आयोगामुळे या गोष्टी होत होत्या. मात्र सध्याच्या राजवटीने या दशकातील जनगणना जी २०२१ ला पूर्ण व्हायला हवी होती ती अद्याप सुरूही केलेली नाही. त्यामुळे आकडेवारी मांडायचीच नाही हेच सरकारचे समकालीन धोरण आहे. त्याचेच प्रतिबिंब नवीन शैक्षणिक धोरणातही दिसते. ठोस विश्लेषणात्मक आकडेवारी या दस्तऐवजात तुम्हाला दिसणार नाही.

बॅटल ऑफ प्लासी (१७५७) ते १८५७ चा उठाव व त्यानंतर १९४७ साली भारताला मिळालेले स्वातंत्र्य या दोन शतकांमध्ये ब्रिटिशांनी व इथल्या सुधारणावादी सामाजिक व राजकीय क्षेत्रांतील व्यक्तींच्या कामामुळे उच्च शिक्षणाची सुरुवात व काहीअंशी प्रगती भारतात झाली. मात्र सध्याच्या अतिउजवी विचारसरणी असलेल्या सत्ताधाऱ्यांनी तर आपल्या अगदी नजीकच्या इतिहासातील १८५७ ते १९४७ हा कालावधी कधी नव्हताच असे भासवण्याचा व त्याप्रमाणे इतिहासाचे पुनर्लेखन करण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक चालविलेला आहे.

आपल्यासाठी इतिहास शिकणे आणि शिकवणे म्हणजे मध्ययुगीन लढाया, व्यक्तींचे उदात्तीकरण, गतकाळ कसा वैभवशाली होता हे रंगवणे झाला आहे. त्यामुळे ते आपल्या सामाजिक जाणिवेतही इतके खोलवर झिरपले आहे की लहान मुलांच्या फॅन्सी ड्रेस स्पर्धेत झाशीची राणी झालेली चिमुरडी निश्चितच दिसेल; पण सावित्रीबाई फुले झालेली चिमुरडी दिसेल का? याची हमी नाही. झाशीच्या राणीने तिच्या संस्थानात शिक्षणाविषयी काय पावले उचलत याची कुठेही नोंद नाही; पण तिची प्रतिमा मात्र समाज पुढील पिढीला हस्तांतरित करतो. सावित्रीबाई फुल्यांच्या प्रयत्नांनी आजची स्त्री सापेक्ष का होईना पण स्वावलंबन व स्वातंत्र्य अनुभवते आहे. त्या माहितीचे किंवा प्रतिमेचेही व्यापक प्रमाणात हस्तांतरण होताना दिसत नाही. याचे एक कारण असे दिसते की, आपल्या सामाजिक नेणिवेत भूतकाळाबद्दलचे सुप्त आकर्षण पूर्वापार आहे. त्यात सध्या सामाजिक माध्यमांच्यामार्गे बहुजनांच्या मेंदूचा ताबा घेऊन हा आभास अधिक गडद व बटबटीत करण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक व शिस्तबद्धपद्धतीने होत आहे. ज्यात भारत हा देश/राष्ट्र म्हणून किती अलौकिक होता, सोन्याचा धूर उगवणारा होता, संस्कृती किती थोर होती/आहे, गुरुकुल व्यवस्था किती आदर्श व परिपूर्ण होती, ऋषी-मुनींनी निर्माण केलेले ज्ञान-विज्ञान किती प्रगत होते, आजच्या आधुनिक विज्ञानातील शोध कसे आमच्या पूर्वजांनी लावून ठेवलेले आहेत या सगळ्या बाबी येतात. आपल्या भूतकाळाकडे आपण उघड्या डोळ्यांनी बघत त्यातील सत्यता पडताळून बघायला हवी. प्रश्न आहे ही चिकित्सक वृत्ती बहुजनांमध्ये कशी जोपासायची? सत्य माहिती मासेस/बहुजनांपर्यंत कशी न्यायची? ही माहिती पोहोचवली नसल्यामुळे मनोहर कुलकर्णी ऊर्फ संभाजी भिडे सारख्या प्रवृत्ती शाहू महाराजांच्या कार्यक्षेत्रात

विषवल्ली रोवतात व त्याची विषारी फळे समाजास घातक ठरतात.

शालेय अभ्यासक्रमात इतिहास विषय नीट शिकवला गेला नाही. त्याची किंमत आज आपला समाज चुकवत आहे. महाराष्ट्रातील शालेय इतिहासाच्या क्रमिक पुस्तकांनी यामध्ये खूप भर घातली. महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेचे हे मोठे अपयश आहे.

भूतकाळातील आभासी इतिहासाबद्दल जितके आकर्षण उत्तर भारतात आहे तितके दक्षिण भारतात नाही. याचे कारण तेथील द्रविड चळवळीत आहे. चळवळीमुळे निर्माण झालेली चिकित्सक वृत्ती आणि आर्य वर्चस्ववादाला आव्हान देण्याच्या परंपरेमध्ये आहे. याचे प्रतिबिंब नवीन शैक्षणिक धोरण-२०२० संबंधित प्रतिक्रियांमध्येदेखील उमटते. दक्षिणेकडील तामिळनाडू, केरळ या राज्यांपाठोपाठ कर्नाटकमधून या धोरणास विरोध होत आहे. दुर्दैवाने शैक्षणिक चळवळीस नेतृत्व दिलेल्या महाराष्ट्रासारख्या राज्यात तो विरोध क्षीण आहे, तर उत्तरेत याबाबत औदासिन्यता आहे.

शिक्षणक्षेत्रावर उजव्या विचारसरणीचे होत असलेले आक्रमण हे आज सौम्य वाटत असले, संस्कृतीच्या धर्माच्या आवरणाखाली वाढले गेले असल्यामुळे रुचकरही लागत असेल; पण तो हल्ला होत आहे हे ओळखले पाहिजे. हे आक्रमण फक्त ब्राह्मणांमुळे नाही तर बहुजनवर्गाच्या ब्राह्मणीकरणामुळे तयार झालेल्या नवब्राह्मणांमुळे अधिक होत आहे. इथे उजव्या विचारसरणीच्या ब्राह्मणांवर केल्या जाणाऱ्या टीकेपेक्षा बहुजन समाजात मोडणाऱ्या पण नवब्राह्मण्य स्वीकारलेल्या आणि ब्राह्मणवादाचा वाहक होण्यात धन्यता मानणाऱ्यांवरही टीका होणे जास्त गरजेचे आहे. ती झाली नाही तर बहुजनांचे प्रश्न अधिक जटिल होत जातील.

### शिक्षणातील सरकारी गुंतवणूक

१८५७ नंतर ब्रिटिश राज्यकर्त्यांनी आधुनिक शिक्षण म्हणता येईल त्याची सुरुवात केली. परंतु शैक्षणिक धोरण राबविण्यासाठी लागणाऱ्या खर्चाकडे त्यांनी दुर्लक्ष केले. उदा वूड्स डिस्पॅचनुसार शिक्षणावर खर्च करण्यास त्यांच्याकडे (सरकारकडे) पैसे नव्हते आणि भविष्यात त्याची तरतूद करू असा त्यांचा रोख होता. ही तरतूद कधी झाली नाही व समाजाने अशा खर्चासाठी निधी उभारावे अशी अपेक्षा पुढे येत गेली. ब्रिटिशांनी त्यांच्या देशात अकराव्या-बाराव्या शतकातच ऑक्सफर्ड-केंब्रिज ही रहिवासी विद्यापीठे स्थापिली होती. ज्याचे बलस्थान अध्यापन व संशोधन होते. १८२० ला लंडन युनिव्हर्सिटीची स्थापना झाली होती. लंडन विद्यापीठाचे स्वरूप हे प्रामुख्याने संलग्नित महाविद्यालयांचे परीक्षा घेण्याचे केंद्र असे होते. विद्यापीठ म्हणून त्याची भूमिका समन्वयक व प्रशासक म्हणून जास्त तर अध्यापन-संशोधन यात कमी होती. भारतात विद्यापीठे स्थापन करत असताना ब्रिटिशांनी ऑक्सफर्ड, केंब्रीज विद्यापीठाचे प्रारूप न स्वीकारता लंडन विद्यापीठाचे प्रारूप अंगीकारले. या प्रारूपाची निवड करण्यामागे ब्रिटिशांचा हेतू सर्व महाविद्यालयांना एका अंमलाखाली आणणे हा होता. त्याचबरोबर छुपा हेतू हाही होता की, हे प्रारूप कमी खर्चिक होते. यानुसार मुंबई, कोलकोत्ता आणि मद्रास या तीन विद्यापीठांची स्थापना झाली. या विद्यापीठांमधूनच इतर अनेक विद्यापीठांची निर्मिती होऊन पुढे देशभरात विद्यापीठांचे जाळे उभे राहिले जे आजतागायत त्याच चौकटीत कार्यरत आहेत. ब्रिटिश परके होते हे समजू शकतो. स्वतंत्र भारताने याच प्रारूपावर आधारित विद्यापीठ व महाविद्यालयाचे जाळे विस्तारित केले. यातही भारत सरकारने प्रशासकीय सोय व कमी खर्च या गोष्टींना महत्त्व दिले असे दुर्दैवाने म्हणावे लागेल. शिक्षणासाठीचा पैसा हा खर्च म्हणूनच बघितला गेला. गुंतवणूक म्हणून नाही. त्यामुळे मूलभूत ज्ञाननिर्मिती व संशोधनाला हवी तशी चालना विद्यापीठांमध्ये मिळाली नाही. विद्यापीठांचे रूपांतर सकस चौकस बुद्धीची गुणवत्ता न जोपासता परिक्षार्थिंची फौज उभारण्याच्या कारखान्यात झाले. इथे नमूद करावेसे वाटते की, यात प्राथमिक शिक्षणाकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले. १९८० नंतर तर ही जबाबदारी मुख्यत्वे समाजावर टाकण्यात आली. हेच गुंतवणूक न करण्याचे धोरण आजही सतत

चालू आहे. किंबहुना असा खर्च/गुंतवणूक अजून कमी कमी होत आहे. समकालीन राष्ट्रीय शिक्षण धोरणात शिक्षणातील गुंतवणुकीची चर्चा नाही.

**भारत-चीन तुलना**

चीनशी झालेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर १९६० च्या दशकात कोठारी कमिशनची स्थापना झाली. त्यात आपल्या तुलनेत चीन शिक्षणावर घेत असलेले प्रयत्न व गुंतवणूक याबाबत चर्चा झाली. निदान त्या कालखंडात आपले प्रयत्न इतरांच्या तुलनेत तपासून बघण्याचे सौजन्य होते. आज आम्हीच सर्वश्रेष्ठ, विश्वगुरू या भंपकपणाखाली कुठलाच विचारविनिमय सोडा तर साधी चर्चाही होत नाही. स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारताची व चीनची शिक्षणविषयक स्थिती साधारणतः सारखी होती. आज चीन इतका पुढे निघून गेला आहे की, ते अंतर सर करायला आपल्याला किती प्रयत्न करावे लागतील याचा अंदाज काही मापदंड विचारात घेतले तर ठळकपणे निदर्शनास येईल. उदा. उच्च शिक्षणातील गुंतवणूक, उच्च शिक्षणातील सकल नोंदणीचे प्रमाण (Gross Enrollment Ratio), उच्च शिक्षणातील संधीची समानता, लिंग समानता निर्देशांक आणि संशोधनाचा दर्जा ठरवण्याकरिताचे निकष जसे प्रकाशित शोधनिबंधाची संख्या (Research papers), उद्धरण योग्य शोधनिबंध संख्या (Citable documents, H index) दरवर्षी देशात फाईल होणारे पेटेंटचे अर्ज इत्यादी निकष. या निकषांच्या आधारे आपण थोडक्यात असे म्हणू शकतो की, उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात चीन केवळ संख्यात्मक नाही तर गुणात्मकदृष्ट्याही भारताच्या खूप पुढे निघून गेला आहे.

तक्ता १ - सर्व विषयांतील भारत व चीन यांच्या Research Metrics ची तुलना

उच्चशिक्षणातील सरकारी गुंतवणुकीत केल्या गेलेल्या लक्षणीय वाढीमुळे आज चीनची अर्थव्यवस्था भारताच्या अर्थव्यवस्थेच्या जवळ-जवळ पाचपट आहे. आजच्या 'knowledge economy' मध्ये तर ही बाब तीव्रपणे जाणवते की, आर्थिक विकास व उच्चशिक्षणाचा दर्जा, शिक्षण संस्थामध्ये होणारे संशोधन, त्या संशोधनातून विकसित होणाऱ्या नवनवीन कल्पना-संकल्पना, नवीन ज्ञान तंत्रज्ञान यांचा एकमेकांशी जवळचा संबंध आहे.

**नवीन शैक्षणिक धोरणातील फसवेगिरी**

नवीन शिक्षण धोरणाचे अनेक मसुदे आलेत New Education Policy 2020 (NEP). या धोरणाच्या अनेक मसुद्यांमध्ये होत गेलेला भाषेचा फरक स्पष्टपणे जाणवतो. सुरुवातीच्या मसुद्यावर झालेली टीका लक्षात घेऊन मसुद्याचा मूळ आशय न बदलता त्या टीकेची धार बोथट करण्याचे प्रयत्न झाले आहेत. टीकेला उत्तर न देता भाषेची चलाखी करून, गोंडसपणे अर्थ न बदलता धोरणात्मक मसुदे तयार करताना शब्दच्छल करून टीका करणाऱ्यास पुढे तसा वाव न देण्याची बनवेगिरी करण्यात उजव्या पालखीचे भोई निष्णांत आहेत. अशाप्रकारे संस्करण केलेल्या अंतिम मसुद्यात प्राचीन आणि शाश्वत भारतीय ज्ञानाचा समृद्ध वारसा मार्गदर्शक म्हणून सांगितले आहेत तर आर्यभट्ट ते मैत्रेयी यांचे उल्लेख आहेत; पण ज्योतिबा फुल्यांचा उल्लेख नाही. १८५७ ते १९४७ पर्यंत तसेच त्यानंतरचा देशातील शिक्षण क्षेत्राच्या प्रवासाचाही फारसा उल्लेख नाही. अल्पसंख्याक हा शब्द तर एकदाच येतो. बहुजनांच्या शिक्षणाबद्दल धोरणकर्त्यांना किती आपुलकी असेल हे यावरून लक्षात येते.

असे असतानादेखील बहुजन NEP खूप चांगली आहे या भ्रमात आहेत. सध्याच्या सरकारचे धोरणे ही फसवी असतात. ही धोरणे खूप थंड डोक्याने, सत्तेसाठी आणि सत्ता राखण्यासाठी अर्थपुरवठा करणाऱ्यांच्या स्वार्थासाठी, सामान्य माणसाच्या जीवनावर काय परिणाम होणार याचा विचार न करता केलेली, ठरविलेली असतात. नोटबंदीचा निर्णय हा असाच विषय आहे. रिझर्व्ह बँकेला, अर्थतज्ज्ञांना विचारात न घेता एका रात्रीतून लादलेला हा तुघलकी निर्णय सुरुवातीला त्यांचे समर्थक आणि सामान्य लोकदेखील चांगलाच आहे असे म्हणत होते व त्याचे गुणगान गात होते. लोकांना होणारा त्रास आणि त्यांची होरपळ दिसत

असतानाही. या नोटबंदीमुळे भ्रष्टाचार नामशेष होईल, आतंकवाद संपुष्टात येईल, काळा पैसा बाहेर येईल व तो बाळगणाऱ्यांवर वचक बसेल असे स्वप्न लोकांना पडू लागले होते. 'मी काळा पैसा परत आणू शकलो नाही तर मला फाशी द्या.' अशा जाहीर भावनाक्षोभक, भाषेने सनसनाटी निर्माण करून, तसेच मीडियाच्या, टीव्हीच्या आणि समाजमाध्यमांच्या मार्गे समाजाच्या मेंदूचा ताबा घेऊन जनमानसास भ्रमिष्ट करण्यात हे सरकार यशस्वी ठरले. आज नोटबंदीची फलश्रुती काय हे आपण सगळेच बघतो आहे. धोरणाची चिकित्सा करणे, सरकारला प्रश्न विचारणे म्हणूनच गरजेचे आहे.

जसे नोटबंदीचे गारुड समाजमनावर होते तसेच काहीसे नवीन शैक्षणिक धोरण-२०२० च्या बाबतीतही म्हणावे लागेल. NEP चा प्रचार अशा पद्धतीने केला गेला की, भारताची जाज्वल्य सांस्कृतिक आणि शिक्षण परंपरा आपण परत आणणार आहोत, जे ७० वर्षांत झाले नाही ते होणार आहे वगैरे.

मी शिक्षणाच्या बाजारीकरणाच्या विरोधात काम करत असताना बऱ्याच पालकांशी, तरुण विद्यार्थ्यांशी बोलतो. बहुतेक मंडळी सुरुवातीला बोलताना NEP चे कौतुक करतात. माझा त्यांना साधा प्रश्न असतो कुठली शिक्षण परंपरा? एकलव्याचा बोट कापणारी गुरुकुल परंपरा का? (नेपोटिजमचे आद्य स्वरूप). सार्वत्रिक शिक्षणात अंतर्भूत असलेली संधीची समानता इथे कुठे आहे?

शिक्षणासंबंधी सध्या तुमच्यासमोर मोठ्ठा प्रश्न कुठला आहे? असा प्रश्न विचारल्यावर सगळ्यांचे उत्तर असते. - शिक्षणातील महागाई, वाढलेली फीस, शाळेबरोबर कोचिंग क्लाससाठी लागणारा खर्च, उच्च शिक्षणासाठी शासकीय किंवा शासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्रवेश न मिळणे इत्यादी.

मग मी विचारतो, NEP मुळे शिक्षण स्वस्त होणार आहे का? फीस कमी होणार आहेत का? शिक्षणाच्या संधी वाढणार आहेत का? तर याचे उत्तर त्यांना स्वतःला नकारार्थी मिळत जाते.

NEP चे दूरगामी परिणाम महागडे शिक्षण, सरकारी खर्चावर चालणाऱ्या शाळा महाविद्यालयांची आक्रसत जाणारी संख्या, शिक्षणाचे खाजगीकरण, कंपनीकरण, बकालीकरण आणि फक्त किमान कौशल्य विकास या स्वरूपात दिसून येणार आहेत.

NEP व शैक्षणिक धोरणाबाबतची चर्चा आरक्षण आंदोलकांबरोबर करणे आवश्यक आहे. आटत जाणाऱ्या संधीत आरक्षण किती उपयोगाचे ठरेल हा त्यातील एक मुख्य मुद्दा म्हणून पुढे नक्कीच येईल आणि लक्षात येईल की, शिक्षणावर खर्च करण्याची जबाबदारी सरकारने पार पाडलीच पाहिजे, यातच समाजाचे भले असेल. येथे समाज म्हणजे स्वतःच्या जातीचा समूह नाही तर संपूर्ण समाज असा अपेक्षित आहे.

NEP २०२० च्या मसुद्यात शिक्षण क्षेत्रामध्ये सार्वजनिक गुंतवणूक वाढवण्यासाठी केंद्र आणि राज्ये एकत्र काम करतील आणि शिक्षणावरील खर्च जीडीपीच्या ६% पर्यंत पोहोचेल हे तातडीने बघितले जाईल असे म्हटले आहे. परंतु अर्थसंकल्पानुसार, २०१४-१५ ते २०१९-२० या काळात केंद्रीय अर्थसंकल्पातील शिक्षणाचा वाटा ४.४% वरून ३.४% इतका घसरला आहे. गेल्यावर्षीच्या (२०२३-२४) अर्थसंकल्पात शिक्षण आणि उच्च शिक्षण क्षेत्रासाठीची तरतूद देशाच्या जीडीपीच्या फक्त २.९ टक्के होती. शब्दच्छल करीत जे बोलतो आहोत त्याच्या विरुद्ध वागायचे हे या सरकारचे अजून एक वैशिष्ट्य म्हणता येईल.

**भाषेचा प्रश्न**

NEP या मसुद्यात स्थानिक किंवा परिसर भाषेत शिक्षण देण्याविषयी भाष्य आहे. परंतु शिक्षणक्षेत्रात काम करत असताना असे दिसते की, बहुजनांमध्ये इंग्रजी या भाषेविषयी आकर्षण आहे, उच्च शिक्षणाची भाषा म्हणून त्यात आपल्या पाल्याने पारंगत असावे ही भावना आहे. या आकर्षणापोटी पालक आपल्या मुलांना ज्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालत असतात त्या बहुतांशी खासगी आहेत. इथे मी स्वतः कार्यरत

असलेल्या गव्हर्नमेंट एडेड महाविद्यालयाचा दाखला देऊ इच्छितो. १५ ते २० वर्षांपूर्वी मेरिटनुसार प्रवेशित झालेले बरेच विद्यार्थी हे निमशहरी भागातील जिल्हा परिषदेच्या शाळेतून शिकलेले असायचे. आता येणारा विद्यार्थी हा खासगी शाळेतून आलेला दिसतो. जसजसे इंग्रजी भाषेविषयक पालकांचे ममत्व वाढले तसतसे हे प्रमाण वाढले. म्हणजेच त्या पालकांनी परिस्थिती असो किंवा नसो आपल्या पाल्यावर सरकारी शाळांच्या मानाने भरपूर अधिक खर्च केला आहे. परिणामी, पटसंख्येला गळती लागल्यामुळे या शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत.

पटसंख्येतील घटीचा शिक्षणाच्या माध्यमाशी असलेल्या संबंधाविषयी फारशी चर्चा शैक्षणिक चळवळीत होताना दिसत नाही. महानगरपालिकेच्या शाळा या आधीच मरणपंथाला लागल्या आहेत. केंद्रीय, राज्य आणि स्थानिक शासनाच्या सहभागाशिवाय, आर्थिक पाठबळाशिवाय उभ्या राहिलेल्या शिक्षणपद्धती नक्कीच खर्चिक असणार आहे, हा खर्च वेळेबरोबर सतत वाढणार आहे. सध्या सामान्य माणसाच्या थोड्याफार आवाक्यात असलेले शिक्षण आर्थिक भारामुळे पुढे हळूहळू हाताबाहेर जाईल हे अटळ आहे.

बंद होणाऱ्या सरकारी शाळांविषयी समाज अजूनही सजगपणे बोलत नाही. गणपतीच्या मिरवणुकीत जेवढ्या संख्येने लोक नाचतात त्याच्या एक तृतीयांश लोक जरी शिक्षणाच्या कंपनीकरण, खाजगीकरण आणि कंत्राटी शिक्षक भरतीच्या विरुद्ध उतरले तरीही चित्र वेगळे असेल. मात्र धार्मिक व जातीय अस्मितेमध्ये अडकलेल्या समाजात परिवर्तन घडविणारे आंदोलन होत नाही.

जरांगे पाटील मराठा समाजातील गरीब मराठा कुटुंबांविषयी बोलतात. या गरीब कुटुंबांतील मुलांना शिक्षणाची संधी नाकारली जात आहे. हे कळकळीने मांडताना दिसतात. मात्र शिक्षणाच्या महागाईवर आरक्षण हा एकमेव उपाय आहे का? आरक्षणाने बहुसंख्य मराठे ज्या खासगी शाळांमध्ये आपली मुले शिकवतात त्या शाळांमधील अव्वाच्यासव्वा वाढवलेल्या फीस कमी होतील का? असा साधा प्रश्नही विचारला जात नाही.

खासगी शाळांमधील फी वाढ रोखण्यासाठी आणि मराठ्यांसह इतर सर्व समाजांतील गरिबांचे शोषण थांबवण्यासाठी या शाळांच्या फीस नियंत्रित करणारा कायदा अधिक प्रभावी करावा यासाठी मोर्चे निघाले असते तर त्यातून सर्व समाजांतील गरिबांचे आर्थिक शोषण कमी झाले असते. मात्र, सर्व जातींमधील गरिबांना आपल्या आर्थिक दर्जापेक्षाही जातीची अस्मिता जास्त महत्त्वाची वाटते. जातीय अस्मितेतून आर्थिक प्रश्न सुटणार नाहीत तर ते अधिक जटिल होत जातील. आपले समकालीन राजकारण व समाजकारण दिवसेंदिवस जातीय अस्मितांवर आधारित होत चालले आहे. शिक्षणातील प्रश्न या धार्मिक व जातीय अस्मितेच्या राजकारणाने सुटणार नाहीत.

भारतात प्रत्येक धर्मात व जातीत श्रीमंत व गरीब हे दोन वर्ग आहेत. श्रीमंतांची व गरिबांचे हितसंबंध परस्पर विरोधी आहेत. मात्र वर्गीय जाणिवांपेक्षा भारतात धार्मिक व जातीय अस्मितांच्या जाणिवा जास्त प्रखर आहेत. त्यामुळे शिक्षणातील आर्थिक प्रश्नांना वर्गीय संघर्षाचे टोक येत नाही आणि समस्या सुटत नाही.

मराठा आरक्षणामुळे मराठा संवर्गातील मुलांना जास्त प्रमाणात प्रवेश मिळतील असे मानण्यास कुठलाही ठोस आधार नाही. ओबीसी संवर्गातील प्रवेशाचे कटऑफ मार्कस् व खुल्या संवर्गातील कटऑफ मार्कस् यात जवळजवळ काहीच फरक नाही. मात्र मराठा आरक्षणाच्या मागणीमध्ये मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्कामध्ये जी सवलत मिळते ती गरीब मराठ्यांना मिळत नाही ही खदखद मोठ्या प्रमाणावर आहे. सर्वांनाच शिक्षण मोफत केले तर ही समस्या सुटू शकते. जगातील प्रगत भांडवली देशांतसुद्धा प्राथमिक शिक्षण हे पूर्णतः व उच्च शिक्षण मोठ्या प्रमाणात मोफत आहे. भारतात ते का होत नाही?

**जातीअंतर्गत वर्गसंघर्ष**

प्रत्येक जातीमधील जातसमूहामधील आर्थिकदृष्ट्या सबळ घटकांच्या मागण्या या जातीय अस्मितेच्या नावाखाली पुढे रेटल्या जातात. या मागण्या त्याच जातीतील गरिबांच्या हितसंबंधाच्या विरोधात असतात. उदा. शिक्षणातील प्रवेश व शुल्कातील सवलतीसाठी पात्र होण्यासाठी क्रिमीलेयरची अट ओबीसी संवर्गामध्ये आहे. क्रिमीलेयरच्या उत्पन्नाची मर्यादा वाढवावी ही मागणी सातत्याने रेटली जाते. क्रिमीलेयरची उत्पन्नमर्यादा वाढल्याने त्याचा फायदा त्या संवर्गातील श्रीमंतांना मिळतो. क्रिमीलेयरची उत्पन्न मर्यादा कमी केल्याने त्या जात संवर्गातील जास्त गरीब विद्यार्थी लाभार्थी ठरतात. असे असतानाही क्रिमीलेयरच्या उत्पन्नाची मर्यादा वाढवावी. या मागणीला त्या जातीतील गरीब विद्यार्थी विरोध करीत नाहीत.

जातीय विषमतेमुळे भारतातील शिक्षणाचा ऱ्हास झाला हे ऐतिहासिक वास्तव नाकारता येणार नाही. वेगवेगळ्या धर्मांत व जातींत विभागल्या गेलेल्या भारतीय समाजात ब्रिटिशांनी शिक्षणाचा प्रसार हा वेगवेगळ्या धर्मांच्या व जातींच्या संस्थांमधूनच प्रामुख्याने केला. तसे करणे ब्रिटिशांना आर्थिक व राजकीय कारणासाठी सोयीचे होते. ब्रिटिशांनी त्यांच्या देशात शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण सरकारी पैशांमधून व सरकारी व्यवस्थेमधून केले. त्यासाठी शिक्षणाला प्राधान्य देत त्यात गुंतवणूक केली. तशी गुंतवणूक त्यांनी भारतात केली नाही. कारण ते परकीय होते. मात्र, स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही आपल्या सरकारने शिक्षणाला प्राधान्य देत सरकारी गुंतवणूक वाढवली नाही. आरक्षणाच्या समकालीन सामाजिक/राजकीय आंदोलनामध्ये शिक्षणक्षेत्रामध्ये सरकारी गुंतवणूक वाढवण्याविषयी कुठलीही मागणी नाही. त्यामुळे शैक्षणिक प्रश्न या आंदोलनामुळे सुटणार तर नाहीतच मात्र ते अजून जटिल होत जातील हे समकालीन राजकारणाचे वास्तव आहे. ■



स्थापना २००६ रजि.नं.मह.१२८/०६

**भगतसिंग शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी सह. पतसंस्था म. जालना, जि. जालना**

कार्यालय : रुखमाई निवास, पांगारकर नगर, अंबड रोड, जालना



अध्यक्ष
**प्रेमदास राठोड**
मो. ९८२३४४६१४४



उपाध्यक्ष
**रमेश आंधळे**
मो. ९४२१६५४३४१



सचिव
**नारायण मुंडे**
मो. ९४२३३४३८६१

**संस्थापक अध्यक्ष : गौतम शिंदे**

**संचालक मंडळ :** विश्वनाथ शेळके (खजिनदार), श्रीकिसन घोळवे, समाधान ढेंगळे, संजय येळवंते, भगवान धनगे, शशिकांत शेजुळ, आरेफ कुरेशी, शिवाजी केदार, श्रीमती संध्या पवार, श्रीमती रेणुका मिसाळ



# क्रांती आणि प्रतिक्रांती

कॉम्रेड शरद पाटील

भाषांतर : सागर नाईक

मला 'क्रांती आणि प्रतिक्रांती' या विषयावर निबंध लिहिण्याची सूचना करण्यात आली आहे. या निबंधाचे शीर्षक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'लेखन व भाषणे'च्या तिसऱ्या खंडात 'रिव्होल्यूशन अँड काउन्टर रिव्होल्यूशन इन एन्शन्ट इंडिया' या मथळ्याखाली प्रकाशित झालेल्या लेखांकडे निर्देश करणारे आहे. एक कार्यकर्ता म्हणून मला वर्तमानातील क्रांती व प्रतिक्रांती यामध्ये अधिक रस आहे. अर्थात, प्राचीन भारतातील क्रांती व प्रतिक्रांती वर्तमानातील क्रांती व प्रतिक्रांती वेगळ्या काढता येणे शक्य नाहीच.

जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील 'स्कूल ऑफ सोशल सायन्सेस'च्या 'सेंटर फॉर द स्टडी ऑफ रिजनल डेव्हलपमेन्ट'ने २७, २८ व २९ ऑगस्ट १९९८ रोजी आयोजित केलेल्या 'आंबेडकर इन रिट्रोस्पेक्ट' या परिसंवादासाठी लिहिलेल्या इंग्रजी निबंधाचे मराठी भाषांतर अक्षरगाथाच्या वाचकांसाठी साभार प्रसिद्ध करीत आहोत.

क्रांतिकारी वर्ग क्रांती करतो आणि प्रतिक्रांतिकारी वर्ग प्रतिक्रांती असा प्रचलित समज आहे. परंतु युरोपातील माजी समाजवादी देशांमध्ये क्रांती आणि प्रतिक्रांती हे दोन्ही क्रांतिकारी वर्गानेच केले. या देशांसोबतच अजूनही समाजवादी असलेले देश आणि उर्वरित जगभरातील साम्यवादी पक्ष अजूनही युरोपमधील समाजवादाच्या पतनामुळे उद्भवलेल्या प्रश्नांची उत्तरे मार्क्सवाद-लेनिनवादात शोधतात.

## दारिद्र्यः जातनिर्मित आणि वर्गनिर्मित

देशभर प्रतिक्रांतीचे सावट हळूहळू पण निश्चितपणे पसरत आहे. देशात समाजवादी क्रांती झाली तरी जातीअंताच्या आव्हानाला सामोरे जावे लागेल. (डॉ.बाबासाहेब आंबेडकर, लेखन आणि भाषणे, खंड १, पृ. ४७) असा इशारा आंबेडकरांनी १९३६ मध्ये समाजवाद्यांना (आणि कम्युनिस्टांना) दिला होता. आज त्यांच्या या प्रतिक्रांतीविषयीच्या इशाऱ्याची पुष्टी होते आहे.

त्याच कालखंडात डॉ. आंबेडकरांनी वर्गीय अर्थशास्त्राच्या तुलनेत दुर्लक्षित अशा जात-अर्थशास्त्राचे सुतोवाच केले होते. 'जात ही केवळ श्रमविभागणी नसून श्रमिकांची श्रेणीबद्ध उतरंड आहे' कित्ता, अशी मांडणी डॉ. आंबेडकरांनी केली. याच कारणामुळे त्यांनी निव्वळ वर्गीय विषमतेपेक्षा श्रेणीबद्ध जातीय विषमता नष्ट करणे जास्त कठीण आहे असाही इशारा दिला होता कित्ता, खंड ३, पृ.३२०. कम्युनिस्टांनी जातीय अर्थशास्त्राच्या विकासासाठी मार्क्सवादी अन्वेषण पद्धती लागू करण्यास नकार दिला. जातविरोधी संघर्ष विभाजनवादी आहे, आणि त्यामुळे वर्गसंघर्षात त्याचा अडथळा होतो, असं कम्युनिस्ट मानत होते. यातूनच पुढे औद्योगिक कामगारवर्गात फूट पडली तर कृषी कामगारवर्गात 'आर्थिक सर्वहारा' आणि 'सामाजिक सर्वहारा' असे विभाजन झाले. सामाजिक सर्वहारा हा आर्थिक सर्वहारा वर्गापेक्षा दरिद्री असून त्यांच्या तुलनेत सामाजिकदृष्ट्या

शोषित आहे हे ओळखण्यात साम्यवादी असमर्थ ठरले. या असमर्थतेमुळे त्यांना या दोन प्रकारच्या दारिद्र्यांच्या मुळाशी जाता आले नाही.

दुसऱ्या मागासवर्गीय आयोगाने जातनिर्मित दारिद्र्याचे गतिनियम मांडले. याचे कारण केवळ या आयोगाचे अध्यक्ष बी. पी. मंडल पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य जातीतून येत होते (पहिल्या मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष काका कालेलकर हे गांधीवादी ब्राह्मण होते) एवढेच नव्हे, तर सत्तरच्या दशकात तीव्र होत चाललेल्या जातीय अरिष्टाच्या पार्श्वभूमीवर या आयोगाची स्थापना झाली, हीसुद्धा बाब त्यासाठी कारणीभूत ठरली. 'जातिव्यवस्थेच्या सर्वव्यापी जुलूमशाहीने निम्नजातीयांना सामाजिकदृष्ट्या मागास व आर्थिकदृष्ट्या गरीब ठेवले. या जाती दारिद्र्यामुळे सामाजिकदृष्ट्या मागास राहिलेल्या नसून त्यांचे दारिद्र्य सामाजिक भेदभावातून उद्भवले आहे. मागासवर्गीय समितीचा अहवाल, १९८०, पृ. ३०. असे मंडल आयोगाने म्हटले.

इतर मागासवर्गीयांना (अदर बॅकवर्ड क्लासेस: ओबीसी) सरकारी सेवांमध्ये जातीच्या आधारावर आरक्षण द्यावे की नाही? याची शिफारस करण्यासाठी पश्चिम बंगालच्या डाव्या आघाडी सरकारने नियुक्त केलेल्या समितीने मांडलेला दृष्टिकोन कम्युनिस्टांची या संदर्भातील भूमिका स्पष्ट करणारा होता. '' मागासलेपणा ठरवण्यासाठीचा सर्वांत महत्त्वाचा निकष जातीपेक्षा गरिबी आणि जीवनमानाचा स्तर हा असायला हवा, असे या समितीला वाटत होते. त्यांनी दारिद्र्यरेषेखालील या गटांच्या आर्थिक विकासासाठी आणि शैक्षणिक प्रगतीसाठी कित्ता, पृ. ११. सर्वांगीण आर्थिक किंवा वर्गीय कार्यक्रमांची शिफारस केली. इथे 'जाती'ऐवजी 'गट' हा शब्द वापरला आहे हे लक्षात घेतले पाहिजे. बौद्ध दर्शनातील दिग्नाग स्कूलने ब्राह्मणी छावणीतील न्याय वैशेषिकांच्या विरोधातील अनन्य दार्शनिक संघर्षात 'जाती' (वैश्विक) ही संज्ञा वापरण्याला नकार दिला. कारण त्यातून जातिव्यवस्थेचा अर्थबोध होतो. त्याऐवजी त्यांनी 'सामान्य' ही संज्ञा वापरली, तर डाव्या आघाडी सरकारला जातिव्यवस्थेचा उल्लेख निषिद्ध वाटत असल्याने त्यांनी 'जात' या संज्ञेचा वापर टाळला, हा केवढा दैवदुर्विलास! या समितीचा अहवाल डाव्या आघाडी सरकारने जशाचा तसा स्वीकारला.

### 'ऑपरेशन बर्गा'चे जातीय गर्भितार्थ

पश्चिम बंगालमधील जातवास्तवाकडे दुर्लक्ष केल्याचे विघातक परिणाम डी. बंडोपाध्याय यांनी ६ सप्टेंबर १९९७ रोजी 'मेनस्ट्रीम' साप्ताहिकात लिहिलेल्या लेखात गर्भितरित्या दिसतात. पश्चिम बंगालमध्ये महाकाय 'ऑपरेशन बर्गा'ची अंमलबजावणी करणारे मंत्री बिनय चौधरी यांचे महसूल सचिव म्हणून बंडोपाध्याय यांनी काम केले आहे. 'ऑपेरशन बर्गा'द्वारे २० लाख बर्गदारांना (वाटेकऱ्यांना) संरक्षित कूळ करण्यात आले तरी अद्याप ते संबंधित जमिनीचे मालक झालेले नाहीत, याकडे बंडोपाध्याय यांनी निर्देश केला. उलटपक्षी बी.सी. रॉय यांच्या काँग्रेस मंत्रिमंडळाने १९५५ च्या 'पश्चिम बंगाल मालमत्ता अधिग्रहण अधिनियमां'तर्गत २५ लाख कुळांना संबंधित जमिनीचे मालक केले होते.

बंडोपाध्याय यांची अन्वेषणपद्धत वर्गवादी असल्याने ते या दोन भूमीसुधारणाविषयक उपाययोजनांच्या जातीय गर्भितार्थांचा विचार करत नाहीत. ब्रिटिश सरकारने 'कायमस्वरूपी जमाबंदी अधिनियम, १७९३' या कायद्याद्वारे शेतमालक जातीतल्या २५ लाख लोकांना बळजबरीने कूळ ठरवले, तर अनुसूचित जाती-जमातींमधून येणाऱ्या २० लाख बर्गदारांना मात्र जमीनदार लॉबीच्या दबावामुळे 'बंगाल कूळ अधिनियम, १८८२'च्या अधिकारक्षेत्राबाहेर ठेवण्यात आले, हे मी 'मेनस्ट्रीम'मध्ये २९ नोव्हेंबर १९९७ रोजी प्रकाशित झालेल्या माझ्या प्रतिवादात दाखवून दिले आहे.

स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर बंगालमध्ये झालेल्या महान तेभागा (जमीनदाराला निम्म्याएवजी तिसरा हिस्सा) आंदोलनात सहभागी झालेल्या एका कम्युनिस्ट

कार्यकर्त्याने (अमीयकुमार गुहा) 'माकप'च्या 'सोशल सायन्टिस्ट'मध्ये त्याच्या आठवणी नोंदवताना हे कबूल केले होते की, तेभागा आंदोलनात भद्रलोक कुळांचे प्राबल्य असले आणि त्यांना या आंदोलनाचा मुख्य लाभ झाला असला, तरी त्यात अनुसूचित जाती-जमातींमधील वाटेकरी, विशेषतः त्यांतील स्त्रियांच या लढ्यात अग्रभागी होत्या आणि त्यांनी सर्वाधिक त्याग केला. 'जातीय संघर्षा'च्या या गर्भितार्थाच्या पार्श्वभूमीवर डाव्या आघाडी सरकारची उच्चजातीय कृतघ्नता उघड पडते.

बंडोपाध्याय पुढे नमूद करतात की, बर्गदारांकडे ते कसत असलेल्या जमिनीची मालकी नसल्यामुळे त्यांना सरकारी आणि सहकारी पतपुरवठ्याचा व इतर साहाय्याचा लाभ घेता येत नाही, याउलट अशा मदतीचा फायदा श्रीमंत शेतकरी- म्हणजे जातीय संदर्भात अभिजन जातीय वर्चस्वशाली शेतकरी- घेतात.

परिणामी, अशा तात्कालिक भूसुधारणेनंतरही बर्गदारांना आपले उत्पादन वाढवता आले नाही, वास्तविक भूसुधारणेचा हा मुख्य परिणाम असायला हवा होता. उलटपक्षी बंगालमधील अनुसूचित जाती-जमातींचे जीवनमान सुधारण्याऐवजी खालावले आहे, असे आश्चर्यकारकरित्या निदर्शनास आल्याचे मृदुल सागर आणि इंद्रनील पाल यांनी 'इकनॉमिक अँड पॉलिटिकल वीकली'मध्ये ५ मार्च १९९४ रोजी लिहिलेल्या 'एससीज् अँड एसटीज् इन ईस्टर्न इंडिया: इनइक्वॅलिटी अँड पॉवर्टी एस्टिमेट्स' या लेखात म्हटले आहे.

सागर व पाल लिहितात: उपभोग मानकांमध्ये ग्रामीण-शहरी अशी दरी दिसते. (तक्ता २०). अनुसूचित जाती आणि जमातींच्या बाबतीत ही विषमता (बिहारमधील अनुसूचित जाती वगळता) पूर्वेकडील इतर कोणत्याही राज्यांपेक्षा पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक आहे. पश्चिम बंगालमधील सत्ताधारी पक्षाचा राजकीय तळाधार मुख्यत्वे ग्रामीण भागात आहे, हे लक्षात घेता सदर स्थिती काहीशी आश्चर्यकारक वाटते...

......पुनर्वितरणाची धोरणे असूनही पश्चिम बंगालमध्ये मोठ्या प्रमाणात विषमता आढळते. ग्रामीण दारिद्र्याचे पुरावेही मोठ्या प्रमाणात आढळतात. पूर्वेकडील चार राज्यांपैकी (आसाम, पश्चिम बंगाल, ओरिसा आणि बिहार) पश्चिम बंगालात बिहारखालोखाल सर्वाधिक दारिद्र्याचे प्रमाण आहे.

**हा कृषक क्रांतीचा गर्भपात आहे !**

डाव्या आघाडी सरकारच्या पोथिनिष्ठ वर्गाधारित धोरणांमुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि ओबीसी यांच्या साक्षरतेचा ऱ्हास झाला आहे. अशोक मित्रा यांनी म्हटल्यानुसार, साक्षरतेच्या बाबतीत १९५१ साली दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या पश्चिम बंगालची १९९१ सालापर्यंत १९ व्या स्थानापर्यंत घसरण झाली आहे.


शिक्षणाच्या बाबतीत १९५१ साली अखिल भारतीय पातळीवर पश्चिम बंगाल दुसऱ्या स्थानावर होता, पण साक्षरता आणि प्राथमिक शिक्षणाकडे दुर्लक्ष केल्यामुळे १९९१ मध्ये राज्याची १९ व्या स्थानावर घसरण झाली आहे. राज्यातील अनुसूचित जाती-जमाती आणि इतर मागासवर्गीयांमध्ये साक्षरतेची पातळी प्रति १०० महिलांमागे तीन किंवा त्याहूनही कमी इतकी खालावलेली आहे. या सगळ्यामुळे आपल्या राज्याच्या सामाजिक आणि आर्थिक वर्गांमध्ये अभेद्य भिंत निर्माण झाली आहे, असं मित्रा लिहितात.

ही बाब भांडवलदारी लोकशाही क्रांतीलासुद्धा पायबंद घालणारी आहे!

लोकशाही क्रांती

भारतात अजून लोकशाही क्रांती व्हायची आहे. यावर सर्व पारंपरिक भारतीय कम्युनिस्ट पक्षांचे एकमत आहे. आपापल्या क्रांत्यांना वेगवेगळी नावे दिल्याने या पक्षांच्या वर्गीय व्यूहरचनांमध्येही भिन्नता आहे. परंतु, यातील कोणत्याही कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यक्रमपत्रिकेत जात्यंताला जागा नाही, त्यामुळे त्यांची क्रांती आणि प्रतिक्रांतीची व्याख्या केवळ वर्गीय आहे. उलटपक्षी आंबेडकरांनी मांडलेली जात्यंतक लोकशाही क्रांतीची व्यूहरचना केवळ जातीय संदर्भातील होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर op.cit, खंड ५.=, पृ. ११२.




उत्पन्न झालेल्या जाती.

परंतु, आंबेडकरांनी पाश्चात्त्य शिक्षण घेतलेले असल्यामुळे त्यांच्या मांडणीत वर्गीय अन्वेषणपद्धत कायमच दिसत होती. म्हणूनच, त्यांनी १९१६ साली यू.एस.ए.मध्ये वाचलेल्या 'कास्ट्स इन इंडिया: देअर मेकॅनिझम, जेनेसिस अँड डेव्हलपमेन्ट' (भारतातील जाती: त्यांची यंत्रणा, उत्पत्ती आणि विकास) या निबंधात जातीची व्याख्या 'बंदिस्त वर्ग' कित्ता, खंड १, पृ. १५. अशी केली होती; ही व्याख्या ऐतिहासिकदृष्ट्या चुकीची आहे. परंतु वर्गीय अन्वेषणपद्धतीच्या प्रभावाखाली येऊन त्यांनी जातीला अभौतिक इमल्यात स्थान दिले नाही, याला त्यांचे अस्पृश्य असणे कारणीभूत होते. याउलट, त्यांनी जातिव्यवस्थेतील विरोधाभास हा वर्गव्यवस्थेपेक्षा अधिक शत्रूभावी मानला. मार्क्सवादी द्वंद्वात्मकतेनुसार या दोन्ही व्यवस्थांतील विरोधाभास क्रांतिकारी मार्गानेच सोडवता येतात. आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात आंबेडकर, ब्राह्मण्यवाद (जातिव्यवस्था) आणि भांडवलशाही (वर्गव्यवस्था) हे भारतीय लोकांचे सर्वात मोठे शत्रू आहेत असे म्हणायचे. जातिव्यवस्थेचा अंत लोकशाही क्रांतीद्वारे करावा आणि भांडवलशाहीचा अंत समाजवादी क्रांतीने करावा असे या मांडणीत अनुस्यूत आहे.

### जात ते जात-वर्ग

काँग्रेसने ब्राह्मण मोरारजी देसाई यांच्या जागी वर्चस्वशाली मराठा शेतकरी जातीमधील यशवंतराव चव्हाण यांना नवनिर्मित महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री केले, त्याचवर्षी आंबेडकरांचे निधन झाले (१९५६). काँग्रेसची ही नवीन बहुत्ववादी बहुस्तरसत्ताक जातीय व्यूहरचना जयंत लेले यांनी 'एलिट प्लुरॅलिझम अँड क्लास रूल' (१९८२) या ग्रंथात उत्कृष्टरित्या उलगडून दाखविली आहे.

मंडल आयोगाने ओबीसी आरक्षणातून वर्चस्वशाली शेतकरी जातींना वगळून हे स्पष्ट केले की, या वर्चस्वशाली शेतकरी जाती ग्रामीण भागांमध्ये जातिव्यवस्थेच्या मुख्य तळाधार आहेत. स्वातंत्र्योत्तर

भांडवली विकासाने सर्व शेतकरी जातींमधून श्रीमंत शेतकऱ्यांना बाहेर टाकले असले तरी, सत्ताधारी श्रीमंत शेतकरी हे वर्चस्वशाली शेतकरी जातीचे आहेत. मंडलोत्तर काळात यादवांसारखी शोषित-अंकित शेतकरी जात ही वर्चस्वशाली शेतकरी जात बनली आहे. वसाहतपूर्व सामंती कालखंडात सर्व जाती आणि समुदाय एकसंध होत्या. इंडो-तुर्की सामंतशाहीच्या काळात वर्चस्वशाली शेतकरी जाती, ब्राह्मण व कायस्थ जाती अनुक्रमे पाटील/मुकादम, चौधरी/देशमुख /देसाई, कुलकर्णी/ पटवार, सरदेशपांडे/कानुगो यांसारख्या वतनदारीच्या माध्यमातून प्रशासनात दुय्यम भागीदार होत्या. याशिवाय ब्राह्मण जातींकडे धार्मिक पौरोहित्याचे काम होते. वसाहतकाळात या शासक सामंती जातींनी आपले विशेषाधिकार गमावले असले तरी स्वातंत्र्योत्तर काळातही त्यांचे जातिव्यवस्थेतील उतरंडीमधले उच्च स्थान कायम राहिले. म्हणूनच श्रीमंत शेतकरी वर्गाला एकसंध वर्ग म्हणता येणार नाही. ते जात-वर्ग आहेत.

बुद्धाच्या भिक्खू-भिक्खूणी संघाने वर्णदासप्रथाअंतक सामजिक क्रांती करून अधिक उत्पादक असणाऱ्या सामंती जातिव्यवस्थेची वाट मोकळी केली. त्यानंतर वर्ण ही क्रियाशील संस्था न राहता विद्यमान आणि उदयोन्मुख जातींसाठी एक वर्गीकरणाची चौकट बनली. ब्राह्मण जातीने उपनयनविधी आणि वैदिक शिक्षणावर मक्तेदारी प्रस्थापित करून बुद्धकाळापासूनच राजांसह सर्व ब्राह्मणेत्तर जातींना शूद्र ठरवले. म्हणूनच, आंबेडकरांनी क्षत्रियांचे, आणि वैश्यांचे द्विज म्हणून केलेले वर्गीकरण चुकीचे आहे. परंतु त्यांनी केलेले सवर्ण आणि अवर्ण हिंदू हे वर्गीकरण ढळढळीत वास्तव आहे. भारतातील सर्व शहरे आणि गावे अजूनही बहिष्कृत आणि बहिष्कृत नसलेल्या वस्त्यांमध्ये विभागलेली आहेत. (शहरांतील झोपडपट्ट्यांमध्ये निम्न जातींची वस्ती असते). भूमिहीन शेतमजुरांच्या वर्गात बहुसंख्य अवर्णांचा (अनुसूचित जाती-जमाती) भरणा असतानाही कम्युनिस्ट या कृषी सर्वहारा वर्गाला एकजिनसी मानून केवळ आपले आर्थिक वर्गसंघर्ष चालू ठेवतात. तथापि, आजचा कृषक सर्वहारा वर्ग सामंती कालखंडाप्रमाणे अस्पृश्य जातींची व आदिवासी समुदायांची एकसंध रचना राहिलेली नाही, त्यात शेतकरी आणि कारागीर जातींतील भूमिहीन मजुरांचा समावेश होत असला तरीसुद्धा हा एकसंध वर्ग होत नाही. आता ते जात-वर्ग आहेत.

उपनयन विधीपासून वंचित असल्याने सर्व ब्राह्मणेत्तर जातींच्या शिक्षणाला धर्मशास्त्रांनी प्रतिबंध केला (कायस्थ आणि बनिया जातींचे शिक्षण केवळ हिसाबकिताब ठेवण्यापुरते मर्यादित होते). वसाहतपूर्व काळातील हिंदू बुद्धिजीवी वर्ग हा मुख्यतः ब्राह्मण जातीचा बनलेला होता. यामुळेच वसाहत काळातील इहवादी/ धर्मनिरपेक्ष शिक्षणावर मुख्यत्वे ब्राह्मण उच्चजातीयांनी मक्तेदारी प्रस्थापित करून प्रशासकीय यंत्रणेवर वर्चस्व निर्माण केले, हे मंडल आयोगाने दाखवून दिले आहे. प्रथम आणि द्वितीय श्रेणी कर्मचाऱ्यांमध्ये अनुक्रमे ८९.६३% व ७१.१९% उच्चजातीय आहेत. या श्रेणीच्या नोकऱ्यांत निम्नजातींचे जे नगण्य प्रमाण आहे त्यापैकी एकूण लोकसंख्येच्या ५२% असणाऱ्या ओबीसी वर्गाचे प्रतिनिधित्व केवळ ४.६९% आहे, या तुलनेत अनुसूचित जाती-जमातींचे प्रतिनिधित्व १०.६३% आहे. यावरून दिसते की, अनुसूचित जाती-जमातींची किमानपक्षी प्रगती केवळ घटनात्मक आरक्षणाच्या तरतुदीमुळे शक्य झाली. मागासवर्गीय समितीचा अहवाल, पृ. ४२. . अनुसूचित जाती-जमाती आणि ओबीसींमध्ये अजूनही निरक्षरतेचे प्रमाण सर्वाधिक असल्याने आणि प्रशासकीय सेवांच्या उच्चस्तरीय भरतींमध्ये उच्चजातीय वरचष्मा असल्याने मंडल आयोगाने दाखवल्याप्रमाणे प्रशासकीय सत्तेचे जातवास्तव बहुतकरून बदललेले नाही. कामगारवर्गाच्या भरतीमध्येही जातीची यंत्रणा कशी काम करते हे देव नाथन यांनी त्यांच्या 'स्ट्रक्चर ऑफ इंडियन वर्किंग क्लास' या अनन्य पेपरमध्ये दाखविले आहे. देव नाथन, स्ट्रक्चर ऑफ इंडियन वर्किंग क्लास, EPW, २/५/१९८७.

सत्तरच्या दशकात महाराष्ट्रात दलित साहित्याचा उदय होऊन आंध्र, कर्नाटक व गुजरात यांसारख्या राज्यांत त्याचा प्रसार झाला. त्यापाठोपाठ शूद्र (ग्रामीण इ.) आणि आदिवासींच्या साहित्याचा उदय झाला. तरीही, साहित्यावर उच्च जातीचे वर्चस्व कायम राहिले आहे. हिंदू बुद्धिजीवी वर्ग एकसंधपणे ब्राह्मण जातीचा बनलेला असल्याचे म्हणता येत नसले तरी त्याला एकसंध वर्गही म्हणता येत नाही. निरंतर ब्राह्मणीकरणाच्या प्रक्रियेला विधायक अब्राह्मणी पर्यायाच्या अभावामुळे बुद्धिजीवी अवकाशात प्रवेश करणारे बहुसंख्य ब्राह्मणेतर विचारवंत अपरिहार्यपणे प्रस्थापित व्यवस्थेचा भाग बनतात. म्हणूनच, या जात-वर्गीय बुद्धिजीवी वर्गाला ब्राह्मणी म्हणावे लागेल.

भारतीय भांडवलदार वर्ग वसाहतपूर्वकालीन हिंदू आणि बिगरहिंदू बनिया जातींमधून आणि समुदायांमधून विकसित झाला, हे धनंजय गाडगीळ यांनी त्यांच्या 'ओरिजिन्स ऑफ द मॉडर्न इंडियन बिझनेस क्लास' (१९५९) या पुस्तकामध्ये दाखवून देतात. या भांडवलदारांचे राजकीय प्रतिनिधित्व करणाऱ्या काँग्रेसने स्वातंत्र्यलढ्यात जात्यंताचा कार्यक्रम टाळला. काँग्रेसला जातविरोधी ब्राह्मणेतर वा दलित चळवळींना सामावून घेणे किंवा वगळणे शक्य झाले, त्यामुळे जातीय घटकाला बाजूला सारणे त्यांना भाग पडले नाही. परिणामी त्यांचे ब्राह्मणी जात-वर्गीय चारित्र्य टिकून राहिले.

म्हणून सध्याच्या जात्यंतक लोकशाही क्रांतीसंदर्भात भांडवलदारांचा जात-वर्ग, ब्राह्मणी बुद्धिजीवी जात-वर्ग, आणि बहुत्ववादी बहुस्तरसत्ताक रितीने शासन चालवणारे वर्चस्वशाली शेतकरी जातीतील अभिजन अशा प्रतिक्रांतिकारी शक्तींचा उदय झाला आहे.

अनुसूचित जाती-जमाती आणि ओबीसी यांच्या क्रांतिकारी लोकशाही युतीचे सुतोवाच आंबेडकरांनी पहिल्यांदा केले होते. परंतु या जाती आणि समुदाय एकजिनसी असल्याचे यात गृहीत धरलेले आहे. मंडलोत्तर काळात सुरुवातीला आंबेडकरी व लोहियावादी पक्षांनी ही व्यूहनीती वापरली. त्याचा त्यांना लाभही झाला. परंतु ही मूलतः जातीय रणनीती असल्याने आंबेडकरी आणि लोहियावादी पक्षांची एकजूट उलट्या दिशेला गेली. अल्पसंख्याक धार्मिक समुदायांमध्येही जाती आहेत आणि प्रत्येक जातसमुदायात वर्गविग्रह झालेला आहे, हे लक्षात घेऊन जातीय व्यूहनीतीचे रूपांतर जात-वर्गीय लोकशाही क्रांतिकारी व्यूहरचनेत करावे लागेल.

मुस्लीम, ओबीसी आणि ख्रिश्चन दलित आरक्षणाची मागणी करत आहेत. त्याअर्थी भारतात सर्व धार्मिक समुदायांना जात्यंतक लोकशाही क्रांतीची निकड आहे. जात्यंत म्हणजे जातीच्या सहा लक्षणांचा अंत १. जातीची आनुवांशिकता, २. आनुवांशिक व्यवसाय, ३. जात्यांतर्गत बेटी व्यवहार, ४. जात्यांतर्गत रोटीव्यवहार, ५. उतरंड व जातवार वस्त्या (विशेषतः सवर्ण आणि अवर्ण), ६.जात पंचायती. जात्यंतासाठीच्या विधेयकाचा मसुदा तयार करून तो संसदेत मांडायला हवा, आणि त्याला राष्ट्रीय प्रबोधनाची व जनजागृतीची जोड द्यायला हवी. यातून जातीय एकजुटीचे रूपांतर जात्यांतक लोकशाही एकजुटीत होईल.

या मुक्तीगामी एकजुटीचे नेतृत्व कोण करेल? दलित जातींनी म्हणजे सामाजिक सर्वहारा वर्गाने या युतीचे नेतृत्व करावे अशी परिकल्पना आंबेडकरांनी मांडली होती. दुसरीकडे कम्युनिस्ट त्यांची वर्गीय लोकशाही क्रांती करण्यासाठी कामगारवर्गावर म्हणजे आर्थिक सर्वहारा वर्गावर अवलंबून राहतात. भारतीय सर्वहारा वर्ग मूलतः या दोन्ही विरोधांची एकजूट आहे. परंतु आंबेडकरवादी आणि कम्युनिस्ट या दोन्ही विरोधांना परस्परांपासून वगळून तेच तुणतुणे वाजवत असतात. जर त्यांनी या दोन्ही विरोधांचे परस्परावलंबन आणि परस्पर-अविभाज्यता लक्षात घेतली तर या क्रांतिकारी नेतृत्वाचा प्रश्न सौहार्दाने सोडवता येऊ शकतो.

आंबेडकरांचे दोन उद्दिष्टे होती: १. जात्यंतक

लोकशाही क्रांतीचा मार्ग मोकळा करणारी जातविरोधी राज्यघटना तयार करणे, २. भारतीय स्त्रियांना जात-वर्गीय व पुरुषी जोखडातून मुक्त करण्यासाठी पायाभरणी करणाऱ्या हिंदू कोड बिलाचा मसुदा तयार करणे. तत्कालीन सामाजिक शक्ती सनातनी पितृसत्तेच्या बाजूने खूप जास्त झुकलेल्या आहेत, याची जाणीव डॉ. आंबेडकरांना असल्याने त्यांनी या विधेयकाला तडजोडीचे विधेयक म्हटले होते. परंतु नेहरुंनी माघार घेतल्याने डॉ. आंबेडकरांना कायदेमंत्री पदाचा राजीनामा द्यावा लागला आणि हे प्रयत्न निष्फळ ठरले. आज सामाजिक शक्तींचा झुकाव महिलांच्या बाजूने आहे त्यामुळे तडजोड न करणारा हिंदू कोड बिलाचा मसुदा तयार करून तो संसदेत मांडण्याची आवश्यकता आहे, आणि त्यालाही स्त्रीवादी प्रबोधनाची आणि जनजागृतीची जोड द्यायला हवी.

आदिवासींकडे पुरेसे लक्ष देण्याइतपत आयुष्य आंबेडकरांना लाभले नाही.

**क्रांतिकारी प्रबोधन:**

आंबेडकरांनी समाजक्रांतिकारक प्रबोधनाला अग्रस्थान दिले होते. त्यांनी १९३६ सालीच म्हटले होते की, राजकीय क्रांत्या कायमच सामाजिक व धार्मिक क्रांत्यांच्या पार्श्वभूमीवर घडत आल्या आहेत, असे सर्वसाधारण: इतिहासाच्या आधारे म्हणता येते. ल्युथरने केलेली धर्मसुधारणा ही युरोपियन लोकांच्या राजकीय मुक्तीची नांदी होती. इंग्लंडमध्ये प्युरिटानिझममुळे राजकीय स्वातंत्र्याची प्रस्थापना झाली. प्युरिटानिझमने नवीन जगाची स्थापना केली. राजकीय शक्ती बनण्याअगोदर अरबी समाज प्रेषित मुहंमदने सुरू केलेल्या संपूर्ण धार्मिक क्रांतीच्या संक्रमणातून गेला होता. चंद्रगुप्त मौर्याच्या नेतृत्वाखाली जी राजकीय क्रांती झाली ती बुद्धाच्या सामाजिक आणि धार्मिक क्रांतीच्या पार्श्वभूमीवर घडली होती. शिवाजीने केलेली राजकीय क्रांती महाराष्ट्रातील संतांनी केलेल्या धार्मिक आणि सामाजिक सुधारणेच्या पायावर उभी होती. शिखांची राजकीय क्रांती गुरूनानक यांच्या धार्मिक आणि सामाजिक क्रांतीच्या पार्श्वभूमीवर घडली.

आंबेडकरांनी प्रबोधनाच्या तात्त्विक अंगाऐवजी धार्मिक आणि मग सामजिक अंगांवर अग्रक्रमाने भर दिला आहे. ते फुल्यांसारखे अजाणते तत्त्वज्ञ होते. त्यांनी व्याख्यांकित केलेल्या तत्त्वज्ञानाला नवबौद्ध वास्तववाद म्हणता येऊ शकेल. त्यांनी भारतीय इतिहासाच्या अर्थबोधासाठी वापरलेली अन्वेषणपद्धती फुल्यांप्रमाणेच अब्राह्मणी होती. डॉ. आंबेडकरांच्या 'भाषणे आणि लेखन' मालिकेतील 'रिडल्स इन हिंदुइझम' हा चौथा खंड १९८७ साली प्रकाशित होणार होता, तेव्हा या पद्धतीमधील नकारात्मकता स्पष्ट झाली. या पुस्तकातील 'द रिडल ऑफ राम अँड कृष्ण' (राम आणि कृष्णाचे गौडबंगाल) हे परिशिष्ट काढून टाकावे, अशी मागणी करत मराठा महासंघ आणि शिवसेना यांनी महाराष्ट्र विधानभवनावर भव्य मोर्चा काढला. तर, परिशिष्ट कायम ठेवण्यासाठी दलित पक्षांनी आणि संघटनांनी एकत्रित प्रतिमोर्चा काढला. काँग्रेसच्या राज्य सरकारने परस्परविरोधी पक्षांना चर्चेसाठी एकत्र आणले आणि परिशिष्ट कायम ठेवण्यासाठी तडजोड करण्यात आली. दलित पक्षाने ही लढाई जिंकली असे त्यांना वाटत असेल तरी ब्राह्मणी (मी 'हिंदू' हा शब्द वापरत नाहीये) पक्ष ओबीसींना दलितांपासून दूर करण्यात आणि वैचारिक लढाई जिंकण्यात यशस्वी झाला! त्यामुळे अयोध्या-काशी-मथुरेचा मार्ग मोकळा झाला. दलितांच्या मागणीला तोंडदेखला पाठिंबा देण्यापलीकडे डावे गेले नाहीत. ही प्रबोधनाची पहिली मोठी चकमक असल्याने, या परिशिष्टावरून महाराष्ट्रात झालेल्या चर्चेत डाव्यांनी आपला मार्क्सवादी दृष्टिकोन मांडून स्वतःचा स्वतंत्र मोर्चा काढायला हवा होता; पण नंतरच्या काळातील 'सहमत' प्रकरण आणि व्ही.पी. सिंग सरकारविरोधातील अविश्वास प्रस्तावावर सोमनाथ चॅटर्जी यांनी ७ नोव्हेंबर १९९० रोजी संसदेत केलेले भाषण व ए. बी. वर्धन यांनी औरंगाबादमधील निवडणूक-प्रचारावेळी केलेल्या भाषणाचा सीपीआयचे मुखपत्र

असणाऱ्या 'युगांतर'मध्ये (१६-१९ जानेवारी १९९१) प्रसिद्ध झालेला वृत्तान्त, यांकडे पाहिले तर भाजपच्या रथाला खीळ बसल्याचे दिसून येते. 'रिडल्स'प्रकरणी ब्राह्मणी चढाईचे नेतृत्व दुर्गा भागवत आणि मा. गो. वैद्य या दोन समर्थ संस्कृततज्ज्ञांनी केले. त्यांच्या मते, राम एकपत्नीवादी आणि निर्व्यसनी होता.

दलितांची बाजू मांडणारे कोणीही संस्कृततज्ज्ञ नव्हते, त्यामुळे या वादात त्यांच्या बाजूने लढण्यासाठी डॉ. य. दि. फडके आणि डॉ. रूपा कुलकर्णी उतरले. फडके संस्कृततज्ज्ञ नसलेले इतिहासकार होते आणि कुलकर्णी या संस्कृततज्ज्ञ होत्या. आंबेडकरांनी नकारात्मक अब्राह्मणी अन्वेषणपद्धतीच्या आधारे आणि संस्कृतवरील प्रभुत्वाअभावी केलेल्या युक्तिवादांचा बचाव करण्याची घोडचूक फडके-कुलकर्णी यांनी केली. वादविवादात प्रतिस्पर्ध्याला विरोध करता येणार नाही असे पुरावे सादर करावे लागतात. कुलकर्णींनी असा युक्तिवाद केला की, राम वनवासात असताना 'मेरया' हे मद्य प्यायला होता. यावर वैद्यांनी प्रतिवाद केला की, 'मेरया'चा अर्थ न आंबवलेला ताडीचा रस असाही होतो. त्यामुळे हा वादविवाद फोल ठरला. मला त्यात हस्तक्षेप करण्याची विनंती करण्यात आली. मी 'सत्यशोधक मार्क्सवादी'च्या फेब्रुवारी १९८८ च्या अंकातील संपादकियामध्ये या संदर्भात बिनतोड ठरतील असे अप्रत्यक्ष पुरावे उद्धृत केले आहेत. राम आणि लक्ष्मण यांच्यासह गंगा ओलांडत असताना सीतेने नदीमातेला नवस केला होता की, राम चौदा वर्षांच्या वनवासातून सुरक्षितरित्या परत आला तर ती नदीमातेला सुराने भरलेल्या हजारो घागरी आणि ढीगभर पुलाव अर्पण करील (सुरा घाटा सहस्रेण ममसा भूत ओदनेन) (II ५२ ८९). 'सुरा'चा अर्थ मद्य असाच होतो. एका संस्कृत म्हणीनुसार, एखादी व्यक्ती स्वतः जे खाते-पिते तेच अन्न आणि पेय स्वतःच्या देवतेला अर्पण करते. अशा रितीने वादविवादात (दलितांच्या बाजूचा) विजय झाला!

परंतु संस्कृत किंवा संबंधित भाषेवरील प्रभुत्व पुरेसे नाही. कोणताही वादविवाद मुख्यत्वे विधायक आणि श्रेष्ठ अन्वेषणपद्धतीने जिंकला जातो. ब्राह्मणी व्यवस्थेचा मुकाबला अब्राह्मणी व्यवस्थेच्या दाखल्याने होऊ शकत नाही; पण नकारात्मक अब्राह्मणी पद्धतिशास्त्र नेमके तेच करायला जाते. उदाहरणार्थ, रामाच्या विरोधात रावण किंवा कृष्णाच्या विरोधात कंस, अशी मांडणी केली जाते इत्यादी. रामाचा प्रतिवाद करण्यासाठी स्त्रीसत्ताक राणी ताटका आणि शूर्पणखा व शूद्र शंभूक यांचा आधार घ्यायला हवा. कृष्णाचा प्रतिवाद स्त्रीसत्ताक राणी पुतना, निषाद राजपुत्र एकलव्य, राक्षस राजपुत्र घटोत्कच आणि सर्वांत महत्त्वाचा म्हणजे बंडखोर दास जर यांच्या आधारे केला पाहिजे. परंतु हे करत असताना हेसुद्धा मांडायला हवे की, राम आणि कृष्ण यांनी आपापल्या काळात सामाजिक क्रांतीचे नेतृत्व केले होते. रामाने स्त्रीसत्ताक व त्रैवर्णिक मातृवंशक राजक व्यवस्थेच्या विरुद्ध अधिक उत्पादक चातुर्वर्ण्य राजक व्यवस्था आणली, तर कृष्णाने अस्तंगत होत चाललेल्या राजक व्यवस्थेच्या विरुद्ध यादवांच्या द्वैवर्णिक अ-राजकाचे नेतृत्व केले.

आंबेडकरांची विचारधारेसंदर्भातील मर्यादा आणि त्यांच्या मांडणीतील विधायक अब्राह्मणी अन्वेषणपद्धतीचा अभाव, या गोष्टी असल्या तरी आंबेडकरांनी सामाजिक सर्वहारांचा पक्ष मांडण्यासाठी त्यांनी इतिहास आणि संबंधित ज्ञानशाखांतील स्वतःचे व्यापक पांडित्य उपयोगात आणले. त्यांनी 'ॲनाहिलेशन ऑफ कास्ट' (१९३६) (जातिव्यवस्थेचे उच्चाटन) या ग्रंथात इतिहासाचे केवळ आर्थिक आकलन मांडण्याविरोधात युक्तिवाद केले आणि माणसांवरील धर्माच्या पगड्याचे समर्थन केले. एका अर्थी, कम्युनिस्टांनी कालांतराने आरक्षणाविरोधात घेतलेल्या आक्षेपांचा पूर्वअंदाजही त्यांच्या मांडणीतून अप्रत्यक्षरित्या व्यक्त होत होता. युरोपातील आर्थिक वा वर्गीय लोकशाही अनुल्लंघनीय आहे, अशी

कम्युनिस्टांची धारणा राहिली आहे. एस. जी. सरदेसाई आपल्या 'क्लास स्ट्रगल अँड कास्ट कॉन्फ्लिक्ट इन रुरल एरियाज' या लेखात आरक्षण 'मूलतः लोकशाहीविरोधी' आहे असे म्हणण्यापर्यंत मजल मारली. आंबेडकरांनी उपरोल्लेखित ग्रंथात ('अॅनाहिलेशन ऑफ कास्ट' या प्रत्यक्षात न दिल्या गेलेल्या भाषणात) निदर्शनास आणून दिले की, प्राचीन रोमन प्रजासत्ताकाच्या प्लेबियनांनी पॅट्रिशियन विरोधकांना शह देण्यासाठी स्वतंत्र मतदारसंघाद्वारे आपला प्रतिनिधी निवडून देण्यात मोठ्या संघर्षानंतर यश मिळवले. हे त्या काळातील आरक्षण होते. परंतु आंबेडकर पुढे असेही म्हणतात की, पॅट्रिशियन लोकांनी धर्माश्रय घेऊन प्लेबियन जनमताचा कौल नाकारला. प्लेबियनांना पक्षपाती असणारा समर्थ प्रतिनिधी निवडून आला, तर त्याच्या नियुक्तीसंदर्भातील निर्णय ईश्वरी संकेत सांगणाऱ्या डेल्फीमधील धर्मगुरूकडे सोपवला जात असे. तेथील देवतेचे सर्व धर्मगुरू पॅट्रिशियन असल्यामुळे उत्तर 'नाही' असे मिळत असे. कित्ता, पृ. ४४-४५

ब्राह्मणी साहित्य व त्याचे साहित्यशास्त्र, आणि नंतरच्या काळातील पाश्चात्त्य सौंदर्यशास्त्र यांच्यासमोरचे अरिष्ट हे तीव्रतर होत चाललेल्या जात-वर्गीय अरिष्टामुळे निर्माण झाले आहे. सुधी प्रधान म्हणतात त्याप्रमाणे, मार्क्सवादी प्रगतिशील लेखक संघ १९५० पासून बंद पडला आहे. (सुधी प्रधान, मार्क्सिस्ट कल्चरल मूव्हमेंट इन इंडिया, खंड १, पृ. २.) दलित साहित्याच्या ब्राह्मण्यविरोधी विद्रोहाला आंबेडकरांच्या नवबौद्ध धर्मांतरातून प्रेरणा मिळाली. परंतु अब्राह्मणी सौंदर्यशास्त्राच्या अभावामुळे सर्व अब्राह्मणी साहित्य अरिष्टात सापडले. मार्क्सच्या द्वंद्वात्मक भौतिकवादाप्रमाणेच बुद्धाच्या अनित्यात्मक बाह्यार्थवाद (dialectical realism) प्रमाणशास्त्र हे प्रतिबिंबवादी होते. दलित साहित्याला आपले सौंदर्यशास्त्र घडवता आले नाही. दिग्नागाच्या (इ. ४००च्या अखेरचा कालखंड) जाणीवनेणिवान्वेषी सौत्रांतिक विज्ञानवाद (चिकित्सक वास्तववाद/ बाह्यार्थवाद) या तत्त्वज्ञानाने जात व स्त्रीदास्य यांच्या विरोधात पक्षपाती असणारे पण त्याचवेळी सर्वंकष असणारे सौंदर्यशास्त्र निर्मिले. मी त्याची पुनर्मांडणी केली आहे आणि 'जातिव्यवस्थाक सामंती सेवकत्व' या माझ्या दुसऱ्या खंडात त्याचा विकास 'समाजवादी सौत्रांतिकवादा'मध्ये केला आहे. हे क्रांतिकारी प्रबोधनाचे सौंदर्यशास्त्र बनणे अटळ आहे.

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, लेखन आणि भाषणे, खंड १, पृ. ४७
२. कित्ता
३. कित्ता, खंड ३, पृ.३२०.
४. मागासवर्गीय समितीचा अहवाल, १९८०, पृ. ३०.
५. कित्ता, पृ. ११.
६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर op. Cit. खंड ५.=, पृ. ११२.
७. कित्ता, खंड १, पृ. १५.
८. मागासवर्गीय समितीचा अहवाल, पृ. ४२.
९. देव नाथन, स्ट्रक्चर ऑफ इंडियन वर्किंग क्लास, EPW, २/५/१९८७
१०. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, op.Cit. पृ.४३-४४
११. कित्ता, पृ. ४४-४५
१२. सुधी प्रधान, मार्क्सिस्ट कल्चरल मूव्हमेंट इन इंडिया, खंड १, पृ. २.

■

## जाहिरातीचे दरपत्रक

| | |
|---|---|
| रंगीत आवरण पृष्ठ क्र. ४ | रु.२५,०००/- |
| रंगीत आवरण पृष्ठ क्र. २ व ३ | रु.२०,०००/- |
| आतील रंगीत पृष्ठ | रु.१५,०००/- |
| कृष्णधवल आवरण पृष्ठ क्र. २ व ३ | रु.१५,०००/- |
| दर्शनी पृष्ठ (कृष्णधवल) | रु.१०,०००/- |
| आतील संपूर्ण पृष्ठ (कृष्णधवल) | रु.८,०००/- |
| आतील अर्धे पृष्ठ (कृष्णधवल) | रु.५,०००/- |

पूर्ण पान : ६.१ इंच रुंदी x ८.४ इंच उंची
अर्धे पान : ६.१ इंच रुंदी x ४.२ इंच उंची

जाहिरातीसाठी : akshargatha@gmail.com

 ISSN : 0976-2957

**विभाग तिसरा**



# धर्म, मध्ययुगीन भारताविषयीचे मार्क्सवादी इतिहासलेखन आणि आज

■

**प्रा. मनोहर निकम**
सहायक प्राध्यापक, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
भ्र. : ८६९८८७४१११

**प्रस्तावना :-**

भारतीय जनमानसावरील धर्माचा प्रभाव अत्यंत खोल आणि कधीही न पुसणारा असा आहे. धर्म हा मिळालेला पारंपरिक वारसा आहे. तीन-चार पिढ्यांची नावे माणसाला आठवणार नाहीत मात्र धर्माने घालून दिलेले नीती-नियम, संस्कार, रूढी-परंपरा यांचा मागच्या पिढ्यांच्याकडून आलेला शेकडो वर्षे जुना वारसा मात्र तो विसरत नाही. धर्म आणि धर्मश्रद्धांचा उदय व्हायच्या अगोदर किंवा त्याला अमूर्त चिरकाल स्वरूप प्राप्त व्हायच्या अगोदर म्हणजे प्राचीन आदिम काळातदेखील मोठे जनसमूह, टोळ्या यांच्याकडे धर्म नसला तरी धर्मप्राय श्रद्धा ह्या अस्तित्वात होत्याच. अनेक भोळ्या-भाबड्या आणि अनाकलनीय अशा श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांनी धर्मप्राय श्रद्धांचे रूप धारण केलेले दिसते. कधीकाळी रानटी असलेल्या किंबहुना अन्य स्थिर सिंधूसारख्या संस्कृतीशी तुलना करता मागासलेल्या आर्यांनी संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेत भारतातील अनार्य, द्रविड समूहांच्या जुन्या श्रद्धा मोडीत काढून (यात मातृसत्ताक पद्धतीदेखील) काही तशाच ठेवून किंवा त्यांना विक्षिप्त स्वरूपात जिवंत ठेवून त्याला धार्मिक स्वरूपात आणण्याचे काम केले. तरी बौद्ध आणि जैन धर्मासारखे त्याला एक घट्ट धर्माचे स्वरूप कधीच प्राप्त झाले नाही. कालौघात देवता बदललेल्या तशा श्रद्धा, अंधश्रद्धा यांचे स्वरूपदेखील बदलत होते. कधी राज्यकर्ते धर्मश्रद्धा यांच्या प्रभावाखाली येत तर कधी सम्राट अशोक यासारखे राज्यकर्ते आपल्या प्रभावाने यात मोठा बदल करीत. परकीय सत्ता म्हणजे शक, हून, कुशाण यादेखील याला अपवाद ठरत नाहीत.

धर्म आणि धर्मश्रद्धा या ब्रिटिशपूर्व काळात समाजावर आपला प्रभाव गाजवत होत्या. त्याकाळातील सत्ताधीश, राज्यकर्ते हे धर्माचा वापर मोठ्या जनसमूहांवर प्रभाव टाकणारी बाब म्हणून, एक मोठे साधन म्हणून करीत असतील; पण भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, राज्यघटनेने धर्मनिरपेक्षता अखिल भारताच्या बाबतीत स्वीकारल्यानंतर धर्म आणि धर्मश्रद्धा ह्या खरेतर छोट्या-मोठ्या जनसमूहाची, बहुसंख्य आणि अल्पसंख्य लोकांची खाजगी बाब होत असताना, भारतातील विविध पक्ष हे अल्पसंख्य किंवा बहुसंख्य लोकांची कढ घेऊन त्या त्या धर्माच्या रक्षणाच्या वा पुनरुज्जीवनाच्या नावाखाली स्थापन झाले आणि सत्तेवर आल्यावरदेखील तेच राजकारण पुढे जेव्हा रेटतात तेव्हा जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशाचे स्वरूप हे आदर्श न राहता संकुचित होऊ पाहते. विशेषत: मध्ययुगीन भारतातील मुस्लीम आणि हिंदू सत्तांचा, सत्ताधीशांचा वर्तमानकालीन राजकारणासाठी, जनतेला आकर्षित करण्यासाठी, प्रसंगी समाजात तेढ आणि अशांतता निर्माण करण्यासाठी वापर केला जातो. यात मध्ययुगीन काळातील गरजेच्या पण आता कुचकामी ठरणाऱ्या अनेक श्रद्धा आणि अंधश्रद्धा, धोरणे, लढाया यांचा आजच्या समाजावर प्रभाव निर्माण करण्यासाठी आणि दुसऱ्या धर्मावर त्यांचे वारस म्हणून

राग काढण्यासाठी वापर केला जातो ; तेव्हा मध्ययुगीन काळातील धर्म आणि धर्मश्रद्धा यांचे स्वरूप पुन्हा एकदा पडताळून पाहण्याची गरज निर्माण होते. याबाबतीत मार्क्सवादी दृष्टिकोनातून झालेले इतिहासलेखन हे निश्चितपणे दिशा देणारे आणि मार्गदर्शक ठरते.

**उद्देश :**

आजच्या काळातील धर्माला राजकारणी आणि विविध पक्षांच्याकडून सोयीने वापरले जात असताना यासाठी ऐतिहासिक वारसा, प्रेरणा या मध्ययुगीन भारताच्या इतिहासातून शोधल्या जातात. तत्कालीन काळातील धर्माची आणि राज्यकर्त्यांची भूमिका ही नेमकी आजच्या काळात दाखविली जाते त्याप्रमाणे एकाच धर्माची 'री' ओढणारी धर्मांध अशी होती का ? की ती धर्मनिरपेक्ष अशी म्हणजे कुठल्याही एकाच वर्णाची, जातीची वा धर्माची बाजू न घेणारी होती ? याचा उलगडा मध्ययुगीन भारताविषयीच्या मार्क्सवादी इतिहासलेखनातून करणे हा या शोधनिबंधांचा उद्देश आहे.

श्रीपाद अमृत डांगे हे छत्रपती शिवाजी महाराजांना एक राजकारणी आणि त्यांचे चरित्र हेही सर्वस्वी राजकारणच ठरवितात; पण इतरांच्या आणि शिवाजी महाराज यांच्या इतिहासात ते फरक करतात. कारण त्यांचा इतिहास अजून कामाला येतो असे त्यांचे म्हणणे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास हा असे घडायला पाहिजे व असे घडवा असे सांगत असल्याने त्यांना तो जिवंत राजकारणाचा विषय वाटतो. ब्रिटिश यांनी मराठयांच्या इतिहासाच्या केलेल्या एकांगी आणि चुकीच्या मांडणीवर ते प्रकाश टाकतात. टिळकांनी शिवजयंती सुरू करणे, ब्रिटिशविरोधी वारे वाहणे, मराठी इतिहासकार यांनी जागरूक होऊन मराठ्यांचा इतिहास लिहिणे असा क्रमाने ते आढावा घेतात. कॉ.डांगे यांचे असे म्हणणे म्हणजे इतिहासाचादेखील वर्तमानकालीन राजकारण करण्यासाठी वापर करता येतो असा अर्थ होतो; पण कट्टरतावादी पक्ष मात्र इतिहास आणि इतिहासातील प्रतीकांचा वापर हा धार्मिक भेदभाव आणि जातीय प्रभाव निर्माण करण्यासाठी करतात आणि सामाजिक सलोख्याचे वातावरण कलुषित करतात याचा त्यांना अंदाज आलेला दिसत नाही. (डांगे,बारा भाषणे,१९७६, पृ.क्र.१०५-१०७)

शिवाजी महाराजांच्या लढ्याला ते धर्माधर्माचा लढा मानीत नाहीत तर मोगली सरंजामशाही व मराठी दलित जनता यांच्यातला लढा मानतात. शिवाजी महाराजांचे धोरण हे ते साम्यवादी पक्षाच्या समितीसारखे मानतात म्हणजे सर्वांना सामावून घेणारे. स्वराज्याच्या कार्यात सामावून घेताना काहींनी त्यांना विरोध केला त्याचाही आढावा डांगे घेतात. कॉ.डांगे स्वराज्यासाठी रक्तही सांडायला मागेपुढे न बघणारे धाडसी शिवाजी महाराज रेखाटतात. ते त्यांचे कार्य आधुनिक काळातील संकल्पनांशी तुलना करत मांडू पाहतात. म्हणजे त्यांचे उंचावर बसणे, मराठी भाषेला उच्च दर्जा प्राप्त करून देणे (आधुनिक काळातील भाषावाद ते लक्षात घेतात) त्यांच्या मते, महाराजांनी जनतेची भाषा स्वीकारली. डांगे यांच्याच शब्दात स्वराज्य, स्वराज्याची एकी, स्वराज्याच्या जनतेचे हित व स्वराज्याची भाषा घेऊन छत्रपती शिवाजी मराठी राज्याचा संस्थापक बनला! (डांगे, बारा भाषणे, १९७६, पृ.क्र.११०-११) खरेतर डांगे यांनी मांडलेले छत्रपती शिवाजी महाराज हे मध्ययुगात तर आदर्श होतेच; पण ते त्यांचे चरित्र लोकांसमोर संयुक्त महाराष्ट्र लढ्याच्या पार्श्वभूमीवर मांडतात आणि त्यांचा आदर्श आणि गुण यांच्यापासून बौद्ध लोक हे महाराष्ट्र राज्यासाठी संघर्ष करण्यासाठी घेतील ही त्यांना आशा वाटते. म्हणूनच त्यांनी उभे केलेले छत्रपती शिवाजी महाराज हे पुराव्यानिशी पुढे येण्यापेक्षा भावनेच्या आवाहनाला साद घालताना दिसतात. ज्यामुळे टीका करणाऱ्यांना त्यांना खोडणे सोपे जाते. याउलट त्यांनी पुराव्यांचा आधार घेऊन मांडणी केली असती तर त्यांना मजबूत असे धर्मनिरपेक्ष आणि जनताभिमुख शिवाजी महाराज उभे करता आले असते.

राज्यकर्त्यांकडून सत्तेसाठी धर्माचा गैरवापर सुरू असताना शिवाजी महाराजांचे मध्ययुगीन काळातील धोरण वेगळे ठरते. याबाबतीत कॉ.गोविंद पानसरे यांची मांडणी मध्ययुगीन वास्तव परिस्थिती व इतिहास उलगडणारी राहिली आहे. शिवाजी महाराज व धर्म,

शिवाजी महाराज व मुसलमान, शिवाजी महाराज व महाराणा प्रताप, पृथ्वीराज चौहान या मुद्द्यांना पानसरे उदाहरणे म्हणून आणि तुलनात्मक पद्धती वापरून स्पष्ट करतात. त्यांच्याबद्दल कट्टर हिंदुत्वाच्या उभ्या केलेल्या प्रतिमा ते नाकारतात. सर्वधर्म सहिष्णुतेचे त्यांचे स्वरूप ते पुढे आणतात.(पानसरे गोविंद,१९८८, पृ.क्र.२६-४०)

शिवकालीन पाच शाह्या व तेथे उच्चपदस्थ हिंदू व मुगल दरबारीदेखील मोठ्या हुद्यांवर असणारे हिंदू याकडे कॉ.पानसरे लक्ष वेधतात. तत्कालीन धर्मसहिष्णू वातावरण व शिवाजी महाराज यांची कट्टर हिंदुत्ववादी प्रतिमा जुळत नसल्याचे ते मत व्यक्त करतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदरी असलेल्या मुसलमान सरदार व अन्य चाकरांची यादी व त्यांचा स्वराज्यासाठीचा पराक्रम यांचा आढावा ते घेतात. राज्याचा प्रश्न त्या काळात महत्त्वाचा मानतात. धर्म नाही. मुस्लीम राज्यकर्त्यांच्या पदरी असलेल्या हिंदू सेवकांचीदेखील नोंद ते घेतात. (पानसरे गोविंद,१९८८,पृ.क्र.२९-३६) पानसरे यांची ही मांडणी लालजी पेंडसे यांच्या शिवकालीन इतिहासाच्या मांडणीशी साधर्म्य साधणारी आहे.

तत्कालीन काळात मुस्लीम राज्यकर्त्यांना हिंदूविरुद्ध जे उभे केले जाते त्याला पानसरे नाकारतात. त्यांच्या मते, तत्कालीन काळात मंदिरे नष्ट करण्याला कारण राज्य होते तर देवळांना भरघोस दान-देणग्या देण्यासही कारण तेच होते. यामुळे अर्थात राज्य मुख्य व धर्म दुय्यम ठरलेला दिसतो. त्या काळात शिवाजी महाराजांना मराठे व हिंदूविरुद्ध देखील लढाया लढाव्या लागल्या. याकडे दुर्लक्ष करून नये असे त्यांना वाटते. शिवाजी महाराजांना विरोध करणाऱ्या हिंदू सरदारांची यादी अर्थातच मोठी दिसते. अगदी यात नातेसंबंधीदेखील होते. या सर्वांची नावासहित माहिती ते देतात. सांगण्याचा हेतू हाच की, त्याकाळात वतननिष्ठा महत्त्वाची ठरत होती. धर्मनिष्ठा नाही. (पानसरे गोविंद, १९८८, पृ.क्र.३६-४०)

कॉ.पानसरे यांना प्रामाणिकपणे वाटते की, मुस्लीम धर्माविरुद्ध कुणी स्वत:ची मते लोकमान्य करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांचा वापर करू नये. नाहीतर त्यांना एकूण ऐतिहासिक बाबींचा जाब द्यावा लागेल. मुस्लीमद्वेष स्वत:च्या नावाने खपवावा त्यावर शिवाजी महाराजांचा शिक्का मारू नये. त्यांचा इतिहास पाहावा, मुस्लीम धर्माविषयी दृष्टिकोन काय होता तो समजावून घ्यावा मग काय ते ठरवावे. याबरोबर अकबर, दाराशिकोह, इब्राहीम आदिलशहा यांचाही दृष्टिकोन त्यांच्यासारखा धर्मसहिष्णू असल्याचे ते नोंदवितात.(पानसरे गोविंद,१९८८,पृ.क्र.४१-४३)

दि.के.बेडेकर त्यांच्या शोधनिबंधात ज्या परिस्थितीत शिवाजी महाराजांनी स्वतंत्र मराठी राज्याची स्थापना केली त्याची चिकित्सा ते करू इच्छितात. त्यांच्या कर्तृत्वाबद्दल मांडलेल्या सिद्धांताचा आढावा ते घेतात. त्यांना वस्तुनिष्ठ शिवाजी महाराज जनतेपुढे यावे असे वाटते. रानडे, डांगे आणि सावरकर यांच्या लेखनातून निर्माण झालेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमा त्यांना एकांगी आणि विपर्यस्त वाटतात. त्या शिवाजी महाराजांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाची सत्यदर्शी सम्यक वस्तुनिष्ठ प्रतिमा उभी करण्यासाठी फारशा उपयुक्त वाटत नाहीत.

बेडेकर यांना शिवाजी महाराजांच्या एकूणच साऱ्या उपक्रमांत महाराष्ट्रातल्या सर्वसामान्य लोकांचा प्रचंड पाठिंबा, निष्ठा आणि विश्वास कसा संपादन करता आला ? हा प्रश्न विचारणे गरजेचे वाटते. अभ्यासानुसार मराठी अभ्यासकांनी याची उत्तरे वेगवेगळी दिली आहेत. ज्यानुसार १) रानडे यांच्या मांडणीत राष्ट्रीय जाणिवेचा उदय दिसतो. २) डांगे हे छत्रपती शिवाजी महाराज यांचे जमीनविषयक बदल शेतकऱ्यांच्या बाजूने केलेले क्रांतिकारक बदल मानतात. ३) वि.दा.सावरकर यांच्या कट्टर हिदुत्ववादी दृष्टीने छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले राज्य हे हिंदू राज्य होते आणि ते परकीय मुस्लिमांच्या साम्राज्याच्या विरोधात होते. (बेडेकर दि.के.,२०१५, पृ.क्र.२४)

बेडेकर तिन्ही विचार त्याकाळात कमी अधिक प्रमाणात अस्तित्वात असणे मान्य करतात; पण तिन्ही घटकांना योग्य तेवढेच महत्त्व देऊन इतिहासाचे एक

खरे, संतुलित आणि संपूर्ण चित्र उभे करणे आवश्यक ठरते. शिवाजी महाराजांवर झालेल्या एकूण साहित्यनिर्मितीत त्यांना दोन प्रवृत्ती प्रमुख म्हणून प्रकट होताना दिसतात. ज्यात निधर्मी राष्ट्रीय जाणीव (पर्यायाने मराठी राष्ट्रकाची जाणीव) व दुसरी अधार्मिक (हिंदू) राष्ट्रीय जाणीव. शिवाजी महाराज यांच्या ऐतिहासिक कामगिरीची, जनतेत असलेल्या लोकप्रियतेची दखल बेडेकर घेतात, त्यांच्या कार्यक्षमतेची स्तुतीदेखील करतात. (बेडेकर दि.के.,२०१५,पृ.क्र.२४)

शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात स्वतंत्र हिंदू राज्याची स्थापना केली का ? त्यांना हिंदू साम्राज्य स्थापन करावयाचे होते का? या प्रश्नांना आणि सिद्धांताला ते नाकारतात व याची समर्पक अशी कारणेदेखील ते आपल्या मार्क्सवादी पद्धतीच्या मांडणीतून देतात.

ज्यात शिवाजी महाराजांनी लिहिलेल्या पत्रात औरंगजेबला आवाहन केले आहे की, अकबराचे धर्मसहिष्णू धोरण जर आपण चालविले तर आम्ही सहकार्याला तयार होऊ आणि दुसरे म्हणजे, भारतात तेव्हा कोणतेच हिंदू वा मुस्लीम धर्मपीठाचे केंद्रीय संस्थापक संघटन नव्हते. ज्यामुळे कोणत्याही राजाला धर्माधिष्ठित राजेशाही असलेले राज्य स्थापन करण्याची गरज वाटली नाही. शिवाजी महाराजांचे धोरण त्यांच्या पत्रावरून धार्मिक सहिष्णुतेचे होते आणि याबाबतीत ते त्यांना समकालीन राज्यकर्त्यांपेक्षा कितीतरी श्रेष्ठ मानतात. (बेडेकर दि.के.,२०१५,पृ.क्र.२८-२९) शिवाजी महाराज यांच्या विविध गुण व कार्याचा आढावा ते घेतात. परंतु रानडे, सावरकर व डांगे यांनी मांडलेला सिद्धांत व त्यायोगे तयार झालेल्या प्रतिमा मात्र ते खोडून काढतात.

छत्रपती शिवाजी महाराज यांची 'गोब्राह्मणप्रतिपालक' व 'हिंदूपदपादशहा' ही प्रतिमा आणि 'हिंदू धर्मवीर' ही छत्रपती संभाजी महाराज यांची प्रतिमा जनमनावर ब्राह्मणी आणि उच्चवर्णीय चरित्रकार आणि इतिहासकार यांनी ठसवली. कॉ.शरद पाटील नेमके या संकुचित आणि धर्मकेंद्री दृष्टिकोनाची चिकित्सा करू पाहतात. अठरापगड जाती आणि हिंदूच नाहीतर मुस्लीम सैनिक आणि अधिकारी यांच्यादेखील पराक्रमाने मजबूत झालेल्या आणि नंतरच्या काळात साम्राज्याचे स्वरूप धारण केलेल्या स्वराज्याचे मूळ स्वरूप कॉ.शरद पाटील प्रामाणिकपणे आपल्यापुढे मांडू पाहतात.

कॉ.पाटील यांच्या मते, छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजींचे खरे माहात्म्य त्यांच्या जात्यन्तक समतावादी शाक्त हौतात्म्यात आहे. शिवकाळाविषयी विविध आकलनविषयक दृष्टिकोनांचा आढावा ते घेतात. यामध्ये शिवाजी महाराज यांनी स्थापन केलेले स्वराज्य हे धार्मिक प्रेरणेने आणि धर्मरक्षणाच्या उद्देशाने स्थापन केल्याचे कसे दाखविण्यात आले याची चिकित्सा कॉ.पाटील करतात. बाबासाहेब पुरंदरे हे 'राजा शिवछत्रपती' या पुस्तकात शिवाजी महाराज यांना धर्मवीर सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या कार्यामागे खुद्द नारायणाची प्रेरणा असल्याचे ते लिहितात. शिवाजी महाराजांचे राज्य हे देवब्राह्मणांचे राज्य जनतेला वाटत असल्याचे आणि त्यांनी चार वर्ण आणि चार आश्रम यांची प्रतिष्ठा वाढविल्याचे देखील पुरंदरे लिहितात. विनायक वाकसकर यांना तर स्वराज्य निर्मितीमागे गोब्राह्मण प्रतिपालनाचे प्रयोजन वाटते. (पाटील शरद,२०२१,पृ.क्र.२३)

वा.सी.बेंद्रे यांनादेखील छत्रपती शिवाजी महाराजांची संकल्पना निधर्मी राष्ट्रवादाची नाहीतर धार्मिकच वाटते; पण कॉ.पाटील यांच्या मते, स्वत: शिवाजी महाराज हे धार्मिक असले तरी त्यांनी काटेकोरपणे सर्वधर्मसमभाव पाळला. त्यांचे शत्रूही हे कबूल करीत. पुरंदरे कशाप्रकारे सर्वच मुसलमान यांना कट्टर धर्मवेडे दाखवितात ह्याचे विश्लेषण कॉ.पाटील हे करतात.पुरंदरे हे मलिक काफुरची बदनामी पराभूत केल्यामुळे तर करतातच; पण याबरोबर हिंदू जातिव्यवस्थेचे हिंदू पापही मुसलमान राज्यकर्त्यांच्याच माथी मारतात. याबरोबर त्यांनी महाराष्ट्राला भरडून काढणाऱ्या मुसलमान व कालयवनांची अफाट रांग उभी केली. रामचंद्र यादवच्या पराभवाचे कारण पुरंदरे यांना हिंदूंची धर्मनिष्ठा कमी पडली असे वाटते.

जिहादच्या सामर्थ्यापुढे ते यादवांची स्वामिनिष्ठा कमी पडल्याचे सांगतात. या मांडणीला प्रतिवाद करताना कॉ.पाटील नोंदवितात की, मुगल बाबरने अफगाण यांचा पराभव केला मग बाबरची इस्लामनिष्ठा काय अफगाण यांच्यापेक्षा जास्त होती, असा निष्कर्ष काढायचा का ? (पाटील शरद, २०२१,पृ.क्र.२४-२९)

शिवाजी महाराज यांचा विजय धर्मनिष्ठ असता तर त्यांच्याकडे मुसलमान वीर कसे आले असते ? असा प्रश्नच कॉ.पाटील येथे उपस्थित करतात. कर्तव्यनिष्ठ अशा मुस्लीम सेवकांची उदाहरणेदेखील ते देतात. धर्मप्रधानता जीवनात मानली तर मुस्लीम राष्ट्रे एकमेकांविरुद्ध का लढतात? आपल्या म्हणण्याच्या स्पष्टीकरणासाठी ते मोहमद हबीब यांच्या मांडणीचा आधार घेतात. ज्यात त्यांनी खिलजीपूर्व तुर्की राजवट ही कशी धर्मवेडामुळेच नष्ट झाली हे स्पष्ट केले आहे. गझनीच्या महमदचे भारतावरील स्वाऱ्यांचे खरे कारण ते धार्मिक नाहीतर आर्थिकच मानतात. हबीब यांच्या मुद्यात येते की, हिंदू देवळे जर मुसलमान मशिदीप्रमाणे संपतीविहीन व साधी असती तर ना गझनीने आक्रमण केले असते ना अलाऊद्दीन खिलजीने दक्षिणेत फौजा पाठविल्या असत्या.(पाटील शरद, २०२१,पृ.क्र.२९-३१)

मोहम्मद हबीब यांच्या मांडणीच्या आधारेच कॉ. पाटील मत नोंदवितात की, बादशाह मुसलमान असायचे कारण हिंदूवाद हा जाती व उपजातीत विभागलेला होता. तर मुस्लीम हे समर्थतम एकजुटीचे अल्पसंख्याक असून क्षत्रिय आणि ब्राह्मण यांच्यापेक्षा संख्येने जास्त होते. हिंदूवाद हा समता आणि सामाजिक लोकशाहीने प्रेरित नसल्याचे ते दाखवितात. याबरोबर सुलतानांचा राज्यकारभार हा इस्लामी कायद्याने नाहीतर इराणी कायद्याने चालत असल्याचे ते दाखवितात. कॉ.पाटील हेही नमूद करतात की, अल्पसंख्य अशा मुस्लीम सत्ताधिशांचे इमानदार बहुसंख्य महसूल गोळा करणारे देशमुख-देसाई ते पाटीलपर्यंत सर्व वतनदार,जमीनदार हे हिंदूच होते. तुर्की राजवटीपासून ते दुय्यम राज्यकर्तेच होते. (पाटील शरद, २०२१,पृ.क्र.३२-३४)

सेतू माधवराव पगडी यांच्या आकलनाचा आधार घेऊन कॉ.पाटील मत मांडतात की, छत्रपती शिवाजी यांच्या कागदपत्रात धर्मविषयक उल्लेख नाही. मुसलमान हा शब्दही नाही. मुगल स्वत:ला तुराणी व अन्य यांना हिंदुस्थानी असे संबोधायचे यामुळे मध्ययुगात धार्मिक प्रेरणेपेक्षा वांशिक प्रेरणाच अधिक जाणवते. (पाटील शरद, २०२१,पृ.क्र.३९)

कॉ.शरद पाटील यांनी धार्मिक एकांगी दृष्टिकोनातून मांडलेल्या मार्क्सवादी इतिहासावर ज्याप्रमाणे बोट ठवले त्याप्रमाणे पौर्वात्यवादी प्रभावाखाली येऊन हिंदू धर्म व हिंदू समाज यांना केंद्रस्थानी ठेऊन राष्ट्रकल्पनेची उभारणी जी ब्राह्मणी मध्यमवर्गाने केली त्याकडे डॉ. उमेश बगाडे हे लक्ष वेधतात. खरेतर वसाहतवादी टीकेला उत्तर म्हणून तशी प्रतीके पुढे येत असलेली दिसतात. ब्राह्मणी मध्यमवर्ग इतिहासकारांनी छत्रपती शिवाजी महाराज हे 'हिंदू राष्ट्रनिर्माता' या स्वरूपात मत मांडले. डॉ.बगाडे यांच्या मते, शिवकाळात हिंदू राष्ट्रवादाचा तात्त्विक पुरस्कार केलाच; पण ब्राह्मण जातीवर्चस्वाची योजनादेखील यातून गुंफली गेली. ही ब्राह्मणी वर्चस्वाची योजना जातीविद्रोहाच्या पावित्र्यातील सत्यशोधक यांना सहन झाली नाही. या मांडणीस प्रतिवाद केळुस्कर गुरुजी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र लिहून केल्याचे ते नमूद करतात. त्यांनी रामदास गुरू म्हणून नाकारणे, गोब्राह्मण प्रतिपालन हे स्वराज्याचे उद्दिष्ट नसून रयतेचे कल्याण होते हे स्पष्ट केले. त्यातील ब्राह्मणेत्तर जातींचे योगदान मांडले. तर के.सी.ठाकरे, दिनकरराव जवळकर या सत्यशोधकांनी शिवचरित्राची संगती लावताना ब्राह्मणी वर्चस्व नाकारले; पण हिंदूराष्ट्रवादाची तत्त्वे मात्र स्वीकारल्याचे डॉ.उमेश बगाडे हे नमूद करतात. (बगाडे उमेश, परिवर्तनाचा वाटसरू,२०१५,पृ.क्र.२५-२६)

अकबराच्या धार्मिक धोरणाबद्दल इरफान हबीब नमूद करतात की, अकबराचे धोरण हे राजकीयदृष्ट्या उपकारक होते, जे त्याच्या अनुभवातून आलेले होते. त्याने हिंदूंच्या धार्मिक ग्रंथांच्या भाषांतराचे केलेले प्रयत्न हे हिंदू आणि मुस्लीम यांच्या

विभक्तीकरणातदेखील समान धागा शोधण्याचे होते. (हबीब इरफान, २०१३, पृ.क्र.१७८-१७९)

लालजी पेंडसे यांचे धर्म किं क्रांती ? हे पुस्तक म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य हे धर्मासाठी स्थापले की एक शेतकऱ्यांची, जनतेची क्रांती म्हणून निर्माण केले याचा घेतलेला मार्क्सवादी दृष्टिकोनातून, भौतिक बाबींना समोर ठेऊन घेतलेला शोध आहे. छत्रपती शिवाजी महाराज लोकांशी कसे वागले ? आणि लोक त्यांच्याशी कसे वागले ? हे बघणे त्यांना महत्त्वाचे वाटते; पण हीच गोष्ट इतिहासात सापडत नसल्याची खंतदेखील ते व्यक्त करतात. शेतकऱ्यांचे, कुणबी यांचे छत्रपती शिवराय यांच्याबद्दलचे प्रेम त्यांना निराळे वाटते. हिंदू पतपातशाहीची स्थापना, गोब्राह्मण प्रतिपालक आणि हिंदू धर्म रक्षण या तीन बाबी छत्रपती शिवाजी महाराजांनी केल्याचे मांडणाऱ्यांचा दृष्टिकोन त्यांना एकांगी वाटतो. (पेंडसे लालजी, १९७६, पृ.क्र. ८-११)

ऐतिहासिक मांडणीतील गायी, स्त्रिया व शेतकरी यांच्या रक्षणार्थ शिवराय हे जागरूक होते वा त्यांचा तसा दंडक होता हे पेंडसे यांना मान्य आहे. मात्र त्यांना ब्राह्मण हा शब्द त्यात जाणीवपूर्वक घुसविला गेला असल्याचे वाटते. तत्कालीन धर्माचे सहिष्णू स्वरूप पेंडसे पुढे आणतात. त्यांच्या मते, महाराष्ट्रातील बहुसंख्य मराठे हेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विरुद्ध होते व अनेक हिंदू सरदार हे देखील औरंगजेब यांच्याशी एकनिष्ठ राहिले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमाच्यामागे ते विशेष स्फूर्ती आणि गतीकारण असल्याचे स्पष्ट करतात. त्यांच्या अगोदर अनेक शक, हुण, कुषाण यासारख्या परकीय सत्तांच्याविरुद्ध अनेक राजांनी लढा दिला; पण छत्रपती शिवाजी महाराज यांचेच नाव लोकांत एखाद्या दैवतासारखे विराजमान आहे, अमर आहे. त्यांच्या धार्मिक कार्याला ते बहिरंग स्वरूप असल्याचे मानतात. अंतरंग नाही. अंतरंग हे स्वरूप हे धर्मेत्तर असल्याचे त्यांना वाटते. हिंदू विरुद्ध मुस्लीम हे स्वरूप त्यांना फसवे वाटते. (पेंडसे लालजी, १९७६, पृ.क्र. १२-१८)

मुस्लिमांच्याऐवजी विरोधी शक्ती ही हिंदू जरी असली असती, तरी छत्रपती शिवाजी महाराज त्याविरुद्ध देखील लढलेच असते. निदान त्यामुळे धर्माचे हे गुंतागुंतीचे स्वरूप जे आज वाटते तसे राहिले नसते असे पेंडसे यांना खात्रीने वाटते. महाराष्ट्रातील मुसलमान सत्ता नामधारी व खरी सत्ता ही मराठ्यांच्याच ताब्यात असल्याचे मत ते नोंदवितात. मराठे म्हणजे हिंदूधर्मीय हेच एकप्रकारे अप्रत्यक्ष सत्तेत असल्याने धर्माचे खास रक्षण करण्याची तरी त्याकाळात गरज नसल्याचे पेंडसे नमूद करतात. याबरोबर एक मोठा प्रश्न ते आपल्यापुढे ठेवतात. शिवाजी महाराज हे जर धर्म रक्षणार्थच लढले असते तर सर्वच मराठे का त्यांच्या बाजूने आले नाहीत ? आणि नंतर जे आले ते केवळ आपली वतने सुरक्षित राहावी म्हणून आली. (पेंडसे लालजी, १९७६, पृ.क्र.२२-२६)

वर्तमानकालीन धार्मिक समस्या या भूतकालीन धार्मिक समस्यांच्यापेक्षा अधिक उग्र रूप भारतातच नव्हे, जगभर धारण करताना दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर मार्क्सवादी विद्वान दि.के. बेडेकर यांची भूमिका आणि मांडणी कालातीत ठरते. अल्पसंख्याक समाजाच्या लाडाचे धोरण आखणाऱ्या सरकारलादेखील बेडेकर खडे बोल सुनवायला कमी करत नाहीत. एक मोठे मार्गदर्शन ते धार्मिक धोरण देशाचे कसे असावे या बाबतीत करतात. त्यांचे म्हणणे आहे की, हिंदू धर्म व संस्कृती यांच्या प्राचीन व गौरवशाली परंपरेत उदारतेचे जे थोर व उदात्त तत्त्व आहे, ते आजच्या राज्यसंस्थेच्या हातून अमलात यावयाचे असेल तर, भारताचे राज्य मग ते आजचे असो की उद्याचे, मार्क्सवाद्यांचे किंवा समाजवाद्यांचे असो, धर्मातीतच असले पाहिजे. विश्वबंधुत्व, शांतता व समता यांचा पुरस्कार असे राज्यच करू शकेल. (बेडेकर दि.के., धर्मचिंतन, पृ.क्र.७२-७३) एवढी स्पष्ट भूमिका बेडेकर धर्माच्या बाबतीत घेताना दिसतात. वरील मार्गच त्यांना भीषण परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठीदेखील योग्य वाटतो.

आजच्या काळातील देशात सर्वत्र आढळणारी धर्मप्रेरणा याच्यावर बेडेकर बोट ठेवतात. धर्माच्या

नावावर भारताचे दोन तुकडे पडले. देशाने धर्मनिरपेक्षता स्वीकारली असूनही हिंदू, मुस्लीम,बौद्ध आणि जैन या सर्वांनाच इतर धर्मीयांचे आक्रमण भेडसावत आहे. या सर्वांनाच आपण आणि आपले धर्मबांधव हे इतरांच्यापेक्षा वेगळे असून याचे आपण सर्वांनी एकत्र येऊन जागरूकतेने रक्षण नाही केले तर अनर्थ ओढवेल या चिंतेने यातले काहीजण पुढे येऊन माथेफिरूपणाची आत्मघातकी पाऊले टाकीत आहेत. (बेडेकर दि.के.,धर्मचिंतन,पृ.क्र.९७) बेडेकर आपल्या मांडणीने थोडक्यात वर्तमानकालीन वास्तव परिस्थितीवर प्रकाश टाकतात. त्यांनी केलेली ही मांडणी नुसतीच तत्कालीन काळाच्या कसोटीवर उतरली नाही तर तिने भविष्यकालीन म्हणजे आजची चिंताही खरी करून दाखविली आहे. स्वधर्माला चिरडले जाण्याची भीती आणि अन्य धर्माबद्दल मोठी शंका आज सर्वत्र निर्माण झाल्याचे दिसते.

आजच्या काळातील धर्मांध शक्तींच्या आणि पक्षांच्या, धर्माच्या नावावर केल्या जाणाऱ्या राजकारणावर कॉ.गोविंद पानसरे हे नेमकेपणाने प्रकाश तर टाकतातच; पण त्यांच्या अर्थकारणावर ते केवळ आणि केवळ गरिबांना बुडविण्याचे कसे आहे हे देखील स्पष्ट करतात. त्यांच्या मते, कधीकाळी हे देशविरोधी असणारे आणि छुपी भूमिका आजही तशीच ठेवणारे कट्टरतावादी अमेरिकेशी साधर्म्य साधणारी हुकूमशाही भूमिका ठेवून चालतात. त्यांची धोरणे ही सरळसरळ जनविरोधी आणि भांडवलशाहीधार्जिणे आहेत. या सत्याचा स्पष्ट उलगडा जनतेला झाला तर त्यांच्यामागे देशभक्तीच्या नावाने उभे राहणारे जवळही जाणार नाहीत हा आशावाद कॉ.पानसरे यांना वाटतो.(पानसरे, २०१७,पृ.क्र.१२-१३)

आज आपण धर्माच्या बाबतीत कुठे आहोत ? २० ऑगस्ट, २०१३ रोजी नरेंद्र दाभोलकर , १६ फेब्रुवारी २०१५ रोजी कॉ.गोविंद पानसरे, ५ सप्टेंबर २०१७ रोजी पत्रकार गौरी लंकेश यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. तिघांनी वैचारिक अशा लेखन आणि भाषणाच्या मार्गांनी व्यक्त होऊन धर्मातील दोषांवर बोट ठेवले होते. धर्माचे दोषारोप स्वीकारून त्यात दुरुस्तीसाठी पुढाकार घेण्याऐवजी त्यांचा नाहक बळी मात्र घेण्यात आला. सध्याच्या वर्तमानकालीन घटनांचा संदर्भ देण्यासाठी वेगळे संदर्भ देण्याची गरज नाही. धार्मिक विषय घेऊन चित्रपट बनविले म्हणून दिग्दर्शक यांना मारहाण करणे, सिनेमांचे विषय बदलण्यास भाग पाडणे, प्रत्यक्ष सिनेमा प्रदर्शित झाल्यावर त्यांच्यावर अप्रत्यक्ष व प्रत्यक्ष बहिष्कार टाकणे. याचवेळी कट्टरतावादी विषयांचे चित्रपट आले की, त्यांना मात्र प्रोत्साहन देणे, कलाकार यांना पारितोषिके देऊन गौरविणे. जुन्या प्रतीकांना, महाकाव्यांना पुन्हा आज जगण्याचा एक अविभाज्य भाग असल्याचे भासविले जात आहे. धार्मिक घोषणा, धार्मिक गाणी ही रिंगटोन म्हणून वापरली जात आहेत.

प्रसारमाध्यमे, समाजमाध्यमे ज्यात व्हाट्सअॅप, फेसबुक, ट्विटर यासारख्या माध्यमांचा वापर समाजात, दोन धर्मात तेढ निर्माण करण्यासाठी, दंगली भडकविणे यासाठी करण्यात येत आहे. आला आहे. महाराष्ट्रात आणि भारतात घडलेल्या धार्मिक दंगलीत अनेक बळी गेले. ज्यात सर्वात वाईट म्हणजे यासाठी मध्ययुगीन काळातील आदर्श अशा व्यक्तिमत्त्वांचा, प्रतीकांचा गर्व, राग, अहंकार व्यक्त करण्यासाठी वापर करण्यात आला. हे झाले सर्वसामान्य लोकांचे. राजकारणीदेखील यात कमी नव्हते. मध्ययुगीन इतिहासातीलच व्यक्तींचा आणि प्रतीकांचा वापर करून तेही भडकपणे बोलत होते. आज राज्यघटनेनुसार कार्यकारी मंडळ म्हणून सत्तेवर आलेल्या व न आलेल्या जनप्रतिनिधींनी आपले पूजा आणि धर्म हे घरात ठेवून समाजात धर्मनिरपेक्ष धोरण अमलात आणण्याची गरज असताना आपला जनपाठिंबा, आमदारकी, खासदारकी, मंत्रिपदे जातात की काय या भीतीने ते देशभर धार्मिक पूजेला, कार्यक्रम यांना हजेरी लावत फिरताना दिसतात. खरेतर जनतेच्या लोकप्रिय धार्मिक श्रद्धांच्या आहारी न जाता त्यांनाच धर्मसहिष्णूतेचा एक आदर्श वस्तुपाठ घालून देण्याची गरज या लोकप्रतिनिधींकडून असताना ते मात्र जनतेचे हित आणि विकास हा केवळ धार्मिक पूजा, विधीत

आणि धर्मद्वेषात असल्याचा गैरसमज करून बसलेले दिसतात आणि त्यांच्या प्रवाहात वाहताना दिसतात. खरेतर राज्यकर्ता हा एक पित्यासमान, पालकासमान भूमिकेत असतो ना की फुटेल तिकडे वाहणाऱ्या अनिर्बंध अशा पाण्याच्या प्रवाहासारखा. जुन्या वास्तू पाडणे, शहरांची नावे बदलणे आणि अन्य यासारख्या बऱ्याच बाबी करणे या सर्व गोष्टी म्हणजे खरेतर जुन्याच वादांना, निखाऱ्यांना जाणीवपूर्वक हवा देण्यासारखे आहे.

महासत्ता होण्याची स्वप्ने बघताना धर्माला दाबून नव्हे; पण धर्माच्या पलीकडे बघण्याची गरज आता निर्माण झाली आहे. मध्ययुगीन काळात धर्मसुधारणेचे युग युरोपात अवतरून भौतिकवाद स्वीकारून तेथे औद्योगिक क्रांती घडून आली. जगभर ज्यात भारतातही युरोपियन देशांनी वसाहतींचे साम्राज्य निर्माण केले हे विसरून चालणार नाही. परराष्ट्र धोरणे आखताना विधर्मी राष्ट्रांशी हातमिळवणी करणे चालत असेल तर राष्ट्रांच्या अंतर्गत धोरणातदेखील राज्यकर्त्यांना असेच सलोख्याचे धोरण आखावे लागेल. तरच लोकशाही, धर्मनिरपेक्षता देशात येईल आणि राज्यघटनेचे योग्य पालन होईल. स्वातंत्र्य चळवळीत क्रांतिकारी, समाजवादी, राष्ट्रवादी, साम्यवादी हे सर्व प्रवाह धार्मिक सलोखा जपताना दिसतात. मध्ययुगीन काळातदेखील छत्रपती शिवाजी महाराज, बादशहा अकबर यांनी धार्मिक एकोप्याचे धोरण अवलंबिले होते. आजचे धार्मिक वातावरण बघून इतिहास हा सरळ गतीने नाहीतर उलटया गतीने जात असल्याचे खेदाने म्हणावे लागते.

**निष्कर्ष :**

इतिहासातल्या घटना, धोरणे, धार्मिक अंगीकार हा खरेतर त्या त्या काळाच्या परिस्थितीला अनुसरून असतात. आधुनिक काळात जर भूतकाळातील घटनांचा अंगीकार करून वर्तमानकालीन घटनांवर प्रभाव टाकला जात असेल तर आपण अजून मध्ययुगातच आहोत असेच म्हणावे लागेल. स्वातंत्र्यासाठी केलेला संघर्ष, सांडलेले रक्त, समाजसुधारणेसाठी केलेला सर्वांगीण त्याग हा मातीमोल होईल. मध्ययुगीन भारताच्या इतिहासाचा जो वापर आज केला जातो तोही वास्तवतेला धरून नसल्याचे आपल्याला मार्क्सवादी इतिहासलेखन अभ्यासल्यावर लक्षात येते. माणसाला धर्माशिवाय अन्य बाबी, जगण्याचा संघर्ष मोठा असतो. विकासाला आणि सुधारणेला बगल देऊन धर्माची रेष ठळक करणे आज सर्वत्र होताना दिसत आहे. शेवटी नेता किंवा राजकारण हे जनतेला काय हवे असते याच्यावर भाष्य किंवा राजकारण करत असतो. जनजागरूकता हीच विकास की धर्म ? धर्मनिरपेक्षता की धार्मिक कट्टरता? मध्ययुग की आधुनिक काळ? या प्रश्नांची आणि त्यांच्या निवडीचीदेखील सोडवणूक करणार आहे. कारण, लोकशाहीमध्ये केवळ लोक म्हणजे जनता हीच मोठी ठरते अन्य कुणीही नाही.

**संदर्भ :**


१. डांगे श्रीपाद अमृत, शिवाजी-त्यांचा आणि आमचा, बारा भाषणे,अभिनव प्रकाशन,मुंबई,दुसरी आवृत्ती-१९७६
२. पानसरे गोविंद, शिवाजी कोण होता ?, ऑल इंडिया स्टुडंटस फेडरेशन, कोल्हापूर, १९८८
३. हबीब इरफाब,भारतीय इतिहास में मध्यकाल, (अनुवाद एवंम संपादन) रमेश रावत,वाणी प्रकाशन, प्रथम संस्करण- २०२२
४. बेडेकर दि.के.,शिवकार्याच्या विविध आकलनांचा चिकित्सक आढावा, समाजप्रबोधन पत्रिका,कोल्हापूर, जाने-मार्च २०१५
५. कॉ. पाटील शरद, शिवाजीच्या हिंदवी स्वराज्याचे खरे शत्रू कोण महंमदी की ब्राह्मणी?(आवृत्ती ६ वी) मावळाई प्रकाशन, शिरूर पुणे, २०२१
६. पेंडसे लालजी, धर्म किं क्रांती ? (शिवकार्याचे वास्तव स्वरूप) चिटणीस वाङ्मय मंडळ, भडगाव, १९७६
७. बगाडे उमेश, मराठा आत्मोन्नतीचा संघर्ष व जागृतिकार पाळेकर(भाग-२), परिवर्तनाचा वाटसरू, १ ते १५ जून २०१५
८. बेडेकर दि.के.,धर्मचिंतन, लोकवाङ्मय गृह, मुंबई, २०१३
९. पानसरे गोविंद, धर्म, जात, वर्ग आणि परिवर्तनाच्या दिशा, लोकवाङ्मय गृह, मुंबई, सहावी आवृत्ती- २०१७
१०. लालजी, धर्म किं क्रांती ? (शिवकार्याचे वास्तव स्वरूप) चिटणीस वाङ्मय मंडळ, भडगाव, १९७६
११. बगाडे उमेश, मराठा आत्मोन्नतीचा संघर्ष व जागृतिकार पाळेकर(भाग-२), परिवर्तनाचा वाटसरू, १ ते १५ जून २०१५
१२. बेडेकर दि.के.,धर्मचिंतन, लोकवाङ्मय गृह, मुंबई, २०१३
१३. पानसरे गोविंद, धर्म, जात, वर्ग आणि परिवर्तनाच्या दिशा, लोकवाङ्मय गृह, मुंबई, सहावी आवृत्ती- २०१७.


■

 ISSN : 0976-2957



# शिवकालीन इतिहासलेखन, विकृती आणि सांस्कृतिक राजकारण

■

**डॉ. श्रीमंत कोकाटे**
२७१, 'सूर्यवदन', गावठान, शिवाजीनगर, पुणे-५.
भ्र. ९४२३३३६४२८, ७०२०३५००२०



> दि. ७ व ८ ऑक्टोबर २०२३ रोजी लोकायत विचारमंच आयोजित सातवी विवेकजागर परिषद जालना येथे संपन्न झाली. या परिषदेत 'भारतीय इतिहास लेखन व समकालीन राजकारण' या मध्यवर्ती विषयावरील '**शिवकालीन इतिहासलेखन, विकृती आणि सांस्कृतिक राजकारण**' या विषयावर केलेल्या मांडणीचे शब्दांकन सारांशरूपाने अक्षरगाथाच्या वाचकांसाठी प्रसिद्ध करीत आहोत.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रलेखनाच्या माध्यमातून वर्चस्ववादी मानसिकता सुमारे दीडशे वर्षांपासून जोपासली जात आहे, त्याला पहिला प्रतिवाद महात्मा फुले यांनी केला. त्यांनी छत्रपती शिवाजीराजांच्या इतिहासाला वर्चस्ववाद्यांच्या वेढ्यातून सोडविण्याचा ऐतिहासिक प्रयत्न केला. महात्मा फुले यांनी शिवाजीराजांची खरी ओळख जनमाणसाला करून दिली.

'कुळवाडी भूषण पवाडा गातो भोसल्यांचा ।।
छत्रपती शिवाजी भोसल्यांचा ।। लंगोट्यास देई
जानवे पोशिंदा कुणब्यांचा ।।'

शिवाजी महाराज हे कुळवाडी म्हणजे कष्टकरी, शेतकरी, बारा बलुतेदार कुणब्यांचे राजे आहेत. त्यांनी लंगोट घालणाऱ्या आदिवासी, शूद्रातिशूद्रांनादेखील प्रतिष्ठा मिळवून दिली. हा राजा श्रमकऱ्यांचा पोशिंदा होता, हे महात्मा फुले यांनी निःसंदिग्धपणे सांगितले. फुलेंच्या मांडणीमुळे 'गोब्राह्मण प्रतिपालक'चा डोलारा प्रथमतः ढासळला. तिरक्या पद्धतीने बांधलेल्या इतिहासलेखनाला आधुनिक भारतात प्रथमतः महात्मा फुले यांनी सुरुंग लावला. छत्रपती शिवाजीराजांना जातवादी, जमातवादी, धर्मांधांच्या जोखडात जे बंदिस्त करण्यात आले होते, त्यांची सुटका करण्याचे काम महात्मा फुले यांनी प्रथमतः केले. पुढे राजारामशास्त्री भागवत, कृष्णाजी अर्जुन केळुस्कर, शरद जोशी, कॉम्रेड गोविंद पानसरे आणि शरद पाटील यांनी वैचारिक पद्धतीने ब्राह्मणी इतिहासाची चिकित्सा केली.

महात्मा फुले यांनी रायगडावरील शिवसमाधीचा शोध घेतला, सुमारे ९०८ ओळींचा शिवपोवाडा लिहिला आणि शिवजयंती उत्सवाला सुरुवात केली. परंतु आजही शालेय अभ्यासक्रमात टिळकांनी शिवजयंती सुरू केली असे धादांत खोटे शिकविले जात आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहास लेखनाद्वारे सतत वर्चस्ववाद जोपासला जात आहे. शिवाजी महाराज म्हणजे राजस्थानच्या राजपूत कुळातील म्हणून ते शूर, पराक्रमी आणि क्षत्रिय असे एक मिथक अनेक वर्षांपासून महाराष्ट्रीयांच्या बोकांडी बसविण्यात आलेले आहे. यातून शिवरायांना साथ देणाऱ्यांना दुय्यम ठरविणे; शिवरायांना भूमिपुत्रांपासून तोडणे, मराठा-कुणबी आणि शूद्रातिशूद्र यांच्यात भेदाची भिंत उभी करणे हा सर्व खटाटोप आहे. आज जो मराठा आरक्षणाचा लढा सुरू आहे आणि मराठा विरुद्ध ओबीसी ही जी फूट

पाडण्यात आलेली आहे त्याची पाळेमुळे वर्चस्ववादी इतिहास लेखनात आहेत. प्राच्यविद्या पंडित शरद पाटील म्हणतात, ''सांप्रत युगात क्षत्रियच उरले नाहीत. ब्राह्मणी ग्रंथांनी / धर्माने कलियुगात क्षत्रिय उरले नाहीत. कारण, परशुरामाने पृथ्वी निःक्षत्रिय केली आहे, असा पुकारा केल्यानंतर फक्त ब्राह्मण आणि शूद्र हे दोनच वर्ण उरतात, मग राजपूत तरी कसे काय क्षत्रिय ठरतात?'' असा सैद्धांतिक प्रश्न शरद पाटील विचारतात. यावरून हे स्पष्ट होते की, शिवाजीराजांच्या भोसले कुळाचे मूळ राजस्थानातील राजपूत कुळातील नाही तर ते मूळचे वेरूळ येथीलच आहेत. परंतु वर्णवर्चस्ववाद कायम ठेवून शूद्रातिशूद्रांना हीन, दुय्यम लेखण्यासाठी शिवचरित्राची मोडतोड केलेली आहे. हे स्पष्ट होते.

शिवाजीराजे शाकाहारी की मांसाहारी? असाही वाद अलीकडे निर्माण करण्यात आलेला आहे. शाकाहारी म्हणजे सात्विक अर्थात सज्जन आणि मांसाहारी म्हणजे तामसी अर्थात दुर्जन असा एक सनातनी प्रवाह अलीकडे वाढत आहे. मुळात आहाराचा आणि नैतिकतेचा काहीही संबंध नाही. आहार ही नैसर्गिक बाब आहे. आहाराचा आणि धर्माचा काहीही संबंध नाही. आहाराचा आणि सुसंस्कृतपणाचा काहीही संबंध नाही. किंबहुना मिश्राहार हीच मानवाची खरी संस्कृती आहे. आहार अगोदर धर्म नंतर आलेत. मानवप्राणी हा मिश्राहारी आहे. तो केवळ शाकाहारी किंवा केवळ मांसाहारी नाही. बुद्ध अहिंसावादी होते, तरीही ते मांसाहारी अर्थात मिश्राहारी होते. एखाद्या व्यक्तीच्या आहारावरून त्यांचे नैतिक मूल्यमापन करणे, हा शुद्ध मूर्खपणा आहे. सारांश महाराष्ट्र देश, येथील भौगोलिक परिस्थिती आणि आहारपद्धती यावरून स्पष्ट होते की, शिवाजी महाराज मिश्राहारी होते, त्यांना शाकाहारी ठरविणे, हा खोडसाळपणा आहे. सनातनी अजेंडा राबविण्यासाठी शिवचरित्रावर सनातनी आहार लादला जातोय, इतिहास लेखनातून सनातनी राजकारण केले जात आहे.

छत्रपती शिवाजीराजांचा लढा मोगल, आदिलशहा किंवा औरंगजेब, अफजलखान, शाईस्तेखान यांच्याविरुद्ध होता, तसाच तो सरंजामदार, स्वकीय धर्मांध यांच्याविरुद्धदेखील होता. त्यांनी जशी औरंगजेबाची धर्मांधता खपवून घेतली नाही, तशीच ब्राह्मणी धर्मांधतादेखील खपवून घेतली नाही. त्यांना स्वकीयांचे, भूमिपुत्रांचे अर्थात रयतेचे लोककल्याणकारी स्वराज्य निर्माण करावयाचे होते, त्यांना भेदभाव मान्य नव्हता. ते शुद्ध नास्तिक नव्हते. त्यांना आपल्या परंपरेचा अभिमान होता. परंतु धर्मभोळेपणा, भाबडेपणा त्यांच्या ठायी नव्हता. त्यांनी बुद्धिप्रामाण्यवाद जोपासला. स्वकीय आणि परकीय धार्मिक प्रतीकांचा आदर-सन्मान केला. परंतु मोगल आणि पोर्तुगीजांच्या स्वैर धर्मांधतेला पायबंद घातला, त्यांचा अनुनय त्यांनी केला नाही. परंतु आज जे काही चालले आहे की, शिवाजी महाराज म्हणजे हिंदूधर्मरक्षक आणि आणि मुस्लिमांचा कर्दनकाळ हे ऐतिहासिक तथ्याला धरून नाही. धर्मनिरपेक्षता ही आधुनिक संकल्पना आहे. ती आदर्शवत आहे. ती इतिहासावर लादणे विसंगत आहे. तसेच त्यांना केवळ धार्मिक वीर ठरविणेदेखील अनैतिहासिक आहे. शिवाजीराजे विवेकमूल्ये जोपासणारे प्रगल्भ राजे होते. त्यांना आजच्या राजकारणासाठी सोयीनुसार वापरणे अत्यंत खेदजनक आहे.

शिवाजीराजे मराठी भाषाभिमानी होते. परंतु इतर भाषांचा त्यांनी कधीही द्वेष केला नाही. त्यांना अनेक भाषा अवगत होत्या. भाषावार प्रांतरचना ही आधुनिक संकल्पना आहे, ती शिवकाळातील नाही. त्यामुळे शिवाजीराजांना जसे जातवादी, जमातवादी ठरविता येणार नाही तसेच त्यांना भाषावादी, प्रांतवादी ठरविणेदेखील अनैतिहासिक किंबहुना विसंगत आहे.

शिवाजीराजांनी स्त्रियांचा आदर - सन्मान केला. शत्रूंच्या स्त्रियांचादेखील आदर-सन्मान केला पाहिजे, हे त्यांचे मानवतावादी धोरण होते. शेतकऱ्यांच्या घामाला दाम आणि श्रमाला मोल मिळाले पाहिजे, पर्यावरणाचे रक्षण झाले पाहिजे. शेतकरी सुखी तर आपण सुखी, ही त्यांची भूमिका होती. त्यांनी गुलामगिरीला कडाडून

विरोध केला. हा त्यांचा मानवीमूल्ये वृद्धिंगत करणारा इतिहास आहे. परंतु त्यांच्या इतिहासाचा वापर जातीय, धार्मिक संघर्ष आणि वर्णवर्चस्वाखाली केला जातोय, हे प्रागतिक विचारांच्या लेखक, अभ्यासक, संशोधकांचे अपयश आहे.

शिवाजीराजांच्या जडणघडणीत तत्कालीन सामाजिक, आर्थिक आणि भौगोलिक परिस्थिती कारणीभूत आहे. तसेच त्यांचे दूरदृष्टीचे माता-पिता जिजाऊ आणि शहाजीराजे यांचे मार्गदर्शनही कारणीभूत आहे. जिजाऊ - शहाजीराजे यांनी शिवरायांना राजनिती आणि युद्धकलेचे शिक्षण दिले, असे वस्तुनिष्ठ इतिहासकार सांगतात. परंतु वर्णवर्चस्ववादी कथाकारांनी शिवरायांच्या जडणघडणीचे श्रेय रामदास - दादोजी कोंडदेवला दिलेले आहे की जे अनैतिहासिक आहे. शिवचरित्राच्या अस्सल - समकालीन ऐतिहासिक साधनात रामदास - कोंडदेवाचा साधा नामोल्लेखदेखील नाही. परंतु शिवाजीराजांच्या कार्यकर्तृत्वाचे श्रेय एका विशिष्ट जात समूहाला जावे यासाठी शिवाजीराजांच्या गुरुस्थानी रामदास - कोंडदेव थापलेले आहेत. यातून धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, प्रशासकीय, साहित्यिक क्षेत्रात तसेच राजकीय क्षेत्रात वर्चस्ववाद वृद्धिंगत झालेला आहे. एकूणच भारतीय इतिहास लेखनाची मांडणी वर्चस्ववादी आहे. त्यातूनच भारतीय राजकारण - सांस्कृतिक क्षेत्र यामध्ये मक्तेदारी वाढीस लागली. त्यामुळेच भारतीय इतिहासाच्या पुनर्लेखनाची नितांत गरज आहे.

'शिवकालीन इतिहासलेखन, विकृती आणि त्यातून सांस्कृतिक राजकारण' वाढीस लागल्याचे महाराष्ट्र या शंभर वर्षांत अनुभवत आहे.

■



# मराठवाड्याच्या मध्ययुगीन इतिहासाचे पुनर्लेखन

■

**सरफराज अहमद**
गाजीउद्दीन रिसर्च सेंटर, २०९, शनिवार पेठ, सोलापूर-४१३००२.
भ्र. ९५०३४२९०७६

इतिहासाचे पुनर्लेखन प्रत्येक काळात सामाजातील निरनिराळ्या जात, धर्म, वर्गांसाठी आणि इतिहासलेखनातील वेगवेगळ्या विचारप्रवाहांसाठी आस्थेचा विषय राहिला आहे. त्यामागे वेगवेगळ्या भूमिका आहेत. विचारसूत्रे, मूल्यसरणी, अभिनिवेष, जात-वर्ग, धर्मीय अस्मिता आणि आग्रह यांची जंत्री आहे. प्रत्येक धर्म, वर्ग, जातींना त्यांच्या सामाजिक अहंकाराला, वर्चस्ववादी मानसिकतेला आणि सांस्कृतिक राजकारणाला इतिहासातून प्रतीके, प्रेरणा व अधिष्ठाने मिळवायची आहेत. इतिहासाच्या पुनर्लेखनाचा आग्रह करणाऱ्यांमध्ये अशापद्धतीच्या समाजसंस्कृतीच्या राजकारणातल्या प्रतिनिधींचा भरणा अत्याधिक आहे. म्हणून इतिहासाच्या पुनर्लेखनाला चर्चेतून बाद ठरवता येत नाही. कारण, पुनर्लेखनाच्या बाजूने असणारा दुसरा वर्ग इतिहासाच्या साधनांमध्ये सातत्याने होणारे बदल, त्यांची नव-नव्या शास्त्रीय व सामाजिक विचारसरणींच्या आधारे होत असलेली भाषांतरे, त्यातून जुन्या भाषांतरांचे समोर येणारे दोष अथवा मर्यादा, गत लेखनाची राजकीय पार्श्वभूमी, धार्मिक झगड्याचा आणि सांस्कृतिक राजकारणाचा त्यावर झालेला परिणाम, त्यातून त्या लिखाणात न दिसणारा प्रामाणिकपणा यामुळे पुनर्लेखनाची भूमिका घेणारा आहे. साहजिकच इतिहासाच्या पुनर्लेखनातील दुसऱ्या वर्गाची भूमिका आपल्यासाठी महत्त्वाची आहे. त्या अनुषंगाने दक्षिणेच्या आणि मराठवाड्याच्या मध्ययुगीन इतिहासाच्या पुनर्लेखनाची गरज व त्याविषयी काही महत्त्वाचे मुद्दे आपल्याला विचारात घ्यावे लागतील.

### इतिहासलेखनावर उत्तरेचा प्रभाव

मध्ययुगापासूनच दिल्ली ही भारताच्या राजकारणाचे केंद्र राहिली आहे. त्यामुळे त्याच्या परिसरातील राजकीय घटना इतिहासलेखनाच्या राष्ट्रीय परिघावरील चर्चेत महत्त्वाच्या ठरल्या आहेत. मात्र, ही चर्चा करत असताना उत्तर भारतातील मध्ययुगीन इतिहासाचा अभ्यास ज्याला राष्ट्रीय स्तरावरील इतिहास अभ्यास वगैरे म्हटले जाते, तो मर्यादित झाला आहे. उत्तर भारतातील काही प्रदेशांच्यापलीकडे तो पोहोचू शकला नाही. त्यामुळे त्याला हिंदी पट्ट्याच्या प्रादेशिक इतिहासासारखे स्वरूप आले आहे. कारण, उत्तर भारतापलीकडच्या प्रादेशिक इतिहासाची, राष्ट्रीय इतिहासावर झालेल्या त्याच्या परिणामांची चर्चा, उत्तरेतर प्रादेशिक इतिहासातील महत्त्वाचे घटक, त्यांची संस्कृती, भाषा, लोकजीवन, वेगवेगळ्या सत्तांचा झालेला उदय या बाबी उत्तरेतल्या अभ्यासकांच्या इतिहास अभ्यासाच्या परिघातून सुटल्या आहेत. भाषांच्या मर्यादांमुळे प्रादेशिक साधनांचा आधार सहसा या इतिहासकारांकडून घेतला जात नाही. त्यामुळे साहजिकच त्यांच्या लेखनाला मर्यादा आलेल्या आहेत. दुसरीकडे प्रादेशिक भाषेतील इतिहासकारांमध्ये मोठा वर्ग बहुसंख्यांक जातवर्गीय मानसिकतेने ग्रासलेला आहे. सांस्कृतिक राजकारणातल्या भूमिकांचा आपल्यावरील प्रभाव हा वर्ग नाकारू शकला नाही. सांस्कृतिक मूल्यांची होणारी

सामाजिक स्पर्धा व त्यातून परसंस्कृतींविषयी निर्माण होणारा रोष महाराष्ट्रातील इतिहासकारांच्या लिखाणात सहजगत्या दृष्टीस पडतो. दक्षिणेतील सल्तनतींचा हस्तक्षेप हा मराठवाड्यापासून सुरू होतो. त्यामुळे मराठी इतिहासलेखनात अल्लाउद्दीन खिलजी आणि देवगिरी प्रकरणावर खूप लिखाण झाले आहे. मात्र, यातील बहुतांश लिखाण धर्मवादी अंगाने करण्यात आले आहे.

अल्लाउद्दीनच्या देवगिरीवरील स्वारीची अतिरंजित कथा, दक्षिणेतून यादव साम्राज्याचे पतन त्यांच्या धर्मभ्रष्टतेमुळे कसे झाले ? दक्षिणेत प्रादेशिक शाह्यांची स्थापना ही राक्षसी आपत्ती कशी होती? हा काळ हिंदूच्या धार्मिक तेजोभंगाचा काळ कसा होता, हे महाराष्ट्रीयनांच्या मनावर बिंबवण्यातच मराठीतल्या प्रादेशिक इतिहासकारांनी धन्यता मानली. पु. ग. सहस्त्रबुध्दे यांनी केलेले विधान याबाबत प्रातिनिधिक मानता येईल, ते म्हणतात, ''तेराव्या शतकाच्या अखेरीपासून सुरू झालेली मुस्लिमांची आक्रमणे, त्यानंतर काहीकाळ चाललेली दिल्लीच्या सुलतानांची सत्ता, आणि त्यानंतर स्थापन झालेली बहामनी सत्ता ही महाराष्ट्रावर आलेली अस्मानी प्रलायपत्तीच होती. मराठ्यांची राजसत्ता तर मुस्लिमांनी नष्ट केलेलीच होती, पण त्याबरोबरच मराठ्यांचा हिंदू धर्म, त्यांच्या प्राचीन परंपरा, हा सर्व महाराष्ट्र समाज आणि या लोकांचे स्वत्त्व यांचा संपूर्ण नाश करण्याची प्रतिज्ञाच बहामनी सुलतानांनी केली होती.''[१]

पु. ग. सहस्त्रबुद्धे यांनी इतिहासातल्या परस्परविरोधी घटना, स्वभावभिन्नता असलेले राजकारण, लढाया, त्यामागील हेतू, त्याचे स्वरूप, तत्कालीन राजकारणातल्या नेत्यांची सांस्कृतिक चारित्र्य वगैरे अशा अनेक बाबींचे सरसकटीकरण करून हे निष्कर्ष नोंदवले आहेत. अशा पद्धतीचे सरसकटीकरण करत असताना त्यांनी तत्कालीन समाज, संस्कृती, उत्पादनसंबंध, श्रमिक वर्ग, बाजारपेठ संबंध, उत्पादनव्यवस्थेचे स्वरूप, निरनिराळ्या धर्मसंस्था, आध्यात्मिक प्रवाह, धार्मिक आंदोलने, सुधारणेच्या चळवळी याकडे दुर्लक्ष केले आहे. सल्तनतकालीन तवारिखकारांच्या साधनांतील सोयीचे मथळे निवडण्याच्या इलियट-डाउसनप्रणीत शास्त्राचाही त्यांनी अवलंब केला आहे. त्याकारणानेच ते असे सोयीचे निष्कर्ष काढण्याची तर्कपूरकता सिद्ध करु शकले आहेत. ते तर्कास पोहोचले असले तरी त्यांचे निष्कर्ष साधनचिकित्सेच्या परिप्रेक्ष्यात टिकू शकत नाहीत. त्यामुळे साधनांच्या आधार घेताना साधन चिकित्सेचा शास्त्रीय विवेक बाळगण्याचा प्रामाणिकपणा इतिहासाच्या अभ्यासकांमध्ये असायला हवा. सल्तनतकालीन इतिहासाच्या साधनांची चर्चा करताना म.श्री. माटे यांनी या अनुषंगाने अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांच्या लेखनातील मूल्यसरणी साधनचिकित्सेसाठी महत्त्वाची आहे. त्यातून सहस्त्रबुध्देंकडून सरसकटीकरणातून लावल्या गेलेल्या आरोपांचेही खंडन होते, ते म्हणतात, ''आता प्रश्न असा उत्पन्न होतो की, साडेतीनशे वर्षे हिंदू धर्माचा उच्छेद करण्याच्या कामात महाराष्ट्रातील सल्तनती यशस्वी झाल्या असत्या तर महाराष्ट्रभूमींवर हिंदू शिल्लक तरी कसे राहिले? हिंदू शिल्लक राहिले एवढेच नव्हे तर प्रचंड बहुसंख्येने अस्तित्वात राहिले आहेत. 'वारकरी' पंथासारखे हिंदू धर्मातील पंथ भरभराटीला आले, आपले 'वारी' सारखे आचार प्रगटपणे पाळत राहिले. मराठी भाषेत धार्मिक स्वरूपाचे प्रचंड वाङमय उत्पन्न झाले, हा चमत्कार कसा काय झाला ? या प्रश्नांचा तटस्थपणे विचार करणे आवश्यक आहे. त्यासाठी मराठी (व इंग्रज) इतिहासकारांनी विश्वसनीय समजून आधारभूत मानलेल्या मुसलमान तवारीखकारांच्या लिखाणाची फेरतपासणी केली पाहिजे. या लेखकांचे हेतू, त्यांच्या प्रेरणा यांचा शोध घेतला पाहिजे. तरच सल्तनतीच्या धोरणांची यथातथ्य कल्पना येईल. दिसते ते असे की, अतिशयोक्ती या अलंकाराचा वापर केला की, विधाने अर्थहीन होतात याचे भान तवारीखकारांनी ठेवलेले नाही. साधी सैन्यबळाची गोष्ट घेतली तरी हेच दिसते. प्रत्येक युध्दात त्यांनी दोन्ही बाजूंनी हजारोंच्या संख्येने सैन्यं उभी केली आहेत.

इतके लढवय्ये दरवेळी पाठविण्याइतकी एकूण लोकसंख्या तरी होती का? हा प्रश्न पडतो. काफरांच्या उच्छेदाची तीच कथा आहे. तबातबा आणि फेरिश्ता काहीही म्हणोत. काफरांचा उच्छेद झाला नाही हेच खरे''[२] मार्टेनी मांडलेला साधनचिकित्सेचा मुद्दा महत्त्वाचा आहे; पण त्यासोबतच प्रचलित साधनांच्या पलीकडे जाऊन आपल्याला काही मुद्द्यांची चर्चा करावी लागेल.

मराठवाड्याच्या मध्ययुगीन इतिहासाच्या अनुषंगाने जी चर्चा होते, ती फार तर सल्तनतकालीन तवारीखकारांपर्यंत मर्यादित आहे. इसामी, अमीर खुसरो, जियाउद्दीन बरनींच्या ग्रंथातील काही मथळे वगळता अन्य इतिहासकारांच्या ग्रंथाची चर्चा अद्याप महाराष्ट्रात सुरू झालेली नाही. राज्यकर्त्यांच्या आश्रयाला राहिलेल्या या विद्वानांसोबतच राजकारणाच्या परिघाबाहेरचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन जगलेल्या अनेक विद्वनांनी सल्तनतीच्या दखखनेतील हस्तक्षेपाच्या पूर्वीपासूनच्या घटनांविषयी लिखाण केलेले आहे. त्यामध्ये मुलतः हिंदू आणि मुस्लिमांतील आध्यात्मिक चळवळीतील विद्वानांचा समावेश होतो. यातील आध्यात्मिक चळवळीतील मुस्लिमांच्या म्हणजे सुफींच्या चिंतनाचा विषय, कार्यक्षेत्र याच्यावर मुस्लीम राज्यकर्त्यांचा बरा-वाईट परिणाम झालेला आहे. त्यामुळे त्यांनी राज्यकर्त्यांच्या अनेक निर्णयाची दखल त्यांच्या लिखाणातून घेतली आहे. सुफींनी निर्माण करून ठेवलेली ही इतिहासाची साधने ज्याला 'मलफुजात' म्हटले जाते. त्या ग्रंथांची माहिती घ्यायला हवी. त्यातून मुलतः देवगिरी, खुलताबाद परिसरातील सामाजिक पातळीवरील इस्लामचा प्रसार आणि मुस्लीम शासकांचा राजकारणातील हस्तक्षेप यातील सहसंबंध उलगडतील.

**खिलजीच्या आधी सुफींचे सांस्कृतिक राजकारण**

इसवी सनाच्या १० व्या शतकापासूनच दखखनेत सुफींच्या आगमनाला सुरुवात झाली होती. १० व्या शतकाच्या मध्यापासून सुफी चळवळीतील दरवेश, मुरीद आणि संत दखखनी लोकसंस्कृती, प्रादेशिक, भौगोलिक व समाजरचनेच्या अभ्यासासाठी दखखनेत कधी दरवेशाच्या रूपात तर कधी व्यापारी म्हणून येत होते. 'अहकामुल बलादुल हुक्काम' हे दक्षिण भारताच्या मध्ययुगीन इतिहासाच्या अभ्यासाचे महत्त्वाचे साधन आहे.[३] त्यामध्ये सुफींच्या दखखनेतील इस्लाम प्रसार आणि समाजसुधारणेच्या चळवळीचा इतिहास मांडलेला आहे. सुफी चळवळीचे दखखनेतील सुरुवातीच्या काळातील प्रसारक म्हणून हजरत मोमीन आरिफ बिल्लाह आणि हजरत जलालुद्दीन गंजरवा सहरवर्दी या दोघांचा उल्लेख अनेक ग्रंथांत येतो. ते खुलताबादेत बराच काळ वास्तव्याला होते. खुलताबादेत त्यांची दर्गाह आहे. त्या दर्गाहवर असणाऱ्या शिलालेखांच्या अनुषंगाने संशोधन झाल्यास सुफी इतिहासाविषयीची बरीच माहिती आपल्याला मिळू शकेल.[४] या दोन्ही सुफींच्या वास्तव्याचा इतिहास अलाउद्दीन खिलजीने केलेल्या स्वारीच्या शतकभरापुर्वीचा आहे. या सुफी साधकांच्या माध्यमातून इस्लामी मूल्यांच्या प्रसारासाठीचे सुफी आंदोलन दखखनेत उभे राहिले होते. खिलजीपूर्व सुफी चळवळीमध्ये शेकडो सुफी साधकांचा उल्लेख येतो. त्यामध्ये हजरत बुरहानुद्दीन गरीब, मंसूर शाह, ख्वाजा सय्यदशाह अहमद हुसैनी, सिद्दीकशाह कल्लेशेर शाह, ख्वाजा दाऊद चिश्ती, सैफुल मुल्क चिश्ती, हजरत हाजी रुमी बिजापुरी, हजरत पीर मुबरी, शेख सुफी सरमस, असदुल औलीया यांच्यासह अनेक सुफी संताचा समावेश होतो. हे सुफी दक्षिणेत आल्यानंतर त्यांना कोणत्याही प्रकारचे साहाय्य न करण्याचे, अन्न-पाणी उपलब्ध करून न देण्याचा आदेश तत्कालीन दखखनेतील मुस्लिमेतर राज्यकर्त्यांनी दिल्याचे सुफी साधनांमध्ये नमूद आहे; पण कालांतराने जनतेच्या प्रेमामुळे हा विरोध मावळल्याचे सुफी चळवळीचे अभ्यासक डॉ. आलिम वकील यांचे मत आहे.[५] इसवी सन १२९४ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीच्या देवगिरीवरील स्वारीवेळी सुफी चळवळीतील अनेक साधक खुलताबाद, देवगिरी परिसरात होते. त्यामध्ये चिश्ती पंरपरेतील मुंतजीबुद्दीन जरजरी जर बख्श यांचाही

समावेश आहे.[६] यातील मुंतजीबुद्दीन यांनी देवगिरीत सुफी चळवळीचे कार्य मोठ्या प्रमाणात केले. ते हजरत बाबा फरिद यांचे शिष्य होते. सुरुवातीला येथील ब्राह्मणवर्गाकडून त्यांना मोठा विरोध झाला. तरीही ते मागे हटले नाहीत.[७] त्यांनी दख्खनेतील सांस्कृतिक, आध्यात्मिक वास्तवाची माहिती घेऊन सुफी चळवळीच्या प्रसारासाठीची योजना आखली होती. त्यांच्यासह सुफी साधकांच्या मोठ्या गटाने दक्षिण भारताला शेख फरिद गंजशकर व हजरत निजामुद्दीन औलीया यांच्या आदेशाने कर्मभूमी म्हणून निवडले होते. दक्षिणेत आलेल्या या गटामध्ये ७०० व्यक्तींचा समावेश होता. त्यामध्ये काही सुफी साधक तर काही संत होते. खिलजी पूर्वकाळात दख्खनेत उभ्या राहिलेल्या सुफी आंदोलनाने इस्लामच्या सामाजिक धारणांचा समाजसेवा व आचरणतत्त्वांच्या माध्यमातून प्रसार व प्रचार केला होता. मुस्लीम राज्यकर्त्यांच्या दख्खनेतील राजकीय हस्तक्षेपाची पार्श्वभूमी यामुळे सिद्ध झाली होती; पण यामुळे सुफींनी राज्यकर्त्यांसाठी; चळवळ राबविली असा अर्थ काढता येत नाही. कारण, सुफी हे सातत्याने जनतेच्या बाजूने सत्तेच्या विरोधात लढले आहेत. त्यामुळेच निजामुद्दीन औलीया यांना मुहम्मद तुघलकाच्या कोपभजनास बळी पडावे लागले होते.[८] तर दख्खनेत हजरत बंदानवाज गेसूदराज यांनी दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर कर संकलनाच्या संबंध पध्दतीविरोधात आंदोलन उभारले. त्यांनी फेरोजशाह बहमनीच्या विरोधात सभा घेतल्या. प्रवचनातून त्याच्या सत्तेला विरोध करण्याचे आवाहन केले होते.[९] सुफींचे सांस्कृतिक राजकारण मुलतः शोषणाच्या विरोधात होते. नुसत्या आध्यात्मिक कट्टरतेपेक्षा त्यांनी मानवी जीवनातला निकोपपणा जपण्यासाठी प्रयत्न केला होता. सुफीं चळवळीचे तत्त्वज्ञान असणाऱ्या 'कश्फल महज्जुब'[१०] चा अभ्यास केल्यास त्याची माहिती मिळू शकेल. खालिक अहमद निजामी यांनी 'सैरुल औलीया'[११] तील काही वचने त्यांच्या पुस्तकात दिली आहेत. याद्वारे सुफींच्या चळवळीचे स्वरूप समजण्यास मदत होऊ शकेल. त्यातील हा मथळा महत्त्वाचा आहे.

''खूप नमाज पठण करणे आणि नामस्मरणात तल्लीन असणे, कुरआनच्या पठणात लीन होणे हे कार्य खूप कठीण नाही. प्रत्येक धैर्यवान व्यक्ती हे कार्य करू शकते. एखादी वृद्ध स्त्रीदेखील ते काम करू शकेल. तहज्जुदगुजारी (मध्यरात्रीच्या नंतरची नमाज पठण) मध्ये लीन असू शकते. मात्र ईश्वराधीन पुरुषाचे काम निराळे आहे. लाचारांची फिर्याद ऐका. वृध्द आणि असहाय्य लोकांच्या गरजा पूर्ण करा, भुकेल्यांच्या पोटासाठी अन्न द्या''[१२]

सुफी सामान्य माणसाच्या जगण्याची दखल घ्यायचे. त्यांच्या जगण्यातल्या अडचणी, दुःखाची कारणमीमांसा करून त्यांना मदत करायचे. सुफींच्या 'खानकाह' गरीब, रुग्ण, प्रवाशांसाठी आश्रयघर बनल्या होत्या. दररोज तेथे 'लंगर' (अन्नदान) चालवले जायचे. हिंदू धर्मप्रमुख आणि साधक दलितांना, अस्पृश्यांना आपल्या सान्निध्यात येण्यास मज्जाव करीत; पण सुफींच्या खानकाहमध्ये सर्वांचे स्वागत व्हायचे. दक्षिण भारतात त्या काळात अशा शेकडो खानकाह होत्या. दक्षिणेत आलेल्या सुफींचे खुलताबाद हे शहर केंद्र म्हणून उदयास आले होते. 'हळूहळू या भागात मुस्लिमांची वसति झाली. तसा हा प्रदेश हिंदू, जैन आणि बौध्द धर्माच्या त्रिवेणी संगमामुळे फुललेला होताच. वेरुळच्या लेण्यांच्या वरच्या बाजूला जर्जरी बक्ष यांची खानकाह आणि एक छोटीशी मशीद होती. येथून आजूबाजूच्या मराठवाड्याच्या परिसरात इस्लामचा प्रसार त्यांना करता आला. इथे एका विशिष्ट गोष्टीचा उल्लेख करणे गरजेचे आहे, देवगिरीच्या हिंदू राजाची मुलगी सोनाबाईने इस्लामची दीक्षा घेतली. त्यांचा मकबरा याच परिसरात आहे.''[१३]

यावरून हे सिद्ध होते की, अल्लाउद्दीनची राजकीय लूट सुरू होण्यापूर्वीच इस्लामचा प्रसार देवगिरी परिसरात झाला होता. दक्षिणेच्या सुफी चळवळीचे केंद्र म्हणून खुलताबाद उदयास आले होते. ही अलाउद्दीनने लादलेली धर्मसंस्कृती नव्हती. ती सुफींनी घडवून

आणलेली सांस्कृतिक क्रांती होती. ज्यावेळी दख्खनेच्या इतिहासातील सुफींच्या कार्यकर्तृत्वाचा अभ्यास सुरू होईल, त्यावेळी दख्खनेच्या इतिहास आकलनाच्या दिशा बदलतील. दख्खनेत पसरलेल्या सुफींनी एकमेकांशी संपर्क करण्याचे, संदेश पाठवण्याचे, नव्या योजना आखण्याचे केंद्र म्हणून खुल्ताबादशी सातत्याने संपर्क ठेवला होता. मोहम्मद तुघलकापश्चात सल्तनतीच्या सत्तेला दक्षिणेत सुरुंग लागल्यानंतर निर्माण झालेल्या बहामनी सत्तेच्या आश्रयाला राहिलेल्या अनेक सुफींच्या ग्रंथातूनदेखील खुलताबाद, देवगिरी परिसराच्या इतिहासाची माहिती उपलब्ध होऊ शकेल. दख्खनेच्या सल्तनतोत्तर इतिहासाची सुरुवात ही देवगिरीपासून होते. आणि सुफी चळवळीची सुरुवातदेखील देवगिरी परिसरातूनच झाली आहे. त्यामुळे संपूर्ण दक्षिणेतील सुफींच्या साहित्याचा अभ्यास मराठवाड्याच्या मध्ययुगीन इतिहासासाठी साहाय्यभूत ठरू शकेल.

### सुफींच्या कविता आणि ग्रंथ

ज्याप्रमाणे वारकरी संतांच्या अभंगांना दख्खनेच्या सांस्कृतिक इतिहासाच्या अभ्यासाचे साधन मानले जाते. त्याप्रमाणे संत ज्ञानेश्वरांच्या शे-दीडशे वर्षांआधीपासून इथे इस्लामचे सांस्कृतिक राजकारण जन्माला घालणाऱ्या, सामाजिक, सांस्कृतिक शोषणाच्या विरोधात संघर्ष करणाऱ्या सुफींच्या साहित्याचादेखील इतिहासाचे साधन म्हणून अभ्यास व्हायला हवा. कारण, दक्षिणेत आलेला प्रत्येक सुफी हा विद्वान, साहित्यिक, कवी, धर्मशास्त्र व तत्कालीन आणि भूतकालीन सामाजिक घटनांचा अभ्यासक होता. त्यामुळे त्यांच्या लिखाणातून तत्कालीन समाज, संस्कृती, राजकारण, उत्पादनव्यवस्था, त्यातील शोषकवर्ग, सरंजामी सत्ताधीशांची भूमिका यांची माहिती मिळते. सुफींनी निर्माण करून ठेवलेली इतिहासाची साधने, 'मलफुजात' सामान्य अभ्यासकांच्या अभ्यासक्षेत्रात सामाविष्ट व्हायला हवीत. उत्तर भारतीय इतिहासकारांनी उत्तरेच्या सुफींनी निर्माण करून ठेवलेली सुफी इतिहासाची साधने आपल्या अभ्यासकक्षेत आणली आहेत. त्यांनी तसा अभ्यास स्वातंत्र्याच्या पूर्वीपासूनच सुरू केला आहे. मोहम्मद हबीब यांचे या विषयावरील काही लेख महत्त्वाचे आहेत.[१४] दक्षिण भारतात मात्र या दृष्टीने विचार करायला अद्याप प्रारंभ व्हायचा आहे. रिचर्ड इटन[१५] आणि मौरौ व्हॅदिनोकी, स्कॉट कुगल, सुलैमान सिद्दीकी[१६] सारख्या काही इंग्रजी विद्वानांनी या दिशेने सकारात्मक पाऊल टाकले आहे.

दक्षिणेत आलेल्या सुफींपैकी ज्यांनी साहित्यनिर्मिती केली त्यामध्ये मुंतजीबुद्दीन जरजरीजर बक्ष यांनी लिहिलेले काही ग्रंथ आणि उतारे उपलब्ध आहेत. त्यापैकी 'रिसाला जरजरीजरबक्ष' हा विख्यात ग्रंथ आहे. त्यांच्यानंतर हजरत बंदानवाज गेसूदराज यांचे वडील राजू कत्ताल यांचे लिखाण महत्त्वाचे आहे. खुलताबादेत मलिक अंबरच्या मकबऱ्यापासून जवळच त्यांची दर्गाह आहे. राजू कत्ताल यांच्या निधनानंतर कुतूबशाही राज्यकर्त्यांनी त्यांची दर्गाह बांधली होती.[१७] राजू कत्ताल यांनी अनेक कविता लिहिल्या आहेत. त्यांनी कुरआनचे श्लोक आपल्या काव्यातून मांडले आहेत. त्यांच्या कविता 'दिवान ए शाह राजू कत्ताल' या दिवान मधून संकलित केल्या आहेत.[१८] याशिवाय त्यांनी 'तोहफतुन्निसाहे' हा ग्रंथ लिहिला होता. वेगवेगळ्या ३५ विषयांवर या ग्रंथात लिखाण केलेले आहे.[१९] मुंतजीबुद्दीन व राजू कत्ताल यांच्या लिखाणात मूर्तिपूजा, वेद, हिंदू धर्म, कुरआन, एकेश्वरवाद, परलौकिक जीवन, राज्यकर्त्यांशी संबंधित काही घटनांविषयी मते मांडलेली आहेत. त्याशिवाय सुफी संत शेख रुक्नोद्दीन काशानी यांनी 'रिसाला ए गरीब', 'तफ्सीर ए रमुज', 'अजकारुल मजकूर', 'रमूज ए वाहिलीन', 'नफायसुल अन्फास', 'शमाईल ए अतकीया' हे ग्रंथ लिहीले आहेत. त्यापैकी काही ग्रंथ खिलजीच्या देवगिरी स्वारीच्या दरम्यान आणि काही नंतर लिहिलेले आहेत. रुक्नोद्दीन काशानी यांच्यासमवेतच त्यांचे बंधू ख्वाजा मुजद्दीद काशानी यांनीदेखील प्रचंड साहित्यनिर्मिती केली आहे. त्यांच्या साहित्यात 'गरायब उल करामत', 'बकयात उल

गरायब', 'ऐनुल हयात' हे महत्त्वाचे ग्रंथ आहेत. त्यानंतर हजरत मीर हसन वगैरेंचे ग्रंथदेखील मराठवाड्याच्या सांस्कृतिक जीवनाची माहिती घेण्यासाठी साहाय्यभूत ठरतील. हजरत बंदानवाज गेसूदराज हे दख्खनेतील प्रमुख सुफी संतांपैकी एक आहेत. ते वयाच्या ८० व्या वर्षी दख्खनेत आले. बहामनी राजवटीच्या आश्रयाला राहिल्याने त्यांचा मराठवाड्याशी जवळचा संबंध होता. त्यांच्या वडिलांमुळे ते काही काळ खुलताबादेत वास्तव्याला होते. गेसूदराज यांनी १०० हून अधिक ग्रंथ लिहिल्याचा दावा केला जातो. त्यांचे लिखाण मुलतः फारसी भाषेत आहे. दक्षिणेत आल्यानंतर त्यांनी अखेरच्या काळात काही ग्रंथ दख्खनी भाषेत लिहिले आहेत. त्यांचा 'मेहराजुल आशिकीन'[२०] हा ग्रंथ दख्खनीतील पहिला प्रकाशित ग्रंथ मानला जातो. इथून दख्खनी भाषेच्या उदय आणि विकासाला सुरुवात झाली. आणि काही शतकांतच दख्खनी दक्षिण भारताच्या संस्कृतीचा एक अविभाज्य अंग बनली.

**सुफींच्या समन्वयवादी सांस्कृतिक राजकारणातून जन्मलेल्या दखनीचा मराठवाड्यात उत्कर्ष**

दक्षिणेच्या सांस्कृतिक व सामाजिक इतिहासात दखनी भाषेचे वेगळे स्थान आहे. दखनी भाषा कशी जन्मली, त्याचे स्वरूप वगैरेंविषयी अनेक अभ्यासकांनी निरनिराळी मते मांडली आहेत. त्यापैकी डॉ. श्रीराम शर्मा यांनी 'दखनी हिंदी का उद्भव और विकास' हा ग्रंथ लिहीला आहे. या ग्रंथात त्यांनी दखनीच्या जन्माची पार्श्वभूमी सांगितलेली आहे. सदर ग्रंथाच्या उर्दू आवृत्तीची प्रस्तावना डॉ. मसूद हुसैन खान यांनी लिहिली आहे. त्यामध्ये ते लिहितात, ''जुन्या उर्दुचा जन्म हजरत अमीर खुसरो यांची दिल्ली व त्याच्या आसपास झाला आहे. उर्दू जन्माच्या एका शतकापश्चात मोहम्मद तुघलकाच्याद्वारे १४ व्या शतकाच्या सुरुवातीला दखनेत पोहोचली. दखनेत त्याचे पहिले केंद्र दौलताबाद होते. जो मराठी मुलुखात येतो. १४४७ मध्ये बहामनी सल्तनतीच्या स्थापनेनंतर जवळपास ३०० वर्षे ही भाषा हिंदी या नावाने उत्कर्षाला पोहोचली. १५ व्या शतकात गुलबर्गा आणि बीदर दख्खनीचे केंद्र होते. जे कानडी प्रदेशात येतात. १७ व्या शतकाच्या अखेरपर्यंत याचे नवे केंद्र तेलुगू प्रदेशात स्थापन झाले होते.''[२१] दखनी काव्याचे अभ्यासक परमानंद पांचाल उर्दूऐवजी खडीबोलीला दख्खनीचे जन्मस्त्रोत मानतात.[२२] दख्खनीच्या जन्माच्या वास्तवकथेची माहिती इथे शक्य नाही. त्याविषयीचे काही प्रातिनिधिक तर्क मांडून विस्तारभयास्तव ही चर्चा इथेच थाबवावी लागेल; पण या अनुषंगाने मराठवाडा आणि दख्खनीच्या जन्माचा एक महत्त्वाचा संदर्भ जाणून घ्यायला हवा. परमानंद पांचाल दख्खनीच्या उदयात मोहम्मद तुघलकाच्या योगदानाला अधोरेखित करतात. त्याविषयी पांचाल लिहितात, ''राजनैतिक आणि भौगोलिक दृष्टीने मुहम्मद तुघलकाने दक्षिणेत आपली राजधानी बनवण्याचा निर्णय घेतला. इसवी सन १३२७ मध्ये दौलताबादला राजधानी बनवण्यात आली. इसवी १३२७ मध्येच त्याने दिल्लीच्या नागरिकांना, पदाधिकाऱ्यांना, सैनिक, विद्वान आणि कलाकारांना दिल्ली सोडून दौलताबादला जाण्याचे आणि तेथे राहण्यासाठी निवासस्थाने बनवण्याचा आदेश दिला. इतिहासकार आणि राज्यशास्त्राच्या तज्ज्ञांमध्ये या विषयावर मतभेद असू शकतील की त्याचे हे प्रयत्न कितपत सफल ठरले. मात्र, भाषेच्या दृष्टीने त्याची हीच कृती दख्खनीच्या दृष्टीने वरदान ठरली.''[२३] हजरत बंदानवाज गेसूदराज यांनी दख्खनीत प्रथम ग्रंथनिर्मिती केली तरी लोकभाषा म्हणून तिचा विकास झाला, तो मुहम्मद तुघलकाच्या काळात. त्याने दक्षिणेत राजधानी बनवण्याच्या महत्त्वाकांक्षेने सोबत आणलेल्या हजारो लोकांच्या व्यवहारातून ही भाषा समाजजीवनात रुजली.

दख्खनीच्या विकासाला मुहम्मद तुघलकाच्या राजकीय कारवायांनी हातभार लावला असला तरी ही प्रक्रिया नियाजोनबद्धपणे आखलेल्या योजनेचा भाग नव्हती. ती त्या काळातल्या सामाजिक वास्तवाचा स्वीकार करणारी अपरिहार्यता होती. कारण दक्षिणेतील लोकांना फारसी भाषेचा गंध नव्हता. त्यामुळे सुफींनी संवादाचे माध्यम म्हणून वापरलेल्या दख्खनीचा मुहम्मद

तुघलक व त्याच्या अधिकाऱ्यांना स्वीकार करावा लागला. अन्यथा मुहम्मद तुघलक हा उत्तरेवरच्या सामाजिक व सांस्कृतिक निष्ठांविषयी अतिशय कर्मठ होता. त्याच्या उत्तरेप्रतिच्या कर्मठतेविषयी रिचर्ड इटन यांनी माहिती दिली आहे. ते म्हणतात, ''चौदाव्या शतकाच्या सुरुवातीला दखनेचा प्रदेश थेट दिल्ली सल्तनतीशी जोडला गेला. तोपर्यंत दिल्लीचे शासक भारतीयत्वाच्या रंगात असे रंगले होते की, ते स्वतःला इस्लाम आणि मुसलमान नव्हे तर उत्तर भारतीय संस्कृतीच्या संरक्षकाच्या रूपात पाहत होते. ही प्रवृत्ती मुहम्मद बिन तुघलकमध्ये पाहता येईल, ज्याने दक्षिणेचे पाणी पिण्यासदेखील नकार दिला होता. त्याऐवजी तो गंगा नदीचे पाणी खांद्यावर वाहून दौलताबादपर्यंत मागवत होता.''[२४] हा उत्तर भारतीय समाजसंस्कृती व दखनी समाजसंस्कृतीमधला संघर्ष लक्षात घेतल्याशिवाय मध्ययुगीन मराठवाड्याच्या इतिहासाला वास्तवभानाची जोड देता येणार नाही. सुफींनी सामान्य माणसाशी संवाद साधण्यासाठी दरबारी भाषा असणाऱ्या फारसीऐवजी समाजजीवनातल्या शब्दांचा स्वीकार करुन दखनी भाषेला जन्मास घातले. सुफींच्या या समन्वयशील सांस्कृतिक राजकारणाचा मराठवाडा आणि आजही दख्खनेत बोलली जाणारी दख्खनी साक्षीदार आहे. या मध्ययुगीन दखनी भाषेत लिहिल्या गेलेल्या काव्याचा, सुफी 'मलफुजात' आणि कुतूबशाही, आदिलशाही, बहामनी सुलतानांच्या काव्याचा वापर इतिहासाची साधने म्हणून व्हायला हवा. त्यातून मध्ययुगीन मराठवाड्याच्या सांस्कृतिक, राजकीय व सामाजिक स्थित्यंतराच्या इतिहास पुनर्लेखनाला गती देता येईल.

## सुफींनी संस्कृती आणि मुस्लीम सत्ता लादली?

अल्लाउद्दीनने केलेली स्वारी ही लष्करी इस्लामचा क्रूर चेहरा होता. त्यामुळे हिंदू संस्कृतीवर आघात झाला. आणि या आघाताची पूर्वतयारी सुफींच्या सांस्कृतिक राजकारणाने केली होती, असा आरोप अनेक मराठी इतिहासकारांकडून केला जातो. त्यापैकी पु.ग. सहस्त्रबुध्दे म्हणतात, ''१२९६ मध्ये अल्लाउद्दीनने देवगिरीचा पाडाव केला व रामदेवाला दिल्लीचा मांडलिक करून टाकला. या आधी पन्नास वर्षे सुफी पंथाचे अनेक अवलिये दक्षिणेत इस्लामचा प्रसार करून हिंदू सत्ता पोखरून काढण्याचा उद्योग करीत होते, पण त्याची दखल कोणी घेतली नव्हती. हेमाद्रीसारखे पंडित, राजकारणी, मुत्सद्दी हे देवगिरीची इंद्राच्या अमरावतीशी तुलना करण्यात व व्रतवैकल्यांच्या याद्या करण्यात गुंतलेले होते. संत-महंतांना तर याचे कसलेच सोयरसुतक नव्हते. त्यांना फक्त मोक्षच दिसत होता व संसाराची असारता जाणवत होती. सत्तारूढ राजांनाही वर सांगितल्याप्रमाणे कसलीच दृष्टी नव्हती; पण त्यांच्या ठायी ती कुवतच नव्हती आणि दक्षिणेकडच्या इतर सत्ताही अशाच मूढ, अंध व दुबळ्या होत्या''[२५]

सहस्त्रबुद्धे यांनी सुफींना सल्तनतीच्या परचक्राची पार्श्वभूमी सिद्ध करून हिंदू संस्कृतीला पोखरून काढणारे ठरवताना काही महत्त्वाच्या मुद्यांकडे लक्ष दिलेले नाही. त्यातील दुर्लक्षिलेली पहिली बाब अशी की, सुफींचे सांस्कृतिक राजकारण हे मुलतः त्या लोकांमध्ये सुरू होते, ज्यांचा सत्तेशी कर चुकवण्यापलीकडे संबंध नव्हता. सुफींनी हिंदू दरबारातल्या राजकारणात कधी हस्तक्षेप केला नाही. दुसरी बाब म्हणजे, जे सुफी दख्खनेत आले होते. ते निजामुद्दीन औलीया यांच्या शिष्यपरंपरेतील होते किंवा त्यांचे समर्थक होते. आणि निजामुद्दीन औलीया यांनी राजकारणाशी संबंधित व्यक्तींना कधीच शिष्यत्व दिले नव्हते. सातत्याने निजामुद्दीन औलीया सत्तेच्या विरोधात भूमिका घेत होते. त्यामुळे मोहम्मद तुघलकाने त्यांना दिल्ली सोडून जाण्याचा आदेश दिला होता; पण त्या आदेशाची अंमलबजावणी होण्यापूर्वीच मुहम्मद तुघलकाचे निधन झाले आणि ही आपत्ती टळली.२६ आणि दक्षिणेत आलेल्या सुफींनीही जनतेच्या बाजूने दरबारी निर्णयांचा विरोध केला होता. गेसूदराज यांची तशी वचने व काव्य आज उपलब्ध आहे. सोबतच सहस्त्रबुध्दे यांनी मांडलेला हिंदू धर्मीय राज्यकर्त्यांनी सुफींच्या सांस्कृतिक

राजकारणाकडे दुर्लक्ष केले हा मुद्दा चुकीचा आहे, कारण सुफींच्या विरोधात अनेक निर्णय मुस्लिमेतर राज्यकर्त्यांनी त्याकाळात घेतले होते. याचे प्रातिनिधिक उदाहरण आपण मागे पाहिलेच आहे. त्यामुळे त्याची पुनरुक्ती इथे योग्य नाही. तिसरा आणि महत्त्वाचा मुद्दा असा की, इसवी सन १२५८ मध्ये हुलेगु खान (कहान) या चंगेज खान (चँग इज कहान) च्या वारसाने बगदाद लुटल्यानंतर अब्बासिद खलिफाला फाशी देऊन खिलाफत संपवली होती. त्यानंतर साम्राज्यवादी मुस्लीम राज्यकर्त्या घराण्यांनी साम्राज्याच्या विस्तारासाठी नवा प्रदेश शोधायला सुरुवात केली होती. आणि भारतातल्या मुस्लिमांच्या सल्तनतीला सातत्याने या हुलेगु खान प्रणीत मंगोल आक्रमणांची भीती होती.२७ त्यामुळेच मुहम्मद तुघलकाने सत्तेचे केंद्रस्थान असणारी राजधानी भौगोलिकदृष्ट्या केंद्रस्थानी असणाऱ्या दौलताबादला आणली होती. मुहम्मद तुघलकाचा राजधानी स्थलांतरामागचा हेतू सत्तेच्या राजकारणाचा होता. धर्म आणि संस्कृतीच्या राजकारणात मुहम्मद तुघलकाने दौलताबाद प्रकरणात कोणतीही महत्त्वाची भूमिका घेतली नव्हती.

मुहम्मद तुघलकापूर्वीच्या घटनांचीदेखील समीक्षा केली तर धर्म संस्कृतीचे राजकारण व सत्तेचे राजकारण यातला फरक स्पष्ट होतो. तुघलकांपूर्वी दक्षिणेत आलेल्या अलाउद्दीनची देवगिरीवरील स्वारी ही मुळात साम्राज्यविस्तारासाठी नव्हती. ज्यावेळी तो देवगिरीवर चालून आला होता, त्यावेळी तो दिल्लीचा सुलतान नव्हता. दिल्लीचा सुलतान असणाऱ्या चुलत्याला म्हणजे जलालुद्दीन खिलजीला त्याने या स्वारीची कल्पनाही दिली नव्हती. आणि या स्वारीनंतर त्याने देवगिरीची यादव सत्ता खालसा केली नव्हती.[२८] ती त्याच्या मृत्यूच्या वर्षापर्यंत दक्षिणेत कायम होती. (सन १३१६) आणि दक्षिणेत आलेले बहुतांश सुफी हे शिया धर्मीय होते. ज्या तुघलकाच्या काळात दौलताबादच्या राजधानी स्थापनेद्वारे केंद्रीय मुस्लीम सत्तेचा थेट संबंध दखनेशी आला ती तुघलकसत्ता ही सुन्नीधर्मीय होती. हे द्वंद्व समजून न घेता सुफींना सुन्नी साम्राज्यवादाचे समर्थक कसे ठरवता येईल?[२९] हे सुफी आणि दक्षिणेत तुघलकानंतर निर्माण झालेल्या सत्ता या अरबी इस्लामपेक्षा इराणी इस्लामी मूल्यांवर निष्ठा ठेवत होत्या.[३०] आणि उत्तरेतील सल्तनती व त्यानंतर स्थापन झालेल्या सत्ता ऑटोमन खिलाफतींचे समर्थन किंवा स्वतंत्र सुन्नी राजवटीचे प्रतिनिधित्व करत होत्या. इथे पुन्हा रिचर्ड इटन यांचे सुफींची प्रोदशिक किंवा भारतीयीकरण झालेल्या राजवटीच्या स्थापनेतील रुचीविषयीचे मत लक्षात घेतले तर तत्कालीन सुफींच्या धार्मिक विचारांचाही उलगडा होईल. रिचर्ड इटन म्हणतात, ''चिश्ती शेखांनी साम्राज्याच्या प्रांतीय शासकांना आणि भारताच्या दूरवरच्या कोपऱ्यात भावी शासकांना साथ दिली. तेथे भारतीय मुस्लीम राजवटीच्या अधीन नव्या शासनाचे देशीकरण आणि वैधीकरण त्यांना करता आले.''[३१] शासनाचे देशीकरण व वैधीकरण हे दोन मुद्दे या विश्लेषणात महत्त्वाचे आहेत. शासनाचे स्वरूप परक्या सांस्कृतिक, सामाजिक, भाषिक अधिष्ठानावर उभे असू नये. तर प्रादेशिक भाषा, प्रादेशिक संस्कृती, लोकव्यवहार यांना शासनात महत्त्वाचे स्थान असावे. त्यातून या शासनाशी मुस्लिमेतर भारतीयांना जोडता येईल हा राजवटींच्या देशीकरणामागचा हेतू होता. वैधीकरणाचा दुसरा मुद्दा सत्तेला खलिफा व त्या समकक्ष व्यक्तीकडून मान्यता मिळवण्याचा तर खलिफाला पर्याय म्हणून दक्षिणेतील मुस्लीम प्रादेशिक सत्ता इराणच्या शाहला नजराणे देऊन त्याच्याकडून खिलअती, पदव्या आणि मान्यता घेत होत्या. इराणशी असलेले दख्खनेतील शिया व काही प्रमाणात सुन्नी सुफींचे सहसंबंध त्यांच्या सांस्कृतिक राजकारणातल्या भूमिकांना अधोरेखित करतात. सुफींनी केलेल्या या आशियायी राजकारणाची प्रवृत्ती ही मूळ भारतीय होती.

**मुस्लीम सुलतान आणि हिंदू सुरत्राण**

एकीकडे सुफी मुस्लीम सत्तांच्या केंद्रीय अथवा उत्तर भारतीय स्वरूपाच्या विरोधात प्रादेशिक राजकारण उभे करत होते तर दुसरीकडे प्रादेशिक हिंदू राजांना

आंतरराष्ट्रीय राजकारणातल्या पदव्यांनी भुरळ घातली होती. दिल्लीच्या सत्तेचे प्रभुत्व नाकारल्यानंतर आपणदेखील मुस्लीम सुलतानांप्रमाणेच 'हिंदू सुलतान' होऊ शकतो, हे दाखविण्यासाठी काही हिंदू राजांनी 'सुलतान' प्रमाणे 'सुरत्राण' हा शब्द आपल्या नावापुढे लावला होता. सन १३६७ मध्ये कपय नायक याने प्रथम असा प्रयोग केला. स्वतःला 'आंध्र सुरत्राण' म्हणून घोषित केले.[३२] हा प्रादेशिक विरुद्ध उत्तर भारतीय वादच तुघलक सत्तेचे आधिपत्य नाकारून दक्षिणेत बहामनी सत्तेच्या स्थापनेसाठी महत्त्वाचा ठरला. तेलुगू सरदारांनी एकत्र येऊन बहामनी सत्तेची स्थापना केली.[३३] आणि यासाठी आधीच सुफींच्या सत्तेच्या देशीकरणाच्या आग्रहाचा पाठिंबा होताच. त्यामुळेच सन १३४७ मध्ये बहमनी क्रांतीवेळी दक्षिणेच्या प्रमुख चिश्ती शेखच्या स्वरूपात जैन-अल-दिन यांनी एका विद्रोही राज्याला इस्लामी राज्य बनविण्यात महत्त्वाची भूमिका अदा केली. गुलबर्ग्यात बहामनीची नवी राजधानी स्थापन झाल्यानंतर हसन बहमनशाहने देखील आपल्या चिश्ती समर्थकांच्याप्रति कृतज्ञता म्हणून राज्याभिषेकावेळी खुलताबादेतील बुरहान-अल-दिन यांच्या दर्गाहवर पाच मण सोने, दहा मण चांदीचा नजराणा पाठविला होता.[३४] या घटनेतून दक्षिणेत बहामनी राजवटीच्या स्थापनेत मराठवाड्यातील खुलताबादेच्या सुफी केंद्राची भूमिका किती महत्त्वाची होती, हे समजू शकेल. उत्तरेविरोधातील दख्खनी बहामनी परिवर्तनाच्या कारणांचा शोध घेण्यासाठी तत्कालीन खुलताबादेतील सुफींच्या 'मलफुजात'चा शोध महत्त्वाचा ठरू शकेल.

## शिया, इराणी, अफाकी वाद आणि महमूद गवानची हत्या

ज्या परिस्थितीचा आणि कारणांचा आधार घेऊन सन १३४७ मध्ये बहामनी सत्ता स्थापन झाली. त्याच कारणांचा आधार व परिस्थिती उद्भवल्याने बहमनीचा नाशही ओढवला. बहामनी राजवटीमध्ये शिया, सुन्नी, इराणी आफाकी, दखनी सरदारांचे निरनिराळे गट होते. त्यापैकी दखनी सरदारांच्या गटाने महमूद गवान जो आफाकी सहकाऱ्यांच्या मदतीने उत्कर्षाला पोहोचला होता, त्याच्याविरोधात कटकारस्थान रचले. आणि त्याची बादशाहकरवी ५ एप्रिल १६८१ रोजी हत्या घडवून आणली. त्यानंतर महमूद गवानच्या हत्येचे पडसाद त्याच्या समर्थक शिया सरदारांमध्ये उमटले.[३५] दरबारात अराजक माजले. तरीही १५३८ पर्यंत बहमनी सल्तनत कशीबशी कायम राहिली. पण १४९० च्या दशकापासून या सत्तेची शकले पडून पुढे दखनेत सन १५१२ पर्यंत सात शाह्या निर्माण झाल्या. त्यापैकी बहुतांश शिया होत्या.

युसूफ आदिलशाहनेच सर्वप्रथम या हत्येची दखल घेऊन आपला रोष व्यक्त केला. संधी मिळताच त्याने १४९० मध्ये बिजापुरात आदिलशाही सल्तनतीची स्थापना केली. शिया सरदारांवरील बहमनी दरबारातील अन्यायाविरोधात त्याने शिया सत्तेची स्थापना करून आवाज उठवला. आदिलशाहीच्या स्थापनेपर्यंत भारतामध्ये शिया धर्मानुसार कोणतीही राजवट चालत नव्हती; पण युसूफ आदिलशाहने शियाधर्मीय सरदारांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी बिजापूरच्या जामा मसजिदीतून शिया धर्माची अधिकृत घोषणा करून बहामनी सत्तेला सुरुंग लावला.[३६] युसूफ आदिलशाहची हीच चिथावणी अहमदनगरच्या निजामशाहीच्या स्थापनेस कारणीभूत ठरली. मुळात बहामनी राजवट बाह्यस्वरूपाने शिया- सुन्नी मिश्र स्वरूपाची असली तरी शिया वर्चस्वाखाली होती. खुद्द हसन बहमन हा बहामन या शिया शहरातून भारतात आला होता. राजवटीच्या स्थापनेनंतर त्या शिया शहराची ओळख त्याने आपल्या राजवटीच्या नावात 'बहामनी' या शब्दाने जपली होती. त्यामुळे आफाकी, इराणी, शिया सरदार या राजवटीचा डोलारा घेऊन उभे होते; पण महमूद गवानच्या हत्येने शिया अस्मिता दुखावली गेली. त्यातून पुन्हा सुफींच्या सांस्कृतिक राजकारणाची पुनरावृत्ती व्हायला लागली. पण यावेळी रोष नुसता उत्तरेवर नव्हता तर सुन्नी विरोधात शिया असे स्वरूप त्याला प्राप्त झाले होते. या वादातून स्थापन झालेल्या अहमदनगरच्या

निजामशाहीने मराठवाड्याच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय जीवनावर मोठा प्रभाव टाकला.

**जातउतरंडीत जन्मलेल्या मलिक अंबरचा दक्षिणी अस्मितेचा संघर्ष**

मध्ययुगीन इतिहासात महमूद गवान, युसूफ आदिलशाह यांच्यानंतर सर्वात प्रभावशाली सरदार म्हणून मलिक अंबरचा उल्लेख येतो. मराठवाडा ही मलिक अंबरची कर्मभूमी होती. गुलाम म्हणून भारतात आलेल्या मलिक अंबरला इथे स्वातंत्र्य मिळाले. हा मलिक अंबर मूळचा कोणत्या प्रांतातला हे काही स्पष्ट होत नाही. त्याला येमेन आणि भारतात निवास केलेल्या पीटर वान डेन ब्रोके या प्रवाशाने 'ॲबिसिनियातील काळा काफीर' म्हटले आहे. तर रिचर्ड इटन यांनी त्याची दखनेतील 'शंभू' आणि 'चापू' ही मुस्लिमेतर नावे नोंदवून तो कोंबाटा प्रांतातील असावा असा तर्क काढला आहे.[३७] कोंबाटा येथेही जातीच्या उतरंडीची समाजरचना होती. त्यावरून मलिक अंबरने मराठवाड्यात जातीच्या उतरंडी व समाजरचनेचा आधार घेऊन केलेल्या राजकारणाला देखील पुष्टी मिळते. याच राजकारणाचा आधार घेऊन मलिक अंबरने जहांगीरच्या उत्तरी फौजेला दक्षिणी सैन्याच्या गनिमतंत्राचा वापर करून अस्मान दाखवले. उत्तरेच्या राजकारणाचा दक्षिणेत मुहम्मद तुघलकानंतर झालेला हा दुसरा पराभव होता. आणि तिसरा पराभव याच मलिक अंबरच्या युध्दतंत्राचा आधार घेऊन मराठा सैन्याने घडवून आणला होता. दखखनेच्या अस्मितेचा मलिक अंबर हा हसन बहमनी नंतरचा दुसरा प्रतिनिधी ठरला. मलिक अंबरच्या काळात हजारोंच्या संख्येने अफ्रिकन हबशी दखखनेत होते. या अफ्रिकन हबशी आणि मराठ्यांचे एकमुखी नेतृत्व त्या काळात मलिक अंबरने केले.[३८] हिंदू निम्नवर्णीय मराठे आणि गुलामी लादलेले हबशी हे ज्या स्वातंत्र्यासाठी लढत होते, त्याची आखणी मलिक अंबरने केलेली होती. मराठ्यांनी परधर्मीय अभिजनांच्या विरोधात लढलेला हा पहिला लढा होता आणि विशेष म्हणजे, त्याचे नेतृत्वही परधर्मीय गुलामांच्या नेत्याकडे होते. त्यांनी ज्या गुलामांच्या नेत्याच्या नेतृत्वाखाली हा लढा लढला. त्या नेत्याने ही आणलेली व्यवस्था सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून निर्मिलेली होती. त्यामुळेच मलिक अंबर कित्येक वर्षांनी स्थापन झालेल्या मराठ्यांच्या स्वराज्यालादेखील पार्श्वभूमी देऊन गेला, असे शरद पाटील सांगतात. त्यासाठी मलिक अंबरच्या सामान्य शेतकरीकेंद्री धारा पद्धतीचा ते संदर्भ देतात.[३९]

**खडकीची स्थापना व जलव्यवस्थापनातील क्रांती**

दक्षिणी अस्मितेचा नेता आणि अहमदनगरच्या निजामशाहीचा तारणहार ठरलेल्या मलिक अंबरने खडकी म्हणजे आजच्या औरंगाबाद नगराची इसवी सन १६१० मध्ये स्थापना केली. त्याची नगररचना तत्कालीन जगातल्या नामांकित शहरांसारखी होती. वापरलेले तंत्रज्ञान तत्कालीन जगाच्या खूप पुढचे होते. जोनाथन गिल हॅरिस यांनी खडकीच्या पाणीपुरवठा योजनेच्या दिलेल्या माहितीवरून त्याची कल्पना येईल. ''१६१२ मध्ये जेव्हा खडकीच्या उभारणीचा आरंभिक टप्पा पूर्ण झाला त्यावेळी नहर ही जगातील सर्वांत आधुनिक, सुसज्ज अशा जल-आपूर्ती व्यवस्थांपैकी एक होती. त्यात कालवे, पाट, प्रपात, भूमिगत कालवे, कृत्रिम तलाव यांचे जाळे होते. खडकीमधून खाम हा एक लहानसा ओढा कायम वाहत असे. मलिक अंबरला खूप मोठे शहर अपेक्षित होते. एवढेच नव्हे तर तिथे लष्कराचाही खूप मोठा तळ असणार होता. या सगळ्यासाठी ओढ्याचे पाणी पुरणे शक्य नव्हते. त्यामुळे त्याला खडकीच्या पाणीपुरवठ्यासाठी इतर काही मार्ग शोधणे आवश्यकच होते. आणि तेही असे की, जे कोणत्याही बाहेरच्या हल्ल्याला बळी पडू शकणार नाहीत. त्याने जेव्हा अहमदनगरच्या इतर सरदारांपाशी नहरच्या योजनेचा विषय काढला, तेव्हा वजीर मुल्ला मोहम्मदसहित त्यांच्यापैकी काहींनी त्याची टर उडवली. मुल्ला मोहम्मदला तर मलिक अबंरची योजना 'मूर्खपणा'चीच वाटली. मलिक अंबर 'कल्पनेचे घोडे दौडवतो आहे' असेच त्याला वाटले. वजिराच्या म्हणण्यात तथ्य होते. खडकीभोवतालचा डोंगराळ प्रदेश

पाहता तिथे उंच खांब उभे करून त्यावर पाण्याचे पाट वाहते ठेवणे कठीण होते. त्याऐवजी गुरुत्वाकर्षण आणि पाण्याचा दाब यांचा उपयोग करीत वेगवेगळी तंत्रे वापरून उंचावरून तसेच जमिनीखाली बोगदे खणून त्यातून पाण्याचा प्रवाह खेळवणे आवश्यक होते. नाना शंका-कूशंकांना दाद न देता मलिक अंबरची योजना यशस्वी झाली. खडकीच्या सात लाख लोकसंख्येच्या गरजा भागवू शकेल इतक्या पाण्याची व्यवस्था त्याने केली.

सर्व शहरवासियांना पाणी पुरवायचे तर नहरला पाण्याचा एकच स्त्रोत असून आणि एकाच दिशेने प्रवाहित करून भागण्यासारखे नव्हते, तसेच एकाच मध्यवर्ती ठिकाणी त्याची योजना करूनही चालणार नव्हते, तर त्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी पाणी येऊन साठेल आणि तिथून विविध ठिकाणी वितरित होईल अशी योजना करावी लागणार होती. म्हणजेच, पाणीपुरवठ्याचे विकेंद्रीकरण करावे लागणार होते. नहरच्या वेगवेगळ्या उपकालव्यांचा नकाशा पाहिला तर तो आजच्या मेट्रो रेल्वेच्या जाळ्यासारखा दिसतो. त्यात एकूण बारा कालवे असून मधून-मधून वेगवेगळी अनेक स्टेशन्स आहेत, जंक्शन्स आहेत. तिथून शहराच्या शक्य तितक्या सर्व भागांत पाणी पोहोचू शकेल अशी योजना केलेली आहे. मुख्य कालव्यातून दोन दिशांना जाणारे दोन उपकालवे आहेत. पहिला उपकालवा शहराच्या मध्यभागी एका टेकडीवर जिथे मलिक अंबरचे मुख्यालय होते तो नौखंडा महाल (हाही मलिक अंबरनेच बांधला), जवळच्याच जुना बाजार आणि विविध श्रीमंत वस्त्यांना पाणी पुरवत असे. दुसरा उपकालवा शाहगंज भागाला पाणीपुरवठा करीत असे. या उपकालव्याला आडवा छेद देऊन जाणारे बरेचसे सिरॅमिकचे पाईप होते. मूळच्या बारा कालव्यांपैकी चार आजही वापरात आहेत.''[४०]

खडकीच्या नगररचेसोबतच कर संकलन, जमीन धारणापध्दती, युध्दनीती, जलव्यवस्थापन आणि प्रशासनात घडवून आणलेल्या परिवर्तनाने मलिक अंबर मध्ययुगीन मराठवाड्याच्या इतिहासातील आकर्षणाचे केंद्र ठरला आहे. पण दुर्दैवाने आजपर्यंत राधेश्याम वगैरेंचा अपवाद वगळता मलिक अंबरवर मूलगामी असे संशोधन होऊ शकले नाही. साधनांच्या कमतरतेमुळे आणि राजाकेंद्रित सरंजामी इतिहासलेखनाच्या मध्ययुगीन पध्दतीमुळे मलिक अंबर विषयीच्या नोंदी विखुरलेल्या आहेत. त्यातही औरंगजेबाच्या दक्षिण स्वारीने दक्षिणेतल्या शाह्यांच्या इतिहासाची साधने संपवली. त्यामुळे मलिक अंबरवरील संशोधन हे आव्हान बनले आहे. तरीही काही साधने आज उपलब्ध आहेत; पण भाषिक अडचणी आणि मराठीतल्या इतिहासलेखनाला आलेल्या मर्यादांमुळे त्याची चर्चा अद्याप महाराष्ट्रात झालेली नाही.

मलिक अंबरच्या इतिहासाच्या मूळ साधनांपैकी 'मुफ्ताहु तवारीख'४१ हा ग्रंथ थॉमस विल्यम बेलच्या निरीक्षणाखाली संपादित करण्यात आला होता. या ग्रंथात मलिक अंबरने मुर्तुजा निजामशाहला गादीवर बसवून कशा प्रकारे कारभार पाहिला याविषयीची माहिती विस्ताराने मांडली आहे. त्यानंतर फेरिश्ताच्या ग्रंथातील उतारे सातत्याने मलिक अंबरच्या इतिहासासाठी आधार म्हणून महाराष्ट्रात वापरले जातात; पण त्याची अन्य ग्रंथांतील मजकुरांच्या परिप्रेक्ष्यात चिकित्सा व्हायला हवी. कारण, फेरिश्ताच्या लेखनात अनेक ठिकाणी असंबध्दता आढळते. सन १६०९ मध्ये रफी शिराजी या आदिलशाही दरबारच्या इतिहासकाराने लिहिलेल्या 'तहफतुल कबीर' या ग्रंथाचीही मलिक अंबरचा इतिहास जाणून घेण्यासाठी मदत होऊ शकेल.

हैदराबाद संस्थानमध्ये जुन्या हस्तलिखितांवर संशोधन करणाऱ्या अनेक संस्था होत्या.[४२] त्यापैकी 'मजलिस -ए-इशाअत-ए-दखनी-मख्तुतात' आणि 'मजलिस-ए-इशाअत-ए-मख्तुतात-ए-फारसीया' या संस्थांनी शेकडो हस्तलिखिते त्या काळात पुनर्प्रकाशित केली होती. त्याकाळी हैदराबादेत अनेक विद्वानांनी मध्ययुगीन इतिहासावर संशोधन करून काही हस्तलिखिते शोधली होती. त्यापैकी मौलवी अ. हक यांनी मोहम्मद अमीन या इजिप्शीयन इतिहासकाराच्या

'तारिख खुलासतुल असर' या मूळ अरबी ग्रंथाचा उर्दू अनुवाद केला होता. तो ग्रंथ मलिक अंबरच्या इतिहासाचे महत्त्वाचे साधन ठरू शकेल. या ग्रंथांसोबतच 'तारिख बसात गनायम' हा ग्रंथ मलिक अंबरच्या हयातीतच लिहिला गेला आहे. लक्ष्मीनारायण शफीक औरंगाबादी यांनी त्याचे संपादन केले आहे. हा ग्रंथ मूळ मराठीत असून त्याचे भाषांतर लक्ष्मीनारायण यांनी केल्याचेही काही इतिहासकारांचे मत आहे.[४३] मात्र लक्ष्मीनारायण शफीक यांनी भाषांतरित केलेल्या मूळ मराठी ग्रंथाची माहिती आता उपलब्ध नाही. याशिवाय हैदराबाद राजवटीचे शेवटचे निजाम मीर उस्मानअली यांच्या काळात उस्मानिया विद्यापीठ व इतर संस्थांच्याद्वारे झालेल्या संशोधनाचा आणि 'दारुल तर्जुमा' या भाषांतर केंद्राद्वारे झालेल्या भाषांतरित ग्रंथांचा नव्याने अभ्यास झाल्यास मलिक अंबरशी संबंधित आणखी काही साधने हाती लागू शकतील.

सल्तनतीच्या काळात मोहम्मद तुघलकाच्या राजधानी स्थलांतराने दौलताबाद, खुलताबाद परिसराला प्रचंड महत्त्व आले होते. त्यानंतर काही काळ राजकीय कारवायांचे तसे मुख्य केंद्र म्हणून या परिसराचा वापर झाला नाही. पुढे मलिक अंबरच्या काळात या शहरांचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले. त्यानंतर पुन्हा हा परिसर औरंगजेबांच्या कारवायांनी चर्चेत आला होता. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर निजामुल मुल्क मीर कमरुद्दीन सिद्दीकीने औरंगाबादेत सन १७२४ मध्ये आसिफिया राजवटीची स्थापना केली. या आसिफीया राजवटीच्या इतिहासाची व्याख्या आधुनिक इतिहासातील घटनांच्या प्रभावाखाली करण्यात येते. त्याला सांस्कृतिक राष्ट्रवादाचा आधार दिल्याने सबंध आसिफिया राजवटीच्या इतिहासाकडे पाहण्याचा एक साचेबद्ध दृष्टिकोन महाराष्ट्रात निर्माण झाला आहे.

**आसिफीया राजवट : दखनमधील सत्ता आणि प्रशासनातील दुसरे परिवर्तन**

सुफींच्या साहाय्याने घडून आलेल्या बहामनी शिया राजकीय परिवर्तनाने दक्षिणेच्या राजकारणाची सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक सूत्रेच बदलली होती. त्यातून शिया राजकारणाच्या आश्रयाने उदयाला आलेल्या प्रादेशिक अस्मिता नंतरच्या कित्येक शतकांच्या राजकारणावर प्रभाव गाजवणाऱ्या ठरल्या होत्या. बहामनी सत्तेच्या विघटनानंतर उदयाला आलेल्या अनेक शिया राजवटी व त्याच्या इतिहासाला परिवर्तन म्हणण्यापेक्षा राजकीय स्थित्यंतरे वगैरे संबोधणे योग्य होईल. कारण, त्यांच्या राजकारणाची रीत ही बहामनीने आखून दिलेल्या चौकटीवरच आधारित होती. मलिक अंबरने काही बदल जरुर घडवून आणले; पण त्यालादेखील काही मर्यादा होत्या. मात्र दक्षिणेतील आसिफीया राजवटीच्या स्थापनेने कित्येक शतकानंतर मुस्लिमेत्तर राजवटींच्या शेजारी एका मुस्लीम सत्तेने बहामनीसारखे महत्त्वाचे स्थान निर्माण केले.

आसिफिया राजवटीच्या स्थापनेने औरंगजेबाने संपवलेल्या प्रादेशिक राजकारणाला पुन्हा एकदा गती मिळाली. इराणकेंद्री शिया सत्ताकारणाला औरंगजेबाने थांबवले तरी त्याला इराणी शिया राजकारणाविरोधात सुन्नी सांस्कृतिक मूल्यांचे पर्यायी राजकारण उभे करण्याइतकी उसंत मिळाली नाही. सुन्नी सांस्कृतिक मूल्यांचे पर्यायी राजकारण खऱ्या अर्थाने उभे राहिले ते आसिफजाही राजवटीत. त्यामुळे मोहम्मद तुघलकाच्या उत्तरकेंद्री राजकारणाच्या विरोधात घडलेल्या दखनी शिया परिवर्तनासारखेच याचे स्वरूपदेखील सांस्कृतिक परिवर्तनासारखे होते. या राजवटीतल्या प्रत्येक बादशाहने स्वतःच्या सामाजिक, सांस्कृतिक धोरणांची अंमलबजावणी केली. त्यांनी घडवून आणलेल्या प्रशासकीय सुधारणा वगैरे दखनेत घडलेल्या शासनाच्या कार्यपद्धतीतले परिवर्तन होते. मोगलशाही जशी कमकुवत होत गेली. तसे या राजवटीत उत्तरेतले विद्वान, साहित्यिक, सरदार, अधिकारी आश्रयाला आले. बहामनीच्या नंतर जसे दखनी भाषेचे सांस्कृतिक राजकारण जन्मले. तसे आसिफजाही राज्यकर्त्यांच्या एक दोन पिढ्या गेल्यानंतर उर्दु भाषेने दख्खनेत सांस्कृतिक महत्त्व प्राप्त केले. मूळच्या दखनी भाषेला

दरबारी किंवा अभिजनांच्या उर्दूचे सौंदर्य प्राप्त झाले. हा भाषिक बदल महत्त्वाचा होता, कारण त्याचे सांस्कृतिक पडसाद पुढील काळात उमटले आहेत. मोहम्मद तुघलकानंतर पुन्हा एका राजवटीने उत्तरेच्या सांस्कृतिक मूल्यांना दक्षिणेत चालना दिली होती. त्यामुळे आजही मराठवाडा परिसरातील मुस्लिमांवर उत्तरेकडील मुस्लीम समाजाचा, अभिजनी स्वभावाचा परिणाम सहजगत्या दिसून येतो.[४४] ही मराठवाड्यातल्या मुस्लिमांमध्ये घडून आलेली सांस्कृतिक क्रांती होती. ती भारताच्या स्वातंत्र्यापर्यंत सुरू राहिली. आणि मराठवाड्यातील मुस्लिमांमधील सांस्कृतिक बदलाचे हे चक्र विलीनिकरणानंतर अभिजन मुस्लिमांच्या स्थलांतराने थांबले.

### मूळ साधनांच्या परिप्रेक्ष्यात आसिफजाहीच्या इतिहासाचे संशोधन

विलीनीकरण आणि त्यातून उद्भवलेल्या सामाजिक परिस्थितीच्या परिप्रेक्ष्यात या राजवटीच्या इतिहासाची चर्चा करण्यापेक्षा प्रत्येक क्षेत्रात या राजवटीने घडवून आणलेल्या बदलाची नोंद घेतली पाहिजे. त्यासाठी त्याच्या मूळ साधनांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. आसिफजाही राजवटीच्या इतिहासाची साधने ही मध्ययुगीन साधनांसारखी किचकट, दुर्बोधाचा अंश असेलेली नाहीत. मध्ययुगीन काळाच्या अखेरच्या टप्प्यात स्थापन झालेली ही राजवट आधुनिकतेकडे झुकली होती.

आसिफजाहीच्या काही साधनांमध्ये दखनेच्या विशेषतः कुतूबशाहीच्या इतिहासाची माहितीदेखील ओघानेच येते. सन १८३९ मध्ये आसिफजाही इतिहासाविषयी हकीम गुलाम हुसैन दहेलवी यांनी 'गुलजार-ए-आसिफीया' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाच्या पहिल्या प्रकरणात कुतूबशाहीच्या स्थापनेपासून औरंगजेबाने कुतूबशाहीवर मिळविलेल्या विजयापर्यंतचा इतिहास मांडलेला आहे. नतंरच्या प्रकरणात आसिफजाही राजवटीच्या इतिहासाची मांडणी करण्यात आलेली आहे.४५ मुनम खान हमदानी औरंगाबादी यांनी लिहिलेल्या 'सवान ए दखन' हा ग्रंथ दखनेच्या इतिहासापासून सुरू होतो. या ग्रंथात आसिफजाही दरबारातील सरदार, अधिकारी वगैरेंची माहिती दिलेली आहे. या ग्रंथाचे लेखन १७८२ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. लाला लक्ष्मीनारायण शफीक औरंगाबादी यांनी 'मासिरे आसिफी' हा ग्रंथ सन १७९३ मध्ये लिहिला. यामध्ये आसिफीया घराण्याचा पूर्ण इतिहास मांडलेला आहे. या ग्रंथातून मराठा-निजाम संबंधांची माहितीदेखील मिळते. ग्रंथाचे लेखक लक्ष्मीनारायण शफीक यांचे वडील लाला मन्साराम हे निजामुल मुल्क आसिफजाहचे मुन्शी होते. त्यानंतर 'आसिफनामा' हा ग्रंथ शाह तजल्ली हैदराबादी यांनी लिहिला आहे. ते नवाब निजाम अली खाँच्या दरबारातील अधिकारी होते. नवाब मीर निजाम अली खाँ आसिफजाह (द्वितीय) च्या कारकिर्दीचा संपूर्ण इतिहास त्यात मांडलेला आहे. सोबतच अन्य माहितीदेखील महत्त्वाची आहे. काही इतिहासकारांनी या ग्रंथाला 'तुज्क-ए-आसिफी' देखील म्हटले आहे. या ग्रंथाची एक आवृत्ती सन १८९३ मध्ये हैदराबादमधून प्रकाशित करण्यात आली होती.

सय्यद नुफात हुसैन खाँ बनारसी यांनी 'निगारीस्तान-ए-आसिफी' हा ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथात आसिफजाही राज्यकर्त्यांचा व्यक्तिगत जीवनातील घटना व अन्य माहिती दिलेली आहे. सन १९०५ मध्ये या ग्रंथाची एक आवृत्ती हैदराबादमधून प्रकाशित झाली आहे. लेखक मूळचे बनारस येथील होते. त्यांचे वडील सय्यद अजीजुल्ला यांनी हैदराबाद रेजीडेन्सीमध्ये नोकरी केली होती. त्यांच्यानंतर सय्यद नुफात हुसैन खाँ यांनीदेखील काही काळ रेजीडेन्सीत काम केले होते. त्यांनी आपल्या इंग्रज अधिकाऱ्याच्या सूचनेवरुन हा ग्रंथ लिहिला होता.[४७] बीदर येथील इतिहास अभ्यासक माणिकराव विठ्ठलराव यांनी आसिफजाही राजवटीचा संपूर्ण इतिहास 'बोस्तान ए आसिफिया' या शीर्षकाने ७ खंडांमध्ये मांडला आहे. सन १९०९ मध्ये ही ग्रंथमाला प्रकाशित करण्यात आली आहे.[४६] या पुस्तकांसोबतच अ. बासित खाँ यांचा 'तारिख-ए-

अदालत-ए-आसिफी' हा ग्रंथ न्यायसंस्थेवर आधारित आहे. डॉ. युसूफ हुसैन खाँ यांचा 'तारिख-ए-दखन', मोहम्मद महेबूब जुनैदी यांचा 'हयात-ए-आसिफ', अ. रउफ यांचा 'दबदबा-ए-निजाम', सय्यद अली असगर बिलग्रामी यांचा 'मासिर-ए-दखन', गुलाम समदानी गुहर यांचा 'तुज्क-ए-महबुबीया' आणि 'दरबार-ए-आसिफ', सय्यद गुलाम मोहम्मद यांचा 'गंजन-ए-आसिफीया', लाला मन्साराम यांचा 'रिसाला-ए-दरबार-ए-आसिफ', नजमुल गनी यांचा 'तारिख-ए-रियासत-ए-हैदराबाद दखन', सय्यद अमजदअली अशहरी यांचा 'सवान ए उमरी आला हजरत मीर महिबूब अली खाँ' हे ग्रंथ आसिफीया राजवटीच्या प्रशासन, सत्तेची सुत्रे, सांस्कृतिक भूमिका यांच्या इतिहासासाठीचे साधन म्हणून अभ्यासकांच्या अभ्यासकक्षेत यावेत. त्याशिवाय हैदराबादच्या स्टेट अर्काइव्हज मधील लाखो कागदपत्रांचा देखील आधार घेता येईल.

## समारोप

मराठवाड्याच्या मध्ययुगीन इतिहासाच्या पुनर्लेखनाने महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय इतिहासलेखनाच्या कक्षा विस्तारण्यासाठी मदत होईल. हैदराबादच्या अखेरच्या निजामांच्या काळात इतिहासाच्या साधनांच्या दृष्टीने खूप महत्त्वपूर्ण कामे करण्यात आली आहेत. ''इ.स. १९१६ मध्ये हैदराबाद संस्थानचे अकाऊंटंट जनरल तपासणीच्या दौऱ्यावर असताना औरंगाबाद येथील कलआ-इ-अर्कमधील (म्हणजे आताच्या कोर्टातील) एका दिवाणखान्याच्या ओवऱ्यांमध्ये जुन्या कागदपत्रांचा एक मोठा संग्रह असल्याचे त्यांना आढळून आले. त्यांनी ही गोष्ट संस्थानच्या 'दफ्तर इ दिवानी' च्या सुपरिटेण्डेण्टना कळविली. तेव्हा तो संग्रह हैदराबाद येथील दफ्तर-इ-दिवानमध्ये हलविण्यात आला. स्वातंत्र्यानंतर काही काळाने या दफ्तर-इ-दिवानीचे सेंट्रल रेकॉर्ड्स ऑफिसमध्ये रूपातंतर करण्यात आले आणि त्याचेच आता 'स्टेट आर्काव्ह्ज, आंध्र प्रदेश'(सध्या तेलंगणा) मध्ये रूपांतर करण्यात आले आहे. तिथेच तो संग्रह आता आहे. त्यात शहाजहान आणि औरंगजेब यांच्या कारकिर्दीतील सुमारे दीड लाख सरकारी कागद आहेत.''[४८] याशिवाय याच आर्काइव्हजमध्ये मराठवाड्याच्या अनुषंगाने हजारो फर्मान, आसिफजाही राज्याकर्त्यांचे हुकूमनामे, पत्रे वगैरे आहेत. सालार जंग म्युझिअममध्ये 'तारिख-ए-बीड', 'तारिख-ए-परभणी', 'तारिख-ए-औरंगाबाद', 'तारिख-ए-नांदेड' या ग्रंथांच्या काही प्रतीदेखील आहेत. ज्यांची निर्मिती प्रादेशिक इतिहासावरील संशोधनाच्या अनुषंगाने निजाम मीर उस्मान अली खाँ यांच्या काळात करण्यात आली होती.

शिवाय 'अंदाजे वाकिआत ए दखन', 'तारिख बनाए हैदराबाद', 'तारिख ए बिजापूर', 'तारिख ए दखन', 'तारिख ए सलातीन ए दखन', 'तारिख ए जफरा ए दखन', 'तारिख ए आदिलशाही', 'तारिख ए कुतूबशाही', 'तारिख ए फरखुंदा', 'वकाए दखन', 'वकाए गोलकुंडा, 'तारिख ए बीड, सुभे दखन', 'सुभे औरंगाबाद दखन', 'तारिख ए किला ए उदगीर', 'तारिख ए कंधार दखन' 'तिजारत व हिर्फत हैदराबाद, दखन', 'तर्जुमा गुलदस्ता ए बिजापूर', 'हालात ए परभणी', 'रहबर ए दखन' सिलसिला ए आसिफीया तारिख ए दखन ६ खंड', 'अजीज ए दखन', 'महबूब ए वतन तज्कीरा सलातीन ए दखन' हे ग्रंथ दखन आणि मराठवाड्याच्या इतिहासाच्या नव्या दिशा ठरण्यासाठी साहाय्यभूत ठरू शकतील. मराठवाड्याचा इतिहास दखनेच्या इतिहासाचा महत्त्वाचा घटक आहे. किंबहुना दखनेच्या मध्ययुगीन इतिहासाचा तो प्रारंभबिंदू आहे. त्यामुळे दखनेच्या इतिहासाची मूळ साधनं मुळातून अभ्यासल्याशिवाय मराठवाड्याच्या इतिहासाची पुनर्मांडणी मूलगामी स्वरूपाची होणार नाही.

## संदर्भ सुची

१. सहस्त्रबुध्दे,पु.ग., 'महाराष्ट्रसंस्कृती', पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, आवृत्ती १ ली, सन १९७९, पृष्ठ क्र. ३०४

(मराठी)
२. माटे, म.श्री, 'मध्ययुगीन महाराष्ट्र, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन' सन २००२, मुंबई, पृष्ठ क्र. १४,१५ (मराठी)
३. मोहम्मद, अ. हाई, गुलिस्तान ए खुल्दाबाद, पृष्ठ क्र. २५, आवृत्ती १ ली. प्रकाशक, मोहम्मद अ. कदीर, औरंगाबाद. सन २००१- औरंगाबाद, पृष्ठ क्र. २५ (उर्दू)
४. बशिरुद्दीन अहमद (दहेलवी), वाकिआत ए ममलिकत ए बिजापूर, जिल्द दुव्वम (खंड दुसरा), आवृत्ती दुसरी, प्रकाशक- कर्नाटक उर्दू अकादमी, बंगळुरू. सन २००४ पृष्ठ क्र. ३११ (उर्दू)
५. डॉ. वकील, आलिम, सुफींची आदमगिरी, सुफी परंपरा व तत्त्वज्ञान, आवृत्ती १ ली. विश्वकर्मा पब्लिकेशन्स, पुणे. सन २०१९ पृष्ठ क्र. ८१(मराठी)
६. शेख मोहम्मद इकराम, 'आबे कौसर', आवृत्ती ५ वी, प्रकाशक- ताज कंपनी, देहली (दिल्ली), सन १९८७, पृष्ठ क्र. ३६२ (उर्दू)
७. कित्ता, पृष्ठ क्र. ३६२
८. खालिक अहमद निजामी, शेख निजामुद्दीन औलीया, (हिंदी अनुवाद- निजामुद्दीन) आवृत्ती, २ री, प्रकाशक- नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, सन १९९९, पृष्ठ क्र. ५६-५७ आणि अधिक माहितीसाठी या पुस्तकातील 'बादशाह और राजनिती से पारंगमुख/विमुखता' प्रकरण अभ्यासता येईल.
९. य.दी. फडके आणि इतर, शिवछत्रपती, खंड १, आवृत्ती १ ली, प्रकाशक मॅकमिलन, सन-२००१ पृष्ठ क्र. - १३२
१०. हजरत हुजविरी अली बि. उस्मान अल जलाबी, कश्फल महज्जुब, इंग्रजी भाषांतर निकल्सन आर ए. दिल्ली ताज कंपनी दिल्ली, आवृत्ती१ ली, सन १९८९
११. खालिक अहमद निजामी, पुर्वोक्त, पृष्ठ क्र. १० (हिंदी)
१२. सयय्द मोहम्मद बिन मुबारक किरमानी, (मीर खुर्द),सियार औलीया,माशाक बुक कॉर्नर लाहोर, (उर्दू भाषांतर- गुलाम अहमद बदयाँ) (उर्दू)
१३. डॉ. वकील, आलीम, पूर्वोक्त पृष्ठ क्र. ८१
१४. हबीब, इरफान, मध्यकालीन भारत, खंड -९ मधील, मोहम्मद हबीब यांचा लेख ''सल्तनत काल की चिश्तिया सूफी दस्तावेजें' हा लेख, प्रकाशक राजकमल प्रकाशन, नवी दिल्ली. आवृत्ती १ली, सन- २०१४, पृष्ठ क्र. ११-५० (हिंदी)
१५. अ) रिचर्ड, इटन, सोशल हिस्ट्री ऑफ द डेक्कन - १३००-१७६१, एट इंडियन लाईव्हज, प्रकाशक केम्ब्रीज युनिव्हर्सिटी प्रेस, आवृत्ती १ ली, सन २००५ ब) रिचर्ड इटन, सुफीज् ऑफ बिजापूर, १३००-१७००, प्रकाशक प्रिन्सेशन युनिव्हर्सिटी प्रेस, न्यू जर्सी, सन -१९७८ (इंग्रजी)
१५. ब) अधिक माहितीसाठी पाहा व्ही. के. बावा आणि इतर, डेक्कन स्टडीज खंड २, सेंटर फॉर डेक्कन स्टडीज, हैदराबाद. सन -२००३. (इंग्रजी)
१६. प्रो. मजीद बेदार, यांचा 'बंदानवाजी तसव्वूफ और अफकार के नुमाईंदा सुफी हजरत शाह राजू हुसैनी सानी मरहूम' हा लेख 'जहान ए उर्दू' या ऑनलाईन नियतकालिकामध्ये १३ नोव्हेंबर २०१५ मध्ये प्रकाशित झालेला लेख. (उर्दू)
१७. 'फेहरीस्त ए कुतुब मख्तुतात, अरबी-फारसी-उर्दू, कुतूबखाना आसिफिया सरकार ए आली' आवृत्ती २ री, प्रकाशक नाजिम ए कुतुबखाना व इदारा तहकीक ए मख्तुतात हुकुमत ए आंध्र प्रदेश ( तेलंगणा), उस्मानिया विद्यापीठ सन २०१२ - पृष्ठ क्र ७२४(उर्दू)
१८. मोहम्मद, अ. हाई, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. २२२
१९. डॉ. मोहीयोद्दीन कादरी जोर, 'दखनी अदब की तारीख', प्रकाशक- उर्दू अकादमी, सिंध, कराची. सन -१९६९, पृष्ठ क्र. १२ (उर्दू)
२०. प्रोफेसर शर्मा, श्रीराम, यांच्या मूळ हिंदी ग्रंथाचे उर्दू भाषांतर 'दखनी जुबान का आगाज व इर्तका', मधील डॉ. मसुद हुसैन खाँ, यांची प्रस्तावना, आवृत्ती १ ली, साहित्य अकादमी, आंध्र प्रदेश, हैदराबाद. सन २१. १९६७. पृष्ठ क्र. ७ (उर्दू)
२२. पांचाल, परमानंद, (संपादन) दक्खिनी हिन्दी काव्य संचयन, आवृत्ती १ ली, प्रकाशक- साहित्य अकादमी, नवी दिल्ली. सन २००८. पृष्ठ क्र. ८ (हिंदी)
२३. कित्ता, पृष्ठ क्र. २१
२४. रिचर्ड इटन, 'मध्यकालिन दक्कन में इस्लामिक स्थान की अभिव्यक्ती', मीनाक्षी खन्ना संपादित 'मध्यकालीन भारत का सांस्कृतिक इतिहास' या ग्रंथातील रिचर्ड इटन यांचा लेख, प्रकाशक ओरियंट ब्लैकस्वान,हैदराबाद. सन २०१२. पृष्ठ क्र. १४०(हिंदी)
२५. सहस्त्रबुध्दे, पु. ग., पूर्वोक्त, १११-११२
२६. आधिक माहितीसाठी पाहा - खालिक अहमद

निजामी, शेख निजामुद्दीन औलीया, (हिंदी अनुवाद- निजामुद्दीन) आवृत्ती, २ री, प्रकाशक- नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, सन १९९९, पृष्ठ क्र. ५६-५७ आणि अधिक माहितीसाठी या पुस्तकातील 'बादशाह और राजनिती से पारंगमुख/विमुखता' प्रकरण अभ्यासता येईल. (हिंदी)

२७. रिचर्ड इटन, 'मध्यकालिन दक्कन में इस्लामिक स्थान की अभिव्यक्ती', मीनाक्षी खन्ना संपादित पूर्वोक्त ग्रंथातील रिचर्ड इटन यांचा लेख, पृष्ठ क्र. १४० (इंग्रजी)

२८. य.दी. फडके आणि इतर, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. ११०-१११

२९. यासाठी हजरत बंदानवाज गेसुदराज यांचे उदाहरण प्रातिनिधिक ठरू शकेल. अधिक माहितीसाठी पाहा - हाफीज सय्यद मोहम्मद अली हुसैनी, 'जवामीउल कलम पर जरुरी नकद व तब्सीरा' (बंदानवाज यांच्या मलफुजातचे विश्लेषण) (उर्दू)

३०. अधिक माहितीसाठी पाहा - डॉ. मोईनुद्दीन अकील, दखखन और इरान (सल्तनत ए बहमनीया और इरान के इल्मी व तमद्दुनी रवाबीत) प्रकाशक- शमीम बुक एजन्सी, कराची. सन १९८३. (उर्दू)

३१. रिचर्ड इटन, 'मध्यकालिन दक्कन में इस्लामिक स्थान की अभिव्यक्ती', मीनाक्षी खन्ना संपादित पूर्वोक्त ग्रंथातील रिचर्ड इटन यांचा लेख, पृष्ठ क्र. १४१ (हिंदी)

३२. कित्ता, पृष्ठ क्र. १३८

३३. कित्ता, पृष्ठ क्र. १३९

३४. कित्ता, पृष्ठ क्र. १४२

३५. मुन्शी अ. कादर, 'तारिख ए अहमदनगर', आवृत्ती १ ली. प्रकाशक मुन्शी अ. कादर, रिटा. डेप्युटी कलेक्टर, सन १९४०. पृष्ठ ३७-३८(उर्दू)

३६. मोईनुद्दीन अकील, पूर्वोक्त, (पृष्ठ क्र. ३९ ब) हारुन खाँ शेरवानी, 'दखन के बहमनी सलातीन' उर्दू भाषांतरित ३ री आवृत्ती, प्रकाशक कौमी कौन्सील, बराए फरोग ए उर्दू जुबान, नई दिल्ली. सन १९९८ पृष्ठ क्र. २९८-९९(उर्दू)

३७. जोनाथन गिर हॅरिस, 'द फर्स्ट फिरंगीज', आवृत्ती १ली, प्रकाशक- पद्मगंधा प्रकाशन, पुणे, सन २०१८, पृष्ठ क्र. १३८

३८. कित्ता, पृष्ठ क्र. १४९

३९. पाटील, शरद, शिवाजीच्या हिंदवी स्वराज्याचे खरे शत्रू कोण? महंमदी की ब्राह्मणी? आवृत्ती ५ वी, प्रकाशक- मावळाई प्रकाशन, पुणे. सन २०१६, पृष्ठ क्र. ८५

४०. जोनाथन गिर हॅरिस, पूर्वोक्त, पृष्ठ क्र.१५३-१५४

४१. 'मुफ्ताहु तवारीख' हा ग्रंथ लखनऊ येथून सन १८६८ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. पण त्या ग्रंथाची त्यानंतर आवृत्ती निघाल्याची माहिती मिळत नाही. (उर्दू)

४२. अधिक माहितीसाठी पाहा सरफराज अहमद आणि इतर आसिफजाही खंड १ मधील तहसीन सरवरी यांचा 'शैक्षणिक व सांस्कृतिक योगदान हा लेख, आवृत्ती १ ली, प्रकाशक शब्द पब्लिकेशन, मुंबई सन २०१९(मराठी)

४३. आगा मिर्झा बेग, 'हकिकत ए मलिक अंबर', प्रकाशक अख्तर मिर्झा बेग, आवृत्ती १ ली, १९९१, पृष्ठ क्र. ३६-४८ (उर्दू)

४४. अधिक माहितीसाठी पाहा 'ममलिकत ए आसिफीया में उर्दु जुबान की तरवीज व तरक्की' मधील सय्यद दाउद अश्रफ यांचा लेख 'तारिखी, तहजीबी व अदबी पसेमंजर' व अन्य लेख आवृत्ती १ ली, प्रकाशक एच.इ.एच. दि निजाम उर्दू ट्रस्ट हैदराबाद, सन २००२(उर्दू)

४५. हकीम गुलाम हुसैन दहेलवी यांनी लिहिलेला 'गुलजार ए आसिफीया' या ग्रंथाच्या काही प्रती सालारजंग म्युजिअम आणि आसिफीया ग्रंथालय हैदराबादमध्ये आहेत. पहिल्यांदा हा ग्रंथ १८९० मध्ये लखनऊ येथून प्रकाशित करण्यात आला होता. (उर्दू)

४६. हकीम सय्यद शम्सुल्लाह कादरी, 'मुवर्रिखीन ए हिंद'(सलातीन ए हिंदुस्तान की मोअतबर व मुस्तनद कुतुब ए तारिख पर तब्सरे), प्रकाशक- दफ्तर रिसाला ए तारीख, हैदराबाद, सन १९३३, पृष्ठ क्र. १०३-१०८ (उर्दू)

४७. माणिकराव विठ्ठलराव, बोस्तान ए आसिफिया खंड १-७, आवृत्ती १ ली. १९०९ प्रकाशक - अन्वारुल इस्लाम हैदराबाद. (उर्दू)

४८. गजानन भास्कर मेंहदळे, श्री राजा शिवछत्रपती, खंड १, आवृत्ती १ली. (तिसरे पुनर्मुद्रण) प्रकाशक डायमंड पब्लिकेशन्स, पुणे. सन २००८. पृष्ठ क्र. १(मराठी)

■



# समकालीन संक्रमणाला भिडलेले क्रांतिकारी धुरीणत्व

■



**डॉ. उमेश बगाडे**
सिटी हाईट अपार्टमेंट, फ्लॅट नं.बी-२०४, यशोमंगल हाऊसिंग
सोसायटीच्या समोर, सम्राटनगर, खडकेश्वर, संभाजीनगर

१

संक्रमण काळ ही काळाची एक कल्पना आहे की जिला संधिकालाच्या प्रतिमेत प्रायः पाहिले जाते. एका कालखंडातून दुसऱ्या कालखंडात प्रवेश करण्यापूर्वीचा हा काळ होय. जाणारा गतकाळ व येणारा भविष्यकाळ यांना सांधणारा हा काळ होय. यात दोन काळ एकमेकांना छेदतात, एकमेकात मिसळतात व समेवर येतात. त्यामुळे गती, गोंधळ व धूसरता या काळात गृहीत धरली जाते.

खरेतर, बदल हा निरंतर असल्यामुळे प्रत्येक काळ संक्रमण काळ मानावा लागतो. मात्र, इतिहास विचारानुसार काळाचा एक पट निश्चित करून त्याला स्थिर करावे लागत असते. किंबहुना, त्याशिवाय इतिहासाचा अर्थ लावणेच शक्य होत नसते. काळाच्या अशा विविध खंडांना कालपटात बांधण्याच्या पद्धतीतूनच लगतच्या कालपटांना सांधणारी संक्रमणकाळाची कल्पना उभी राहते.

एका विशिष्ट सामायिक तत्त्वाआधारे कालखंडाची एकता इतिहासविचारात केली जाते. व्यक्तीचा प्रभाव, घराण्याची राजवट, विचारांचा अंमल, सामाजिक, धार्मिक वहिवाट, उत्पादनपद्धतीचे सातत्य अशा अनेकविध सूत्रांद्वारे कालखंड बांधले जातात. इतिहास अध्ययनातून त्या त्या कालखंडाची वैशिष्ट्ये अधोरेखित केली जातात. आणि अशा वैशिष्ट्यांच्या चौकटीत संक्रमण काळाची संगती लावली जाते.

काळाचा एक पट उभारताना स्थळ-काळाची एकवाक्यता केली जात असते. आर्यावर्त, ब्रह्मावर्त या स्थळवाचक कल्पना काळ निर्देशित करतात आणि मौर्यकाळ, शिवकाळ या कालवाचक कल्पना स्थळ निर्देशित करतात. काही काळनिदर्शक कल्पना सार्वत्रिक म्हणून इतिहासात प्रचलित केल्या जात असल्या तरी स्थळाच्या संदर्भाशिवाय त्या अन्वर्थक बनू शकत नसतात. आधुनिक इतिहासात वैश्विक परिमाण लाभलेली प्रबोधनकाल ही कल्पना देश व प्रदेशातील विशिष्टतेनुसार समजून घेतली जाऊ शकते. त्यामुळे काल-स्थळ संदर्भांतच संक्रमणकाळाचा उलगडा केला जात असतो.

कालखंडाच्या कल्पना उभारताना ऐतिहासिक बदलाची संगती सांगणारा कार्यकारण-भाव मध्यवर्ती केला जात असतो. एकरेषीय विकास-गती, विरोध-विकासात्मक सर्पाकार-गती, चक्रीय गती अशा काळ-गतींच्या आधारे इतिहासाची संगती लावली जात असते. म्हणून कोणताही इतिहासकार त्याने शोधलेल्या वा पत्करलेल्या कार्यकारणभावाचे व कालगतीचे सूत्र लावून संक्रमण काळाची चर्चा करत असतो.

इतिहास विवरणात काळाची एक प्रवृत्ती निश्चित केली जात असते. उदाः- मध्ययुगाला तमोयुग तर आधुनिक काळाला प्रगतीचे युग मानले जाते. काळाची प्रवृत्ती सांगताना कालगतीची कल्पना त्यात अध्याहृत असते. उन्नती-अधोगती, उदय-ऱ्हास अशा सूत्रांद्वारे बदलांचे स्वरूप व दिशा ती सूचित करते. त्यामुळे संक्रमण काळाची कोणतीही चर्चा बदलांचे स्वरूप, गती व तिची दिशा यांना घेऊन पुढे जाते.

२

ऐतिहासिक भौतिकवादाचे सूत्र घेऊन समाजक्रांतीचा उलगडा करण्यासाठी मार्क्सवादामध्ये संक्रमणकाळाचा विशेष अभ्यास केला जातो. उत्पादन साधने...उत्पादनपद्धती यांच्यातील बदलांनुसार समाज बदलतो ही धारणा स्वीकारून उत्पादनपद्धतीमधील क्रांतिकारी बदलाचा वेध त्यात घेतला जातो. आणि त्यानुसार प्राथमिक साम्यवाद, प्राचीन गुलामगिरी, सामंतवाद, भांडवलशाही असे इतिहासाचे टप्पे पाडून संक्रमण-काळाचा अभ्यास मार्क्सवादामध्ये केला जातो.

वरकड अपहरणाला धरून उत्पादनपद्धतीची व्याख्या मार्क्सवाद करतो. आणि त्यानुसार शोषण-शासनाचा वर्गसंबंध मध्यवर्ती मानून वर्गसंघर्षाला समाजबदलाची प्रेरणा म्हणून तो प्रस्थापित करत असतो. वर्गसंघर्ष नित्य घडत असतो. त्यामुळे उत्पादन साधने व उत्पादनपद्धती यामध्ये बदल घडत असतात. हे बदल मुख्यतः संख्यात्मक असतात. मात्र, त्यामध्ये गुणात्मक बदल झाल्यावर त्यातून समाजक्रांती होत असते अशी धारणा तो बाळगतो.

उत्पादनपद्धती ज्या गतीने बदलत असते त्या गतीने उत्पादन संबंध बदलत नसतात. त्यातून समाज-विकासाच्या प्रक्रियेत एक प्रकारचा तणाव उभा राहतो. त्याचे पर्यवसान अंतिमत: समाजक्रांतीत होते. समाजविकासाच्या प्रक्रियेत घडणाऱ्या प्रत्येक समाजक्रांतीत त्यामुळे उत्पादनपद्धती म्हणजे उत्पादन साधने, उत्पादन शक्ती व उत्पादन संबंध यामध्ये व परिणामाने वरकड अपहरणाच्या पद्धतीत गुणात्मक बदल घडून येत असतो.

उत्पादनपद्धतीच्या आधारे व्याख्यांकित केलेल्या दोन लगतच्या कालखंडांना मार्क्सवाद परस्पर विरोधाच्या चौकटीतून समजून घेतो. उदा- सार्वत्रिक व्यापार कमी होऊन स्थानिक विनिमय वाढण्यातून सरंजामशाही तर सार्वत्रिक व्यापाराच्या व्यापक विस्तारातून भांडवलशाही अवस्था जन्म घेते असे मानले जाते. सामंत-भूदास संबंधात बद्ध झालेले श्रम, स्थगित उत्पादन तंत्र, मॅनोरच्या मर्यादेत गोठलेली अर्थव्यवस्था, ग्रामीण जीवनाची सद्दी वैगेरे सरंजामशाहीचे पायाभूत घटक ठरवले जातात. तर, त्याउलट, करार स्वातंत्र्य, विकसित उत्पादन तंत्र, शहरी जीवनपद्धती यांना भांडवलशाहीचे व्यवच्छेदक लक्षण समजले जाते.

सरंजामशाही ते भांडवलशाही या संक्रमणाचा अभ्यास मार्क्सवादामध्ये समाजक्रांतीचा अभ्यास बनतो. त्यानुसार युरोपमधील १३ व्या शतकापासून ते १७ व्या शतकापर्यंतचा काळ भांडवली समाजक्रांतीचा काळ म्हणून अभ्यासला जातो. सरंजामशाहीतील वाढत्या कर आकारणीमधून तीव्र होत गेलेल्या वर्गसंघर्षातून भांडवली समाजक्रांती आकाराला आली असे मार्क्सवादी अभ्यासकांचे आकलन राहिले आहे.

सरंजामशाही ते भांडवलशाही संक्रमणाचा मार्क्सवादी चौकटीतला अभ्यास मॉरीस डॉब यांनी सादर केला. त्यांनी भांडवलशाहीच्या उदयामागे व्यापार-वाणिज्याचा आकृतिबंध काम करतो या सूत्राला आव्हान दिले. सरंजामशाहीतील आंतरिक तणाव भांडवली स्थित्यंतराला जन्म देतात अशी संगती त्यांनी लावली. सरंजामशाहीतील वाढती कर आकारणी शेतकऱ्यांना असह्य झाल्याने सरंजामशाही संकटात सापडली आणि परिणामी भांडवलशाहीचा उदय झाल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

संक्रमण काळाच्या डॉब यांच्या या संगतीला पॉल स्विझी यांनी आव्हान दिले. त्यांच्या मते, सरंजामशाही ते भांडवलशाही हे संक्रमण बाजार विनिमयाच्या विस्तारातून होत राहिले. मॅनोरच्या चाकोरीत अडकलेल्या सरंजामी अर्थव्यवस्थेला बाजार विनिमयाच्या व्यवस्थेने बदलाची दिशा दिली. बाजार विनिमयाने सामंत व भूदास यांच्या संबंधांचे चलनीकरण केले. त्यातून बाजार संबंधांचा विस्तार वाढत गेला आणि प्रचलित उत्पादन व्यवस्था बदलून भांडवलशाही अस्तित्वात आली. डॉब आणि स्विझी यांच्यामधील संक्रमण काळासंबंधातला हा विवाद अनेक सूक्ष्म व गुंतागुंतीच्या घटनांचा व प्रक्रियांचा वेध घेतो. डॉब व

स्विझी सरंजामशाही ते भांडवलशाही हे संक्रमण दीर्घकालीन मानतात. डॉब भांडवली संक्रमणाच्या दोन अवस्था नमूद करतात तर स्विझी तीन अवस्था अधोरेखित करतात.

भांडवली संक्रमणाचाच नव्हे तर इतिहासातील सर्व संक्रमणकाळाचा अभ्यासही फलप्रद असतो. संक्रमण काळाच्या अभ्यासात ऐतिहासिक बदल समजून घेण्यासाठी समाजस्थितीचे खोलवर अध्ययन केले जाते. बदलाला कारणीभूत होणाऱ्या विविध कारणांचा व प्रक्रियांचा मुळापर्यंत जाऊन उलगडा केला जातो. स्थानिक संदर्भात व वैश्विक संदर्भात इतिहास बदलाचे नियम पुढे आणले जातात. आणि त्याआधारे मानवी इतिहासाची स्थिती, गती आणि हेतू समजून घेता येतात व वर्तमान व भविष्याचा वेध घेता येतो.

३

कॉ. शरद पाटील हे मार्क्सवादाचे अनुयायी. भारतीय जातीसमाजातील जात्यंतक लोकशाही क्रांतीच्या संदर्भात आणि साम्यवादी क्रांतीच्या जागतिक संदर्भात मार्क्सवादाच्या मर्यादा त्यांनी पुढे आणल्या. पोथीनिष्ठ मार्क्सवादापासून फारकत घेत सुरुवातीला मार्क्सवाद-फुले-आंबेडकरवाद व नंतर सौत्रान्तिक मार्क्सवादाचे दर्शन त्यांनी मांडले.

समाजक्रांतीची कोंडी फोडणाऱ्या तत्त्वज्ञानाच्या उभारणीसाठी त्यांनी इतिहासमीमांसेत विशेष रस घेतला. इतिहासाचे कालखंड ठरवण्याच्या आणि त्यानुसार संक्रमणकाळाचा विचार मांडणाऱ्या चर्चेत सहभाग घेतला. मार्क्सवाद्यांचे समाजक्रांतीच्या कालखंडाचे प्रचलित साचे नाकारत ऐतिहासिक कालखंडाचा नवा विचार त्यांनी मांडला. भारतातील ऐतिहासिक बदलांचा व त्यातील संक्रमणाचा मार्क्सवादी संगतीपेक्षा वेगळा विचार मांडून भारतीय इतिहास विचाराला त्यांनी वेगळे वळण दिले.

पारंपरिक मार्क्सवादातील आर्थिक नियतवाद व एकांगी वर्गवाद यांना कॉ. पाटील यांनी लक्ष्य केले. वर्गालाच शोषण-शासनाची एकमेव व्यवस्था ठरवणारा एकप्रवाही ऐतिहासिक भौतिकवाद नाकारून वर्ण, गण, लिंगभाव, जात, वर्ग, वंश अशा संस्थांच्या शोषण-शासनाला उलगडणाऱ्या बहुप्रवाही ऐतिहासिक भौतिकवादाची मांडणी त्यांनी केली. आणि त्याला ब्राह्मणी-अब्राह्मणी सिद्धांत चौकटीची व जाणीव-नेणीव केंद्री प्रमाणशास्त्राची जोड दिली.

इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर उत्पादनपद्धतीत क्रांती घडून मानवी स्व-कर्ता (subject) प्रगतीकडे अग्रेसर होत असतो असे सांगणारा मार्क्सवादाचा प्रयोजनलक्षी (teleological) इतिहासविचार कॉ. पाटील यांनी अनुसरला. भारतीय इतिहासाचे टप्पे करताना उत्पादन पद्धतीमधील क्रांतीला त्यांनी महत्त्व तर दिलेच. पण, त्याचबरोबर नातेगोतेसंबंध, जाती व गण या संस्थामधील भौतिकतेला अधोरेखित करत ऐतिहासिक स्थित्यंतराची व संक्रमणाची मौलिक अर्थाने वेगळी मीमांसा त्यांनी केली.

प्राथमिक साम्यवादाची मार्क्सवादी कल्पना गंधर्वनगरी म्हणून कॉ. पाटलांनी नाकारली. खरेतर, मानवी इतिहासाचा प्रारंभिक कालखंड म्हणून केलेली प्राथमिक साम्यवादाची कल्पना अगदीच आधारहीन नव्हती. उपलब्ध मानवशास्त्रीय संशोधनाच्या आधारे मार्क्स-एंगल्सने तिची रचना केली होती. त्यातील दोषांवर नेमके बोट ठेऊन प्राथमिक साम्यवादाच्या कल्पनेला कॉ. पाटलांनी प्रश्नांकित केले. आणि मानवी समाजविकासाचा प्रारंभिक काळ प्राथमिक साम्यवादाचा नसून स्त्रीसत्तेचा असल्याचे त्यांनी जाहीर केले.

लैंगिक श्रमविभागणीचा मुद्दा उपस्थित करून स्त्री सत्तेच्या उत्पादनतंत्राला समजून घेण्याची भूमिका कॉ. पाटील यांनी घेतली. मानवशास्त्रीय अध्ययनातून मातृसत्ता व स्त्रीसत्तेचे अनेकविध तपशील त्यांनी जमा केले. विशेषतः शेतीचा शोध स्त्रियांनी लावल्याचा संदर्भ अधोरेखित करून नदीवक्र गाळपेराच्या भूमीत स्फय या काठीच्या आधारे पेरणी करण्याचे आदिम शेतीतंत्र स्त्रियांनी दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

स्त्रीसत्तेतील लैंगिक श्रमविभागणीबरोबर

लिंगभावाची भूमिका कॉ. पाटील यांनी पुढे आणली. गण व जमात या संस्थांमधील फरक स्पष्ट करून कुल ही संस्था मातृसत्तेत तर वर्ण व गण या संस्था स्त्री सत्तेमध्ये उगम पावल्याचे त्यांनी सांगितले. स्त्रिया क्षेत्रीय वर्ण तर पुरुष हे ब्राह्मण वर्ण म्हणून गणाचे घटक असतात. मातृसत्ताक व स्त्रीसत्ताक गणात शोषण नसले तरी विषमता असते, स्त्री श्रेष्ठतेचे सूत्र विद्यमान असते असे निरीक्षण त्यांनी नोंदविले.

मातृसत्ता व स्त्रीसत्तेमधील फरक पाटील या अनुषंगाने लक्षात आणून देतात. त्यांच्या मते, मातृसत्तेत स्त्रिया पुरुषांपेक्षा श्रेष्ठ होत्या तर स्त्रीसत्तेत त्या संभाव्य राष्ट्री होत्या. मातृसत्तेत स्त्रियांचे श्रेष्ठत्व सुपीकता मायेतून (fertility magic) तर स्त्रीसत्तेत ते स्त्रियांच्या आर्थिक प्रभुत्वातून म्हणजे कृषीमायेतून प्रस्थापित झाले. कृषीमायेतून राजपद जन्माला आल्याचे फ्रेजरचे मत उचलून धरून स्त्रीसत्तेत राज्यसंस्था उदयाला आल्याचा सिद्धांत त्यांनी मांडला.

स्त्रीसत्तेत राजपद उदयाला आल्याच्या भूमिकेमुळे राज्यसंस्था ही वर्गोत्तर संस्था असून राजपद हे सत्ता अपहरणातून आले या एंगल्सच्या म्हणण्याला छेद बसला. वरकड निर्मिती होऊ लागल्यावर खाजगी संपत्तीचे तत्त्व उदयाला येऊन वर्गसंस्था उदयाला आली आणि त्यांनतर खाजगी संपत्तीच्या रक्षणासाठी राज्यसंस्था अस्तित्वात आली हे एंगल्सचे मत कॉ. पाटील यांनी स्त्रीसत्तेच्या संगतीच्या आधारे खोडून काढले आहे.

स्त्रीसत्तेच्या तांत्रिकी श्रुतीचा व निऋतीचा शोध जाणीव-नेणीव प्रमाणशास्त्राच्या आधारे पाटील यांनी लावला. निऋती ही स्त्रीसत्तेची आद्य राणी असल्याचे त्यांनी सांगितले. कुल मातेंच्या सभेचा विकास होऊन निऋतीला राष्ट्री म्हणून निवडण्यात आले. मातृसत्तेत 'सभ्य' म्हणजे सभेच्या सभासद केवळ स्त्रियाच असायच्या पण, स्त्रीसत्तेत समिती हे स्त्री-पुरुषांनी बनलेले दुसरे गृह निऋतीसारख्या राष्ट्रीने निर्माण केले असे त्यांनी स्पष्ट केले. आणि 'स्वातंत्र्य', 'समता' व 'मित्रता' हे शब्दही तांत्रिकी श्रुतीनेच निर्माण केल्याचे त्यांनी सांगितले.

कृषीमाया हे राजपदाचे मुख्य अधिष्ठान होते; त्यात उत्पादक तंत्र हे आशय (content) होते तर माया हे रूप होते असे सांगून उत्पादनतंत्रावरील स्त्रियांचे प्रभुत्व पाटलांनी अधोरेखित केले. निऋती, उर्वशीसारख्या स्त्रीसत्तेच्या राष्ट्री चौपटावर अक्ष फेकून गण जमिनीचे न्याय व समान वाटप करत हे त्यांनी दाखवून दिले. कृषीमायेचे रूप हे प्रायः अपेक्षित फलांच्या प्रक्रियेची नक्कल असल्याचे सांगून पृथ्वी हे स्त्रीतत्त्व व आकाश हे पुरुषतत्त्व म्हणून रचलेल्या सुपीकतेच्या मायेचे स्वरूप व तिचा स्त्रीसत्तेत झालेला विकास त्यांनी स्पष्ट केला. गीत, नृत्य वादन हे तांत्रिक मायेचे साधन असल्याचे त्यांनी सांगितले.

रूपाशयाच्या अशा द्वंद्वातून तांत्रिकी श्रुतीचा विकास निऋतीप्रणीत स्त्रीराज्यात झाला. मुक्त संभोग हे मातृसत्ता व स्त्रीसत्तेच्या जीवनपद्धतीचे वैशिष्ट्य होते. सक्त मातृवंशकतेतच समानतेची हमी होती. मातृसत्तेत व स्त्रीसत्तेत स्त्री श्रेष्ठत्वाचे तत्त्व जरी रूढ असले तरी सालोहित समता असल्यामुळे उच्च प्रकारची लोकशाही नांदत होती असा अभिप्राय कॉ. पाटील यांनी व्यक्त केला.

वैश्विक इतिहासाच्या पटावर स्त्रीसत्तेची ही जी मांडणी कॉ. पाटील यांनी केली ती प्राथमिक साम्यवादाच्या कल्पिताला अनुलक्षून केली. त्यांच्या मते, रशियातील समाजवादी क्रांती फसण्याचे कारण भांडवलदारी लोकशाही क्रांतीला परिणत होण्याचा वेळ न देता समाजवादी क्रांतीच्या वाटेने नेण्यात आले हे होय. मग असे का करण्यात आले? तर आधुनिक समाजवाद उत्पादन साधनांच्या सामाजिकीकरणातून आपोआप येईल या गृहीतकामुळे.

उत्पादन साधनांच्या सामाजिकीकरणातून समाजवाद आपोआप येईल हे गृहीतक प्राथमिक साम्यवादाच्या कल्पितावर बेतलेले असल्याचे कॉ. पाटील दाखवून देतात. 'दि ओरिजिन ऑफ दी फॅमिली, प्रायव्हेट प्रॉपर्टी अँड दी स्टेट' या एंगल्सच्या ग्रंथाच्या

आधारे स्टॅलिनने केलेले समाजवादी क्रांतीच्या अपरिहार्यतेचे समर्थन त्यांनी त्यामुळेच उद्धृत केले आहे.

गणसमाजाच्या कल्पितावर बोट ठेवताना कम्युनिस्टांच्या लोकशाहीबाबतच्या धारणेला त्यांनी लक्ष्य केले. गणसमाजाची लोकशाही आदर्श आणि नित्य मानून ती पुनरुज्जीवनवादी पद्धतीने स्वीकारली हे मार्क्सवादाने भांडवलशाहीबरोबर व्यक्तिस्वातंत्र्याधिष्ठित लोकशाहीची कल्पना नाकारण्यामागचे कारण असल्याचे त्यांनी सांगितले. आणि त्याबरोबर द्वंद्वात्मकता या मार्क्सवादी तत्त्वाचा अधिक्षेप करते म्हणूनही प्राथमिक साम्यवादाचे कल्पित कॉ. पाटील यांनी नाकारले. प्राथमिक साम्यवादामध्ये द्वंद्वात्मक विकासाचे तत्त्व गैरहजर असल्याचे सांगून स्त्रीसत्तेच्या काळातील द्वंद्वात्मकतेची संगती त्यांनी लावली. प्रायः स्त्री प्रधानतेमुळे व मुक्त कामचारामुळे स्त्रीसत्तेत निर्माण होणाऱ्या तणावांकडे त्यांनी लक्ष तर वेधलेच; पण त्याबरोबर कृषीमायेतील रूप-आशयाचे द्वंद्वही त्यांनी अधोरेखित केले.

कॉ. पाटलांनी रचलेला स्त्रीसत्तेचा इतिहासकाळ इतिहास विकासक्रमाची नवी आखणी करतो. एका बाजूला, तो मार्क्सवाद्यांचा साचेबंद इतिहास-विचार समाजवादी क्रांतीसाठी कसा बाधक ठरला हे सांगतो. तर दुसऱ्या बाजूला समकालीन समाजक्रांतीच्या उभारणीसाठीची तात्त्विक पायाभरणी तो करतो.

अर्थातच, कॉ. पाटलांच्या स्त्रीसत्तेच्या अशा संगतीमागे काही मर्यादाही आहेत. पहिले म्हणजे, इतिहासातील स्त्रीसत्तेचे अस्तित्व अनेक स्त्री मानवशास्त्रज्ञच अमान्य करतात. दुसरे, त्यांनी भाषाशास्त्रीय संगतीमधून आणि मिथक मीमांसेमधून मिळविलेली तथ्येही निर्विवाद स्वरूपाची नाहीत. आणि तिसरे, त्यांच्या अनुमानात्मक तथ्यांना व अन्वयार्थांना पुष्टी देणारे पुरेसे पुरातत्त्वीय व लिखित पुरावे त्यांना उभे करता आलेले नाहीत.

पण, त्यामुळे त्यांचे स्त्रीसत्तेचे सिद्धांतन अग्राह्य मानता येणार नाही. इतिहास स्थित्यंतरातील एका कालावकाशाची शक्यता म्हणून स्त्रीसत्तेचा विचार गांभीर्याने तपासण्याची गरज राहणार आहे. समकालीन समाजवास्तव उलगडण्यासाठी आणि विशेषतः समाज-क्रांतीच्या पेचांना भिडण्यासाठी स्त्रीसत्तेचे सिद्धांतन खचितच उपयोगाचे ठरणार आहे; पण इतिहासाला घडविणाऱ्या अनेक शक्ती व विचार लक्षात घेता स्त्रीसत्तेचा व तिच्या वारशाचा अतिविचार करणेही अनावश्यक ठरणारे आहे हे विसरून चालणार नाही.

४

मातृसत्ता ते स्त्रीसत्तेच्या स्थित्यंतरात सत्तेचे स्वरूप बदलत असले तरी उत्पादन तंत्रात क्रांतिकारी बदल घडत नव्हता. राजपद अस्तित्वात येणे, गण संघगणात विकसित होणे, सुपीकतेच्या मायेचे स्थान कृषीमायेने घेणे व एकगृही सभागृह द्विगृही होणे असे राज्यव्यवस्थेतले बदल जरी होत असले तरी उत्पादनतंत्रात फार बदल होत नव्हते. या पार्श्वभूमीवर भारतीय इतिहासातील पहिले संक्रमण स्त्रीसत्ता ते राजक असे असल्याचे कॉ. पाटील यांनी सांगितले.

स्त्रीसत्तेत स्फ्य वा टोकदार काठीच्या साहाय्याने स्त्रिया शेती करत असत; पण पुढे पशुशक्तीचा उपयोग करून नांगराने शेती करणे सुरु झाले आणि शेती पुरुषांकडे गेली. यातून उत्पादनवाढ तर झालीच; पण अधिक उत्पादनवाढीसाठी गणदास प्रथाही सुरू झाली. पर्यायाने उत्पादनतंत्र आमूलाग्रपणे बदलणारी पहिली समाजक्रांती राजर्षीसत्ताक गणदास प्रथेच्या रूपात झाल्याचे कॉ. पाटील यांनी जाहीर केले.

उत्पादनतंत्रातील या बदलांबरोबर स्त्रीसत्तेला पुरुषसत्तेचे आव्हान मिळू लागले. शेतीसाठी पाऊस पाडण्याची माया म्हणजे पौराहित्य करण्याचे जे काम स्त्रिया स्त्रीसत्तेत करत होत्या; वा ज्या कृषीमायेच्या आधारावर त्या श्रेष्ठ व सत्ताधारी बनल्या होत्या त्या कृषीमायेला पुरुषांनी या काळात स्वतःकडे घेतले. स्त्रीचे पौराहित्य कर्म काढून घेण्यामागचे उद्दिष्ट केवळ पाऊस पाडण्याची मायाशक्ती हस्तगत करणे एवढेच नव्हते तर

राष्ट्र गणभूमी व तिची उपज यांचे नियतकालिक वाटप करण्याचे राजकार्य हस्तगत करणेही होते. शेती पुरुषांकडे गेली, कृषीमायेवरचा ताबा मिळवून पुरुष राज्यकर्तेही बनले तरीही मातृवंशकतेचे तत्त्व मात्र या काळात कायम राहिल्याचे निरीक्षण त्यांनी या अनुषंगाने नोंदविले.

'दास' या शब्दाचा मूळ अर्थ अमित्र (शत्रू) वा परगणीय, मारून टाकायला व गुलाम करायला योग्य असा असल्याचे सांगून 'आत्म' व 'पर'भानाचे गतिशास्त्र गणदासप्रथेच्या संगतीमध्ये कॉ. पाटलांनी पुढे आणले. त्यांच्या मते, गणदास प्रथा राजर्षीसत्ताक संघगणांच्या उत्पादनसंबंधांचे सामाजिक रूप होते. की, ज्यात विजयी गण पराभूत गणाला शेतीश्रमासाठी गणदास म्हणून राबवून घेत होते.

स्वतः विकसित केलेल्या अब्राह्मणी अभ्यासपद्धतीच्या आधारे प्रागैतिहासिक काळातील पुरातत्त्वीय व लिखित साधनांना बोलतं करण्याचे कर्मकठीण काम कॉ. पाटलांनी केलेच; पण त्याद्वारा राजर्षीसत्ताक गणदासप्रथेचे संक्रमण लिंगभावाच्या विग्रहातून म्हणजे स्त्रीसत्ता विरुद्ध पितृसत्तेच्या संघर्षातून झाले आणि गणांच्या वर्चस्वप्राप्तीच्या संघर्षातून जन्माला आलेल्या गणदास प्रथेमधून झाल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

याच पद्धतीने म्हणजे उत्पादनतंत्र व उत्पादन संबंधातील बदलांच्या अनुषंगाने भारतीय इतिहासातल्या पुढच्या समाजक्रांत्यांची संगती कॉ. पाटील यांनी लावली. त्यांच्या मते, मातृवंशक गणदासप्रथेच्या तुलनेत पितृवंशक शूद्रप्रथेच्या द्वारा दुपटीने उत्पादन वाढविणारी समाजक्रांती रामाने केली. त्याने ताटका, शूर्पणखा शासित स्त्रीराज्ये नष्ट करून व रावणशासित मातृवंशक राजकाचा पराभव करणारी ही दुसरी समाजक्रांती घडविली. तर शेतीला उपयुक्त असलेले दास व जनावरे यांचा बेछूट संहार करणारे कर्मकांड व त्यासोबत ब्राह्मणवर्णाचे हितसंबध नाकारून व राजपदाला नष्ट करून भारताच्या पहिल्या दासप्रथाक अराजक (संघगणाची) स्थापना करणारी समाजक्रांती कृष्णाने केली.

राम व कृष्णाच्या समाजक्रांतीमागे पितृसत्तेची समाजशक्ती काम करत होती हे सांगताना दासप्रथेला अधिक कार्यक्षमतेने राबविण्याची व उत्पादनवृद्धी करण्याची कुवत मातृवंशक राजर्षीसत्ताक समाजापेक्षा पितृवंशक राजर्षीसत्ताक समाजात अधिक असल्याचे मत कॉ. पाटील यांनी नोंदविले. प्रायः सामाजिक द्वंद्वाच्या चौकटीत समाजक्रांतीची व्याख्या करून त्यांनी समाजक्रांतीच्या संक्रमणाची संगती सादर केली.

समाजाच्या उत्पादनाचा विकास करणाऱ्या साधनांचा व तज्जन्य उत्पादनसंबंधांचा पुरस्कार करणारा तो पुरोगामी आणि विरोध करणारा तो प्रतिगामी असे ठरवून 'प्रतिगामी वर्गाकडून पुरोगामी वर्गाकडे होणारे समाजाच्या सत्तेचे हस्तांतरण' अशी समाजक्रांतीची व्याख्या कॉ. पाटील यांनी केली. स्त्रीसत्ताक गणसमाजासाठी लढणारा परशुराम प्रतिगामी तर पितृवंशक राजर्षीसत्ताक दासप्रथाक समाजासाठी लढणारा राम पुरोगामी. आणि कर्मकांडी धर्माप्रीत्यर्थ शेतीउपयुक्त शेकडो जनावरांचा बळी देणाऱ्या दासप्रथा समाजासाठी लढणारे कंस, जरासंध, शाल्व, शिशुपाल आणि दुर्योधन प्रतिगामी, तर कर्मकांडविहीन अराजक संघगणासाठी लढणारे बलराम व कृष्ण पुरोगामी अशी संगती त्यांनी लावली.

५

'यादव कृष्ण संघगणाच्या आरंभापाशी तर शाक्य बुद्ध संघगणाच्या अंतापाशी उभा आहे' असे सांगून मावळत्या आणि उगवत्या समाजांमधील तणावांच्या रूपात बुद्धाने केलेल्या समाजक्रांतीचे संक्रमण कॉ. पाटील यांनी सादर केले. कृष्णाच्या काळात जन्मलेल्या अराजक संघगण-समाजाच्या अरिष्टाची कोंडी फोडून दासप्रथा व वर्णांताची समाजक्रांती गौतम बुद्धाने केली असा अन्वयार्थ त्यांनी त्यातून सादर केला.

मावळत्या आणि उगवत्या समाजातील तणावाची तर्कचौकट काळ, स्थळाचे एकवटीकरण तर करतेच; पण समाज अवस्थांच्या व संक्रमणांच्या प्रदीर्घ

कालपटांना गोठवून कार्यकारणसंबंधाच्या रचनेत उभे करते. त्यामुळे बुद्धानंतर शेकडो वर्षांनंतर जन्मलेल्या जातीसमाजाला कॉ. पाटील यांनी बुद्धाच्या क्रांतीची उपज मानले. मार्क्सवादी सिद्धांतनामध्ये अनुभवपूर्व तर्कांची जी योजना काम करते तिला अंगीकारल्यामुळे त्यांची अशी संगती उभी राहिली आहे.

बुद्धाचा काळ व जातीसमाजाचा काळ यांना क्रांती व प्रतिक्रांतीच्या विलग वर्णनबंधात डॉ. आंबेडकरांनी उभे केले. बुद्ध क्रांतीची व जातीसमाजाकडे नेणाऱ्या प्रतिक्रांतीची समाजप्रक्रिया वेगवेगळी असल्याचे त्यांनी सांगितले. कारणसंबंधाची बाब म्हणून दबा धरून बसलेल्या ब्राह्मणी शक्तीने बुद्धकालीन क्रांतीला दिलेल्या प्रतिगामी प्रतिक्रियेची उपज असा बुद्धक्रांतीचा जातीसमाजाशी संबंध त्यांनी जोडला.

याउलट बुद्धाच्या क्रांतीचा परिणाम म्हणून जातीसमाज उदयाला आल्याचे पाटलांनी सांगितले. बुद्धक्रांती व जातीसमाज या दरम्यान दोन विभिन्न समाजप्रक्रिया कार्यरत होत्या असे न मानता जातिव्यवस्थाक उत्पादन पद्धतीकडे जाणारी एक सलग समाजसंक्रमण प्रक्रिया म्हणून या कालपटाकडे त्यांनी पाहिले. बुद्धाचा धर्म हा उत्पादनशक्तीचा धर्म होता तर ब्राह्मणी धर्म उत्पादनसंबंधाचा धर्म होता या तार्किक चौकटीत त्यांनी जातीसमाजाच्या प्रदीर्घ संक्रमण प्रक्रियेला बुद्धाच्या क्रांतीशी थेटपणे जोडले.

मार्क्सवादी इतिहासलेखनाच्या परंपरेत उभे राहूनच बौद्ध काळाची संगती कॉ. पाटलांनी लावली. बौद्ध काळात लोखंडी नांगराच्या वापरातून आणि कारागिरीच्या विकासातून झालेली उत्पादनवाढ, शहरांचा उदय, व्यापाराचा विस्तार अशा भौतिक बदलांना मार्क्सवादी संशोधनातून उद्धृत करतानाच समाज बदलांमधली बुद्धविचारांची भूमिकाही त्यांनी त्याआधारे पुढे आणली. मात्र मार्क्सवादी इतिहासाचे असे अनुसरण करताना त्यातील मर्यादांनाही त्यांनी लक्ष्य केले.

अंगभूत अशा सैद्धांतिक मर्यादांमुळे बुद्धाच्या समाजक्रांतीचे आकलन मार्क्सवादी इतिहासकारांना झाले नसल्याचे मत त्यांनी मांडले. त्यांच्या मते, 'अफूच्या गोळीच्या एकांगी कल्पनेमुळे धर्माचा सामना प्रतिधर्माने होतो' या वास्तवाकडे मार्क्सवाद्यांचे दुर्लक्ष झाले आणि एकांगी वर्गवादाच्या दुराग्रहामुळे वर्ण-जातीचे गतिशास्त्र समजून घेण्याची गरज त्यांना वाटली नाही. अशा सैद्धांतिक दुराग्रहामुळे बुद्धाच्या समाजक्रांतिकारी विचार व व्यवहाराचे स्वरूप मार्क्सवाद्यांना कळले नाही. म्हणून बुद्धाला ते सुधारक ठरवत राहिले.

सामाजिक कलहाचा अंत करण्यासाठी गौतम बुद्धाने प्रवज्जा घेतली ही आंबेडकरांनी लावलेली संगतीही त्यांनी प्रश्नांकित केली. प्रेतयात्रा, रोगी, जराजर्जर मनुष्य पाहिल्याने बुद्धाला विरक्ती प्राप्त झाली ही पारंपरिक बौद्ध धम्माची संगती आंबेडकरांप्रमाणेच त्यांनीही नाकारली. मात्र शाक्य व कोलिय गणांमध्ये रोहिणी नदीच्या पाण्यावरून झालेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर शाक्य गणसंघात जे मतभेद झाले त्यातून बुद्धाने प्रवज्जा घेतली या आंबेडकरांच्या संगतीला त्रिपिटकात आधार मिळत नसल्याचे त्यांनी सांगितले. बुद्धाच्या प्रवज्जानंतर म्हणजेच १२ वर्षांनी बुद्धाने समाजक्रांती केल्याचे सांगून बुद्धाच्या समाजक्रांतीचे स्वरूप डॉ. आंबेडकरांनाही उलगडता आले नसल्याचा दावा त्यांनी केला.

बुद्धाच्या समाजक्रांतीचे स्वरूप उलगडण्यासाठी त्यांनी प्रायः मेंढक श्रेष्ठीच्या मिथकाचा अन्वयार्थ कॉ. पाटील यांनी लावला. मगध राज्यातील मेंढक गहपतीच्या अतिमानुषी शक्तीविषयीचे मिथक बुद्धाने ऐकले. मेंढकाचे धान्याचे कोठार आकाशातून वृष्टी होऊन भरते. दास व कर्मकरांना जेवण वाढूनही त्याच्या पत्नीच्या थाळीतले अन्न संपत नाही. वेतन द्यायला बसल्यावर त्याच्या मुलाची कार्षापणाची थैली रिकामी होत नाही. त्याच्या पुण्णक नावाच्या दासाने नांगराची एक कीर टाकली की सात कीर आपोआप पडतात.

मेंढकाच्या या जादूच्या मिथकाचा उलगडा तत्कालीन वर्णदासप्रथाक संघगण अरिष्टग्रस्त झाल्याच्या पार्श्वभूमीवर कॉ. पाटलांनी केला. त्यांनी त्यातून तीन

प्रमुख निष्कर्ष काढले. एकतर, मेंढक श्रेष्ठीने दासांना मुक्त करून वेतन कर्मकर केले. दुसरे, त्यातून त्याचे शेती उत्पादन सात पटीने वाढले आणि तिसरे, दास्यांताचा हा कार्यक्रम बुद्धाने मेंढकासारख्या कस्सक गहपतीकडून घेतला व सार्वत्रिक केला.

प्रबोधन हे समाजक्रांतीचे मौलिक हत्यार असल्याचे कॉ. पाटलांचे मत आहे. दास्यांत व वर्णांताच्या समाजक्रांतीसाठी मने तयार करायचे प्रबोधन बुद्धाने केले असा त्यांचा अभिप्राय आहे. त्रिपिटकातील क्रांतिकारी पंच्चधम्माचा व सुधारणावादी पंच्चधम्माचा बुद्धाने दिलेला कार्यक्रम कॉ. पाटील यांनी त्या अनुषंगाने उद्धृत केला. तुमच्या दासाला वय व शक्तीनुसार काम द्या, त्याला तुम्ही खाता ते अन्न द्या, त्याला सुट्या द्या, आजारी पडल्यास त्याची शुश्रूषा करा, त्याला सहामाही वेतन व धान्य रोखीत द्या असा पंच्चधम्माचा क्रांतिकारी कार्यक्रम रुजवून दास्यांताची व वर्णांताची समाजक्रांती बुद्धाने केल्याचे पाटील यांनी स्पष्ट केले.

दास्यांत व वर्णांत करणाऱ्या बुद्ध क्रांतीच्या परिणामातून जातीसमाज उदयाला आल्याचे सांगताना जाती संक्रमणाच्या काही प्रक्रिया त्यांनी नोंदविल्या. एकतर गण ते जाती असा दा. ध. कोसंबीनी दाखविलेला जातीउद्भवाचा क्रम त्यांनी स्वीकारला आणि त्या क्रमात खुदकश्त वरचढ शेतकरी जातीच्या उदयाची प्रक्रिया त्यांनी विशद केली.

दुसरे म्हणजे, वर्णव्यवस्थेच्या अंतानंतर चातुर्वर्ण्य नवनव्या जाती-जमातींना सामावून घेणारी चौकट बनली. त्यात 'अनिरवसित' व 'निरवसित' म्हणजे गावात राहणारे शूद्र आणि बहिष्कृत शूद्र अशी जातीविभाजनाची प्रक्रिया कार्यरत झाली. जमाती जातिव्यवस्थेत येणे आणि त्यातील काहींचे अवनतीकरण होऊन गावकुसाबाहेर ढकलले जाणे अशी जातीविभाजनाची प्रक्रिया तुर्कागमनापर्यंत चालू राहिली.

तिसरे म्हणजे, राज्यकर्त्या जातींनी वतनी वा जागिरी जमिनी व ब्रह्मदेये व अग्रहार (धार्मिक इनामे) देण्यास सुरुवात केल्यापासून सामंतीकरणाची प्रक्रिया गतिमान झाली. दा. ध. कोसंबीनी प्रस्तावित केलेल्या खालतून व वरतून सामंतशाहीच्या प्रारूपात ती विकसित झाल्याचे कॉ. पाटील यांनी स्पष्ट केले. यात शेतकरी जातीचे वतनदार त्यांच्या शेतकरी भाईंपासून वेगळे झाले व ते सामंताचा दुय्यम विभाग बनले तर शेतमजुरांबरोबर शेतकरी जाती शूद्र स्थानी पोहोचल्या.

चौथे म्हणजे, सामंती व्यवस्थेत शासकवर्ग शेतकरी, कारागीर व अतिशूद्रांच्या श्रमांनी निर्माण झालेले वरकड महसूल रूपात वसूल करून पदसोपानानुसार परस्परांत वाटून घेत असतो हे सांगून उत्पादनपद्धती, उत्पादन संबंध आणि वरकड अपहरणाची व्यवस्था म्हणून भारतीय सामंतशाही जात्याधिष्ठित व्यवस्था म्हणूनच विकसित झाल्याचे कॉ. पाटील स्पष्ट केले.

बुद्धानंतर जाती उत्पत्तीस शेकडो वर्षे लागल्याची नोंद करूनही जातीसमाजाच्या संक्रमणाची सुरुवात बुद्धाच्या क्रांतीपासून झाल्याचे मत कॉ. पाटलांनी व्यक्त केले. त्यांच्या मते, दास्यांत घडवून जे अर्धस्वातंत्र्य बुद्धाच्या समाजक्रांतीने दिले त्यातून जातीसमाजाकडे नेणारे संक्रमण गतिमान झाले. हे संक्रमण प्राग्सामंतशाही आणि सामंतशाहीच्या वाटांनी जातीसमाजाप्रत पोहोचले.

याउलट, बुद्धाच्या क्रांतीला पुष्यमित्र शुंगाच्या प्रतिक्रांतीने खंडित केल्याचे डॉ. आंबेडकरांनी सांगितले. क्रांती व प्रतिक्रांती हे भिन्न कालपट मानून प्रतिक्रांतीला जातीसमाजाचे कारण म्हणून आंबेडकरांनी जबाबदार धरले. पुष्यमित्र शुंगाने ब्राह्मणी पुनरुज्जीवनवादाची प्रतिक्रांती केली अशी नोंद कॉ. पाटलांनी केली. मात्र, उत्पादनपद्धतीच्या चौकटीत इतिहासकाळ बांधण्याच्या मार्क्सवादी भूमिकेतून त्यांनी प्रतिक्रांतीला क्रांतीमधला खंड मानले नाही. क्रांती आणि प्रतिक्रांतीच्या प्रदीर्घ प्रक्रियांना जातीसमाजाच्या घडणीचा सलग काळ म्हणून पाहिल्याने बौद्ध क्रांतीला जातीसमाजाच्या कारण संबंधांशी जोडणारी विसंगत संगती कॉ. पाटील यांनी लावली.

एका बाजूला, बौद्ध धम्माच्या वर्णांतवादी व

जात्यंतवादी तत्त्वज्ञानाचे सूक्ष्म तपशील कॉ. पाटील यांनी सांगितले; इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर बौद्ध पंथ व उपपंथाने जातिव्यवस्थेला वैमनस्याभावी विरोध केल्याचे दाखविले. तर दुसऱ्या बाजूला, बुद्धाने जातीसमाजाचे प्रबोधन केल्याचे सांगितले. एका बाजूला, व्यक्ती म्हणून बुद्ध आणि विचारशक्ती म्हणून धम्माची समाजक्रांतीमधील भूमिका पुढे आणली आणि आर्थिक निर्धारणवादाची चौकट उल्लंघली तर दुसऱ्या बाजूला बुद्ध क्रांतीलाच जातीसमाजाचे कारण मानले आणि जातीच्या उत्पादनवृद्धीवर बोट ठेवून निर्धारणवादाचे सूत्र कॉ. पाटील यांनी पुढे चालविले.

६

ऐतिहासिक संक्रमणाची कोणतीही चर्चा त्यामागच्या कारण-सूत्रांचा शोध घेत पुढे जाते. या पार्श्वभूमीवर बहुप्रवाही ऐतिहासिक भौतिकवादाचा पुकारा करत ऐतिहासिक संक्रमणामागच्या कारण-सुत्रांना शोधण्याचे काम कॉ. पाटलांनी केले. मार्क्सवादाच्या एकेरी वर्गवादाला तर त्यांनी नाकारलेच; पण लिंगभाव, वर्ण, गण, जात अशा प्राचीन भारतातील संस्थांना शोषण-शासनाच्या संस्था ठरवून त्यांचा कारण-सूत्रामध्ये त्यांनी समावेश केला.

इतिहास संक्रमणातील कारण-सूत्रांची संगती लावताना उत्पादन तंत्रातील बदलांना त्यांनी मध्यवर्तीत्व दिले; पण मानवी आत्मनिष्ठकर्त्याची (human subject) आणि विचारसरणीची भूमिका त्यांनी त्यामध्ये महत्त्वाची मानली. मार्क्सवादाचा पाया-इमला सिद्धांताच्या मर्यादेत न अडकता भौतिक पायामध्येच क्रियाशील असलेल्या सामाजिक-सांस्कृतिक-वैचारिक घटकांना कारण-सूत्रांमध्ये त्यांनी स्थान दिले.

मानवी आत्मनिष्ठकर्त्याच्या घडणीतील आर्थिक घटकांचे महत्त्व त्यांनी नाकारले नाही. आत्मनिष्ठ कर्ता इतिहासाच्या स्थळ व काळाने बद्ध असतो अशी भूमिका त्यांनी घेतली. व्यक्तीचे वा समूहाचे 'स्व'त्व व कर्तेपण प्रवाहित करणारे सत्तासंबंध त्या-त्या काळातील स्त्रीसत्ता, पितृसत्ता, वर्णव्यवस्था व जातिव्यवस्थेच्या भौतिक तसेच भाषिक, सांस्कृतिक व वैचारिक पायावर आकाराला आलेले असतात असे त्यांनी सांगितले.

वस्तुगत वास्तव व्यक्तीच्या जाणिवेत प्रतिबिंबित होते आणि विचारात रूपांतरित होते ही प्रतिबिंबवादाची धारणा अधोरेखित करत प्रतिबिंबवादी प्रमाणशास्त्र हीच मार्क्सवादाची मर्यादा असल्याचा दावा कॉ. पाटील यांनी केला. मार्क्सवादाच्या या प्रतिबिंबवादी प्रमाणशास्त्राच्या आधारे समाजवादी क्रांतीची कोंडी सोडवता येत नसल्याचे सांगून बौद्धवादाच्या जाणीव-नेणीवकेंद्री प्रमाणशास्त्राचा अंगीकार त्यांनी केला.

केवळ जाणिवेच्या अंगाने नव्हे, तर जाणीव व नेणिवेच्या द्वंद्वातून मानवी आत्मनिष्ठ कर्ता व त्याची/तिची कृतिशीलता समजून घेण्याची भूमिका त्यांनी घेतली. इतिहासाची लिखित, अलिखित साधने असोत, त्यातील शब्द, प्रतीके व प्रतिमा असोत, व्यक्ती वा समूहाचे सार्वकालिक कर्तेपण असो त्यांचे परिशीलन व अर्थनिर्णयन जाणीव-नेणीवकेंद्री प्रमाणशास्त्राच्या पर्यायाने अब्राह्मणी अभ्यासपद्धतीच्या आधारे करण्याचा पायंडा त्यांनी रूढ केला.

इतिहासाच्या कालक्रमाचा जो तर्क कॉ. पाटलांनी रचला त्यात शासन-शोषणाच्या विशिष्टतेने बद्ध अशा कालखंडांना उत्पादनतंत्राच्या विकासक्रमात उभे करण्यात आले. पूर्वकालखंडातील शासन-शोषण संबंधाची व उत्पादनाची कोंडी फोडून उत्पादन तंत्र व शासन-शोषण संबंधाच्या बदलाचा, उत्पादनवृद्धीचा उत्तर कालखंड येतो असे त्यात गृहीत धरण्यात आले. अर्थातच तथ्यांचा शोध घेऊन, निगमन तर्काच्या आधारे परिशीलन व संश्लेषण करून कालक्रमाच्या या गृहीतकाला सिद्ध करण्याचा प्रयत्न कॉ. पाटील यांनी केला.

कॉ. पाटलांच्या कालक्रमाच्या कल्पनेत अनेक गृहीतके गुंतलेली आहेत. उदा- लिंगभाव-वर्ण-जात-वर्ग अशा शोषण-शासनसंबंधांचे तणाव इतिहासाच्या त्या-त्या टप्प्यावर समाजव्यवस्थेला वळण देतात आणि समाजक्रांती घडवतात. एका समाजक्रांतीमधून आकाराला आलेली समाजव्यवस्था काळाच्या ओघात

अवरुद्ध होते आणि ती अवरुद्ध समाजव्यवस्था नष्ट करूनच उत्पादनवाढ करणारी नवी समाजक्रांती होत असते.

कालानुक्रमाला आधारभूत असणारी अशी गृहीतके बहुप्रवाही ऐतिहासिक भौतिकवाद, जाणीव-नेणीवकेंद्री प्रमाणशास्त्र व ब्राह्मणी-अब्राह्मणी संकल्पना चौकट यांच्या सिद्धांत-व्यूहातून कॉ. पाटलांनी निष्पन्न केली. सिद्धांतव्यूहाचा भाग म्हणून ती जरी अनुभवपूर्व संश्लेषक विधानांच्या रूपात येत असली तरी त्याला इतिहासमीमांसेची पर्यायाने निगमन तर्काच्या आधारे अनुभवोत्तर निष्कर्षांच्या रूपात त्यांनी उभे केले आहे.

कॉ. शरद पाटील यांनी भारतीय इतिहासाची संगती प्रायः ब्राह्मणी-अब्राह्मणी परंपरेच्या द्वंद्वाद्वारे लावली. त्यांच्या मते, ब्राह्मणी-अब्राह्मणी परंपरा भारतातील इतिहास बदलणाऱ्या विचारशक्ती वा समाजशक्ती होत. स्थळ-काळाच्या विशिष्ट संदर्भात कार्यरत असलेल्या वर्ण, गण, लिंग, जात, वर्ग अशा बहुपेढी विग्रहांना त्या परस्परविरोधी छावण्यात एकवटतात. आणि विरोधातून व समन्वयातून एकमेकांना पालटत त्या इतिहासाला वळण देतात, असे मत त्यांनी प्रतिपादले.

७

वसाहतकाळातील वर्गीय संक्रमणाबाबत पोथीनिष्ठ मार्क्सवादाशी असलेले आपले मतभेद कॉ. शरद पाटील यांनी जाहीर केले. वर्ग ही शासन-शोषणाची वैश्विक संस्था मानून वसाहतपूर्व काळात भारतात वर्गीय शोषण कार्य करत असल्याचा पारंपरिक मार्क्सवाद्यांचा दावा त्यांनी खोडून काढला. वसाहतपूर्वकाळात भारतात वर्ग नव्हते; तर वर्ण, जाती, पितृसत्ता या शोषण-शासनाच्या संस्था म्हणून कार्यरत होत्या असे मत त्यांनी प्रस्थापित केले.

वसाहतवादाबरोबर भारतात भांडवली स्थित्यंतर घडून वर्ग दाखल झाले अशी संगती त्यांनी लावली. त्यामुळे मध्ययुगात जाऊन सरंजामशाही ते भांडवलशाही या संक्रमणाचा शोध घेण्याची गरज त्यांना पडली नाही. भारतातील संक्रमण सरंजामी जातिव्यवस्था ते भांडवली वर्गसमाज असे असल्याचे सांगून त्याचा शोध वसाहतकाळाच्या इतिहासमीमांसेआधारेच त्यांनी घेतला.

जगाचा इतिहास वर्गसंघर्षाचा असल्याचे सांगून सर्व समाजक्रांत्यांची व त्यामधील संक्रमणाची वर्गविग्रहाच्या आधारे संगती लावण्याच्या मार्क्सवादी भूमिकेला कॉ. पाटील यांनी छेद दिला. एकतर बहुप्रवाही ऐतिहासिक भौतिकवादाचा सिद्धांत मांडून एकांगी वर्गवादाला त्यांनी नाकारले. तर दुसरे म्हणजे, जातिव्यवस्था ही उत्पादनपद्धती (mode of production) असल्याचे सिद्ध करून भारतातील जातीसंघर्षाचा इतिहास त्यांनी पुढे आणला. तिसरे म्हणजे, विग्रहाच्या चौकटीत एकाचे अस्तित्व म्हणजे दुसऱ्याचा अभाव हा तर्क नाकारत वसाहतकाळात भांडवली उत्पादनपद्धत भारतात आली असली तरी जातिव्यवस्थाक उत्पादन पद्धत टिकून राहिली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

वसाहतकाळात जातिव्यवस्थाक उत्पादनपद्धतीवर भांडवली उत्पादनपद्धतीचे कलम झाल्याचे सांगून जातीच्या पायावरच भारतात वर्गव्यवस्था उदयाला आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. वर्गाच्या विरोधात जातीची व्याख्या जरी पाटील यांनी केली असली तरी जात आणि वर्गाला केवळ परस्परउच्छेदक स्वरूपात त्यांनी पाहिले नाही. शोषण-शासनाच्या आंतरिक संबंधांच्या आधारे या दोन संस्थांतील अनुबंध त्यांनी अधोरेखित केले.

ब्रिटिश साम्राज्यवादाच्या बाजारसंबंधांमधून जातीमध्ये वर्ग उदयाला आले. ग्रामीण शेतीव्यवस्थेत सावकार, जमीनदार व शेतकरी असे वर्गस्तर जातीच्या चौकटीतच आकाराला आले. आणि भांडवली उत्पादनसंबंधातून जातीमधून भांडवलदार व कामगारवर्ग उदयाला आले. परंपरेने व्यापार करणाऱ्या बनिया जातींमधूनच भारतातला भांडवलदार वर्ग उदयाला आला. पारंपरिक बुद्धिजीवी जातीमधून इंग्रजी शिक्षित बुद्धिजीवी म्हणजे नवा अभिजनवर्ग उदयाला आला.

भांडवली उद्योगांमधील कामगार भरती जातीच्या आधारावरच होत राहिली. शुद्ध-अशुद्ध श्रमभेदाच्या आधारेच कामगारवर्गांमध्ये अस्पृश्य जातींना प्रवेश देण्यात आले.

भारतातील वर्गोद्भवाच्या प्रक्रियेचे असे सूक्ष्म तपशील देत देत जातिव्यवस्थाक उत्पादनसंबंध भांडवलशाहीच्या वर्गीय स्थित्यंतराला कसे आकार देत राहिले याचे स्पष्टीकरण कॉ. पाटील यांनी केले. भांडवलशाहीच्या वर्गीय स्थित्यंतरात जातीची उत्पादनपद्धती, उत्पादन संबंध आणि विनिमय संबंध राहिल्याचे सांगून वर्गोद्भवानंतरचे भारताचे वास्तव जात-वर्गीय वास्तव असल्याचे पाटील यांनी जाहीर केले.

भारतातील वर्गीय संक्रमणाबाबत पाटलांची संगती वेगळी असल्यामुळे कम्युनिस्ट पक्षाच्या अधिकृत भूमिकेबरोबर त्यांचा संघर्ष होणे अपरिहार्य होते. भांडवली उद्योगाच्या विस्तारातून (वर्गसंघर्षामधून) जाती आपोआप नष्ट होतील (या मार्क्सच्या १८५२ च्या भारतासंबंधातल्या नोंदीला अनुलक्षून निर्माण झालेल्या) कम्युनिस्ट पक्षाच्या धारणेला त्यांनी त्यामुळे लक्ष्य केले. पक्षाच्या एकांगी वर्गसंघर्षाच्या धोरणावर त्यांनी टीका तर केलीच; पण त्यामागे असलेल्या सैद्धांतिक दुराग्रहांवरही हल्ला चढवला.

वर्ग हा आर्थिक पाया व जात इमला या सिद्धांताआधारे एकांगी वर्गसंघर्षाचा आग्रह धरला जात असल्यामुळे जात हा भारतीय समाजवास्तुचा पाया असल्याचा युक्तिवाद त्यांनी एका बाजूला केला. तर दुसऱ्या बाजूला कॉ. बसवपुन्नया यांच्या वर्गविग्रह हाच शत्रुभावी विरोध असल्यामुळे त्याचीच सोडवणूक क्रांतिकारी पद्धतीने होऊ शकते या युक्तिवादाचे त्यांनी खंडनही केले. कोणतेही सामाजिक विग्रह हवाबंद नसतात असे सांगत अशत्रूभावी विरोध शत्रूभावी तर शत्रूभावी विरोध अशत्रूभावी होऊ शकतात असे प्रतिपादन माओचा हवाला देऊन त्यांनी केले. इंग्लंडमधील भांडवलदार व कामगार यांच्यातील शत्रूभावी वर्गविग्रह भारतीय वासाहतिक शोषणाच्या संदर्भात मित्रभावी बनतो हे स्पष्ट करत जातीच्या शत्रूभावी विरोधाला अधोरेखित केले आणि जातीविग्रहाच्या क्रांतिकारी सोडवणुकीची म्हणजे जात्यंताच्या लोकशाही क्रांतीची भूमिका त्यांनी प्रस्तावित केली.

मार्क्सवादाच्या चिंतनपरंपरेत राहूनच जात्यंताच्या लोकशाही क्रांतीची भूमिका त्यांनी मांडली. आणि त्या अनुषंगाने कम्युनिस्ट पक्षाच्या कर्मठ धारणांना लक्ष्य केले. कमी उत्पादक समाजव्यवस्थेला नष्ट करत अधिक उत्पादक समाजव्यवस्थेकडे नेणाऱ्या विकासक्रमानुसार युरोपात प्राचीन गुलामगिरी ते सरंजामशाही आणि सरंजामशाही ते भांडवलशाही असा समाजक्रांतीचा क्रम जसा उभा राहतो त्याप्रमाणे वर्णांताच्या समाजक्रांतीनंतर जात्यंताच्या व त्यानंतर वर्गान्ताच्या समाजवादी क्रांतीचा क्रम भारतात उभा राहतो असे त्यांचे प्रतिपादन राहिले.

मार्क्सवादी इतिहासविचाराच्या आधारेच जात्यंताच्या लोकशाही क्रांतीचा अग्रक्रम कॉ. पाटील यांनी निष्पन्न केला. जातीसंघर्षाचे तत्त्व त्यांनी अंगीकारले असले तरी एकांगी जातीसंघर्षाचा मार्ग जात्यंताकडे नेणार नाही असे सांगत जातीलढ्यांचा आग्रह धरणाऱ्या फुले-आंबेडकरवादी पक्ष-संघटनांवर त्यांनी टीकाही केली. शोषित-अंकित जातींमध्ये उच्च वर्ग निर्माण झाला असून उच्च जातीवर्गाबरोबर त्याचे बहुस्तरसत्ताक शासन चालू आहे. त्यामुळे जात-वर्गीय संघर्षाची एकजूट करण्याचे आवाहन त्यांनी डाव्या व फुले-आंबेडकरी पक्ष-संघटनांना केले.

जात्यंताच्या लोकशाही क्रांतीची कॉ. पाटील यांची कल्पना एका तत्त्वसमुच्चयाच्या रूपात पुढे येते. त्यात समाजबदलाचा शास्त्रीय क्रम म्हणून प्रथम लोकशाही क्रांती आणि नंतर वर्गान्ताची समाजवादी क्रांती असा मार्क्सवादाने उभारलेला क्रम येतो. जातिव्यवस्थेच्या शासन-शोषणातून मुक्तता हा स्वातंत्र्याचा अर्थ त्यात मध्यवर्ती होतो. त्या अनुषंगाने बहुप्रवाही ऐतिहासिक भौतिकवादी इतिहासविचाराची सूत्रे त्यात येतात. मार्क्सवादाबरोबर फुले-आंबेडकरवादाची तत्त्वदृष्टी येते. आणि पुढे ज्याला

त्यांनी सौत्रान्तिक मार्क्सवाद म्हटले त्याची प्रमेये येतात.

मार्क्सवाद-फुले-आंबेडकरवादाच्या समन्वित तत्त्वचौकटीत जात्यंताची भूमिका कॉ. पाटील यांनी उभी केली. एका बाजूला, बहुप्रवाही ऐतिहासिक भौतिकवादाचे परिमाण घेऊन जातीला भौतिक व्यवस्था म्हणून नष्ट करण्याची भूमिका त्यांनी त्यात घेतली. आणि दुसऱ्या बाजूला, फुले-आंबेडकरवादाच्या मुशीत जातीला शोषण-दमनाची सामाजिक-सांस्कृतिक-मानसिक व्यवस्था समजून जाती निर्मूलनाची भूमिकाही त्यांनी घेतली. त्यातून जात्यंताच्या सर्वंकष क्रांतीची अनेक परिमाणे आकाराला आली.

जात्यंताच्या लोकशाही क्रांतीचा अग्रक्रम मांडताना वर्गान्ताच्या समाजवादी क्रांतीतला अडथळा म्हणून जातीला नष्ट करण्याचा आंबेडकरांनी मांडलेला विचार त्यांनी वेळोवेळी उद्धृत केला आहे. जात्यंताच्या क्रांतीची व्यूहरचना म्हणून आंबेडकरांची व्यूहरचनाच त्यांनी उद्धृत केली आहे. दलित म्हणजे पूर्वास्पृश्य जाती जात्यंताच्या क्रांतीचे धुरीणत्व करतील. आदिवासी जमाती, भटक्या विमुक्त जाती-जमाती, इतर मागास जाती असे सामाजिक सर्वहारा आणि कामगार, शेतकरी असे आर्थिक सर्वहारांच्या मित्रशक्तीच्या आधारे जात्यंताची क्रांती ते करतील अशी व्यूहरचना त्यांनी मांडली आहे.

मार्क्सवाद-फुले-आंबेडकरवादाच्या प्रकाशात जात्यंताच्या लोकशाही क्रांतीची कार्यक्रमपत्रिकाही त्यांनी घडविली. जात-पितृसत्तेमध्ये पायाभूत असलेल्या जमीनमालकीचा व तद्जन्य शोषण-शासन संबंधांचा विनाश करणाऱ्या जमिनीच्या फेरवाटपाची योजना त्यातून त्यांनी पुढे तर आणलीच; पण जात-पितृसत्तेला नष्ट करणारा सर्वंकष कायदा करण्याची मागणीही त्यांनी पुढे आणली.

आंबेडकरांची साक्ष काढून जात्यंतासाठीच्या प्रबोधनाची भूमिकाही त्यांनी प्रस्तावित केली. प्रबोधन म्हणजे निव्वळ भाषणबाजी नव्हे, तर जाणीव-नेणिवेचे परिवर्तन करणे होय असे सांगत नेणिवेतूनही जात नाहीशी करण्याचे उद्दिष्ट प्रबोधनाच्या योजनेत त्यांनी गुंतवले. ब्राह्मणी व अब्राह्मणी परंपरांमधील ऐतिहासिक संघर्ष उकलून दाखवत दास्यांत व वर्णांत घडवणाऱ्या बुद्धाच्या प्रबोधनाचा आदर्श त्यांनी पुढे आणला. फुले-आंबेडकरांच्या प्रबोधनाला नकारात्मक ठरवत विधायक अब्राह्मणी प्रबोधनाची भूमिका त्यांनी प्रस्तावित केली. जाणीव-नेणिवेच्या तळापर्यंत पोहोचणारे प्रबोधन उभारण्यासाठी सौंदर्यशास्त्राचा मूलगामी वेध त्यांनी घेतला आणि सौत्रान्तिक विज्ञानवादाच्या मदतीने अब्राह्मणी सौंदर्यशास्त्रही त्यांनी सिद्ध केले.

९

कॉ. शरद पाटील यांनी जो इतिहासविचार मांडला त्यातून समाजबदलाचा एक क्रम आणि गतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळ यांना जोडणाऱ्या समाजगतीचे सूत्र पुढे आले. आणि त्या सूत्रानुसार जात्यंताची लोकशाही क्रांती भारतात अपूर्ण राहिली आणि तिची पूर्ती केल्यावर भविष्यात समाजवादी क्रांती करता येईल अशी संगती पुढे आली. अखंडितपणे चाललेल्या ब्राह्मणी विरुद्ध अब्राह्मणी या संघर्षातून भारतात वर्ण, जात वर्ग अशी स्थित्यंतरे झाली असली तरी जात-वर्गीय तणावांची क्रांतिकारी सोडवणूक करण्याची म्हणजे जात्यंताची लोकशाही क्रांती करण्याची जबाबदारी अपूर्ण राहिलेली आहे असे त्यांचे प्रतिपादन राहिले.

जात्यंताची समाजक्रांतीसाठी समकालीन संक्रमणाचा वेध घेण्याचा प्रयत्न कॉ. पाटील यांनी सातत्याने केला. जात-वर्ग-लिंगभावात्मक अन्वेषण पद्धतीचा पाया घालून भारतातील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक राजकीय अशा सर्व प्रकारच्या स्थित्यंतरांचा धांडोळा त्यांनी पेश केला. ब्राह्मणी, भांडवली राजकारणाचा, त्यामागील समाजशक्तीचा उलगडा करत साम्यवादी, समाजवादी अशा वर्गवादी चळवळीची आणि दलित-बहुजन अशा जातीआधारित चळवळीची परखड मीमांसा त्यांनी केली.

समकालीन जागतिक स्थित्यंतराचा मागोवा घेत

सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक घटितांची मूलाग्रही चिकित्सा करत समकालीन साहित्य, संस्कृती, सौंदर्यशास्त्र यांची घनघोर समीक्षा करत समकालीन सामाजिक संक्रमणाची दिशा स्पष्ट करत क्रांतिकारी तत्त्वज्ञानातील कुंठा दूर करत क्रांतिकारी हस्तक्षेपाची गरज कॉ. पाटील यांनी सातत्याने प्रतिपादली. क्रांतिकारी तत्त्वज्ञान व कार्यक्रमपत्रिकेच्या अभावात केलेला हस्तक्षेप क्रांतीला दूर नेतो असे सांगत 'माफुआ' वा सौत्रान्तिक मार्क्सवादाची सापेक्षत: नवे क्रांतिकारी तत्त्वज्ञान म्हणून घोषणा त्यांनी केली. जात्यंताची समाजक्रांती उंबरठ्याबाहेर आहे असे सांगत जात्यंताच्या बाजूने समाजशक्ती उभारण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

वर्गसंघर्षाच्या सूत्राआधारे समकालीन सामाजिक स्थितिगतीचे निदान मार्क्सवादी इतिहासविचार करतो; समाजप्रक्रिया समाजगती यांचा वेध घेत समकालीन संक्रमणाचे भाकीत तो करतो. तर जातीसंघर्षाच्या सूत्राआधारे सामाजिक स्थितिगतीचे निदान आणि समकालीन संक्रमणाचा वेध फुले-आंबेडकरवाद घेतो. तर कॉ. शरद पाटील यांचे 'माफुआ'चे तत्त्वज्ञान वर्ण-जाती-लिंगभाव-वर्ग अशा बहुपेढी संघर्षाच्या सूत्राआधारे समाजस्थिती, समाजप्रक्रिया, समाजगती यांचे निदान व समकालीन संक्रमणाचे भाकीत करते. आणि जात-वर्ग-लिंगभावात्मक द्वंद्वाच्या आधारे समाजस्थितीचा वेध घेत क्रांतीबरोबर प्रतिक्रांतीचेही भाकीत करते.

खरेतर, फ्रान्सच्या समकालीन संक्रमणात क्रांतीची शक्यता आजमावताना प्रतिक्रांतीचे पहिले निदान कार्ल मार्क्सने केले. क्रांतीला उलट दिशेने नेणारी समाजप्रक्रिया म्हणून प्रतिक्रांतीची व्याख्या त्याने केली. क्रांतीतला अडथळा, क्रांतीचे नकाराकरण या चौकटीत प्रतिक्रांतीचे अनेक अर्थ मार्क्सवादी चर्चाविश्वात पुढे रचले गेले. त्यात पिसाळलेल्या भांडवलशाहीचे प्रगट रूप म्हणून फॅसिस्ट राजवटीला प्रतिक्रांती ठरविण्यात आले.

डॉ. आंबेडकरांनीही क्रांती व प्रतिक्रांतीचे प्रतिमान प्राचीन भारताचे इतिहासलेखन करताना वापरले. ब्राह्मणी व बौद्ध धर्म व परंपरांमधील जीवघेणा संघर्ष मांडताना ब्राह्मणी प्रतिक्रांतीचे निदान त्यांनी केले. बौद्ध समाजक्रांतीचे तत्त्वज्ञान घेऊन जात्यंताच्या लोकशाही क्रांतीच्या दिशेने वाटचाल करताना ब्राह्मणी-भांडवली प्रतिक्रांतीची शक्यता त्यांनी वर्तवली. हिंदू बहुसंख्यांकवादाच्या रूपात येऊ घातलेल्या प्रतिक्रांतीच्या विरोधात लढण्याचे आवाहन दलित-बहुजनांना त्यांनी केले.

जात्यंतासाठी कम्युनिट पक्षात आंतरिक संघर्ष करणाऱ्या कॉ. पाटील यांनी भारतात येऊ घातलेल्या ब्राह्मणी-फॅसिस्ट संकटाचे अचूक भाकीत केले. १९७८ च्या जनता पक्षाच्या राजवटीच्या पार्श्वभूमीवर जेव्हा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली फॅसिस्ट प्रतिक्रांतीची शक्यता अधिकृतपणे वर्तवित होता तेव्हा जनता पक्षाचा भाग असलेला पूर्वाश्रमीचा जनसंघ आणि आर. एस. एस. या प्रतिगामी शक्ती भारतात ब्राह्मणी-फॅसिस्ट प्रतिक्रांती करतील असे भाकीत कॉ. पाटील यांनी केले.

भारतातल्या ब्राह्मणी-फॅसिस्ट प्रतिक्रांतीचे भाकीत कॉ. शरद पाटील यांना अचूकपणे करता आले याचे मुख्य कारण म्हणजे, फुले-आंबेडकरवादी तत्त्वज्ञानाचा त्यांचा व्यासंग, त्यातून आलेले जातीसंघर्षाचे भान, ब्राह्मणी विरुद्ध अब्राह्मणी संघर्षाच्या प्रवाहात समकालीन जात-वर्गीय संघर्षाची त्यांनी उभारलेली समज, ब्राह्मण्यवादाच्या व भांडवलशाहीच्या आंतरिक संबंधाची त्यांना असलेली जाण हे होय.

आधुनिक भारताच्या समाजप्रक्रियांमध्ये विद्यमान असलेली फॅसिस्ट प्रतिक्रांतीची पाळेमुळे डॉ. आंबेडकरांनी हुडकून काढली होती. प्राचीन भारतातील बौद्ध क्रांतीच्या विरोधात झालेल्या ब्राह्मणी प्रतिक्रांतीचे स्वरूप त्यांनी समोर आणले. प्रतिक्रांतीच्या प्रमुख समाजप्रक्रिया त्यांनी अधोरेखित केल्या. ब्राह्मणांच्या वर्चस्वाची व प्रभुत्वप्राप्तीची प्रक्रिया, जातिव्यवस्थाक पितृसत्तेच्या उदय व स्थिरीकरणाची प्रक्रिया व शूद्र व

स्त्रियांच्या अवनतीची प्रक्रिया यांचे विवर्ण करत ब्राह्मणी प्रतिक्रांतीचे स्वरूप त्यांनी विशद केले.

बौद्ध क्रांती व ब्राह्मणी प्रतिक्रांती असे भारतीय इतिहासातील समाजबदलाचे दोन कालपट क्रांती-प्रतिक्रांतीच्या प्रतिमानाच्या आधारे आंबेडकरांनी स्थापित केले. बौद्ध क्रांतीच्या उलट दिशेने घेऊन जाणारी नकारात्मक समाजप्रक्रिया म्हणून प्रतिक्रांतीचे चित्रण त्यांनी केले. भारतीय इतिहासाचा अन्वयार्थ बौद्ध व ब्राह्मणी धर्म व परंपरांच्या वैमनस्याभावी विरोधाच्या संबंधात त्यांनी प्रस्थापित केला.

युरोपातील फॅसिस्ट प्रतिक्रांतीचा तत्त्वज्ञ असलेल्या नित्शेच्या आधारे ब्राह्मणी प्रतिक्रांतीमागचे मानसिक गतिशास्त्र त्यांनी स्पष्ट केले. नित्शेने गौरवलेला 'सुपरमॅन' गंड प्रतिक्रांतीमधील ब्राह्मण मक्तेदारीच्या व वर्चस्व प्राप्तीच्या प्रेरणेमागचे प्रमुख सूत्र असल्याचे त्यांनी सांगितले. सुपरमॅन म्हणजे वर्चस्वाची वा स्वामित्वाची तीव्र ओढ असलेला अहंम. अशा प्रकारे त्याची वाढ झालेली असते की, तो वर्चस्वप्राप्तीसाठी न्याय व चांगुलपणाची चाड ठेवत नाही. चांगुलपणालाच घाबरणारी व परतत्त्वाच्या बाबतीत दानवाप्रमाणे वागायला तयार असणारी ती अहंता असते.

प्रतिक्रांतीमधील ब्राह्मणांच्या सुपरमॅन गंडाचे दर्शन आंबेडकरांनी घडविले. ब्राह्मणांनी राजहत्येचा व राज्य करण्याचा अधिकार बळकावला, प्रशासकीय व धार्मिक सत्तेवर मक्तेदारी मिळवली, अन्य वर्णाचे अधिकार कमी करून सर्वाधिकार प्रस्थापित केले, अमानुषपणे स्त्री-शूद्रांचे अवनतीकरण केले, दान-दक्षिणेच्या व भूमिदानाच्या आधारे भौतिक सत्तेचे केंद्रीकरण स्वजातीठायी केले, स्वजातीठायी देवत्व स्थापित करून अन्य जातीयांचे जगण्याचे, व्यक्तीपणाचे अधिकार नाकारले. यातून सुपरमॅन गंड कसा काम करतो हे आंबेडकरांनी स्पष्ट केले.

ब्राह्मणांची पुरुषी अहंता सुपरमॅन गंडाच्या रूपातच काम करते, वर्चस्वप्राप्तीसाठी स्त्रियांचे ती अवनतीकरण करते. भारतात जात उदयाला आली ती स्वगटात विवाह करण्याचा निर्बंध स्त्रियांवर लादत. स्त्रियांना अधीन व अवनत करत. त्यातूनच स्त्रियांच्या लैंगिक नियंत्रणाचे तत्त्व स्त्रियांचे दास्य आणि पर्यायाने जाती अस्तित्वासाठी आधारभूत बनले. भारतात सर्वप्रथम ब्राह्मणांनी स्वजातीला बंदिस्त करून स्त्रीदास्याच्या पायावर जातीचा पाया घातला. ब्राह्मण जातीच्या अनुकरणातून जातिव्यवस्था उदयाला आली आणि पुढे अनुकरणाच्या संसर्गाने ब्राह्मणांच्या अहंतेमध्ये मुरलेल्या सुपरमॅन गंडाचे कमी-अधिक प्रक्षेपण सर्व जातींत होत राहिले. स्वहिताचा विचार करताना कोणतीही जात न्याय व चांगुलपणाची चाड त्यामुळेच आजही बाळगताना दिसत नाहीत.

प्रतिक्रांतीच्या समाजप्रक्रियेने उभारलेले श्रेणीबद्ध विषमतेचे तत्त्व जातिव्यवस्थेसाठी आधारभूत ठरले. शुद्धी-अशुद्धी, श्रेष्ठता-कनिष्ठता, स्वामित्व-दास्यता या अक्षावर जाती-जातींमधील वर्चस्व व अंकिततेच्या संबंधांची श्रेणीबद्धता घडविण्यात आली. भौतिक शासन शोषणामध्येही हे श्रेणीबद्ध विषमतेचे तत्त्व मध्यवर्ती राहिले. आंबेडकर सांगतात, 'श्रेणीबद्ध विषमतेच्या तत्त्वाने भारतीय समाजाला अपंग बनवले; जातिव्यवस्थेविरुद्धच्या असंतोषाला संघटित होऊ दिले नाही. त्यामुळेच जातिव्यवस्थेविरोधातले परिणामकारक बंड भारतात आकार घेऊ शकले नाही.'

आंबेडकरांनी सत्तेचे भौतिक, सामाजिक व धार्मिक असे तीन आधार मानून प्रतिक्रांतीच्या समाजप्रक्रियेचे विश्लेषण केले. मनुस्मृतीच्या अनुषंगाने ब्राह्मणी धर्माने शिक्षा देणारी दमनकारी न्यायसत्ता (juridical power) व वळण लावणारी शिस्तनिर्धारक मानसिकसत्ता (disciplinary power) कशी प्रवाहित केली याचे विवेचन केले. त्यानुसार द्विज व शूद्र वर्ण यांना पालक पाल्य संबंधात उभे करून शूद्रांचे अंकितीकरण करण्यात आले. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या वर्णांना पालक म्हणून सार्वभौम आत्मनिष्ठ-कर्ते (subject) बनवले तर शूद्र वर्णाला पाल्य म्हणून अंकित, दास्यत्वभावी व्यक्तित्वाच्या अधिकारापासून

वंचित असे आत्मनिष्ठ-कर्ते (subject) बनविण्यात आले. एका बाजूला पाशवी शक्तीच्या आधारे शूद्राला कठोर शिक्षा देऊन वर्णजातीच्या नियमांचे पालन करण्यास बाध्य करण्यात आले. तर दुसऱ्या बाजूला, रोजच्या व्यवहारातील संबंधांचा सामाजिक प्रतीकात्मक व्यवहार, धार्मिक कर्मकांड यांच्या अनुपालनाच्या शिस्तनिर्धारक सत्तेच्या आधारे त्यांचे अंकितीकरण करण्यात आले.

जातीच्या उतरंडीत परत्वतत्त्वाच्या संदर्भात म्हणजे शुद्धी-अशुद्धी, श्रेष्ठता-कनिष्ठता, स्वामित्व व अंकिततेच्या चौकटीत जातीचे आत्मभान उभे करण्यात आल्यामुळे शूद्राचा संपत्तीसंचय ब्राह्मण जातीसाठी दु;खाचे कारण बनला हे आंबेडकरांनी स्पष्ट केले. त्यामुळे शूद्रांना संपत्ती संचयाच्या, व्यक्तित्वाच्या अधिकारापासून व शिक्षणाच्या अधिकारापासून वंचित करून अक्षय दास्याच्या गर्तेत लोटण्यात ब्राह्मणांनी स्वतःचे हित मानले.

दलितांच्या अत्याचाराचे मूळही मनुस्मृतीच्या दंडसंहितेमध्येच असल्याचे आंबेडकरांनी सांगितले. मनूने दलितांना अस्पृश्यतेच्या खुणा धारण करण्यास बाध्य केले. दलितांची अशुद्धी, कनिष्ठता, दास्य वरिष्ठ जातीयांच्या शुद्धतेशी, श्रेष्ठता व स्वामित्वाशी त्याने अशा विरोधात्मक पद्धतीने जोडली की दलितांनी अस्पृश्यतेच्या खुणा धारण करण्यास नकार देणे अधर्म वाटेल, वरिष्ठ जातीयांना स्वत:चा अपमान वाटेल. आणि दलितांना वळण लावणारी वा धडा शिकवणारी हिंसा त्यांना धर्म्य वाटेल व स्वसन्मान रक्षणासाठीचे कर्तव्य वाटेल. अशाप्रकारे मनुस्मृतीमध्ये स्थित असलेल्या दलित अत्याचाराच्या प्रेरणा अधोरेखित करत दलित अत्याचाराचा सामाजिक अंमल कायदेविहिनतेचा कायदा म्हणून आंबेडकरांनी व्याख्यांकित केला.

ब्राह्मणी प्रतिक्रांतीने ज्या ब्राह्मण्यवादी अहंतेला प्रवाहित केले तिने न्याय व चांगुलपणाची कसलीच चाड बाळगली नाही. आंबेडकर सांगतात त्याप्रमाणे 'बळकावण्याचे राजकारण' हाच तिचा मंत्र बनला. स्वातंत्र्य, समता व बंधुतेला नाकारत धर्मसत्ता, राजसत्ता, अर्थसत्ता व समाजसत्ता यांच्यामार्फत बळकावण्याचे राजकारण या अहंतेने प्रतिष्ठित केले. स्त्रिया व शूद्रातिशूद्र जातींना संपत्तीविहिन अधिकारविहिन, अधीन व अवनत केले. सद्यःकाळ हा ब्राह्मणी प्रतिक्रांतीचाच काळ असल्याचे 'क्रांती व प्रतिक्रांती' या ग्रंथाच्या आराखड्यातून सांगत वर्तमानकाळात विद्यमान असलेला ब्राह्मणी प्रतिक्रांतीचा विचार व वारसा आंबेडकरांनी अधोरेखित केला आहे.

११

कॉ. अंकुश कदम हे कॉ. शरद पाटील यांचे अनुयायी आहेत. मार्क्सवाद-फुले आंबेडकरवादाची बांधिलकी पत्करून दोन दशकांपेक्षा अधिक काळ जात-वर्ग-स्त्रीदास्यंताच्या चळवळीत सहभाग देत आहेत. क्रांतिकारी तत्त्वज्ञान व व्यवहार यांचा सांधा जोडून जात्यंताच्या राजकीय व सांस्कृतिक चळवळीचे धुरीणत्व करत आहेत. विचारवंत कार्यकर्त्यांच्या भूमिकेतून ज्ञान, साहित्य, संस्कृती, शिक्षण व समाजकारण या क्षेत्रांमध्ये सक्रिय योगदान देत आहेत.

शोषित-अंकित जातवर्गाची लढाई लढताना समकालीन संक्रमणाला भिडण्याचा प्रयत्न त्यांनी सातत्याने केला. जात-वर्ग-लिंगभावलक्ष्यी अभ्यासपद्धतीच्या आधारे समकालीन संक्रमण समजून घेऊन त्यात क्रांतिकारी हस्तक्षेप करण्याची धडपड केली. आणि त्याचेच फलित म्हणून त्यांनी वेळोवेळी लिहिलेल्या लेखांचा संग्रह 'हस्तक्षेपाच्या कणखर भूमीतून' आपल्या समोर येत आहे.

या लेखसंग्रहात अनेक विषय हाताळण्यात आले आहेत. त्यात साहित्य, संस्कृतीची, माध्यम जगताची समीक्षा, निवडणूक निकालाचे समालोचन, डाव्या, दलित चळवळीची व राजकारणाची मीमांसा, कोविडची साथ व तिचे परिणाम, हिंदू राष्ट्रवादाची चिकित्सा असे अनेक विषयांवरचे प्रसंगोत्पात लिहिलेले लेख आहेत. त्यात प्रायः केंद्रात भाजपाचे सरकार आल्यावर घडणाऱ्या ब्राह्मणी फॅसिस्ट संक्रमणाचा वेध घेण्यात आला आहे.

विशेषतः भारतीय लोकशाहीतील घातक स्थित्यंतराचा सूक्ष्म लेखाजोखा त्यात देण्यात आला आहे. राष्ट्रीय चळवळीत झालेल्या विधायक वाद-संवादातून पुढे आलेल्या आणि स्वतंत्र भारताचा आधार बनलेल्या भारताच्या संकल्पनेला नाकारल्याचा आणि त्याऐवजी हिंदू बहुसंख्याक भारताची संकल्पना नवा भारत म्हणून पुढे आणण्याचा आलेख त्यात आहे.

या ब्राह्मणी फॅसिस्ट सत्तासंक्रमणात भारतीय घटनेच्या मूळ गाभ्यालाच लक्ष्य केले गेले. संघराज्याची तत्त्वप्रणाली विशेषतः सत्ता विभाजनाचे सूत्र नाकारून केंद्रीय सत्ता बळकट बनविली गेली. घटनेने दिलेल्या अभिव्यक्तीस्वातंत्र्याची गळचेपी करून लोकशाहीचे आधारस्तंभ असलेल्या माध्यमांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले गेले. माध्यमाच्या क्षेत्रातल्या अशा गंभीर बदलांची दखल अंकुश कदम यांनी आपल्या लेखांतून घेतली आहे.

भारतात माध्यमांचा चव्हाटा निम्न जातींसाठी कधी खुला नव्हता. वासाहतिक भारत असो की स्वतंत्र भारत तो कधीच सार्वजनिक नव्हता. माध्यमे ही मुळात ब्राह्मणी-भांडवली मक्तेदारीचीच बाब राहिली. आजही प्रिंट व इलेक्ट्रॉनिक अशा दोन्ही माध्यमांमध्ये ब्राह्मण बुद्धिजीवींचीच सरशी राहिली आहे. माध्यमांच्या या वास्तवस्थितीकडे अंकुश कदम यांनी आपल्या लेखातून लक्ष वेधले आहे.

भारतात प्रिंट माध्यमांच्या उदयापासून जे ब्राह्मण वर्चस्व राहिले त्याला सत्यशोधक दलित पत्रकारांनी माध्यमांचा प्रतिचव्हाटा निर्माण करून उत्तर दिले. महात्मा फुले यांनी स्त्री-शूद्रातिशूद्रांच्या प्रतिनिधित्वाचा, ज्ञानात अनुपस्थित असलेल्या स्त्री-शूद्रातिशूद्रांच्या अनुभवाचा मुद्दा उपस्थित करून वर्तमानपत्राच्या चळवळीला चालना दिली. तर कृष्णराव भालेकर, नारायण मेघाजी लोखंडे अशा सत्यशोधक पत्रकारांनी व शिवराम जानबा कांबळे व किसन फागुजी बनसोडे अशा दलित पत्रकारांनी वर्तमानपत्र चालवून शूद्रातिशूद्रांचे दु;खे वेशीला टांगली. आरंभिक सत्यशोधक व दलित पत्रकारितेची संगती सादर करत डॉ. आंबेडकरांच्या 'मूकनायक' वर्तमानपत्रामधील पत्रकारितेला कदम यांनी आदर्श म्हणून उभे केले आहे. शोषित-अंकित जातवर्गांच्या हितासाठी झटणाऱ्या पत्रकारांची व पर्यायी माध्यमाची आवश्यकता त्यातून त्यांनी अधोरेखित केली आहे. जातीअंताला बांधील पर्यायी माध्यमाचा विचार विस्तारण्यासाठी 'मूकनायक पारितोषक' पत्रकारांना देण्याचा उपक्रम हे हा लेख लिहिण्याचे खास प्रयोजन.

भाजपाच्या या राजवटीत स्वतंत्र माध्यमांविरोधात एक दमनतंत्र विकसित करण्यात आले. जनहिताची बाजू घेणाऱ्या स्वतंत्र बुद्धीच्या पत्रकारांना धमकावून, त्यांच्यावर देशद्रोही व अर्बन नक्सल असल्याचे आरोप करून, त्यांना ट्रोल करून, त्यांच्या चौकशा लावून, विविध कायद्यांच्या आधारे तुरुंगात टाकून, ब्राह्मणी फॅसिस्ट राजवटीने एका बाजूला माध्यमांचे स्वातंत्र्य नष्ट केले. तर दुसऱ्या बाजूला प्रिंट, इलेक्ट्रॉनिक व सोशल मीडियावर राजसत्तेचे नियंत्रण लादून, सरकारी जाहिरातींचा घसघशीत मलिदा चारून भांडवलदार मित्रांकडून मीडिया खरेदी करून शरणागत व लाचार व स्तुतिपाठक गोदी मीडियाला जन्म दिला आणि सरकारचा व हिंदुत्वाचा प्रचार करणारी एकमुखी यंत्रणा म्हणून तिला स्थापित केले. लोकशाहीचा गळा घोटणाऱ्या या बदलांचा साक्षेपी आढावा घेतानाच जनप्रतिकारातून उभ्या राहिलेल्या ट्रॉली टाईम्स या प्रतिमीडियाची दखल कॉ. कदम यांनी घेतली आहे. भाजप सरकारच्या तीन अधम कायद्यांविरोधात शेतकऱ्यांनी जे राष्ट्रव्यापी आंदोलन केले त्याला बळजोरीने मोडून काढण्याचा प्रयत्न सरकारने केला. गोदी मीडियाने शेतकरी आंदोलनाविरोधात एकतर्फी प्रचाराची राळ उठवली. त्याविरोधात आंदोलक शेतकऱ्यांनीच उभारलेल्या ट्रॉली टाईम्सचा विधायक प्रतिकार कदम यांनी अधोरेखित केला. पर्यायी माध्यमाच्या उभारणीतून ब्राह्मणी फॅसिस्ट सत्तेविरोधात झुंज देण्याची ईर्ष्या त्यांनी गौरवली आहे.

साहित्य संस्कृतीच्या क्षेत्रातील ब्राह्मणी फॅसिस्ट

राजकारणालाही कदम यांनी लक्ष्य केले आहे. यवतमाळ मधील ९२ व्या मराठी साहित्यसंमेलनात उद्घाटनासाठी निमंत्रित असलेल्या नयनतारा सहगल यांच्या भाषणात केंद्र सरकारवर टीका असल्यामुळे त्यांचे आमंत्रण रद्द करण्याचा निर्णय आयोजकांनी घेतला. त्यावरचा लेख कदम यांनी संग्रहात समाविष्ट केला आहे. फुले-आंबेडकरांनी सुरू केलेल्या साहित्य संस्कृतीच्या पर्यायी राजकारणाची कास पकडूनच ब्राह्मणी फॅसिस्ट शक्तींचा मुकाबला करता येईल असा विश्वास त्यांनी त्यातून व्यक्त केला आहे.

साहित्य संस्कृतीच्या लढ्यात प्रतीकांच्या राजकारणाचे महत्त्व कदम यांनी अधोरेखित केले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रतीक ब्राह्मणी शक्तींच्या ताब्यात गेल्याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे. महात्मा फुले यांनी 'कुळवाडीभूषण' म्हणून शिवाजी महाराजांचा पोवाडा लिहिला. गोविंद पानसरे यांनी 'रयतेचा राजा' म्हणून शिवाजी महाराजांचे चरित्र लिहिले. 'शिवाजी महाराजांचे खरे शत्रू कोण ब्राह्मणी की महंमदी?' या पुस्तकातून कॉ. शरद पाटील यांनी शिवाजी महाराजांना जातीविरोधी लढ्यातील अब्राह्मणी प्रतीक म्हणून पुढे आणले. असा ज्ञानव्यवहार असतानासुद्धा शिवाजी महाराजांचे प्रतीक त्यांच्या वारसदारांनी जाती अस्मितेच्या व प्रादेशिक मर्यादांमध्ये बंदिस्त केले. त्यामुळे शिवाजी महाराजांच्या प्रतीकाच्या आधारे शोषणमुक्तीच्या लढाईत अग्रेसर होण्याची संधी वारसदारांनी गमावली ही वेदना त्यांनी आपल्या लेखातून व्यक्त केली आहे.

कोविड संकट, सरकारने घोषित केलेला लॉकडाऊन, रस्त्यावरून पायी गावी जाणारे श्रमिकांचे तांडे, आरोग्य सेवेची कमतरता, गंगेत तरंगणारी प्रेते, सरकारची अभूतपूर्व बेपर्वाई यांचा लेखाजोखा कदम यांनी कोविडवरच्या लेखांतून मांडला आहे. कोविड साथीचे परिणाम दलितांना व दलित स्त्रियांना कसे भोगावे लागले याचे सूक्ष्म विवेचन त्यातून त्यांनी केले आहे. ब्राह्मणी फॅसिस्ट राजवटीचे जनविरोधी रूप त्यातून साधार स्पष्ट झाले आहे.

आपल्या स्फुट लेखातून दलित अत्याचाराच्या प्रश्नाला कॉ. अंकुश कदम भिडले आहेत. जागतिकीकरणाच्या काळात दलित अत्याचाराची संख्या कमी झाली नाही. उलट भाजपाच्या राजवटीत ती अधिकच वाढली असे निरीक्षण त्यांनी नोंदविले. वर्चस्वशाली जातींची जातीश्रेष्ठत्वाची भावना भाजपाच्या विजयाने वाढीस लागल्याने दलितांच्यावरचे अत्याचार वाढले असा त्यांचा निष्कर्ष आहे.

हिंदू बहुसंख्याकवाद केवळ मुस्लिमांच्या परकेपणावर उभा राहत नाही तर दलित परत्वाच्या वा द्वेषाच्या आंतरिक सूत्रावर तो आधारलेला असतो. त्यात प्रभुत्वशाली जातींची श्रेष्ठता जातीउतरंडीत दलित जातींच्या हीनतेशी बांधलेली असते. त्यामुळे दलितांची समतेची व आत्मसन्मानाची मागणी, प्रभुत्वशाली जातींना अपमानजनक वाटते. दलितांना धडा शिकवणे आणि जातीउतरंडीचे रक्षण करणे यात त्यांना मर्दुमकी वाटते. वळण लावण्यासाठी हिंसा करणे त्यांना धर्म्य व नैतिक वाटते. त्यामुळे दलितांवर अत्याचार करण्याच्या इरेला त्या पडतात. परिणामी, दलित अत्याचाराचा अंमल ज्याला आंबेडकर कायदेविहीनतेच्या कायद्याचा अंमल म्हणतात तो काम करू लागतो. वर्गोन्नतीने जातीला छेद दिला नाही तर जातीश्रेष्ठत्वाच्या भावनेलाच चालना दिली. त्यामुळे जागतिकीकरणाच्या वर्गीय स्थित्यंतराने दलित अत्याचारात वाढ केलेली पाहायाला मिळते. ग्रामीण भारतातल्या वर्गोन्नत शेतकरी जातींमध्ये दलित द्वेषाच्या जोरावर स्वजातीश्रेष्ठत्वाचा दंभ पोसण्याची प्रवृत्ती वाढलेली दिसते. वर्गोन्नत असो की वर्ग-अवनत प्रभुत्वशाली जाती स्वजातीच्या राजकीय प्रभुत्वाचा दावा म्हणून दलित अत्याचार वाढताना दिसतात.

जागतिकीकरणाने दलित स्त्रियांच्या अत्याचारांत वाढ झाली याची नोंद कॉ. कदम यांनी केली. जातीचे सामाजिक अवलंबित्व, अधीनता यातून दलित स्त्रियांची सावजस्थिती घडली. त्यातच जागतिकीकरणातील

वाढत्या दारिद्र्याने दलित स्त्रियांचा श्रम-बाजारातला, सार्वजनिक अवकाशातला वावर वाढवला. त्यामुळे आश्रयदात्या व स्वामित्वभावी प्रभुत्वशाली जातींच्या आक्रमक आणि मुजोर पुरुषी भावनेला त्या सहज बळी पडल्या.

दलितांवरच्या वाढत्या अत्याचारामुळे जात्यंताच्या लोकशाही क्रांतीची केलेली कोंडी कदम यांनी अधोरेखित केली. दलित व शेतकरी जातीची एकजूट जात्यंताच्या व्यूहरचनेचा भाग आहे, ब्राह्मणी-भांडवलशाही विरुद्धच्या लढाईत शोषण-शासनाने गांजलेले जातीवर्ग एकत्र येणे आवश्यक आहे. मात्र, दलित अत्याचारांमुळे त्यांच्यातील शत्रूभावी विरोध वाढत जातो आणि जात्यंताच्या लोकशाही क्रांतीच्या व्यूहरचनेसमोर पेच उभा राहतो असे प्रतिपादन कदम यांनी केले आहे.

डाव्या व दलित चळवळीची मीमांसा करताना आत्मटीकेचा पवित्रा कदम यांनी स्वीकारला आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने फुले-आंबेडकरांचे राजकीय तत्त्वज्ञान स्वीकारले; पण काँग्रेस व भाजपा अशा राज्यकर्त्या पक्षांबरोबर दाता-आश्रित संबंधात स्वतःला बांधून घेतले. एकांगी जातीकेंद्री राजकारणाची कास पकडून  राजकीय सौदेबाजीचाच मार्ग प्रशस्त केला आणि फुले-आंबेडकरवादी तत्त्वज्ञान आणि कार्यक्रमपत्रिकेपासून फारकत घेतली.

दलित मध्यमवर्गाच्या आत्मकेंद्रित वृत्तीमुळे दलित चळवळीच्या पतनाला अधिकच गती दिली. दलितांमधील  मध्यमवर्ग हा आत्मकेंद्री व सुखलोलुप राहिला. दलित चळवळीला स्वोन्नतीचे साधन मानल्यामुळे राजकीय तडजोड व भ्रष्टाचार त्याला कधी असंगत वाटला नाही. फुले-आंबेडकरांच्या जात्यंताच्या मार्गापेक्षा राजकीय सत्ताप्राप्तीचा मार्ग त्याने इष्ट मानला. ब्राह्मणी-भांडवलशाहीशी संघर्ष करण्यापेक्षा जाती अस्मितेच्या संकुचित डबक्यात बुडी मारण्यात त्याने स्वारस्य दाखविले. दलित चळवळीला अराजकीय बनवून परिणामहीन बनविण्यात दलित मध्यमवर्गाची महत्त्वाची भूमिका राहिली.

अशाप्रकारे दलित चळवळीचे साचलेपण कदम यांनी वेळोवेळी उघड केले. कम्युनिस्ट झाल्यामुळे मी अस्पृश्यांसाठी अस्पृश्य झालो हा अण्णा भाऊ साठे यांच्यावर लिहिलेला लेख दलित चळवळीतल्या कम्युनिस्ट विरोधावर बोट ठेवतो. तर्कदुष्टपणे कम्युनिस्ट द्वेष करून दलित चळवळीने सत्ताधारी जातवर्गाची पाठराखणच केली असे सांगितले आणि त्याबरोबर दलित चळवळीतील गांधीद्वेषही गैरलागू असल्याचे कदम यांनी सांगितले. गांधीचे व्यापक राजकारण व समाजपरिवर्तनातील भूमिका समजून न घेता गांधींचा द्वेष करण्यातून त्यांना मानणाऱ्या निम्न जात-वर्गांना दलित चळवळीने अंतर दिले आणि ब्राह्मणी फॅसिस्ट शक्तीच्या विरोधात एकजूट घडविण्यात अडथळा निर्माण केला.

डाव्या कम्युनिस्ट चळवळीवरही कदम यांनी कटाक्ष टाकला आहे. गौरी अम्मा व अण्णा भाऊ साठे यांच्यावरच्या लेखातून कर्मठ मार्क्सवादाच्या वर्गवादाला त्यांनी लक्ष्य केले आहे. दलित जातीत जन्माला आलेली आणि कम्युनिस्ट चळवळीत झोकून दिलेली ही दोन प्रतिभावंत व कर्तबगार व्यक्तित्वे. त्यांच्या अपूर्व कर्तृत्वामुळे ती अजरामर झाली आहेत. मात्र तरी ही दोन व्यक्तित्वे तौलनिकदृष्ट्या दुर्लक्षित का राहिली? याचा ऊहापोह त्यांनी या लेखातून केला आहे. जातीप्रश्नाकडे दुर्लक्ष करण्याच्या कम्युनिस्ट चळवळीच्या प्रवृत्तीवर त्यांनी त्यातून बोट ठेवले आहे.

१२

'माफुआं'चा इतिहासविचार आत्मसात केल्यामुळे समकालीन फॅसिस्ट संक्रमणांच्या सूक्ष्मतांना भिडणे कॉ. कदम यांना सहजशक्य झाले आहे. ब्राह्मणवादाची विचारसरणी व सांस्कृतिक यंत्रणा, समकालीन समाजातील ब्राह्मणवादाची भूमिका, भांडवलशाहीबरोबरचे तिचे आंतरिक संबंध, प्रभुत्वप्राप्तीचे तिचे राजकारण, तिने सुरू केलेल्या जमातवादी राजकारणाच्या पोटात असलेले जात-

पितृसत्ताक प्रभुत्वाचे राजकारण या सर्वांची नीट उकल कदम यांनी केली आहे आणि त्यामुळेच अब्राह्मणी विचारपरंपरेच्या कणखर भूमीवर उभे राहून हस्तक्षेपाच्या राजकारणाची भूमिका आपल्या लेखसंग्रहांतून त्यांनी जाहीर केली आहे.

औद्योगिक भांडवलशाहीचे शासन-शोषण जातीच्या स्वामी-सेवक संबंधावर उभे राहिल्याने भांडवलशाहीचा ब्राह्मणवादाशी निकटचा संबंध राहिला. वसाहतकाळातील व्यापारी, भांडवलदार जातवर्ग ब्राह्मणवादाच्या चौकटीतच आत्मशोध करू लागला. परोपकाराचे कार्य म्हणून गोरक्षण व मंदिर उभारणीचे काम तो करू लागला. अनेक व्यापारी, भांडवलदार सुरुवातीपासून हिंदू महासभा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे समर्थक राहिले.

ब्राह्मणवाद जसा भांडवलदारांच्या आत्मकल्पनेत स्थिरावला तसा मध्यमवर्गाच्या आत्मकल्पनेतही स्थिरावला. वर्गीय श्रेष्ठत्वाचे निदर्शक म्हणून पाश्चात्त्य संस्कृतीच्या अनुकरणाबरोबर ब्राह्मण जातीच्या अनुकरणाचा मार्ग त्यांनी अंगीकारला. वर्गोन्नत जातींना जात्युन्नतीची ओढ लागल्याने मध्यमवर्गीय राहिवासात ब्राह्मणवाद मोठ्या प्रमाणात बोकाळला गेला. जागतिकीकरणानंतर तर त्यात वाढच होत गेली.

जात-पितृसत्तेचे तत्त्व समुदायभावनेचा मुख्य आधार आहे. त्यामुळे पारंपरिक जातीअभिमानाच्या पोटातच फॅसिस्ट प्रवृत्ती असते. जागतिकीकरणाच्या काळात वर्गोन्नतीची स्पर्धा तीव्र झाल्याने जाती आणि धर्म यांच्या अस्मितांचा स्फोट झाला आहे. त्यामुळेच स्त्रीद्वेष आणि परजातीचा द्वेष ब्राह्मणी फॅसिस्ट आमदानीत आज पराकोटीला पोहोचलेला पाहायला मिळतो. जात-पितृसत्तेची समाजात दृढ झालेली मुळेच आज अक्राळविक्राळ बनलेल्या जन फॅसिझमचा (mass fascism) आधार आहेत, याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

भारतात फोफावलेल्या फॅसिझमचे बाह्य रूप जरी हिंदू राष्ट्रवादाचे म्हणजे मुस्लीमद्वेषाचे असले तरी आंतरिक रूप ब्राह्मणी-भांडवली हितसंबंधांचे जात-वर्ग प्रभुत्वाचे असल्याचे कॉ. कदम यांनी स्पष्ट केले आहे. 'नसरुद्दीन शहा यांचे काय चुकले?' या लेखातून त्याचा उलगडा त्यांनी केला आहे. जातीच्या वगळण्याच्या सूत्राच्या आधारेच मुस्लिमांना वगळण्याची नीती हिंदू राष्ट्रवाद आखतो. तर आदिवासींच्या जमिनी बळकावणाऱ्या भांडवलदारांविरुद्ध लढणाऱ्या वयोवृद्ध स्टेन स्वामींना यूएपीए कायद्याआधारे तुरुंगात टाकतो. यातूनच हिंदू फॅसिझमचे जात-वर्ग चरित्र व ब्राह्मणी-भांडवली हितसंबंध स्पष्ट होतो.

कॉ. अंकुश कदम यांचा प्रस्तुत लेखसंग्रह संक्रमणकाळाच्या प्रतिमानाचा उपयोग करून अस्वस्थ वर्तमानाची चिकित्सा करण्याचा प्रयत्न करतो. ब्राह्मणी फॅसिझमच्या संक्रमणाची साक्षेपी उकल करून वर्ग-जाती संघर्षाचा पट खुला करतो. जात्यंताच्या लोकशाही क्रांतीसाठी व्यापक जनप्रबोधनाची तो हाक देतो आणि ब्राह्मणी फॅसिझमला परास्त करणाऱ्या क्रांतिकारी हस्तक्षेपाची मागणी करतो.

■


## वाचक / वर्गणीदार यांना आवाहन

'अक्षरगाथा' त्रैमासिक दर्जेदार लेखनाला प्रसिद्धी देण्याचा प्रयत्न करत आले आहे. नियतकालिकाला सातत्य टिकवण्यासाठी लेखनाची जशी गरज असते तशी वाचकाचीही गरज असते. साहित्य-कला-संशोधन व पुरोगामी विचार मानवी मूल्ये-संविधान मूल्ये याबरोबर आर्थिक/सामाजिक/राजकीय/सांस्कृतिक प्रश्नांचे उकल करणारे लेखन आवश्यक असते. या सर्वांचे संवर्धन करणे हे विचारशील व विवेकी माणसाचे कर्तव्य आहे. विचार व साहित्यकला यांच्या सृजन व संवर्धनासाठी आपल्यासारख्या वाचकांची/वर्गणीदारांची गरज आहे. आपण आपल्या पद्धतीने ही चळवळ वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत असे आम्ही आपणास नम्र आवाहन करत आहोत.

**विभाग चौथा**

# इतिहासाच्या कक्षा रुंदावणारा अभ्यासक कार्यकर्ता

■

**डॉ. संगीता ठोसर, डॉ. राजू जाधव**
के.एच.४-२-६०२, सेलीब्रेशन सोसायटी सेक्टर-१७, खारघर,
नवी मुंबई-४१०२१० भ्र. ९७६७५८६९०१

डॉ. उमेश बगाडे हे ३१ जानेवारी २०२४ रोजी नोकरीतून निवृत्त झाले. ते जवळपास मागील ३० वर्षांपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील इतिहास व प्राचीन संस्कृती विभागात अध्यापनाचे कार्य करत होते. त्याआधी काहीकाळ त्यांनी पुण्यातील एका महाविद्यालयामध्ये अध्यापनाचे कार्य केलेले होते. तसे ते मूळचे पश्चिम महाराष्ट्राचे (साताऱ्याचे) असूनही दीर्घकाळापासूनच्या अधिवासामुळे मराठवाड्याच्या मातीशी, येथील संस्कृतीशी विशेषतः औरंगाबादशी ते तादात्म्य पावले होते. तसं पाहिलं तर अनेक लोक विशिष्ट वयानंतर सेवानिवृत्त होतात, त्यात विशेष असे काही नसते. लोकांनाही त्यात विशेष असं काही वाटत नाही. मग डॉ. उमेश बगाडे यांच्या निवृत्तीच्या घटनेत विशेष असे काय आहे ? सामाजिक माध्यमांवर फारसे सक्रिय नसणाऱ्या या माणसाविषयी अनेकजण सोशल मीडिया तसेच इतर माध्यमांतून इतक्या आत्मीयतेने का व्यक्त होत आहेत?

वरील प्रश्नांची उत्तरे बगाडे सरांच्या विचार व कार्यात दडलेली आहेत. गेल्या पंचवीसेक वर्षांपासून ते महाराष्ट्राच्या सार्वजनिक विचारविश्वातील एक प्रमुख अभ्यासक व विचारवंत म्हणून वावरत आहेत. अनेक अकादमिक संस्था तसेच परिवर्तनवादी संस्था-संघटनांशी त्यांचा घनिष्ठ असा संबंध राहिला आहे. सार्वजनिक बुद्धिमंतांची जबरदस्त मांदियाळी महाराष्ट्राला लाभली आहे. त्यांनी महाराष्ट्राच्या सार्वजनिक विचारविश्वावर आपल्या विचार व कार्याची अमिट अशी छाप सोडली आहे. परंतु अलीकडे मात्र महाराष्ट्राची ही परंपरा काहीशी लुप्त होत असल्याचे चित्र आपण पाहत आहोत. अशा या कालखंडात ज्या काही लोकांनी ही परंपरा आपल्या खांद्यावर तोलून धरली आहे. त्यात बगाडे सर अग्रभागी असल्याचे दिसून येते. त्यांनी आपल्या नोकरीकडे केवळ चरितार्थाचे साधन या संकुचित दृष्टीने पाहिले नाही. आज दुर्दैवाने असेच लोक बहुसंख्य असल्याने ते आपले शिकविण्याचे कामही योग्यपणे पार पाडत नाहीत, आपले तास वेळेवर घेत नाहीत. त्यामुळेच शिक्षक-प्राध्यापकांचा कधीकाळी असलेला नैतिक दरारा कमी होऊन ते विद्यार्थी व समाजाच्या कुचेष्टा व रोषाचे धनी बनले आहेत. या पार्श्वभूमीवर बगाडे सरांचे योगदान काहीसे अतुलनीय असेच म्हणावे लागेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील इतिहास विभागातील त्यांची कारकीर्द केवळ तो विभागच नव्हे, तर विद्यापीठाच्या दृष्टीने भूषणावह राहिली आहे. केवळ अध्यापन नव्हे, तर संशोधन, लेखन, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, सार्वजनिक बुद्धिमंत अशा विविध आघाड्यांवर सरांनी आपला ठसा उमटविला आहे. म्हणूनच त्यांची निवृत्त होण्याची घटना विशेष आहे. सार्वजनिक शिक्षणक्षेत्र शेवटचे

आचके देत असल्याच्या परिस्थितीत बगाडे सरांचे निवृत्त होणे फार मोठी पोकळी निर्माण करणारे आहे.

उमेश बगाडे हे आमचे औपचारिकदृष्टीने शिक्षक नाहीत; पण अनौपचारिकदृष्ट्या ते आमचे खूप मोठे शिक्षक राहिले आहेत. त्यामुळे ते आमचे जीवनशिक्षकच आहेत. अकादमिक क्षेत्रात तसेच सार्वजनिक/सामाजिक चळवळीत त्यांनी आमच्या शिक्षकाची भूमिका निभावली आहे. म्हणून प्रस्तुत लेख हा एका अर्थाने त्यांच्या विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकाच्या अध्यापकीय व सामाजिक चळवळीतील दिलेल्या योगदानाचा मांडलेला लेखाजोखा आहे.

**प्रखर ज्ञाननिष्ठा**

डॉ. बगाडे यांच्या एकूण कारकिर्दीचा विचार केला तर एक गोष्ट ठळकपणे समोर येते व ती म्हणजे त्यांची प्रखर ज्ञाननिष्ठा. खरे म्हणजे अनेक वर्षे निष्ठेने केलेल्या ज्ञानाच्या तपश्चर्येतून ही प्रखर ज्ञाननिष्ठा त्यांच्या व्यक्तित्वाचा, अस्तित्वाचा, जाणीव-नेणिवेचा एक अभिन्न अंग बनली आहे. आपली ही ज्ञाननिष्ठा त्यांनी विविध रूपाने जोपासली आहे. शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांना ते आपण शिकवित असलेल्या विषयाचे सर्वांगीण व खोल असे ज्ञान देतात, त्या विषयाचे विविध पैलू उलगडून दाखवितात. त्यांच्या विद्यार्थ्यांच्या मतानुसार, बगाडे सर हे एखादा टॉपिक इतर शिक्षकांप्रमाणे एखादे स्टॅन्डर्ड टेक्स्टबुक वा फारतर त्या विषयावर एखाद्या नावाजलेल्या लेखकाचा आधार घेऊन शिकवित नाहीत तर अनेक लेखकांच्या मांडण्याचा आधार घेऊन, त्या मांडण्याची वैशिष्ट्ये, मर्यादा दाखवून देत शिकवितात. त्यांच्या या अध्यापन पद्धतीमुळे बगाडे सरांचा तास म्हणजे विद्यार्थ्यांना जणू त्या विषयाचा संदर्भकोश वाटतो. एम. फिल. व पीएच. डी. चे मार्गदर्शक म्हणून त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पळवाटा शोधणाऱ्या, कॉपी-पेस्ट करणाऱ्या, संशोधनाची लगन असण्यापेक्षा निव्वळ डिग्री म्हणून एम. फिल. व पीएच. डी. कडे बघणाऱ्या विद्यार्थ्यांना बगाडे हे मार्गदर्शक म्हणून नको वाटायचे. कारण ते आपल्या संशोधक विद्यार्थ्यांना संशोधन विषयासाठीचे आवश्यक ते संदर्भ गोळा करणे, ते वाचून त्यांच्या नोंदी करण्यास, नोट्स काढण्यास सांगायचे. प्रत्येक भेटीत ते त्याचा आढावा घ्यायचे. त्यामुळे संशोधनासाठीचे हे कष्ट न घेणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांना बगाडे सरांची भेट घेण्यास भीती वाटे. त्यामुळे बगाडे सरांकडे संशोधन करत असलेले विद्यार्थी संशोधनाच्या पद्धती (Methodology) समजून घेत, त्यात किमान अर्हता मिळवून संशोधन पूर्ण करत. आपल्या संशोधनविषयाला खरोखर न्याय देण्याचा प्रयत्न करत. महाराष्ट्रात काही अपवाद वगळता प्राध्यापकांना मेथडॉलॉजी काय असते, तिचे प्रकार, ती कशी वापरायची यातले काही कळत नाही. मग असे विद्यार्थी जेव्हा टाटा इन्स्टिटच्यूट ऑफ सोशल सायन्सेस, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ किंवा अशा नामांकित संस्थांमध्ये संशोधनासाठी किंवा संशोधन साहाय्यक वा साहाय्यक प्राध्यापक म्हणून अर्ज करतात तेव्हा ते संशोधन पद्धतीविषयी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकत नाहीतच; पण त्याचबरोबर ते ज्ञानव्यवहार प्रामाणिकपणे न करता पळवाटा शोधल्यामुळे ते या नोकरीसाठीच्या मुलाखतींमध्ये टिकू शकत नाहीत. परंतु बगाडे सरांचे विद्यार्थी मात्र मोठ्या प्रमाणावर नामांकित शिक्षणसंस्थांमध्ये संशोधन करीत आहेत.

बगाडे सर आजही स्वतःला मोठ्या प्रमाणावर इतिहासाचे विद्यार्थी समजतात. ते मुंबईला आले की, एशियाटिक लायब्ररी वा पुराभिलेखागारात जाऊन आपल्या संशोधनासाठीची साधने शोधतात. ही प्रखर ज्ञाननिष्ठा जोपासल्यामुळेच आज महाराष्ट्रातील बुद्धिमंताच्या मांदियाळीत त्यांना आदराचे स्थान प्राप्त झाले आहे.

**मार्क्सवाद-फुले-आंबेडकरवादाचे (माफुआं) भाष्यकार**

कॉ. शरद पाटलांनी एकोणिसशे सत्तरच्या दशकाच्या मध्यात 'मार्क्सवाद-फुले-आंबेडकरवाद' या सापेक्षतः नव्या तत्त्वज्ञानाची मांडणी केली. मार्क्सवाद

 ISSN : 0976-2957

हे प्रायः वर्गलक्षी पद्धतीने समाजवास्तवाचा वेध घेते, तर फुले-आंबेडकरवाद या जातलक्षी पद्धतीने सामाजिक वास्तवाचा विचार करतात. परंतु, भारताचे समाजवास्तव हे निव्वळ जातीय नाही व निव्वळ वर्गीयही नाही तर ते जातवर्गपुरुषसत्तेच्या गुंतागुंतीने व व्यामिश्रतेने बनलेले आहे. त्याचा सम्यक वेध घेण्यासाठी मार्क्सवाद व फुले-आंबेडकरवादाच्या मर्यादा लादून त्यांचा तत्त्वज्ञानिक पातळीवर संयोग करून नवा तात्त्विक व्यूह मांडण्याची गरज कॉ. पाटलांना जाणवत होती. त्यातूनच त्यांनी आपल्या 'माफुआं' या तत्त्वज्ञानाची सृष्टी उभारली. 'माफुआं'ने जातवर्गपुरुषसत्ताविरोधी लढ्याच्या प्रबोधन आणि संघर्ष अशा दोन्ही आघाड्यांवर अजोड असे योगदान दिले आहे. बगाडे सरांनी 'माफुआं'शी अकृत्रिम पण डोळस अशी निष्ठा पत्करली. आजही 'माफुआं'वरची त्यांची निष्ठा अविचल असल्याचे आपल्या प्रत्ययास येते. शिबिरे, कार्यशाळा, परिसंवाद, परिषदा आदींच्या माध्यमातून त्यांनी माफुआंच्या प्रसारासाठी भरकस प्रयत्न केले. कॉ. प्रा. रणजित परदेशींच्या बरोबर ते 'माफुआं'चे एक महत्तम भाष्यकार बनले.

'माफुआं'च्या तत्त्वदृष्टीतून त्यांनी आपल्या लिखाणाचे चर्चाविश्व (iscourse) उभारले. क्रांतिसिंह नाना पाटील अकादमीने 'जातिव्यवस्था आणि इतिहास', 'जातिव्यवस्था आणि अर्थशास्त्र', 'जातिव्यवस्था आणि सांस्कृतिक राजकारण', 'जातिव्यवस्था आणि पितृसत्ता', 'जातिव्यवस्था आणि समाजशास्त्र' अशा अनेक विषयांवर राष्ट्रीय परिषदांचे आयोजन केले. त्याचा उद्देश जातवास्तवाच्या विविध पैलूंचा स्वतंत्रपणे आढावा घेण्याचा व त्या माध्यमातून जातिव्यवस्थेच्या अभ्यासाचे अर्काइव्ह उभे करण्याचा होता. बगाडे सरांनी या जातीपरिषदांची संकल्पना मांडली. एवढेच नव्हे, तर त्यातील अनेक परिषदांच्या आयोजनात अनेक पातळ्यांवर मोठे कष्टही त्यांनी उपसले. बगाडेंनी विविध महत्त्वपूर्ण विषयांवर 'माफुआं'ची अन्वेषणपद्धती वापरून लेख लिहिले. पुस्तके लिहिले. 'माफुआं'च्या बहुप्रवाही अन्वेषणपद्धतीचा वापर करून विषयाच्या खोलात जाऊन त्याचे योग्य विश्लेषण केले जाऊ शकते हे त्यांनी आपल्या लेखनसंभाराच्या माध्यमातून दाखवून दिले. सामान्य कार्यकर्त्यांना 'माफुआं' समजण्यात काही अडचण उद्भवल्यास त्याचे निरसन करण्याचे सर्वात जवळचे व हक्काचे स्थान म्हणजे बगाडे सरांची केबिन हे राहिले. त्यांची व्याख्याने म्हणजे श्रोत्यांसाठी एक अपूर्व वैचारिक मेजवानी असते. जातवर्गपुरुषसत्ताविरोधीचा लढा गतिमान करण्यासाठी प्रबोधनाची लढाई विस्तारावी लागते. बगाडे सरांनी सांस्कृतिक प्रबोधनाची लढाई गतिमान होईल, त्याला अधिक व्यापकता मिळेल असे अनेक नवीन सांस्कृतिक उपक्रम, लढे सुचविले.

**आंतरविद्याशाखीय ज्ञानव्यवहार**

बगाडे सर हे इतिहासाचे विद्यार्थी व अध्यापक आहेत. त्यामुळे त्यांचा ज्ञानव्यवहार मोठ्या प्रमाणावर इतिहास या ज्ञानशाखेच्या विचारविमर्शाशी निगडित आहे. परंतु, त्यांनी इतिहासविषयाशी संबंधित ज्ञानव्यवहार करताना त्यांनी स्वतःला निव्वळ इतिहास विषयाच्या सीमांमध्ये बांधून घेतले नाही. त्याऐवजी त्यांनी आपल्या ज्ञानव्यवहारात मोठ्या प्रमाणावर आंतरविद्याशाखीय अभ्यासपद्धतीचा अवलंब केला.

जातिव्यवस्थेचे यथार्थ विश्लेषण करायचे असेल तर तिच्या अर्थकारणाचा वेध घेणे गरजेचे आहे. यादृष्टीनेच कॉ. शरद पाटलांनी जातिव्यवस्थेच्या अर्थशास्त्राची उभारणी करण्याची गरज वेळोवेळी प्रतिपादन केलेली होती. परंतु आजही अर्थशास्त्रज्ञांनी जातिव्यवस्थेचे अर्थशास्त्र उभारणे दूर पण जातिव्यवस्थेच्या अर्थकारणाची, तिच्या अर्थशास्त्रीय गतीतत्त्वांनाही फारसे लक्षात घेतलेले आढळून येत नाही. बगाडे सरांनी पेशवाई व एकोणिसाव्या शतकातील जातिव्यवस्थेच्या अर्थकारणावर काही महत्त्वाचे मुद्दे मांडून जातिव्यवस्थेचे अर्थकारण समजून घेऊ इच्छिणाऱ्या अभ्यासकांसाठी पाऊलवाट पाडून दिली आहे. जातिव्यवस्था ही उत्पादन, वितरण व उपभोग

या मूलभूत आर्थिक क्रियांना प्रभावित करत होती. त्यात गावगाड्याच्या रचनेतील बलुतेदारी, उतरंडीची सामाजिक रचना भूमिका निभावत होत्या हे बगाडे सरांनी दाखवून दिले. हा अभ्यास करताना बगाडे अर्थशास्त्र व इतिहास या ज्ञानशाखांच्या सीमा ओलांडून आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन स्वीकारला. त्यांचे पीएच. डी.चे संशोधन 'महाराष्ट्रातील प्रबोधन आणि वर्गजातीप्रभुत्व' या नावाने प्रकाशित झाले आहे. त्यांनी आंतरविद्याशाखीय अभ्यासपद्धतीचा अवलंब करत इतिहास आणि तत्त्वज्ञान या विषयांची मुशाफिरी केली. या संशोधनात त्यांनी एकोणिसाव्या शतकातील धर्मसुधारणाविषयक चर्चाविश्वाचा ऐतिहासिक दृष्टीने धांडोळा घेताना त्यात अंतर्भूत ईश्वरविषयक संकल्पना, धर्माचे स्वरूप अशा तत्वज्ञानिक बाबींच्या चर्चेचा पट त्यांनी अभ्यासविषयाचा भाग बनविला.

एकोणीसशे ऐंशीच्या दशकात अभिजन राष्ट्रवादी इतिहास लेखनाला नकार देत सबाल्टर्न स्कूल उदयाला आले. त्यांनी राष्ट्रवादी व मार्क्सवादी इतिहासलेखनातील अभिजन धारणा व पद्धती नाकारून नवीन इतिहास लेखनपद्धती अनुसरली. विविध अभ्यासकांनी लिहिलेल्या अत्यंत महत्त्वाच्या लेखांचे १० खंड या सबाल्टर्न इतिहास प्रकल्पांतर्गत प्रकाशित केले गेले. सबाल्टर्न इतिहास लेखनाचा मोठा प्रभाव विविध भाषिक अभ्यासकांवर पडला. त्यांनी वापरलेली सबाल्टर्न ही कोटी तसेच त्यातील समाविष्ट विविध लेख हे अभ्यासकांच्या औत्सुक्याचा भाग बनले होते. मराठीत अनेकांनी सबाल्टर्न या संज्ञेचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला. त्यात बगाडे सरांनी लावलेला त्याचा 'शोषित-अंकित जन' हाच अर्थ अधिक समर्पक वाटतो. सबाल्टर्न इतिहासलेखन प्रकल्प, त्याचे महत्त्व, त्यात होत गेलेले बदल तसेच त्यांच्या मर्यादा यांची साक्षेपी चिकित्सा बगाडे सरांनी त्यावर 'समाजप्रबोधनपत्रिके'त दीर्घ लेख लिहून केली. एका परीने मराठीतील वाचकांसाठी या महत्त्वपूर्ण इतिहासलेखन पद्धतीचा साक्षेपी आलेखच त्यांनी प्रस्तुत केला. या सबाल्टर्न इतिहासकारांनी सबाल्टर्न जाणीव (SubalteA°n Consciousness) शोधण्याचा प्रयत्न केला. बगाडे सरांनी आपल्या 'दलित जाणिवेतील द्वंद्व : प्रभुत्व आणि प्रतिकार' या महत्त्वपूर्ण पुस्तिकेत या संकल्पनेला विधायक नकार देत दलित जाणिवेचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. या मौलिक कृतीमध्ये त्यांनी दलित जाणिवेचे विविध पदर उलगडले आहेत.

बगाडे सरांच्या ज्ञानव्यवहाराचे दुसरे वैशिष्ट्य येथे नमूद करण्यासारखे आहे. प्रतिगामी उजव्या शक्ती आपला अजेंडा पुढे रेटण्यासाठी बऱ्याचदा इतिहासाचा वापर करतात. तथ्यांची मोडतोड करून त्याआधारे इतिहासाचे विकृतीकरण करत समाजात ध्रुवीकरणाच्या मोहिमेला गती प्रदान करतात. ऐतिहासिक पुरावे व योग्य अन्वेषणपद्धतीचा आधार घेऊन उजव्या शक्तींचा अजेंडा रोखला जाऊ शकतो. म्हणजेच, वर्तमानात जर इतिहासाची लढाई केली नाही तर वर्तमानाबरोबर भविष्यकाळही अंधकारमय होण्याचा धोका संभवतो. सद्यःस्थितीत आपण त्याचा अनुभव घेतच आहोत. या पार्श्वभूमीवर इतिहासकारांच्या भूमिकेला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होते. बगाडे सरांनी केलेले इतिहासलेखन यादृष्टीने महत्त्वाचे ठरते. उजव्या शक्ती बहुजन महामानवांचे वा प्रतीकांचे अवमूल्यन करण्याचा प्रयत्न करतात. अरुण शौरींनी 'Worshiping False God' नावाचे पुस्तक लिहून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर चिखलफेक करण्याचा प्रयत्न केला. पुस्तकात शौरींनी आंबेडकरांवर अनेक आरोप केले. त्यातील एक महत्त्वाचा आरोप म्हणजे आंबेडकर हे ब्रिटिशांचे हस्तक असून ते स्वातंत्र्यलढ्याच्या विरोधी होते. म्हणजेच शौरींनी आंबेडकरांना राष्ट्रवादाच्या चौकटीचा वापर करून आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा प्रयत्न केला. बगाडे सरांनी 'फुले-आंबेडकरांचा राष्ट्रवाद' नावाची पुस्तिका लिहून एका बाजूला अभिजनांचा राष्ट्रवाद हा कसा उच्चजातवर्गांच्या हितसंबंधांचे प्रवक्तेपण करणारा राहिला, त्यात कनिष्ठ जातवर्गीयांचे आवाज कसे अनुपस्थित ठेवले गेले हे

दाखवून दिले. दुसऱ्या बाजूला फुले-आंबेडकरांचा विचार हा दलित, शोषितांच्या हिताचे प्रवक्तेपण करणारा, सामाजिक न्यायाच्या भूमिकेला मध्यवर्तित्व देणारा होता हे सप्रमाण दाखवून दिले. बहुसंख्य असणाऱ्या जनसमूहाच्या हिताचा बळी देऊन राष्ट्राचे हित साधले जाऊ शकत नाही किंवा राष्ट्राची उभारणी केली जाऊ शकत नाही, हा फुले-आंबेडकरांच्या राष्ट्रविषयक चिंतनाचा गाभा होता. तो बगाडेंनी उलगडून अभिजन ज्या राष्ट्र व राष्ट्रवादाची भूमिका मांडत होते, त्यातील मर्यादा व अभिजनांची हितसंबंधांची संकुचितता बगाडे सरांनी उजागर केली. अशाप्रकारे बगाडे सरांनी फुले-आंबेडकर हे राष्ट्रवादी नव्हते किंवा त्यांच्या भूमिकेत राष्ट्राच्या हिताचा विचार अंतर्भूत नव्हता हा समज खोटा ठरविला आणि राष्ट्र व राष्ट्रवादाच्या संकल्पनेकडे बघण्याच्या पारंपरिक दृष्टिकोनातील उणिवा उघड करून त्याला अधिक व्यापक बनविले.

'एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र' हा बगाडे सरांच्या विशेष आवडीचा प्रांत राहिला आहे. त्यासंदर्भात त्यांनी विपुल लेखन करून आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीची प्रक्रिया, त्यातील विविध अंतर्विरोध आणि त्यातील जातिव्यवस्थाक हितसंबंधांनी निभावलेली भूमिका याचे यथार्थ दर्शन वाचकांसमोर ठेवले आहे. याकाळातील अस्सल कागदपत्रे व लिखाणाचा सूक्ष्म अभ्यास तसेच गेल ऑमव्हेट, रोझालिंड ओहॅनलॉन, नील चार्ल्सवर्थ, य. दि. फडके, हिरोयुकी कोटानी, रवींद्रकुमार, हिरोशी फुकाझावा अशा एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रावर विपुल लेखन केलेल्या अभ्यासकांच्या मांडणीचा अभ्यास करून त्यांनी एकोणिसाव्या शतकावर अधिकारवाणीने लिखाण केले आहे. त्यांचा एम. फिल. चा प्रबंध हा फुलेंच्या पर्यायी सांस्कृतिक मांडणीला उजागर करतो. एकोणिसाव्या शतकातील शेतकरी बंडांचा त्यांनी केलेला अभ्यास इंग्रजी राजवट, त्यांनी केलेले रयतवारी आणि इतर विविध बदल, त्यामुळे शेतकऱ्यांच्या कर्जात झालेली प्रचंड वाढ, त्याचा ब्राह्मण व मारवाडी सावकारांनी घेतलेला लाभ अशा अनेक मुद्द्यांचा सूक्ष्म आढावा घेतो. मुकुंदराव पाटलांच्या अग्रलेखांचा खंड संपादित करताना त्यास बगाडे सरांनी लिहिलेली प्रस्तावना सत्यशोधक चळवळ आणि त्यात होत गेलेल्या संघटनात्मक तसेच वैचारिक स्थित्यंतराचा आलेख सादर करते. त्यांनी लिहिलेले महात्मा फुलेंचे चरित्र फुले आणि सत्यशोधक चळवळ समजून घेणाऱ्यांच्या दृष्टीने एक महत्त्वाचा संदर्भग्रंथ आहे.

या छोट्याशा टिपणवजा लेखामध्ये बगाडे सरांच्या विपुल लेखनाचा धांडोळा सादर करणे शक्यतेच्या कोटीतील गोष्ट नाही. त्यांनी विपुल लिखाण तर केलेच; पण त्यासोबत अनेक अभ्यासपूर्ण प्रस्तावना विविध मान्यवर अभ्यासकांच्या तसेच नवलेखकांच्या पुस्तकांना लिहून दिल्या. महाराष्ट्रात राम बापट यांच्यानंतर कदाचित बगाडे सरांनीच सर्वाधिक प्रस्तावना लिहिल्या आहेत. ह्या प्रस्तावना वाचकांसाठी स्वतंत्रपणे एक महत्त्वाचा वैचारिक दस्तावेज आहे.

**स्त्रीप्रश्नासंबंधीच्या आकलनाला योगदान**

स्त्रीवादी विचारविमर्शात बगाडेंनी महत्वाचा हस्तक्षेप केला. 'ब्राह्मणी पितृसत्तेचा विचारव्यूह' या पुस्तकाच्या लेखातून त्यांनी भारतीय स्त्रीप्रश्नासंबंधीच्या आकलनाना महत्वाचे योगदान दिले आहे. त्यातील 'ब्राह्मणी पितृसत्ता उकलण्याचा पेच' हा महत्त्वाचा लेख भारतीय पितृसत्तेसंबंधीच्या प्रस्थापित मान्यतांना प्रश्न विचारत नवीन मांडणी करण्याचा प्रयत्न करतो. या लेखाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातून काही स्त्रीवाद्यांकडून वापरल्या जाणाऱ्या 'बहुविध पितृसत्ता' वा 'दलित पितृसत्ता' यासारख्या संकल्पनांची मर्यादा स्पष्ट करण्याची तार्किक आधारभूमी आपणास बगाडेंच्या लेखातून प्राप्त होते. आपल्या लेखात बगाडे सर भारतीय पितृसत्तेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य नमूद करताना पुढील मांडणी करतात, गण ते जात या स्थित्यंतरामध्ये जमातीय स्वायत्ततेचा वारसा जातपंचायतीच्या स्वायत्ततेच्या स्वरूपात चालू राहिला. त्यातून प्रत्येक जातीच्या जातीविशिष्ट पितृसत्तेचा स्वायत्त अवकाश उभा राहिला. जातिअंतर्गत सामाजिक

संबंधाचे (कुटुंब, विवाह, नातेगोतेसंबंध) नियमन करणे, कुटुंब व कुटुंबाच्या नातेगोतेसंबंधांवर आधारलेल्या श्रमसंबंधांना व उत्पादनप्रक्रियेला नियमांची/संकेतांची चौकट देणे, जातीची सामाजिक व सांस्कृतिक विशिष्टता टिकवून वा घडवून जातीची सामुदायिक एकता व व्यक्तित्व घडवणे आणि जातपितृसत्तेचे नित्य पुनरुत्पादन करणे ही कामे जातविशिष्ट पितृसत्तेठायी एकवटली गेली. स्वजातीनियमनामध्ये जातपितृसत्तांना स्वायत्तता लाभल्याने जातपितृसत्तेची विशिष्टता जपलीही गेली. जातपितृसत्तांचे हे स्वायत्त कोश पूर्णतः स्वायत्त राहू शकत नव्हते. कारण कोणतीही जात सुटी, स्वतंत्रपणे अस्तित्वात असत नाही. तर इतर जातींच्या सान्निध्यातच तिचे अस्तित्व घडते. अनेकविध जातींच्या एकसमयावच्छेदेकरून अस्तित्वातून जातीसंस्था अस्तित्वात येते. जातींना एकत्र आणणारे तत्त्व व यंत्रणा म्हणून ब्राह्मणवाद उभा राहिला. ब्राह्मणी धर्म व संस्कृतीच्या अधिपत्याखाली जातींना उतरंडीत एकत्र आणणाऱ्या या प्रक्रियेचे धुरीणत्व करण्यात ब्राह्मणी पितृसत्तेने महत्त्वाची भूमिका बजावली. जातीविशिष्ट पितृसत्तांच्या सार्वत्रिक धारणांचे एकवटीकरण करून जातीउतरंडीच्या रचनेत त्यांना मेळवण्याचे काम तिने केले (बगाडे २०२१: २३). म्हणजेच जातीविशिष्ट पितृसत्तांचे अस्तित्व दिसून येत असले तरी त्या ब्राह्मणवादाच्या चौकटीतच काम करतात वा ब्राह्मणवादाच्या मूलतत्त्वांना त्या विरोधी नसतात. उलटपक्षी ब्राह्मणवादाच्या (जातीपितृसत्तेला) अस्तित्वाला निरंतरता पुरविण्यात त्या प्रभावी भूमिका बजावतात. याचा अर्थ जातीविशिष्ट पितृसत्तांना एकमेकांपासून पूर्णतः स्वतंत्र अशा स्वरूपात पाहता येत नाही. त्यामुळे 'बहुविध पितृसत्ता'संबंधीच्या मांडणीची वैधता प्रश्नांकित होते. आणि त्यात बगाडे सरांची उपरोक्त मांडणी कळीची ठरते.

राजर्षी शाहूंनी स्त्री हिंसाचाराच्या विरोधी कायदा केला. बगाडेसरांनी शाहूंच्या ऐतिहासिक कार्याचे मूल्यमापन करताना या कायद्यास स्त्रियांच्या कौटुंबिक हिंसाचाराच्या विरोधी करण्यात आलेला पहिला कायदा असे त्याचे यथार्थ वर्णन केले. आणि त्याचबरोबर अब्राह्मणी प्रवाहाची स्त्री प्रश्नाबाबतची समज आणि त्याच्या सोडवणुकीसाठी उचललेली पावले काळाच्या किती पुढची होती हे अधोरेखित केले. त्याचबरोबर त्यांनी 'वसाहतपूर्व जातिसमाजातील प्रेम काही सैद्धांतिक निरीक्षणे' या लेखामधून काहीशा नवीन विषयाला हात घालताना प्रेम भावनेतील संकल्पनात्मक वैविध्याचा अभ्यासपूर्ण आढावा घेत वसाहतपूर्व जातीसमाजात ब्राह्मणी पितृसत्तेने टाकलेली प्रेमावरील बंधने, त्यामागील सत्तासंबंध, स्त्रीदास्य आणि प्रेम, भक्ती संप्रदायाने केलेली प्रेमाची विद्रोही मांडणी, जातिव्यवस्था व स्त्री-पुरुष विषमतांना नकार देणाऱ्या तंत्र पंथातील स्त्रीप्रतिमा आणि प्रेमाची भावना, बौद्ध संप्रदायातील स्त्री-पुरुष संबंधाचा विचार अशा बहुविध मुद्द्यांची अभ्यासपूर्ण मांडणी बगाडेसरांनी आपल्या या लेखात केली. त्यांचे हे लेख स्त्रीप्रश्न आणि व्यापक अर्थाने स्त्रीवादाला दिलेले योगदान ठरते.

### चळवळीविषयीची समर्पितता

चळवळीविषयीची समर्पितता हे बगाडेसरांच्या शैक्षणिक कारकिर्दीचे व्यवच्छेदक लक्षण राहिले. त्यांनी आपल्या तीस वर्षांच्या विद्यापीठातील कारकिर्दीत अध्यापन आणि संशोधनाच्या क्षेत्रात लक्षणीय कामगिरी बजावली; पण त्याबरोबरच सामाजिक चळवळींमध्येही त्यांनी आपला महत्त्वपूर्ण सहभाग नोंदविला. ते १९९६ पासून क्रांतिसिंह नाना पाटील अकादमीचे अध्यक्ष राहिले. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक प्रबोधनाच्या आघाडीवर अकादमीने अतिशय महत्त्वाचे योगदान दिले. अकादमीने जातवर्गपुरुषसत्ताअंताच्या दृष्टीने प्रबोधन गतिमान करण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण पुस्तिका प्रकाशित केल्या. त्यातील अनेक पुस्तिका या नवीन लेखकांकडूनही लिहून घेण्यात आल्या. तात्कालिक विषयांवर तसेच जातवर्गपुरुषसत्तेच्या विविध पैलूंचे वा विषयांचे अन्वेक्षण करणाऱ्या या पुस्तिकांनी महाराष्ट्रात प्रबोधनाच्या आघाडीवर अग्रदलाची भूमिका निभावली. शिक्षण,

शेती, स्त्रीप्रश्न, फुले-आंबेडकरांचा विचार, राष्ट्रवाद, राजकारण अशा अनेक बहुविध विषयांवरील पुस्तिकांचा त्यात समावेश होता. अकादमीने वर उल्लेख केल्याप्रमाणे अनेक जातीअंत परिषदा आयोजित केल्या. शिरूर (पुणे) येथे कॉ. शरद पाटलांच्या साहित्यावर परिसंवाद आयोजित केला. पुणे विद्यापीठातील (आताचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र (आताच्या जेंडर स्टडीज डिपार्टमेंट) च्या साहाय्याने 'अब्राह्मणी स्त्रीवादी इतिहास लेखनाच्या दिशेने' हा महत्त्वपूर्ण परिसंवाद आयोजित केला. कॉलेजस्तरीय विद्यार्थ्यांमध्ये पुरोगामी विचारांविषयी जागरूकता निर्माण होण्याच्या दृष्टीने परीक्षा घेण्याचा उपक्रम राबविला. ज्यात हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. याबरोबरच इतरही अनेक व्याख्याने, चर्चासत्रे, परिषदा यांसारखे उपक्रम राबविले गेले. ते राबविण्यात अकादमीचे अध्यक्ष म्हणून बगाडे सर पुढाकारावर राहिले. औरंगाबाद तसेच इतर शहरांत इतर संस्था, संघटनांनी राबविलेल्या कार्यक्रमांमध्ये बगाडेसरांनी कायम आपला सहभाग नोंदविला.

बगाडे सरांच्या शैक्षणिक कारकिर्दीचे दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी विद्यार्थ्यांच्या हिताला आत्यंतिक महत्त्व दिले. त्यांचे प्रश्न समजून घेऊन त्यांच्या सोडवणुकीचे मार्ग शोधण्यात, त्यासाठीच्या सक्रिय प्रयत्नांत त्यांनी आपले योगदान देण्याचा नेहमीच प्रयत्न केला. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या विद्यार्थी संघटनांना मार्गदर्शन करण्यासाठी वा काही मदतीची गरज असेल तर ती करण्यासाठी बगाडे सर कायम तत्पर असत. सत्यशोधक विद्यार्थी संघटनेच्या वाटचालीत बगाडे सरांच्या मार्गदर्शन व मदतीची भूमिका अतिशय महत्त्वाची राहिली. अनेक गुणवान विद्यार्थी जसे त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडले तसे अनेक कार्यकर्ते घडण्यातही त्यांचा वाटा राहिला. त्यांचे विद्यापीठातील घर असो की नंतरचे स्वतः विकत घेतलेले घर असो ते अकादमीच्या बैठकांचे एक हक्काचे ठिकाण होते व आजही आहे.

**अभ्यासक कार्यकर्ता**

बगाडे सरांनी त्यांचा बराचसा काळ विद्यापीठात इतिहासाच्या अध्यापनासाठी खर्च केला. परंतु हस्तिदंती मनोऱ्यात राहून ज्ञानाचे मनोरे उभे करणाऱ्या अभ्यासकासारखी भूमिका त्यांनी कधीही घेतली नाही. अध्यापन असो, संशोधन असो वा लिखाण असो त्यांनी आपला ज्ञानव्यवहार हा कायमच लोकांच्या मुक्तीशी संबंधित ठेवला. बऱ्याचदा विशेषतः अलीकडील काळात अकादमिक ज्ञानव्यवहार आणि सामाजिक चळवळ/ जनचळवळ यात द्वैत निर्माण केले जाते. हे कृत्रिम द्वैत नव्या प्रकारच्या विषमतेला जन्म देते. ज्यात रस्त्यावर काम करणारा, लोकांच्या प्रश्नांसाठी झगडणारा कार्यकर्ता पुस्तके मात्र वाचत नाही. साधे पत्रक लिहिण्याचा आत्मविश्वासही या द्वैतामुळे त्याच्याकडे राहत नाही. दुसऱ्या बाजूला अभ्यासक प्रत्यक्ष चळवळीत अंग झिजविण्यास कुचराई करतात. कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणे हेच आपले सामाजिक काम व हीच आपली चळवळ असे ते मानू लागतात. या धारणांमधून कार्यकर्ता न्यूनगंडात ढकलला जातो तर प्राध्यापक वा अभ्यासकांना चळवळीत काम करणे कमीपणाचे वाटू लागते. बगाडे सरांनी मात्र या कृत्रिम विभागणीला नकार देऊन अभ्यासक व कार्यकर्ता यांचे द्वैत सांधण्याचा प्रयत्न केला. त्यांनी व्यक्तिगत पातळीवर ज्ञानसाधनेला आत्यंतिक महत्त्व दिले; पण त्याचबरोबर त्यांनी चळवळीत काम करणे कधीही दुय्यम वा कमी महत्त्वाचे मानले नाही. अनेक कार्यक्रम, शिबिरे, व्याख्याने, परिसंवाद, परिषदा, कार्यशाळा यांच्या आयोजनात पुढे होऊन काम करताना ते कायम पुढाकारावर राहिले. ते कायमच कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी तत्पर राहत; पण त्याचवेळी विद्यार्थी वा कार्यकर्त्यांनी वाचन केले पाहिजे यावर त्यांचा आग्रह असे. ते विद्यार्थी व कार्यकर्त्यांच्या मागे वाचन करण्याचा लकडा लावत. म्हणून न वाचणाऱ्या विद्यार्थी व कार्यकर्त्यांना बगाडे सरांची भीती वाटे. त्यांनी सामाजिक चळवळ व चळवळीचे क्षेत्र आणि क्लासरूम यांच्यात

निर्माण केले जाणारे द्वैत लांघून क्लासरूम हे चळवळीचे क्षेत्र बनविले. त्यातून चिकित्सक विचार करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अनेक पिढ्या त्यांनी घडविल्या. ज्यांनी ‘अविद्येचे’ राजकारण समजून घेऊन शिक्षण अधिकाराच्या संघर्षाचे नेतृत्व केले. दुसऱ्या बाजूला शिक्षणाचा आशय समतावादी व्हावा म्हणून सकारात्मक हस्तक्षेपही सरांच्या मार्गदर्शनातून तयार झालेल्या विद्यार्थ्यांनी केला.

बगाडे सरांच्या या भूमिकेमुळेच ते सध्याचे एक आघाडीचे सार्वजनिक बुद्धिजीवी/विचारवंत (Public Intellectual) ठरले आहेत. चळवळीशी जैविक बांधिलकी व विचारांशी विनातडजोड निष्ठा यामुळे सार्वजनिक परिक्षेत्रात उद्‌भवलेल्या तदनुषंगिक घटनांचे विश्लेषण करणे असो की व्यवस्था बदलाच्या दृष्टीने महत्त्वाच्या कूट प्रश्नांची वा मुद्द्यांची सोडवणूक असो बगाडे सरांची भूमिका, मत वा विश्लेषण हे महत्त्वाचे मानले जाते. आपल्या अफाट व्यासंगातून त्यांनी हा अधिकार कमावला आहे.

बगाडे सरांसारख्या व्यक्ती या व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेच्या वर उठून सामाजिक उत्तरदायित्वाचा टिळा भाळी लावून बहुविध भूमिका व जबाबदाऱ्यांचे वहन करत असतात. त्यांच्यासारख्या व्यासंगी व प्रतिभावान माणसाला हस्तिदंती मनोऱ्यात बसून स्वतःचे व्यक्तीमाहात्म्याच्या गाथा रचणे सहजशक्य असते. हीच एका अर्थाने कोणत्याही व्यक्तीच्या व्यक्तित्वाची कसोटी असते. बहुतांशजण स्वमाहात्म्य व व्यवस्थेने पुढे केलेल्या आमिषाला भुलून आपल्या सामाजिक उत्तरदायित्वाकडे पाठ फिरवितात. बगाडे सरांनी मात्र स्वमाहात्म्य व व्यवस्थेच्या लुभावणाऱ्या आमिषांना नाकारून सामाजिक सर्वहारांचे जैविक बुद्धिजीवी बनण्याची कठीण वाट निवडली. ही वाट कठीण यासाठीही असते की त्यावर चालताना स्वमाहात्म्य व व्यवस्थेच्या मानसन्मान व पदांच्या लोभांवर पाणी तर सोडावे लागतेच; पण त्याचबरोबर अनेक व्यक्ती तसेच व्यवस्थेच्या शास्त्यांची खप्पामर्जी सहन करावी लागते. कधीकधी तीव्र विरोध सहन करावा लागतो. बगाडे सर हे असल्या बाबींची फारशी फिकीर न करता आपण निवडलेल्या मार्गाने व्रतस्थपणे चालत राहिले. त्यासाठी विविध टप्प्यांवर अनेकांची नाराजी व विरोध त्यांनी सहन केला. आपल्या ज्ञानाचा व पदाचा कमाल उपयोग सामाजिक उत्तरदायित्व निभावण्यासाठी केला. म्हणूनच बगाडे सरांसारखी व्यक्ती जेव्हा निवृत्त होते तेव्हा त्यामुळे सहजासहजी भरून न येणारी पोकळी निर्माण होते हे सत्यच आहे. आज जेव्हा दलित बहुजन विद्यार्थ्यांसाठी शिक्षणक्षेत्रांमध्ये तीव्र आव्हाने निर्माण झाली आहेत अशासमयी विद्यार्थ्यांच्या मदतीला धावणारे, त्यांना मार्गदर्शनासाठी कायम उपलब्ध असणारे बगाडे सरांसारखे हक्काचे ‘प्रश्ननिवारक केंद्र’ नसणे या पोकळीची तीव्रता कैक पटींनी वाढते.

**संदर्भ**

बगाडे, उमेश (२०२१) ब्राह्मणी पितृसत्तेचा विचारव्यूह, लोकवाङ्मय गृह, मुंबई

■

## अक्षरगाथासाठी साहित्य पाठवा

- नवलेखकांच्या सर्जनात्मक, संशोधनात्मक लेखनाला आवर्जून प्रसिद्धी दिली जाते.
- दर्जेदार, सर्जनात्मक/वैचारिक/पुरोगामी लेखनाचे स्वागत आहे.
- अक्षरगाथा नेहमीच पुरोगामी, संशोधनात्मक, सडेतोड लेखनाच्या शोधात असते.

लोकायत
विचारमंच, नांदेड

## लोकायत विचारमंच, नांदेड
## स्थानिक संयोजन समिती, जालना व
## प्रागतिक इतिहास संस्था, महाराष्ट्र
## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना,

आयोजित

शनिवार-रविवार
७ व ८ ऑक्टोबर २०२३

**सातवी विवेक जागर परिषद**

वेळ : सकाळी १०.००
ते सायं. ६.००

## इतिवृत्त

लोकायत विचारमंच नांदेड, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना, प्रागतिक इतिहास संस्था, महाराष्ट्र, स्थानिक संयोजन समिती, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने जालना येथे 'भारतीय इतिहासलेखन आणि समकालीन राजकारण' या विषयाअंतर्गत 'सातवी विवेक जागर परिषद' खेरुडकर मंगल कार्यालय सभागृहात दिनांक ०७ व ०८ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत आयोजित करण्यात आली होती. या परिषदेसाठी महाराष्ट्र व इतर राज्यातील अभ्यासकांनी सहभाग नोंदविला होता.

दि. ७ ऑक्टोबर २०२३ वार, शनिवार रोजी खेरुडकर मंगल कार्यालय सभागृहात उद्घाटनाचा समारंभ सुरू झाला. सभागृहाच्या बाहेरील बाजूस पुस्तकांची दुकाने थाटली गेली होती. वेगवेगळ्या स्टॉलवर वाचकवर्गाची गर्दी पाहायला मिळत होती. सभागृहात प्रवेश करतेवेळी दर्शनी भागामध्ये विवेक जागर परिषदेचे बोधचिन्ह तथा लोकायत विचारमंचच्या बोधचिन्हाने काढलेली रांगोळी श्रोत्यांची व दर्शकांची मने वेधून घेत होती. या रांगोळीसाठी बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी परिश्रम घेतले.

उद्घाटन समारंभप्रसंगी प्रमुख व्याख्याते दिल्ली येथील डॉ. अनिरुद्ध देशपांडे, प्राचार्या श्रीमती कविता प्राशर, प्रा. राजक्रांती वलसे (बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना), लोकायत विचारमंचचे माननीय मा.मा. जाधव, प्रागतिक इतिहास परिषदेचे माननीय डॉ. नारायण भोसले, डॉ. उमेश बगाडे (डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर), ७ व्या विवेक जागर परिषदेचे स्वागताध्यक्ष कॉ. अण्णा सावंत यांच्या उपस्थितीमध्ये उद्घाटन समारंभाची सुरुवात झाली. तत्पूर्वी नोंदणी कक्षावरील नोंदणी करत आलेल्या अभ्यासकांनी आणि सहभागी सदस्यांनी परिषदेसाठी हजेरी लावलेली होती.

उद्घाटन समारंभाच्या सुरुवातीला शाहीर रवी मापारी यांच्या क्रांतिगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर भीमगीताचे गायन झाले. मुख्य कार्यक्रमाची सुरुवात महात्मा ज्योतिबा फुले यांचे समग्र वाडमय, लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांचे समग्र वाङ्मय, संत तुकाराम यांची अभंगगाथा यासारख्या ग्रंथांना अभिवादन करत पुष्प अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन प्रा. प्रमोदकुमार जायभाये यांच्या समवेत सभागृहातील सर्वांनी एकत्रित उच्चारण केले.

उद्घाटन समारंभामध्ये स्वागतपर भाषणात सातव्या विवेक जागर परिषदेचे स्वागताध्यक्ष कॉ. अण्णा सावंत यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांच्या मनोगतामध्ये जालना शहरातील या परिषदेचे आयोजन करण्यामागची भूमिका, संयोजन समितीच्या कार्याचा आढावा, जालना या व्यापारी शहराचे सांस्कृतिक महत्त्व, तेथील उद्योजकता, कामगारवर्ग, विविध राजकीय, सामाजिक, कामगार, सांस्कृतिक चळवळी, १९७४ चे मराठवाडा विकास आंदोलन व विद्यार्थी चळवळ या सर्वांचा आढावा घेत विवेकवादी विचारांचा प्रचार, प्रसार व प्रासंगिकता यांचे महत्त्व त्यांनी त्यांच्या मनोगतामध्ये व्यक्त केले.

जालना शहराची वैचारिक भूक भागवत असतानाच, तसेच या शांत शहरामध्ये असलेले सामाजिक व सांस्कृतिक एकोप्याचे वैशिष्ट्य, हिंदू- मुस्लीम- ख्रिश्चन सांस्कृतिक एकता या सर्व बाबींचा उल्लेख करत कॉ. श्री. आण्णा सावंत यांनी सर्वांचे मनःपूर्वक स्वागत केले.

तसेच, त्यानंतर लोकायत विचार मंचची सातव्या विवेक जागर परिषदेची भूमिका लोकायत विचार मंचचे सन्माननीय मा. मा. जाधव यांनी विशद केली. आजवर पार पडलेल्या पूर्वीच्या सहा परिषदांचा आढावा घेत नरेंद्र दाभोलकर, कॉ. गोविंद पानसरे अशा विवेकवादी विचारवंताचा भ्याड खून करून विवेकवादी विचार संपवण्याचा मनोदय असणाऱ्यांचा केवळ शाब्दिक कृतीतून निषेध न करता संवैधानिक मार्गाने विवेक जागर परिषदेची पायाभरणी झाली आणि विवेकवादी विचारांचा एल्गार नांदेड, लातूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, परभणी, वसमत अशा ठिकाणांहून देत देत सातवी विवेक जागर परिषद जालना येथे उभी राहिली आहे, असे ते म्हणाले.

या परिषदेतील विषय, व्याख्याते यासंदर्भात माहिती देत पूर्वीच्या परिषदेत येऊन गेलेल्या महनीय विद्वजनांची शब्दओळखही श्री मा.मा. जाधव यांनी उपस्थितांना करून दिली व उपस्थित त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे, अभ्यासक आणि रसिक श्रोते आणि चिंतक, व्याख्याते या सर्वांचे आभार मानले.

**उद्घाटन सत्र : पहिले** : दिल्ली येथील डॉ. अनिरुद्ध देशपांडे यांच्या 'अभिजनवादी इतिहास लेखन' या विषयावरील भाषणाने पहिले सत्र गाजले. अभिजनवादी इतिहासलेखन व लोकप्रिय इतिहासलेखन तथा वंचित वर्गाच्या इतिहास लेखनाच्या विविध पैलूंचा त्यांनी आढावा घेत अभ्यासकांच्या आणि श्रोत्यांच्या बुद्धीला आवाहन केले.

ब्राह्मण असो की उलेमा प्रत्येक धर्मातील शिक्षित वर्गाने राज्यकर्ते, शासक, प्रस्थापित वर्ग, व्यवस्थेचे हितसंबंध जोपासत इतिहासलेखन केले. परिणामी, शेतकरी, मजूर, महिला असा अशिक्षित मोठा समूह त्यांचे इतिहासातील योगदान दुर्लक्षित झाले. त्यामुळे शिक्षण घेऊन भूतकाळातील इतिहासाला प्रश्न विचारले पाहिजेत आणि दुर्लक्षित समूह घटकांच्या इतिहास लेखनासाठी अभिजनवादी इतिहास लेखनाऐवजी वंचितांच्या लोकप्रिय इतिहासलेखनाच्या अंगाचा स्वीकार केला पाहिजे असेही डॉ. देशपांडे म्हणाले.

याप्रसंगी प्रबोधन मंचावर स्वागताध्यक्ष कॉम्रेड अण्णा सावंत, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कविता प्राशर, डॉ. उमेश बगाडे, लोकायत विचारमंचचे मा.मा. जाधव, प्रागतिक इतिहास संस्थेचे डॉ. नारायण भोसले, स्थानिक संयोजन समितीचे सदस्य, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाचे प्रा. राजक्रांती वलसे, स्थानिक संयोजन समितीचे प्रा. प्रमोदकुमार जायभाये यांची उपस्थिती होती.

उद्घाटन सत्र तथा प्रथम सत्राच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रमोदकुमार जायभाये यांनी केले तर प्रा. राजक्रांती वलसे यांनी आभार मानले.

प्रथम सत्रातील दुसरे व्याख्याते प्रोफेसर माननीय डॉ. उमेश बगाडे (डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद/ छत्रपती संभाजीनगर) यांचे 'फुले - आंबेडकरवादी दृष्टिकोनातून इतिहास लेखन' या विषयावर अभ्यासपूर्ण भाष्य झाले. फुले - आंबेडकर

यांनी इतिहासलेखनाचा मूळ गाभा शोषित- वंचित, कष्टकरी -शेतकरी -मजूर- दलित यांच्या इतिहासाचा धांडोळा घेऊन त्यांची वैचारिक बैठक घडविण्यात आहे असे प्रतिपादन केले.

त्याचप्रमाणे विवेकी विचाराचा जागर करताना वर्चस्ववादी सत्व हे बहुसंख्याक होणं आणि बहुजनांच्या तत्त्वाचं अल्पसंख्यांकिकरण होणे या संकल्पनेचा डॉ. उमेश बगाडे सर यांनी विस्तृत आढावा घेतला.

या व्याख्यानानंतर श्रोत्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे डॉ. बगाडे सर आणि इतरांनी दिली. या प्रश्नोत्तर संवादात डॉ. बी.एच. मस्के, डॉ. मारुती तेगमपुरे, प्रा. रावसाहेब ढवळे यांनी सहभाग नोंदविला. या सत्राचे आभार प्रा.डॉ. गजानन अवचार यांनी मानले.

**भोजन सत्र** : उद्घाटनाचा कार्यक्रम थोडासा अंमल उशिराने सुरू झाल्याने भोजनाचे सत्र लवकर आटोपून वेळेवर दुपारच्या सत्राचे नेटके आयोजन करण्यात आले. दुपारच्या भोजन सत्रसमयी विविध प्रकाशन संस्था तथा विविध पुस्तक विक्रेते यांना नेमून दिलेल्या ठिकाणी पुस्तकांची मांडणी आकर्षक पद्धतीने केलेली होती. तिथे आलेले रसिक, श्रोते, अभ्यासक, चिंतक, वाचक हे पुस्तके चाळताना व खरेदी करताना त्या ठिकाणी आढळून आले. वाचक मंडळींचा पुस्तक प्रदर्शनास भरघोस असा प्रतिसाद दिसून येत होता.

भोजन सत्रानंतर दुपारच्या द्वितीय सत्रात माननीय डॉ. श्रीमंत कोकाटे यांचे 'शिवकालीन इतिहासलेखन: विकृती आणि सांस्कृतिक राजकारण' या विषयावर व्याख्यान झाले. भाषणाच्या अनुषंगाने सध्या महाराष्ट्रात गाजत असलेले मराठा आरक्षण मिळू न देण्याला खरे जबाबदार ७० वर्षांपासून राजकारणात प्रस्थापित असलेले नेते आहेत. कष्टकरी, गरीब मराठ्यांना आरक्षण मिळू नये, यासाठी राजकारणातील सरंजामी नेते कारणीभूत आहेत. आरक्षण लढाईत ब्राह्मण व इतर समाजाला दोष देऊन काय फायदा आहे, असा सवाल करीत श्रीमंत कोकाटे यांनी आपल्या भाषणातून राजकीय क्षेत्रात चालणारे जात- धर्माच्या ध्रुवीकरणाने इतिहासलेखनात विकृती निर्माण होत असल्याचे अधोरेखित केले. त्याचबरोबर महात्मा फुले यांनी सर्वप्रथम तत्कालीन ग्रँट डफ यांचे इतिहासलेखन व बखर यांचा आधार घेत विवेक आणि सत्याच्या बळावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर सर्वप्रथम १०८ ओळींचा पोवाडा लिहून शिवकालीन इतिहासलेखनाचा प्रारंभ करणारे महात्मा फुले हे आद्य इतिहासकार आहेत असे प्रतिपादन केले.

यानंतर याच सत्रामध्ये सोलापूर येथील सरफराज अहमद यांचे 'दख्खनी वारसा' या विषयावर व्याख्यान झाले. या अनुषंगाने त्यांनी औरंगाबाद शहर हे दख्खनी मुस्लिमांच्या राष्ट्रीयत्वाचा आधार आहे. तिथे कदिम ऊर्दू म्हटल्या जाणाऱ्या दख्खनीचा जन्म झाला. दख्खनी उर्दू भाषेच्या पहिल्या फळीतील साहित्य औरंगाबादमध्ये निर्माण झाले, दख्खनी मुस्लिमांच्या मानवी मूल्यांचा वारसा औरंगाबाद परिसरातील मातीत सामावला असून ते जपणे गरजेचे आहे. राजू खताल याजपासून ते जरीबक्ष यांच्यापर्यंत शेकडो सुफींची स्मारके औरंगाबाद शहरात असल्याने औरंगाबादचे नामांतर चुकीचे आहे, असे मत सरफराज अहमद यांनी 'दख्खनी वारसा' या विषयावर मनोगत व्यक्त करताना केले. त्याचबरोबर सोलापूर, बीदर परिसरातील सांस्कृतिक, ऐतिहासिक संदर्भाचा आढावा सरफराज अहमद यांनी मांडला. या द्वितीय सत्राच्या दोन्ही व्याख्यानांच्या अनुषंगाने प्रा. डॉ. यशवंत सोनुने यांनी आभार व्यक्त केले.

**तृतीय सत्र** : दुपारच्या तृतीय सत्रात जळगाव येथील प्रा. देवेंद्र इंगळे यांनी 'भारताची परिकल्पना' या विषयावर आपले व्याख्यान दिले. याप्रसंगी डॉ. देवेंद्र इंगळे यांचे स्वागत लोकायत विचार मंचचे सदस्य माननीय नवनाथ गोरे यांनी केले. त्यांच्या भाषणात प्रा. देवेंद्र इंगळे यांनी 'आयडिया ऑफ इंडिया' च्या अनुषंगाने अनेक विषयांना एकमेकांशी जोडत, इतिहास हा मध्यवर्ती घटक ठेवून मांडणी केली. देशातील ६०% संपत्ती ठरावीक वर्गाकडे तर ७८% लोकसंख्येकडे जुजबी संपत्ती आहे. त्यामुळे टोकाची आर्थिक विषमता तयार झाली आहे. आरक्षणामुळे मिळालेल्या आर्थिक,

सामाजिक प्रगतीच्या संधी खाजगीकरणाच्या माध्यमातून व्यावहारिक दृष्टीने हिसकावून घेतल्या जात आहेत. अशा स्थितीत ऐतिहासिकदृष्ट्या पिळलेले, शोषित सर्व घटकांनी एकत्र येऊन आर्थिक विषमतेविरुद्ध तसेच संसाधने, साधनसंपत्तीच्या समन्यायी वाटपासाठी सामूहिक लढा उभारायला हवा असे त्यांनी प्रतिपादन केले.

त्याचबरोबर हिंदुत्व हा राजकीय प्रवाह, विचारधारा असून हिंदू धर्माशी त्याचा काही संबंध नाही असे इंगळे यांनी स्पष्ट केले. ज्यांनी आर्यत्वाचे गोडवे गायिले, ब्राह्मण असल्याचा अहंभाव मिरवला अशा व्यक्तींनी शंभर वर्षांपूर्वी स्थापन केलेली ही चळवळ असल्याचे सांगितले. प्रतिनिधित्वाच्या राजकारणाचा इतिहास मांडताना प्रा. इंगळे यांनी राज्यकारभारात सहभाग मिळविण्यासाठी निर्माण झालेली काँग्रेस, मुस्लीम लीग, हिंदू महासभा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची वाटचाल नमूद केली. सत्यशोधक आणि ब्राह्मणेतर चळवळींना शह देण्यासाठी हिंदू अस्मिता उभी राहिली. यात समस्त हिंदूंच्या मुक्तीचा विचार कुठेही दिसत नाही. आज बालमृत्यू, साथरोगाने होणारे मृत्यू, शेतकऱ्यांच्या आत्महत्या यात सर्वाधिक हिंदूच आहेत. हिंदुत्वाचा मुखवटा धारण करून बड्या शोषक वर्गाचे हितसंबंध जोपासले जात असून धार्मिक, सांस्कृतिक संसाधनांचा वापर करून जनतेला बधिर केले जात असल्याचे त्यांनी सांगितले. या सत्राचे सूत्रसंचालन तथा आभार प्रा. राज्यक्रांती वलसे यांनी केले.

चहापानानंतर या अगोदरील दिवसभराच्या सत्राच्या अनुषंगाने प्रश्नोत्तराचे सत्र पार पडले.

या सत्रासाठी डॉ. नारायण भोसले यांचे स्वागत डॉ. बाबासाहेब मस्के यांच्या हस्ते ग्रंथभेट देऊन करण्यात आले. डॉ. जगदीश सोनवणे यांचे स्वागत व सत्कार संयोजन समिती सदस्य ॲड. शिवाजीराव आदमाने यांच्या हस्ते ग्रंथभेट देऊन करण्यात आले.

माननीय देवेंद्रजी इंगळे यांचे स्वागत व सत्कार बदनापूर येथील प्रा. डॉ. शफी शेख यांनी ग्रंथभेट देऊन केला.

या सत्राचे सूत्रसंचालन डॉ. मारुती तेगमपुरे यांनी केले. या सत्रात नांदेड येथील डॉ. दिलीप चव्हाण, डॉ. बी.एच. मस्के व इतर अभ्यासकांनी विचारलेल्या प्रश्नांना जगदीश सोनवणे, नारायण भोसले, प्रा. देवेंद्र इंगळे, मा.मा. जाधव यांनी उत्तरे देऊन समाधान केले. उपस्थित केलेल्या लिखित प्रश्नांचे वाचन सूत्रसंचालक डॉ. मारुती तेगमपुरे यांनी केले. या सत्राचे आभार शेख अहमद यांनी मानले. या सत्रासाठीचे समन्वयक म्हणून डॉ. निशिकांत लोखंडे यांनी परिश्रम घेतले.

तत्पूर्वी पहिल्या दिवसाच्या शेवटच्या सत्रात शोधनिबंधाचे वाचन ठेवण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष जगदीश सोनवणे होते. अध्यक्ष जगदीश सोनवणे यांचे स्वागत प्रा.विलास भुतेकर यांनी केले. त्याचबरोबर शोधनिबंधवाचक प्रा. नारायण पाटील यांचे स्वागतही प्रा. विलास भुतेकर यांनी केले. जगदीश सोनवणे यांनी निबंधवाचक व संशोधन यासंदर्भात मौलिक सूचना करत सत्राचे अध्यक्षपद भूषविले. 'अनिष्ट रूढी, प्रथा अंधश्रद्धा निर्मूलन कार्यक्रम : इतिहास आणि वर्तमान वर्तमानकालीन स्थिती' यावर प्रा. नारायण पाटील यांनी शोधनिबंधाचे वाचन केले. या सत्रानंतर पहिल्या दिवसाचे सर्व सत्र संपले. सायंकाळी सहभागी निमंत्रक, अभ्यासक यांच्याकरिता संयोजन समितीच्या वतीने खेरुडकर मंगल कार्यालयाच्या भोजनकक्षात भोजन व्यवस्था उत्तम पद्धतीने करण्यात आली होती.

दिवसभरातील सर्व सत्रांच्या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. यासंदर्भात शेख अहमद यांनी सूचना केल्या. जय संविधान! भारत माता की जय! या घोषणांनी सभागृह दुमदुमले.

**दिवस दुसरा** : दिनांक ०८ऑक्टोबर २०२३, रविवार रोजी सकाळच्या पहिल्याच सत्रात व परिषदेच्या एकूण पाचव्या सत्रांमध्ये दिल्ली येथील डॉ. विकास गुप्ता यांचे 'राष्ट्रीय शिक्षण धोरण पाठ्यपुस्तके आणि इतिहासलेखन' या विषयावर भाषण पार पडले. एनडीए सरकारच्या पहिल्या काळात 'शिक्षणास सामाजिक दायित्वाच्या भावनेतून पाहणे शासनाने बंद करावे' असा अहवाल दोन मोठ्या भांडवलदारांनी दिला होता. त्यामुळे शिक्षणाची खरेदी –विक्री व्हावी, हा त्यांचा उद्देश

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात पुरेपूर अंतर्भूत झाला असून याच्या समर्थनार्थ केंद्र शासनाने संपूर्ण शक्ती पणाला लावली आहे. सोबतीला प्रगतिशील वर्गालाही घेतले आहे. संपूर्ण देशात एकच अभ्यासक्रम केंद्र शासन थोपवणार असून यातून शिक्षणाचे केंद्रीकरण होऊन राज्याचे अधिकार आपोआप संपुष्टात येतील, तर समूह शाळांमुळे आदिवासी, दलित, गोरगरिबांची मुले असा मोठा समूह शिक्षणापासून वंचित राहणार असल्याचा धोका विकास गुप्ता यांनी त्यांच्या भाषणांमध्ये व्यक्त केला.

शिक्षकांना पायपीट करण्यास लावणारे 'झोला छाप' धोरण असल्याची टीका करत नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे तांत्रिक विश्लेषण करण्याची गरज आहे. तसेच संविधानाची प्रास्ताविका, मूलभूत अधिकार आणि राज्यांचे विशेष अधिकार या तीन तत्त्वांवर शिक्षणव्यवस्था असावी, त्यासाठी प्रगत वर्गातून शैक्षणिक लढाई व्हावी अशी अपेक्षाही गुप्ता यांनी व्यक्त केली.

पाचव्या सत्रातील दुसरे वक्ते नाशिक येथील मा.श्री मिलिंद वाघ यांनी 'शिक्षणाचा इतिहास आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण' या विषयाअंतर्गत आपले विचार प्रकट केले. सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक चळवळींचा शैक्षणिक कार्यातील योगदानाचा आढावा घेत नोटबंदीप्रमाणे नवीन शैक्षणिक धोरणाकडे बहुजन समाजास आकर्षित केले असून आज आरक्षणासाठी चळवळी, आंदोलने होत असताना नवीन धोरणात शिक्षणाच्या संधी मिळतील का? असे प्रश्न समाजासमोर विचारावे लागतील असे मत डॉ. मिलिंद वाघ यांनी व्यक्त केले. समग्र शैक्षणिक परिस्थितीचा आढावा घेत भारतीय शासनास चीनप्रमाणे शिक्षणावर खर्च करावा लागेल. असेही श्री वाघ यांनी सांगितले.

त्यानंतर उपस्थितांच्या प्रश्नांना डॉ. विकास गुप्ता व डॉ. मिलिंद वाघ यांनी उत्तरे देऊन समाधान केले. या प्रश्नोत्तर चर्चा व संवाद कार्यक्रमात सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. दुपारच्या सत्रात कृषीभूषण विजय अण्णा बोराडे, प्रा. नारायण बोराडे, वकील, उद्योजक, जिल्हा परिषद व माध्यमिक उच्च माध्यमिक क्षेत्रात अध्यापन करणाऱ्या शिक्षक, प्राध्यापकवृंद यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

संयोजन समितीतील सदस्यांनी सकाळपासूनच्या सत्रातील झालेल्या वक्त्यांच्या भाषणावर प्रश्न- उत्तर संवाद, वक्ता-श्रोता संवाद कार्यक्रमाचे ऐनवेळी आयोजन करत कार्यक्रम एका उंचीवर नेऊन ठेवला. अनेक स्फोटक व विद्रोही विचारांना हात घालत समन्वयक, वैचारिक भूमिका घेत अभ्यासकांच्या उत्तराने विचारांच्या कक्षा रुंदावण्यात श्रोत्यांना मदत झाली असे आढळून आले. ■


## अक्षरगाथाचे वर्गणीदार व्हा!

- कोणत्याही महिन्यापासून वर्गणीदार होता येते.
- www.akshargatha.com या संकेतस्थळावर 'अक्षरगाथा'विषयी संपूर्ण माहिती उपलब्ध आहे.
- 'अक्षरगाथा' त्रैमासिक असून त्याच्या प्रकाशनाचा नियतकाल १० एप्रिल (एप्रिल-मे-जून), १० जुलै (जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर), १० ऑक्टोबर (ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर), १० जानेवारी (जानेवारी-फेब्रुवारी-मार्च) असा आहे.

## 'अक्षरगाथा'ला साहित्य पाठवताना

आपले लेखन सुवाच्य हस्ताक्षरात लिहिलेले वा टंकलिखित अथवा संगणकाद्वारे मुद्रित केलेले असावे. मुद्रित लेख श्रीलिपी ७०८ फॉण्ट मध्ये असावा.

# जालना शहर महानगरपालिका
# जालना

प्रशासकीय इमारत, रेल्वे स्टेशन रोड, जुना जालना-४३१२०३
कार्यालय संपर्क क्र. ०२४८२-२३०३५०
e-mail : comcjalna@gmail.com website : jalnamahaulb.maharashtra.gov.in

## डेंग्यू ताप प्रतिबंधासाठी जनतेस आवाहन



- डेंग्यू रोगाचा प्रसार एडीस इजिप्ती नावाच्या डासांमार्फत होतो.
- एडिस इजिप्ती डासांची उत्पत्ती रांजण, माठ, हौद, टाक्या यामधील स्वच्छ साठवलेल्या पाण्यात व कुलरमधील पाणी, छतावरील साचलेले पाणी, परिसरातील रिकाम्या बॉटल, नारळाच्या करवंट्या, निकामी टायर्स इ. मध्ये होते.
- रोग लक्षणेः ताप, डोकेदुखी, मळमळ, उलट्या, सांधेदुखी, अंगावर पुरळ येणे, अंगदुखी इत्यादी लक्षणे डेंग्यू रुग्णात आढळतात.
- डेंग्यू तापाचा प्रसार रोखण्यासाठी खालील उपाययोजना राबवाव्यात. आठवड्यातून एक कोरडा दिवस पाळावा. या दिवशी घरातील सर्व पाणीसाठे रिकामे करून त्यांच्या आतील बाजू व तळ घासून पुसून स्वच्छ करून कोरडे करावेत.
- पाणी साठ्यांचे साधन नियमितपणे पूर्ण झाकून ठेवावेत.
- साचलेल्या नाल्या, डबके वाहते करावे व वाहत्या करता न येणाऱ्या पाण्यात ऑईल, रॉकेल टाकावे.
- कोरडे करता न येणाऱ्या व डास आळ्या असलेल्या पाणीसाठ्यात आरोग्य कर्मचाऱ्याकडून ॲबेट टाकून घ्यावे.
- आवश्यक ठिकाणी आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत गप्पीमासे साडावेत.
- खिडक्यांना जाळीदार पडदे बसवावेत, डास प्रतिबंधात्मक साधनांचा व मच्छरदानीचा वापर करावा.
- डासांचा संपर्क टाळण्यासाठी दारं, खिडक्या सायंकाळी बंद ठेवाव्यात.
- घर व घराच्या शेजारील परिसर स्वच्छ ठेवावा.
- गावातील, परिसरातील व घराशेजारील गाजरगवत नष्ट करून परिसर स्वच्छ ठेवावा. शौचालयाच्या व्हॅट पाईपला जाळ्या बसवून घ्याव्यात.
- ताप आल्यास नजिकच्या प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, सरकारी दवाखाने, आरोग्य कर्मचारी यांच्याशी संपर्क साधावा.

Post Registration No. NND-372/2021-2023


# कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखाना लि.,अंकुशनगर



पो.अंकुशनगर - ४३१ २१२, ता.अंबड, जि.जालना (महाराष्ट्र)

**KARMAYOGI ANKUSHRAO TOPE SAMARTH SAHAKARI SAKHAR KARKHANA LTD., ANKUSHNAGAR**

Post. Ankushnagar - 431212, Tq. Ambad, Dist. Jalna (Maharashtra)



• GSTIN - 27AADAS8482L1ZS • PAN No.AADAS8482L • TAN No. NSKS06848C
• Regd. No. JAL/PRG/(A)-1, Date : 10/02/1982 • Phone & Fax No. (02483) 279623, 279624, 279629
• Mob.9623457070, 9623013007 • E-mail : samarthsugar@gmail.com • Website: www.samarthsugars.com

**कारखान्याची ठळक वैशिष्टये**

■ देश व राज्य पातळीवरील ३० पुरस्कार प्राप्त कारखाना. ■ कठोर परिश्रम आणि शिस्त. ■ शुभ्र दाणेदार साखरेचे उत्पादन. ■ ठिबक सिंचन योजना, माती परीक्षण योजना. ■ पर्यावरण संवर्धनासाठी कारखाना स्थळी झाडांची लागवड. ■ युनिट नं.१ अंकुशनगर प्रती दिन गाळप क्षमता ४००० मे. टन ■ युनिट नं.२ (सागर) तीर्थपुरी प्रती दिन गाळ क्षमता २५०० मे. टन ■ दोन्ही युनिटकडे ६०,००० लिटर प्रतिदिन क्षमतेचा डिस्टीलरी/इथेनॉल प्रकल्प. ■ युनिट नं.१ अंकुशनगरकडे १८ मेगावॅट सहवीज निर्मिती प्रकल्प. ■ प्रस्तावित ४००० ते ७५०० मे. टन प्रती दिन गाळप क्षमतेचा साखर कारखाना ■ १०० केएलपीडी क्षमतेचा डिस्टीलरी/इथेनॉल प्रकल्प. ■ समर्थ कंपोस्ट खत, समर्थ गांडुळ खत प्रकल्प कार्यान्वित. ■ सभासदांसाठी सवलतीचे दराने साखर वाटप, अपघात विमा योजना. ■ ऊस तोडणी मजुरांसाठी अपघात विमा योजना. ■ कारखाना कर्मचाऱ्यांसाठी वर्क्समन कॉम्पेन्सेशन पॉलीसी, ग्रुप ग्रॅच्युईटी स्कीम, ग्रुप पर्सनल ॲक्सीडेंट बेनीफीट पॉलीसी, ग्रुप लिव्ह इन-कॅशमेंट पॉलीसी, आरोग्य केंद्र, रुग्णवाहिका, निवास व्यवस्था इत्यादी सुविधा. ■ कर्मयोगी अंकुशराव टोपे यांचे भव्य स्मारक व पुर्णाकृती पुतळा.



**आ. राजेश टोपे**
माजी सार्वजनिक आरोग्य
व कुटुंब कल्याण मंत्री
महाराष्ट्र राज्य

कार्यकारी संचालक | व्यवस्थापकीय संचालक | उपाध्यक्ष | अध्यक्षा

**व मा. संचालक मंडळ**

---

जालना एज्युकेशन सोसायटीचे,

# आर.जी. बगडिया कला, एस.बी. लखोटिया वाणिज्य आणि आर. बेझंजी विज्ञान महाविद्यालय, जालना

आज़ादी का अमृत महोत्सव

## सातव्या विवेकजागर परिषदेस हार्दिक शुभेच्छा!



**कनिष्ठ महाविद्यालयातील अभ्यासक्रम आणि वरिष्ठ अभ्यासक्रमातील बी.ए., बी.कॉम.,बी.एस्सी.,बी.सी.ए., बी.व्होक, पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच संशोधन केंद्रे**

### ❁ महाविद्यालयाची वैशिष्ट्ये ❁

*अनुभवी आणि उच्चशिक्षित प्राध्यापक वर्ग, *भव्य क्रिडांगण व सुसज्ज ग्रंथालय, *डिजिटल वर्ग खोल्या, * मुला-मुलींसाठी स्वतंत्र वस्तीगृह, *महात्मा गांधी अध्ययन केंद्र, *स्पर्धा परीक्षा अभ्यासिकेची सुविधा, *शासकीय शिष्यवृत्ती, *करिअर मार्गदर्शन, *NCC, NSS, *CET साठी नि:शुल्क मार्गदर्शन वर्ग, *पारंपारिक अभ्यासक्रम व्यतिरिक्त कौशल्य विकास अभ्यासक्रम करण्याची सुविधा. *खगोल प्रेमीसाठी आधुनिक दुर्बिण.

पी.आर. बगडिया — अध्यक्ष | एस.जी. भक्कड — सचिव | जी.एम. अग्निहोत्री — प्राचार्य


'अक्षरगाथा'च्या वर्गणीसाठी QR कोड

'अक्षरगाथा' हे त्रैमासिक मुद्रक प्रल्हाद उत्तमचंद साहनी यांनी मुद्रा ऑफसेट प्रिंटर्स ॲन्ड प्रोसेसर्स, शारदा टॉकीजजवळ, एम.जी. रोड, नांदेड - ४३१ ६०३ येथे मुद्रित करून प्रकाशक अर्चना माधवराव जाधव यांनी बळीवंश प्रकाशन, 'बळीवंश', नृसिंह पॅलेसच्या मागे, नरहरनगर, नांदेड - ४३१ ६०५ येथे प्रकाशित केले.
संपादक : डॉ. जाधव माधवराव मारोतराव.
RNI : MAHMAR 2010/35743
Cell : 09881191543, 09422874336 e-mail : akshargatha@gmail.com www.akshargatha.com